

आर.के.नारायण

# गाइड



अनुवाद
उल्का राऊत

रोहन
प्रकाशन

# गाइड

।। रोहन प्रकाशन ।।

आर.के . नारायण  ह्यांचा जन्म १० ऑक्टोबर १९०६ रोजी चेन्नई येथे झाला. त्यांचं बालपण चेन्नई येथे त्यांच्या आजोळी व्यतीत झालं. त्यांच्या वडिलांची ‘महाराजा हायस्कूल’, म्हैसूर येथे बदली झाल्यानंतर ते आपल्या कुटुंबासह म्हैसूर येथे वास्तव्यास होते.

आर.के. नारायण यांनी आपल्या साहित्यलेखनाची सुरुवात ‘स्वामी अँड फ्रेंड्स’ (१९३५) या पुस्तकाने केली. मालगुडी या काल्पनिक गावातील सर्वसामान्य माणसाचं आयुष्य सहज, ओघवत्या शैलीतून आणि मार्मिक विनोदातून चितारणं ही त्यांची खासियत!

आर.के. नारायण यांना अनेक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आलं आहे. ‘गाइड’ या त्यांच्या कादंबरीला साहित्य अकादमी ॲवॉर्ड आणि रॉयल सोसायटी ऑफ लिटरेचरतर्फे दिलं जाणारं ए.सी. बेन्सन मेडल प्राप्त झालं आहे. अनेक विख्यात विद्यापीठांकडून त्यांना डी.लिट्. ही पदवी बहाल करण्यात आली आहे. १९६४ साली त्यांना पद्मभूषण तर २००० साली पद्मविभूषण सन्मान प्राप्त झाला. १९८९ मध्ये त्यांना राज्यसभेचं सभासदत्व बहाल करण्यात आलं.

या महान लेखकाचा मृत्यू १३ मे २००१ रोजी वयाच्या ९४व्या वर्षी झाला.

•*आर.के. नारायण यांची निवडक ग्रंथसंपदा :*

•The Bachelor of Arts (१९३७)

•The Dark Room (१९३८)

•The English Teacher (१९४५)

•The Financial Expert (१९५२)

•The Guide (१९५८)

- The Man-Eater of Malgudi (१९६१)
- The Vendor of Sweets (१९६७)
- The Ramayana (१९७२)
- The Mahabharata (१९७२)
- Malgudi Days (१९८२)
- The Grandmother's Tale (१९९३)

# गा इ ड

## आर.के.नारायण

१

अनुवाद

## उल्का राऊत

संस्थापक: मनोहर च ंपानेरकर

प्रकाशक

प्रदीप चंपानेरकर

रोहन प्रकाशन

'धवलगिरी' शॉप ५ व ६
४३० वीर मारुतीसमोर, पुणे ४११ ०३०.
दूरध्वनी : २४४८०६८६

rohanprakashan@gmail.com
www.rohanprakashan.com

या पुस्तकातील कोणताही मजकूर, कोणत्याही स्वरूपात वा माध्यमात पुनर्प्रकाशित अथवा संग्रहित करण्यासाठी लेखक आणि प्रकाशक दोघांचीही लेखी पूर्वपरवानगी घेणे बंधनकारक आहे. तसेच पुस्तकाचं मुखपृष्ठ, आतील मांडणी व टाइपसेटिंग यावरचे सर्वाधिकार प्रकाशकाकडे आहेत. कोणत्याही स्वरूपात त्यांचा वापर पुनर्प्रकाशित करण्यासाठी करणे असल्यास त्यासाठी प्रकाशकाची लेखी परवानगी घेणे बंधनकारक राहील.

।। गाइड ।।

प्रकाशन प्र. : ४००

पहिली आवृत्ती : ऑगस्ट १५, २०१५

Marathi Translation © Rohan Prakashan

Marathi Translation of 'THE GUIDE '

Published in arrangemet with

THE LEGAL HEIRS OF R.K. NARAYAN

© Legal Heirs of R.K. Narayan

मुखपृष्ठ व मांडणी : चंद्रमोहन कुलकर्णी

ISBN 978-93-82591-76-4४

# अनुवादिकेचं मनोगत

आतापर्यंत माझ्याकडून अनेक उत्तमोत्तम पुस्तकांचे अनुवाद झाले आहेत. त्यांत आर.के. नारायण यांच्या पुस्तकाचाही अनुवाद करायची संधी मला काही वर्षांपूर्वी मिळाली आहे. 'रोहन प्रकाशन'नेच यापूर्वी आर.के. नारायण यांच्या चार सुप्रसिद्ध पुस्तकांच्या अनुवादाचा प्रकल्प हाती घेतला होता. त्या प्रकल्पातील *'द इंग्लिश टीचर'* या पुस्तकाचा अनुवाद मी केला होता. नारायण ह्यांची सहजसुंदर भाषा, ओघवती कथनशैली आणि चित्रवत वर्णन करण्याची शैली ह्या वैशिष्ट्यांमुळे अनुवादाचा तो अनुभव खूपच आनंददायक ठरला होता. त्यानंतर 'रोहन प्रकाशन'चे प्रदीप चंपानेरकर आर.के. नारायण यांच्या *'द गाइड'* या पुस्तकाचे हक्क घेणार आहेत ह्या गोष्टीचा सुगावा लागताच मी तातडीने 'अनुवाद मीच करणार' असा क्लेम लावून अक्षरश: हक्कच प्रस्थापित केला. ह्यामागे अनेक कारणं होती. सहज सोपी लेखनशैली असलेल्या आर.के. नारायण यांच्या या पुस्तकाचा चाकोरीबाह्य विषय, त्यात असलेली नाट्यमयता, कथेतील वैशिष्ट्यपूर्ण व्यक्तिरेखा या सर्वांमुळे हे पुस्तक मला साद घालत होते आणि त्याचबरोबर एका फ्रेंच प्रकाशकाने संकलित केलेल्या *'१००० Books You Must Read Before You Die'* ह्या यादीत *'द गाइड'चा* समावेश केला असल्याने या पुस्तकाविषयी अप्रूपही होतं. आणखी एक महत्त्वाचं कारण म्हणजे या कादंबरीवर बेतलेला विजय आनंद दिग्दर्शित 'गाइड' हा चित्रपट!

या चित्रपटाचं गारुड आज ५० वर्षांनंतरही ओसरलेलं नाही. 'गाइड' हा सिनेमा अनेक अर्थांने वैशिष्ट्यपूर्ण ठरला. राजू गाइड आणि विवाहित रोझीचे प्रेमसंबंध हा त्या काळच्या मानाने फारच धाडसी विषय होता. देव आनंद आणि वहिदा रेहमान ह्यांनी, तसंच अन्य साहाय्यक कलाकारांनी समर्थपणे रेखाटलेल्या व्यक्तिरेखा आणि चित्रपटाचं दिग्दर्शन, संगीत, सारंच अविस्मरणीय होतं. हा संपूर्ण चित्रपट सर्वच दृष्टीने सर्जनशीलतेचा एक उत्तम नमुना होता.

अनुवाद करताना सुरुवातीला पुस्तकाची चित्रपटाशी तुलना करणं अपरिहार्य होतं. धोती आणि कोट, फाटकी गंजी घालणारा पुस्तकातील 'रेल्वे राजू' आणि चित्रपटातला देव आनंदचा 'स्टायलिश राजू गाइड' ह्यांचा मेळ बसायला थोडा अवधी जावा लागला. पुस्तक जसंजसं वाचत गेले तसंतसं मात्र चित्रपटाचा विसर पडत गेला आणि मी पुस्तकातील राजूच्या कहाणीमध्ये पूर्णत: गुंतून गेले.

राजूच्या जीवनप्रवासात मालगुडी स्टेशनला अनन्यसाधारण महत्त्व आहे. तिथे दुकान चालवणारा राजू प्रेक्षणीय स्थळांची विशेष माहिती नसतानाही, केवळ बेमालूम थापा मारण्याचं कसब अंगी असल्याने बघता बघता पर्यटकांचा आवडता गाइड बनतो. राजूच्या एकमार्गी आयुष्यात कमालीची नाट्यमय उलथापालथ करणाऱ्या व्यक्ती म्हणजे रोझी आणि मार्को. त्यांच्याशी त्याची प्रथम भेटही स्टेशनवरच होते.

पुरातत्त्वज्ञ मार्को उच्चकुलीन असतो. पुरातनकालीन मूर्तींच्या शोधात आणि उत्खननात कायम रममाण असणारा, काहीसा नीरस आणि पोक्त, रूक्ष अशा प्रवृत्तीचा. त्याच्या अगदी विरुद्ध आयुष्य जगणारी रोझी! देवदासी कुळातून आलेली. तिने आपला पेशा घेऊ नये यासाठी तिची आई रोझीला उच्च शिक्षण देते. त्याचबरोबर रोझी नृत्यकलेचेही धडे घेते. आणि नृत्य म्हणजे तिचा श्वास होऊन जातो. नृत्यातच प्रावीण्य मिळवावं, नाव कमवावं याचा जणू ती ध्यासच घेते. दोन टोकाचे असे हे नवरा-बायको आणि त्यांना भेटलेला राजू गाइड! कोणतंच ध्येय नसलेला... मात्र जेव्हा तो रोझीचं नृत्यप्रेम बघतो तेव्हा थक्क होऊन जातो. नवऱ्याच्या प्रेमाला मुकलेली, स्वत:चं स्वतंत्र अस्तित्व जपणारी रोझी त्याला मोहवून टाकते. नृत्यकलेत निपुण होण्याचा तिचा ध्यास त्याला स्वत:चंच जीवनध्येय वाटू लागतं. एकदा प्रसिद्धी मिळायला लागल्यावर, रोझी लोकप्रिय होऊ लागल्यावर मात्र तो भरकटतो. एका प्रकरणात अडकून तुरुंगाची वारीही करून येतो. तुरुंगातून बाहेर आल्यावरचा राजू मात्र पूर्ण वेगळा आहे. एकाच पात्रातली ही दोन आवर्तनं आर.के. नारायण यांनी ताकदीने

उभारली आहेत. एकमेकांमध्ये गुंतलेल्या या पात्रांमधून पुढे जाणारी कथा हळूहळू मनाचा ठाव घेते. राजूच्या व्यक्तिरेखेतलीप्रत्यंतरं आणि रोझीची निश्चयी व आत्मनिर्भर व्यक्तिरेखा हाच या कथेचा आत्मा आहे.

ही कादंबरी वाचताना त्यातील एक एक व्यक्तिरेखा किती जिवंतपणे रेखाटली आहे याचा प्रत्यय येत होता- मग ती राजूची असो किंवा रोझीची. किंवा अगदी वेलनचीही! त्यांचे स्वभावविशेष, एखाद्या प्रसंगात प्रकर्षाने जाणवणारा त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा पैलू आणि संपूर्ण कथनामध्ये या व्यक्तिरेखांची आपसातली गुंफण खूपच मनोवेधक आहे.

अशा पुस्तकाचा अनुवाद करणं हा माझ्यासाठी एक सुंदर अनुभव ठरला. गाइडचा अनुवाद मीच करावा यासाठी मी आग्रही होते. त्यामुळे तो उत्तम आणि निर्दोष व्हावा अशी माझी प्रामाणिक इच्छा होती. त्यातच प्रकाशक प्रदीप चंपानेरकर यांना 'गाइड'विषयी विशेष ममत्व असल्याने मनावर एक प्रकारचं दडपणही होतं. या कादंबरीवर बेतलेला 'गाइड' हा चित्रपट चंपानेरकर यांचा जणू अभ्यासाचाच विषय! हा चित्रपट त्यांनी ३५-४० वेळा पाहिला आहे, आणि विविध अंगांनी हा चित्रपट समजून घेण्याचा प्रयत्न केला आहे. चित्रपट बघताना प्रत्येक वेळी चित्रपटातील विविध सौंदर्यस्थळांचं आणि वेगवेगळ्या बारकाव्यांचं आकलन त्यांना झालं आहे. ही अद्भुत माहिती मला समजली होती. त्यामुळे या कादंबरीचा अनुवाद करताना मी पुष्कळ काळजी घेतली. अनुवाद पूर्ण झाल्यानंतर चंपानेरकर यांनी 'अनुवाद उत्तम जमला आहे' अशी आवर्जून दाद दिली, तेव्हा कुठे माझ्या मनावरचं दडपण ओसरलं.

अशा अभिजात साहित्यकृतीचा अनुवाद करताना मला मोठा आनंद मिळाला आहे. वाचकांच्याही पसंतीला हा अनुवाद उतरल्यास माझा आनंद द्विगुणित होईल, आगळं समाधान लाभेल...

## उल्का राऊत

२३०३ प्रिंग्स, जी.डी. आंबेकर मार्ग

दादर पूर्व, मुंबई ४०००१४. मोबाईल : ९८२१०९१३१९

Email : ulkaraut२११@gmail.com

# १

तो आल्यामुळे सभोवतालच्या नीरव एकांताचा भंग झाला, त्यामुळे राजूला बरं वाटलं. राजूच्या चेहऱ्याकडे तो मोठ्या भक्तिभावाने पाहत राहिला.

राजूला त्याची गंमत वाटली, थोडा संकोचदेखील वाटला. त्याची भावपूर्ण समाधी भंग करण्याचा उद्देशाने राजू म्हणाला, "हवं तर बसा ना." कृतज्ञतेने मान डोलावून तो इसम घाटाच्या पायऱ्या उतरून खाली गेला. नदीच्या वाहत्या पाण्यामध्ये हातपाय आणि चेहरा स्वच्छ धुऊन, खांद्यावरच्या पिवळ्या चौकटीच्या उपरण्याने चेहरा टिपत तो वर आला. नदीकाठावरील पुरातन मंदिराच्या बाजूला, एका खडकावर सिंहासनावर विराजमान व्हावं अशा रुबाबात राजू मांडी ठोकून बसला होता. तिथेच दोन पायऱ्या सोडून खालच्या बाजूला तो इसम आसनस्थ झाला. अंधाराचं साम्राज्य पसरू लागलं होतं. पक्षीमाकडांची तीरावरील झाडांवर विसावण्यासाठी लगबग सुरू होती. त्यांच्या गोंधळामुळे पानं सळसळत होती, फांद्याही कंप पावत होत्या. दूरवर, पर्वतराजींमधून अस्ताला जाणारा सूर्य डोकावत होता. तो माणूस काही बोलेल म्हणून राजूने थोडा वेळ वाट पाहिली. पण तो विनम्रपणे शांत बसून होता. अखेर राजूनेच संभाषणाला तोंड फोडलं.

"कोणत्या गावचे तुम्ही ?" हा प्रश्न विचारताना राजूच्या मनात धाकधूक होत होती. त्यानेही आपल्याला हा प्रश्न विचारला तर ?

"मी मंगला गावचा आहे," तो उत्तरला.

"मंगला कुठे आलं ?"

त्याने हात उंचावून पलीकडच्या किनाऱ्याकडे निर्देश केला. "इथून फार लांब नाही." मग स्वत:हूनच पुढे म्हणाला, "माझी लेक इथे जवळच राहते. तिलाच भेटायला गेलो होतो. आता घरी चाललोय. 'रात्री जेवूनच निघा' असा तिने खूप आग्रह केला, पण मी दुपारच्या जेवणानंतर

निघालोच. थांबलो असतो तर घरी पोचायला मध्यरात्र झाली असती. म्हणजे मी घाबरतो असं नाही, पण आरामात झोपायचं सोडून रात्रभर तंगड्या तोडायच्या हे मला मान्य नाही.”

“अगदी बरोबर,” राजूने त्याच्या हुशारीला दाद दिली.

माकडांची चर्पटपंजरी ऐकत दोघंही काही काळ स्वस्थ बसले. नंतर काहीतरी आठवावं तसं तो म्हणाला, “माझ्या बहिणीच्या मुलाबरोबरच मुलीचा विवाह झालाय. नातंच असल्याने तिला कसला त्रास नाही. बहीण आणि लेकीला भेटण्यासाठी मी वरचेवर जात असतो, पण कोणीही त्याविषयी तक्रार करत नाही.”

“स्वत:च्या मुलीला भेटायला गेलं तर काय झालं? त्यामध्ये तक्रार करण्यासारखं काय आहे?” राजूच्या ह्या प्रश्नावर तो खेडूत उत्तरला, “जावयाकडे वारंवार जाणं बरं दिसत नाही, असं म्हणतात.”

असं हे सटरफटर बोलणं राजूला आवडलं. हा संपूर्ण दिवस त्याने अगदी एकट्याने काढला होता. त्यामुळेच दुसऱ्या माणसाचा आवाज कानी पडल्याने त्याला बरं वाटलं. ह्या संभाषणानंतर तो इसम पुन्हा मोठ्या आदराने त्याचा चेहरा न्याहळू लागला. राजू बुचकळ्यात पडला. हनुवटीवर हात फिरवून ऋषिमुनींसारखी आपल्याला दाढी तर आली नाही ना, ह्याची त्याने खात्री करून घेतली. छे, तसं काहीच नव्हतं. चेहरा छान गुळगुळीत होता. तुरुंगामध्ये काम करून कमावलेले पैसे खर्चून त्याने दोनच दिवसांपूर्वी दाढी केली होती.

जन्मजात बडबड्या स्वभावानुसार न्हावीबुवांनी त्याची दाढी करताना चौकश्यांना सुरुवात केली, “सुटका झाली वाटतं?” न ऐकल्यासारखं करून राजू गप्प राहिला. राग आला असला तरीही वस्तराधारी व्यक्तीसमोर तो व्यक्त करणं धोकादायक होतं. अर्थात न्हावीबुवांनी चिकाटी सोडली नव्हती. “नुकतीच सुटका झाली वाटतं?” त्यांनी विचारलं.

प्रदीर्घ अनुभव गाठीशी असणाऱ्या माणसावर काय रागवायचं, असा विचार करून राजूने विचारलं, "तुम्हाला कसं कळलं?"

"वा, म्हणजे काय? गेली वीस वर्षं दाढ्या करतोय लोकांच्या. तुरुंगातून बाहेर पडल्यानंतर पहिलं दुकान माझंच आहे हे तुमच्या लक्षात आलं नाही वाटतं? धंदा मोक्याच्या ठिकाणी असला की तुमचं अर्धं काम झालंच म्हणून समजा. त्यामुळेच लोक जळतात माझ्यावर," असं म्हणताना त्याने मत्सरी न्हाव्यांच्या झुंडीला हाताच्या इशाऱ्याने दूर लोटलं.

"तुम्ही कैद्यांच्या दाढ्या करत नाही वाटतं?"

"ते बाहेर आल्यानंतरच मी त्यांना हात लावतो. माझ्या भावाचा मुलगा तुरुंगामध्ये दाढी करायचं काम करतो. मला त्याच्याशी स्पर्धा करायची नाही. शिवाय रोज तुरुंगामध्ये जायचीही मला इच्छा नाही."

"ती जागा एवढी काही वाईट नाही," साबणाच्या फेसामधून राजू म्हणाला.

"मग जा की पुन्हा आत," न्हावीबुवांनी सल्ला दिला. "काय केलं होतं? पोलीस काय म्हणाले?"

राजूला त्यांचे प्रश्न आवडले नाहीत. "त्याविषयी काही विचारू नका," तो तुसडेपणाने म्हणाला. पुढे सगळी दाढी होईपर्यंत राजू चिडका चेहरा करून फुगून बसला होता. पण एवढ्याने घाबरून जाण्याएवढे न्हावीबुवा लेचेपेचे नव्हतेच. निर्ढावलेल्या गुन्हेगारांसोबत जन्म काढल्यामुळे तेदेखील चांगले बेडर झाले होते. राजूने तोडून टाकलं तरी त्यांनी आपलं घोडं पुढे दामटलंच, "अठरा महिने की चोवीस? दोन्हीपैकी एका मुदतीची सजा झाली असणार हे नक्की..."

राजूला न्हावीबुवांच्या चिकाटीचं कौतुक वाटलं. ह्यांच्यावर काय रागवायचं, असा विचार करून तो म्हणाला, "तुम्ही तर इतके हुशार आणि माहीतगार आहात, मग प्रश्न कशाला

विचारताय?”

राजूने स्तुती केल्याने न्हावीबुवा खूष झाले. काम थांबवून त्यांनी राजूकडे मोहरा वळवला, “मला समजत नाही असं थोडंच आहे? तुमच्या तोंडून ऐकायचंय, इतकंच. तुला दोन वर्षांची सजा झाली होती हे तुझ्या चेहऱ्याकडे पाहूनच मला कळलं. ह्याचा अर्थ तू खुनी नाहीस, हे नक्की.”

“तुम्हाला कसं काय समजलं?”

“सात वर्षांसाठी आत गेला असतास तर तू निराळा दिसला असतास. खून करणाऱ्यांना तेवढीच शिक्षा होते.”

“अच्छा, मी खून केला नाही. मी आणखी काय केलेलं नाही?” राजूने विचारलं.

“तू फार मोठी हेराफेरी केलेली नाहीस हे नक्की. काहीतरी किरकोळ गुन्हा तुझ्या हातून घडला असावा.”

“अच्छा? आणखी काय?”

“अपहरण, बलात्कार किंवा कोणाच्या घराला आग लावणं वगैरे प्रकार नक्कीच नाही...”

“असे तर्कवितर्क लढवण्याऐवजी मी नेमक्या कोणत्या कारणासाठी तुरुंगात गेलो - तेही दोन वर्षांसाठी - हे सांगून टाका ना. बरोबर ओळखलंत तर चार आणे बक्षीस.”

“असे खेळ खेळायला मला वेळ नाही,” न्हावीबुवांनी त्याचा प्रस्ताव फेटाळून लावला. पुढे काय करायचं ठरवलंयत?”

“काहीतरी करायला हवं हे तर खरंय; पण काय करावं, कुठे जावं काहीच समजत नाही,” राजू काहीसा विचारात पडला.

“तुला पुन्हा तुझ्या मित्रांच्या सहवासात जायचंय का? त्यासाठी फार काही करायची गरज नाही. बाजारात गर्दीमध्ये कोणाच्या खिशात हात घाल किंवा एखाद्या घरात घुसून किरकोळ चोरी कर! लगेच बोंबाबोंब होऊन लोक तुला पोलिसांच्या ताब्यात देतील. तडक तुझी रवानगी तुरुंगात होईल,” न्हावीबुवांनी मोलाचा सल्ला दिला.

तुरुंगाच्या दिशेने मान डोलावून राजू म्हणाला, “एवढी काही वाईट जागा नाही ती... लोकही प्रेमाने वागतात. पण पहाटे पाच वाजता उठावं लागतं ते मात्र मला आवडत नाही.”

“निशाचरांची घरी परतण्याची तीच वेळ असते, नाही का?” न्हावीबुवांच्या बोलण्यामधील गर्भितार्थ लपत नव्हता. “चल, झाली दाढी. ऊठ आता,” असं म्हणून त्यांनी वस्तरा धोपटीमध्ये ठेवला. राजूकडे निरखून पाहत ते म्हणाले, “वा, एखाद्या राजासारखा दिसतोस तू.”

खालच्या पायरीवर बसलेला तो खेडूत राजूकडे मोठ्या भक्तिभावाने बघत होता.

“माझ्याकडे असं का पाहतो आहेस तू?” त्याने चिडून विचारलं.

“ते मलाही समजत नाही. पण तुम्हाला दुखवायचा माझा हेतू नाही, साहेब,” तो अजिजीने म्हणाला.

त्यावर ‘कुठेही जायला जागा नाही म्हणून मी इथे येऊन बसलोय. मला ओळखणाऱ्या सर्व लोकांपासून दूर जायचंय मला,’ असं राजू फटकन बोलणार होता, पण त्याने स्वत:ला आवरलं. तसं बोलल्याने नसत्या चौकशांना सामोरं जावं लागणार हे त्याला माहीत होतं. ‘तुरुंग’ ह्या शब्दाच्या नुसत्या उल्लेखानेही, त्याच्याकडे मोठ्या आदराने पाहणाऱ्या त्या इसमाला धक्का बसला असता हे नक्की. ‘तुला वाटतं तेवढा काही मी महान वगैरे नाही. एक सामान्य माणूस आहे मी,’ असं तो बोलणार तेवढ्यात तो खेडूत म्हणाला, “साहेब, मी मोठ्या संकटात सापडलोय.”

हे ऐकताच सर्वांना मदत, मार्गदर्शन करणारा, त्याच्यातील जुना राजू जागृत झाला. "काय झालं सांग मला," तो म्हणाला. त्याची शिफारस करताना पर्यटक नेहमी म्हणायचे, 'राजूसारखा गाइड मिळाला तर तुमच्या सर्व चिंता मिटल्याच म्हणून समजा. भेट देण्यालायक सर्व जागा तर तो तुम्हाला दाखवेलच, पण इतरही सर्वच बाबतींमध्ये मदत करेल.' इतरांच्या आवडीनिवडी जाणून घ्यायच्या, त्यांच्या आयुष्यात डोकावून पाहायचं हे त्याच्या स्वभावातच होतं. लोकांच्या समस्या समजून, त्या सोडवण्यासाठी तो धडपडायचा. 'माझा स्वभाव असा नसता तर मीदेखील सर्वसामान्य लोकांप्रमाणे कोणत्याही चिंतेविना मजेत जगलो असतो,' असा विचार नेहमीच राजूच्या मनात चमकून जाई.

माझ्या आयुष्यातील सर्व उलथापालथींना सुरुवात झाली ती रोझीमुळे. (आपली जीवनकहाणी ज्या खेडुताला राजू सांगत होता, त्याचं नाव 'वेलन', हे पुढे समजलं.) ती परदेशी मड्डम तर नव्हती, मग तिचं नाव 'रोझी' का होतं कोण जाणे! अन्य हजारो भारतीय स्त्रियांप्रमाणे देवी, मीना, ललिता वगैरे नावांऐवजी 'रोझी' म्हणवून घेणं तिला आवडायचं; पण ती तोकडे स्कर्ट घालायची किंवा तिचा बॉबकट होता अशी कल्पना करू नका. ती एक पारंपरिक नर्तकी होती आणि तशीच दिसायची. भडक रंगाच्या जरीकाठी साड्या, कुरळ्या केसांची वेणी, त्यावर गजरे, हिऱ्याची कर्णफुलं आणि गळ्यामध्ये सोन्याची जाडजूड साखळी असं तिचं राहणं होतं. संधी मिळताच 'ती किती महान नर्तिका आहे आणि आपल्या सांस्कृतिक परंपरा जपण्याचं महत्त्वाचं कार्य करतेय' असं सांगून मी तिला खूष केलं होतं.

कालांतराने हजारो लोकांनी तिची ह्याच शब्दांमध्ये स्तुती केली असेल, पण सुरुवात मात्र मीच केली. प्रशंसा कोणाला आवडत नाही! पण मला वाटतं, नृत्य करणाऱ्यांना ती जरा जास्तच आवडते. त्यांचा नृत्याविष्कार, पदन्यास किती सुंदर आहे हे त्यांना कितीही वेळा सांगितलं तरी कमीच पडतं! ती एकटी असताना, तिचा पतिदेव आजूबाजूला नाही ह्याची खात्री करून मी तिच्यावर स्तुतिसुमनांचा वर्षाव करत असे. तिचा नवरा म्हणजे नगच होता! त्याच्याइतका

भयानक दिसणारा प्राणी मी पाहिला नव्हता. रोझीने स्वत:चं नाव बदलण्याऐवजी त्याचंच नाव बदलून ते 'मार्को पोलो' असं ठेवायला हवं होतं. कारण त्याच्या एकूण अवतारामुळे तो कायम एखाद्या मोहिमेवर निघालाय असं वाटायचं. जाड, रंगीत भिंगांचा चष्मा, जाडजूड जॅकेट, डोक्यावर हेल्मेट. हेल्मेटवर चमकदार हिरव्या रंगाचं वॉटरप्रूफ कव्हर ताणून बसवलेलं असायचं आणि ते तो कधीही काढत नसे. हे सगळं घातल्यामुळे तो अंतराळप्रवाशासारखा दिसायचा. खरा मार्को पोलो कसा दिसायचा ह्याची मला सुतराम कल्पना नसली तरी ह्या प्राण्याला पाहताक्षणी मी त्याचं 'मार्को' असं नामकरण करून टाकलं; आणि माझ्यासाठी तरी तेच नाव कायम झालं.

रेल्वे स्टेशनवरील त्या संस्मरणीय प्रथम भेटीमध्ये 'तो माझा कायमचा ग्राहक असणार आहे' हे मी सहजच समजून चुकलो. सदैव प्रवासाच्या तयारीत असल्याप्रमाणे दिसणारा हा गृहस्थ म्हणजे आम्हा गाइड लोकांना पर्वणीच!

मी गाइड का आणि कधी बनलो हे जाणून घ्यायची कदाचित तुम्हाला उत्सुकता असेल. कोणी सिग्नलमन, कोणी पोर्टर तर कोणी गार्ड बनतं, तसा मी गाइड बनलो. तसं विधिलिखित होतं एवढंच, अन्य कोणतंही कारण नाही. वरील सर्व उदाहरणं रेल्वेसंबंधित आहेत म्हणून हसू नका. रेल्वे फार पूर्वीपासून माझ्या रक्तामध्ये भिनली आहे. धूर ओकणाऱ्या, प्रचंड आवाज करत धडधडत जाणाऱ्या इंजिनांनी माझ्या मनावर लहानपणापासून मोहिनी घातली आहे. रेल्वे प्लॅटफॉर्मवर खेळताना माझा वेळ मजेत जाई. स्टेशन-मास्तर, तिथले कूली मला जवळचे दोस्त वाटत. रेल्वेविषयीचं त्यांचं संभाषण ऐकायला मला अतिशय आवडे. त्यांच्या संगतीमध्येच मी लहानाचा मोठा झालो. मालगुडी स्टेशनसमोरच आमचं छोटंसं घर होतं. तिथे रेल्वे येण्यापूर्वी, बराच काळ आधी माझ्या बाबांनी आपल्या हातांनी हे घर बांधलं होतं. गावाबाहेरची ही जागा स्वस्तामध्ये मिळाली म्हणूनच केवळ त्यांनी ते ठिकाण निवडलं. त्यांनी स्वत: पाया खणला, विहिरीच्या पाण्यात माती मळून भिंती बांधल्या. नारळाच्या झावळ्यांचं छप्पर तयार केलं.

घराभोवती पपईची झाडं लावली. पुढे त्या झाडांना आलेल्या पपया विकून त्यांना बऱ्यापैकी पैसे मिळायचे. पपईच्या चिरा करून ते विकायचे. नीट कौशल्याने चिरा काढल्या तर एका पपईमागे चक्क आठ आणे मिळत. लाकडी फळ्या आणि गोणपाट वापरून त्यांनी एक लहानसं दुकान बांधलं होतं. दिवसभर त्या दुकानात बसून ते पेपरमिंट, फळं, तंबाखू, खायची पानं, चणे-फुटाणे (हे मोजण्यासाठी बांबूचं छोटंसं मापटं वापरायचे) असं काहीबाही विकायचे. ट्रंक रोडवरून जाणाऱ्या-येणाऱ्यांना लागतील अशा साऱ्या वस्तू त्यांच्या दुकानात विकायला ठेवलेल्या असत. 'खोपटं-दुकान' म्हणूनच ते प्रसिद्ध होतं. शेतकरी, गाडीवान अशांची त्यांच्या दुकानासमोर कायम गर्दी असायची. त्यामुळे ते अतिशय व्यस्त असत. दुपारी जेवण्यासाठी घरी जाताना ते मला दुकानात बसवायचे. जाताना ठरावीक सूचना द्यायला विसरायचे नाहीत, "राजू, इथे बस. काहीही विकलंस तर त्याचे पैसे घ्यायला विसरू नकोस. फळं, चणे-फुटाणे विकण्यासाठी आहेत, तुला खाण्यासाठी नाहीत हे लक्षात ठेव. काही समजलं नाही तर मला बोलाव."

मीही 'बाबा वाक्यं प्रमाणम्' मानून सतत ओरडत राही, "अप्पा, अर्ध्या आण्यामध्ये किती हिरव्या पेपरमिंट देऊ?" समोर गिऱ्हाईक सोशिकपणे वाट पाहत उभा असे.

अप्पांच्या तोंडात घास असे. ते तसंच ओरडून सांगत, "तीन. पण पाऊण आण्याच्या घेत असेल तर..." ते काहीतरी कठीण हिशेब सांगत, पण मला ते कधीच समजायचं नाही.

मी हुशारी दाखवून ग्राहकाला सांगायचो, "मला फक्त अर्धा आणा द्या." त्याबदली तीन पेपरमिंट देऊन सौदा मिटवायचो. मोठ्या बाटलीमधून कधी चुकून तीनऐवजी चार पेपरमिंट निघायचे. कटकट नको म्हणून मी चौथी तोंडात टाकायचो.

आमच्या आळीमध्ये एक विक्षिप्त कोंबडा होता. 'आम्ही फार वेळ झोपलो, आता पुरे' असं ठरवून तो भल्या पहाटे बांग द्यायचा. त्याची कर्णकटू बांग ऐकून अप्पा धडपडून उठायचे. लगेच मलाही उठवायचे.

मी स्नान करून कपाळावर भस्म फासायचो. भिंतीवर टांगलेल्या देवदेवतांच्या तसबिरींसमोर उभा राहून मोठमोठ्याने आरत्या, श्लोक म्हणायचो. अप्पा थोडा वेळ माझी नाटकं पाहत थांबायचे. मग मागच्या बाजूला म्हशीची धार काढायला जायचे. नंतर ताज्या दुधाने भरलेली बालदी घेऊन घरात येऊन ते न चुकता कुरकुरायचे, “त्या म्हशीला काय झालंय समजत नाही. आज तर अर्धी बालदीसुद्धा भरली नाही.”

यावर माझ्या आईचं उत्तरही तयार असे, “हो, मलाही तसंच वाटतंय. फार मस्ती चढलीय तिला. तिला कसं वठणीवर आणायचं मला बरोबर माहितीय.” हे बोलताना तिच्या आवाजात गूढ धमकी जाणवायची. दुधाची बालदी घेऊन ती आत जायची आणि थोड्याच वेळात माझ्यासाठी गरमागरम दुधाचा प्याला घेऊन यायची.

साखर जुन्या पत्र्याच्या डब्यामध्ये ठेवलेली असे. डबा गंजलेला होता. पण त्यामधील साखर फार चांगल्या प्रतीची असे. स्वयंपाकघरातील धुराने काळ्या झालेल्या भिंतीवर एक लाकडी फळी होती. तिच्यावर साखरेचा डबा माझा हात पोचू नये अशा बेताने ठेवलेला असे. मला वाटतं, माझ्या उंचीबरोबर फळीची उंचीदेखील वाढत असावी, कारण त्या गंजक्या डब्यामधली साखर कधीही माझ्या हाती लागली नाही.

सकाळी अप्पा मला घेऊन अभ्यासाला बसायचे. हाताजवळ बारीक छडी असे. ‘बालमानसशास्त्र’ अशासारखे प्रकार त्या काळात अस्तित्वात नव्हते. ‘छडी’ हा शिक्षकाचा अविभाज्य भाग असे. ‘छडी लागे छमछम, विद्या येई घमघम’ हे तत्त्व अप्पाही कोळून प्यायले होते. ते मला तमीळ बाराखडी शिकवायचे. पाटीच्या दोन्ही बाजूंना ते बाराखडीमधील दोन अक्षरं लिहून द्यायचे. मी ती अक्षरं गिरवत बसायचो. अखेर ती अक्षरं ओळखण्यापलीकडे जात! अप्पा अधूनमधून माझ्या हातून पाटी हिसकावून घेत. अक्षरांचा मी केलेला काला पाहून ते माझ्याकडे रागीट नजरेने पाहायचे, “काय ही गिचमिड करून ठेवलीयस! अक्षरांचं पावित्र्य राखायला शीक, नाहीतर आयुष्यात कधीच प्रगती करणार नाहीस.” असं बजावून ते ओल्या

फडक्याने पाटी स्वच्छ पुसायचे, पुन्हा ती अक्षरं लिहून माझ्या हाती द्यायचे. "पुन्हा घाण केलीस तर याद राख! मी लिहिलंय तसंच नेमकं गिरवायचं. स्वत:ची अक्कल चालवू नकोस," ह्या धमकीबरोबर हातामध्ये छडी असायचीच.

मी अतिशय नम्रतेने 'होय अप्पा' म्हणून पुन्हा बाराखडी घोकायला सुरुवात करायचो. 'मान कलती करून, जिभेचं टोक बाहेर काढून अत्यंत एकाग्रतेने अक्षरं गिरवणारा मी' हे चित्र अजूनही माझ्या डोळ्यांसमोर स्पष्ट उभं राहतंय. सारी शक्ती पणाला लावून पेन्सिल फिरवल्याने कचकच आवाज यायचा. तो ऐकून अप्पा ओरडायचे, "काय चाललंय तुझं? तो विचित्र आवाज आधी बंद कर."

बाराखडीनंतर गणिताचा अभ्यास! दोन आणि दोन = चार; चार आणि तीन = आणखी काहीतरी, अमुक गुणिले तमुक, ह्याच्यातून ते वजा... अरे बापरे, अंकगणितामुळे माझं डोकं दुखायचं. बाहेरच्या आल्हाददायक हवेत पक्षी मुक्तपणे विहार करत असताना मी मात्र अप्पांबरोबर गणितं सोडवायला बसलोय ह्यामुळे मी नशिबाला दोष देत राही. माझं लक्ष नाही पाहून अप्पांचा पारा क्षणोक्षणी वर चढायला लागे. अखेर माझ्या मूक आळवणीला यश यायचं. एखादं गिऱ्हाईक दुकानासमोर आलेलं पाहून माझी शिकवणी आकस्मिकपणे थांबायची. "तुझ्यासारख्या मठ्ठ मुलाला शिकवून पंडित बनवण्याच्या खटाटोपापेक्षा दुसरी महत्त्वाची कामं आहेत मला," वैतागून असं म्हणत ते गिऱ्हाइकाकडे वळायचे.

'आपण फारच अभ्यास केला' असं मला वाटत असलं तरी आई म्हणायची, "सुट्टी झालीसुद्धा? अर्ध्या तासात काय शिकतोस देव जाणे!"

काकुळतीने मी तिला म्हणायचो, "मी बाहेर जाऊन खेळतो. तुला मुळीसुद्धा त्रास देणार नाही. पण अभ्यास करायला सांगू नकोस." तिलाही माझी दया येत असावी, कारण पलीकडच्या चिंचेच्या झाडाखाली, सावलीमध्ये खेळायची परवानगी मला मिळे. खूप जुना वृक्ष होता तो - विशाल, दाट पर्णराशी. पक्षी, वानरं राहायची त्यावर. सतत पक्ष्यांची किलबिल, माकडांची ची-

ची चालू असे. सारे चिंचेची कोवळी पानं, चिंचांवर तुटून पडत. कुठूनतरी डुकरं त्यांच्या पिलावळीबरोबर येत. पालापाचोळ्यात नाक खुपसून हुंगत राहत. अशा सर्व गोतावळ्यामध्ये मी दिवसभर हुंदडत राही. कल्पनाविश्वात रमून मी त्या डुकरांनाही खेळात सामील करून घेत असे. त्यांच्यावर स्वार होऊन आमची स्वारी निघालीय अशी चित्रं माझ्या डोळ्यांसमोर तरळायची. अप्पांची गिऱ्हाइकं जाता-जाता मला हाक मारत. गोट्या, रबराचा चेंडू, लोखंडी चाक, ह्या आणि अशाच खेळण्यांबरोबर माझा दिवस मजेत जाई. किती वाजलेत, आजूबाजूला काय चाललंय - मला कसलंच भान राहत नसे.

अप्पा शहरामध्ये खरेदीला जायचे. कधीतरी मलाही बरोबर घ्यायचे. त्यासाठी मला माझा अभिनय पणाला लावाला लागत असे. शहराकडे जाणारी एखादी बैलगाडी त्यांनी थांबवली की मी अत्यंत केविलवाण्या नजरेने त्यांच्याकडे पाहत तिथेच घोटाळत राही ('मलाही बरोबर घेऊन चला' असा हट्ट करायचा नाही, अशी ताकीद होती). अधूनमधून अप्पांना पाझर फुटे. "चल रे पोरा, गाडीत बस," त्यांचं वाक्य पूर्ण होण्यापूर्वी मी टुणकन गाडीत चढून बसे. गाडी निघाली की बैलांच्या गळ्यातील घुंगरू वाजत, लाकडी चाकांचा खडखड आवाज येई. कच्च्या रस्त्यावरची धूळ उडायला लागे. गाडीच्या बाजूच्या बांबूला मी घट्ट पकडून ठेवी. हाडं खिळखिळी झाली तरी मी मजेत असायचो. गाडीतल्या गवताच्या पेंडीचा वास मला आवडायचा. रस्त्यावरून चालणारी माणसं, वाहनं, लहान मुलं, डुकरं असं काहीबाही बघताना माझा प्रवास मजेत चालायचा. जीवनाचे हे विविध रंग मला मोहवून टाकायचे. बाजारात पोचल्यानंतर ओळखीच्या दुकानदाराच्या दुकानामध्ये मला बसवून अप्पा खरेदीला जात. भाजलेले चणे-फुटाणे, शेंगदाणे आणि गोळ्यांनी माझे खिसे ठासून भरलेले असत. ते तोंडात टाकत मी गजबजलेल्या बाजारातील गंमत बघत बसे - विक्रेते, गिऱ्हाइकं एकमेकांशी वाद घालत, बोलाचाली, शिव्यागाळ, तर कुठे हास्यविनोद चालत. 'अप्पा स्वत: दुकानदार असूनही ते इतरांकडून खरेदी का करतात' हा प्रश्न माझ्या मनात सतत घोळत असे. कलत्या दुपारी

बाजारातील गर्दी-गोंगाट ऐकता ऐकता हळूहळू मी पेंगायला लागे. त्या अनोळखी जागी मी अप्पा मला बसवून गेलेल्या भिंतीला टेकून गाढ झोपी जाई.

"माझ्यापुढे एक फार मोठा प्रश्न उभा आहे, साहेब." तो म्हणाला.

राजू मान डोलावून म्हणाला, "तसे सर्वांनाच असतात." आपण सर्वज्ञानी आहोत असं त्याला अचानक वाटायला लागलं होतं. हा माणूस त्याच्याकडे मोठ्या भक्तिभावाने पाहायला लागल्यापासूनच त्याला आपल्या महानतेचा साक्षात्कार झाला होता. अभिनय करणाऱ्या पात्रांना सदैव योग्य तीच प्रतिप्रिया द्यावी लागते. राजूलाही तसंच काहीसं वाटत होतं. 'फार मोठा प्रश्न आहे' ह्यावर नेमकी कोणती प्रतिप्रिया द्यावी हे त्याला बरोबर उमजलं. 'कोणताही प्रश्न, समस्या नसलेला एक तरी माणूस ह्या जगात आहे का? तसं असतं तर सारी मानवजात सदासुखी असती. "भगवान बुद्ध काय म्हणाले माहितीय का?" तो माणूस उत्सुकतेने पुढे झुकला. "एकदा एक शोकाकुल माता आपल्या बाळाचं मृत शरीर छातीशी धरून आप्रोश करत भगवान बुद्धांकडे गेली. ते तिला म्हणाले, "जा. नगरातील प्रत्येक घरी जरा जाऊन बघ. ज्यांनी मृत्यू कधी पाहिलाच नाही, असं एक जरी घर सापडलं ना, तर तिथून मूठभर मोहरी घेऊन ये. त्यानंतरच मृत्यूवर विजय कसा मिळवावा ह्याचं गुपित मी तुला सांगेन."

ही कथा ऐकून त्या माणसाने पसंतीदर्शक मान डोलावली. "अगदी बरोबर. पण साहेब, त्या मृत बाळाचं पुढे काय झालं?"

"अर्थातच त्याला पुरावं लागलं. तात्पर्य काय, तर, कोणत्याही प्रकारची समस्या वा अडचण नसेल असं एक जरी घर तू दाखवलंस तर सर्व प्रश्न सोडवण्याचा उपाय मी तुला सांगेन." राजूने तत्त्वज्ञान सांगितलं खरं, पण दोन्ही गोष्टींमध्ये तुलना कशी काय करता येईल हे त्याला स्वत:लाही समजलं नव्हतं.

तो माणूस मात्र राजूचं विद्वत्तापूर्ण बोलणं ऐकून कमालीचा प्रभावित झालेला दिसला. अतिशय नम्रपणे त्याने राजूला वंदन केलं आणि म्हणाला, “साहेब, मी माझं नाव तुम्हाला सांगितलंच नाही. मी वेलन. माझ्या बापाने तीन लग्नं केली. त्याच्या पहिल्या पत्नीचा मी सर्वांत थोरला मुलगा. त्याच्या तिसऱ्या नंबरच्या बायकोची धाकटी मुलगी आमच्याकडेच असते. कुटुंबप्रमुख या नात्याने मी तिची सर्वतोपरी काळजी घेतो. तिला खूप सारे दागदागिने, कपडेलत्ते दिले आहेत. पण...” असं म्हणून तो थबकला. पुढे काहीतरी धक्कादायक बोलायला तोंड उघडतोय तोच राजूने त्याचं वाक्य पूर्ण केलं, “पण तिला त्याची किंमत नाही.”

“अगदी बरोबर, साहेब” तो म्हणाला.

“तुला तिचं लग्न करायचंय. पण त्यालाही तिचा विरोध आहे. खरंय ना?”

राजूने सर्व बरोबर ओळखलं ह्याचं वेलनला फारच आश्चर्य वाटलं. “साहेब, अगदी खरंय,” तो अचंब्याने म्हणाला. “खरं तर माझ्या मामेभावाच्या मुलाशी तिचं लग्न ठरवलं होतं. खूप चांगला आहे. लग्नाची तारीखही ठरली होती. पण साहेब, त्या पोरीने काय केलं माहितीय?”

“पळून गेली, दुसरं काय?” राजू पटकन म्हणाला. “पण तिला परत कसं आणलं?”

“तीन दिवस वेड्यासारखा वणवण फिरत होतो. दिवसरात्र शोधल्यानंतर दूरच्या एका खेड्यामध्ये सापडली. देवाची रथयात्रा असल्याने आजूबाजूच्या पन्नास खेड्यांतील लोक जमले होते. प्रत्येकाचा चेहरा न्याहाळत मी गर्दीत हिंडत होतो. शेवटी सापडली. बाहुल्यांचा खेळ पाहत होती. एवढा त्रास करून तिला घरी घेऊन आलो. पण तिला त्याचं काही आहे का? काय करावं तिने घरी आल्यानंतर?” ‘संपूर्ण गोष्ट सांगण्याचं समाधान त्याला मिळू दे’ असा विचार करून राजू गप्प राहिला. वेलन पुढे म्हणाला, “दिवसभर खोलीमध्ये रुसून बसली होती पोरगी! काय करावं समजतच नाहीये मला. कुणी झपाटलंय की काय अशी शंका येतेय. तिची कशी समजूत काढावी हे सांगाल तर फार बरं होईल, साहेब.”

एखाद्या तत्त्ववेत्त्याच्या गांभीर्याने राजू म्हणाला, “जीवन अशा गोष्टींनीच भरलेलं आहे. आपल्या मनावर ताबा ठेवायचा. कसलाही परिणाम होऊ द्यायचा नाही. शांत राहायचं.”

“साहेब, मी तिला कसं समजावू?”

“तिला घेऊन ये. मी बोलतो तिच्याशी,” राजू मोठ्या अधिकारवाणीने म्हणाला.

वेलन आनंदाने उठला. वाकून राजूच्या पायांना स्पर्श करणार तोच राजू मागे सरला. “कोणालाही माझ्या पाया पडायला देत नाही मी. फक्त परमेश्वराच्या चरणी मस्तक ठेवायचं, अन्यथा तो आपल्या सर्वांचाच विनाश करेल. मानवाचा तो अधिकार नाही.” आपले उच्च विचार ऐकून आपण ‘संतपदी पोचलो’ असा दृढविश्वास त्याला वाटू लागला. वेलन अत्यंत लीनपणे पायऱ्या उतरून खाली गेला. नदीचं पात्र पार करून तो पैलतीरी पोचला आणि दिसेनासा झाला. तो गेल्यानंतर राजू काहीसा विचारात पडला. ‘त्याला मुलीचं वय काय आहे हे विचारायला हवं होतं. सामान्य, साधीसुधी असेल तर बरंय. मला आता कोणत्याही भानगडीत पडायचं नाही.’

रात्रीच्या क्षीण प्रकाशात संथ वाहणाऱ्या नदीचा प्रवाह पाहत तो तिथेच बसून राहिला. पिंपळ, वटवृक्षांची मंद सळसळ कानी पडत होती. मधूनच पानांची सळसळ भय वाटेल इतकी प्रचंड मोठ्या आवाजात होई. आकाश निरभ्र होतं. अक्षरशः रिकामटेकडा असल्याने राजूने चक्क तारे मोजायला सुरुवात केली. ‘मानवजातीसाठी एवढं महत्त्वाचं कार्य केल्याबद्दल मला पुरस्कार मिळायला हरकत नाही. आकाशात नेमके किती तारे आहेत हे ह्या माणसाला माहीत आहे. या बाबतीत तुम्हाला कोणत्याही प्रकारच्या शंका, प्रश्न असतील तर त्याचा सल्ला घ्या. तारांगणाविषयी तुम्हाला योग्य मार्गदर्शन करणारा ‘नाईट-गाइड’ आहे तो. असं लोक माझ्याविषयी बोलतील.’ राजूचं स्वप्नरंजन पुढेही चालू होतं. ‘तारे मोजण्यासाठी एक युक्ती मला माहीत आहे. एका कोपऱ्यापासून सुरुवात करायची आणि आकाशाच्या एका भागापासून दुसऱ्या, मग तिसऱ्या असं करत पुढे जायचं. वरून खाली क्षितिजापर्यंत नव्हे, तर खालून

वरपर्यंत तारे मोजायचे असं तंत्र आहे.' राजूने तारे मोजायचा सिद्धांतच तयार केला. एवढंच नव्हे, तर तो सिद्धांत वापरून त्याने डावीकडच्या पाम वृक्षराजीच्या वरच्या बाजूचे तारे मोजायला सुरुवात केली. तिथून वरपर्यंत, नदीच्या पात्रावरून मोजत तो दुसऱ्या बाजूला पोचला. 'एक... दोन... पंचावन्न...' अत्यंत एकाग्रतेने तारे मोजत असताना अचानक त्याला आणखीही तारकासमूह दिसू लागले. आधीच्या गणतीमध्ये यादेखील तारकांची भर पडली. शेवटी आपण कुठून सुरुवात केली होती हेच राजूच्या लक्षात येईना. असंख्य तारे मोजताना तो अखेर दमलाच. तो नाद सोडून बसल्या जागीच कातळावर आडवा होऊन तारांगणाखाली राजू गाढ झोपी गेला.

चेहऱ्यावर सूर्यकिरणं पडली तेव्हा राजूला जाग आली. सकाळचे आठ वाजले होते. डोळे उघडून पाहिलं तर वेलन महाशय खालच्या पायरीवर विनम्रपणे उभे होते! सोबतच्या मुलीला पुढे करून तो म्हणाला, "बहिणीला घेऊन आलोय." साधारण चौदा वर्षांची, केसांच्या चापूनचोपून घट्ट वेण्या बांधलेली, अंगावर दागदागिने घातलेली मुलगी त्याच्याबरोबर होती. "हे सर्व दागिने मी स्वत:च्या पैशांनी बनवलेत. बहिणीसाठी एवढं तरी करायलाच हवं ना!" वेलन म्हणाला.

राजू डोळे चोळत उठून बसला. नुकताच झोपेतून उठल्यामुळे जगाच्या उठाठेवी करण्याइतपत त्याची मानसिक तयारी नव्हती. शिवाय सकाळची आन्हिकं उरकण्यासाठी त्याला एकांताची गरज होती. "तुम्ही त्या तिथे थांबा. मी आलोच," तो म्हणाला.

तो ताजातवाना होऊन येईतो ती दोघं नजीकच्या पुरातन, मोठमोठे खांब असलेल्या दालनामध्ये थांबली होती. मधोमध एक चौथरा होता. राजू त्याच्यावर स्थानापन्न झाला. वेलनने त्याच्यासमोर एक टोपली ठेवली. केळी, काकड्या, उसाचे तुकडे, भाजलेले दाणे असे अनेक खाद्यपदार्थ टोपलीत होते. शिवाय दुधाने भरलेला काशाचा तांब्याही होता.

"हे सारं कशासाठी आणलंय?" राजूने विचारलं.

"आपण हे सारं ग्रहण केलंत तर आम्हाला फार आनंद होईल, साहेब."

राजूने टोपलीकडे नजर टाकली. हे सारं 'ग्रहण' करायला त्याची ना नव्हतीच. तुरुंगवासानंतर खाण्याच्या बाबतीत कटकट करायची नाही हे तो व्यवस्थित शिकला होता. विनातप्रार कोणत्याही गोष्टीचा फन्ना करायची त्याची तयारी होती. पूर्वीच्या राजूने 'सकाळीच हे सारं कोण खाणार? आत्ता कॉफी, इडली पाहिजे मला. फळंबिळं नंतर खाण्यासाठी ठीक राहतील' असं फटकन म्हटलं असतं. तुरुंगात एवढे दिवस काढल्यानंतर मात्र तो कोणत्याही वेळी, काहीही मिळेल ते पोटात ढकलायचा. तुरुंगामध्ये कधीतरी, वॉर्डरची कृपा झालीच तर, त्याच्या कोठडीतील सहकैदी मटण पफसारखा चमचमीत पदार्थ गुपचूप आणत असे. तो शिळा, तेलाचा खवट वास मारणारा पफ ते दोघं मिटक्या मारत खायचे. इतर कैदी उठण्यापूर्वी पहाटे तीन वाजता पफचा सफाया होई. तुरुंगातलं अन्न खाल्ल्यानंतर आता सर्वच स्वादिष्ट वाटायचं. "माझ्यासाठी एवढं का करता?" त्याने विचारलं.

"या सर्व वस्तू माझ्या शेतामधल्या आहेत. त्या आपल्याला अर्पण करताना मला फार आनंद वाटतोय."

हे ऐकल्यावर राजूने आणखी प्रश्न विचारले नाहीत. आपल्याला लोक अत्यादराने वागवतात ही गोष्ट हळूहळू राजू गृहित धरायला लागला होता. वेलनने आणलेल्या टोपलीकडे पाहत तो काही काळ शांत बसला. अचानक ती उचलून तो गाभाऱ्यामध्ये गेला. वेलन आणि त्याची बहीणही त्याच्यामागोमाग आत आले. काळोख्या गाभाऱ्यात मोठ्या कोनाड्यामध्ये देवाची भव्य मूर्ती होती. चतुर्भुज, गदा आणि चप्रधारी, अत्यंत देखणा कोरीव चेहरा. पण एक शतकापासून या देवाला सर्वच विसरले होते. फारसं कोणी या मंदिरामध्ये येत नसावं. राजूने मोठ्या समारंभपूर्वक फळफळावळांची टोपली देवाच्या पायाशी ठेवली, "प्रथम मान देवाचा. आधी त्याला नैवेद्य दाखवायला हवा. त्यानंतरच आपण सर्वांनी प्रसाद समजून खायचं. कोणतीही गोष्ट परमेश्वराला अर्पण केल्याने ती कमी न होता अनेक पटीने वाढत असते. याविषयीची एक

कहाणी सांगतो तुम्हाला...” असं म्हणून राजूने देवक नावाच्या एका भिकाऱ्याची फार पूर्वी घडलेली कथा सांगायला सुरुवात केली, “तो रोज एका मंदिराच्या दाराशी भीक मागायचा. दिवसअखेर जमा झालेली सर्व भिक्षा तो प्रथम प्रभुचरणी अर्पण करायचा.” कहाणीला सुरुवात केली खरी, पुढे काय झालं किंवा तात्पर्य काय हे राजूच्या ध्यानी येईना. अचानक तो गप्पच झाला.

वेलन अत्यंत सहनशीलपणे वाट पाहत होता. ‘अर्धवट कहाणी अथवा तात्पर्य हा जीवनाचा एक भाग आहे. पुढे काय या गोष्टीची चिंता करू नये’ असं मानणाऱ्या आदर्श भक्तांमध्ये त्याची गणना सहज करता आली असती. कहाणीचा अंत न सांगता राजू गाभाऱ्यातून बाहेर पडला आणि मोठ्या रुबाबात नदीकिनारी पायरीवर स्थानापन्न झाला. वेलन आणि त्याची बहीण शांतपणे त्याच्यामागोमाग बाहेर आले.

फार पूर्वी माझ्या आईने सांगितलेली ती कहाणी आज मला आठवत नव्हती. पण हे साहजिकच नाही का? दुकान बंद करून अप्पा येण्याची आम्ही वाट पाहत असू तेव्हा ती रोज संध्याकाळी मला गोष्ट सांगायची. दुकान मध्यरात्र होईपर्यंत उघडं असायचं. लांबलांबच्या खेड्यांमधून बैलगाड्यांचा तांडा संध्याकाळी उशिरा येत असे. नारळ, तांदूळ आणि असाच माल विकण्यासाठी लोक दूरवरून यायचे. विशाल चिंचेच्या झाडाखाली बैलांवरचं जोखड उतरायचं. दमलेल्या बैलांना चारापाणी देऊन विश्रांतीसाठी सोडल्यानंतर गाडीवानदादा अप्पांच्या दुकानात यायचे. कधी नुसत्याच गप्पा मारायला, कधी खाद्यपदार्थ, विडीकाडी घ्यायला दुकानात गर्दी व्हायची. अप्पांनाही त्यांच्याशी गप्पा मारायला आवडायचं. धान्याचे भाव, पाऊस-पाणी, पिकं, पाटाचं पाणी अशा विविध विषयांवर चर्चा झडत. कोर्टात चालू असलेले कज्जे, खटले हा विषयही लोकप्रिय होता. न्यायाधीश, साक्षीदार, अपिलं अशा गंभीर विषयांवर बोलतानाही अधूनमधून हास्याचे फवारे उडत असत - बहुधा त्यांना ‘कायदा गाढव आहे’ ह्या उक्तीची प्रचीती दर्शवणारी उदाहरणं आठूवन खळखळून हसू येत असावं.

गप्पागोष्टींत रंगल्यावर अप्पांना जेवण्याचं, झोपायचं कसलंच भान उरत नसे. त्यांना बोलावण्यासाठी आई मला वारंवार बाहेर पाठवायची. अप्पा कधी भडकतील ह्याचा नेम नसे. रंगात आलेल्या मैफलीचा भंग केल्यानंतर त्यांची प्रतिप्रिया काय होईल याचा अंदाज बांधणं अशक्य असे. त्यांना कसं हाताळायचं याचं प्रशिक्षण आईने मला दिलं होतं. त्यांचा कल बघून मगच अतिशय हळुवारपणे जेवणाची, घराची आठवण करून द्यायची असल्याने मी दुकानाच्या छपराखाली उभा राहून हळूच खोकत असे. घसा साफ करून त्यांचं लक्ष वेधायचा प्रयत्न करत असे. पण माझ्या खोकण्याकडे, खाकरण्याकडे ते अजिबात दुर्लक्ष करत. गप्पा मारण्यात ते इतके गढून गेलेले असत की, मी समोर उभा आहे या गोष्टीचं त्यांना भान नसे. गंमत म्हणजे काहीही समजत नसलं तरी मीदेखील त्यांचं बोलणं ऐकण्यात गुंगून जाई.

दोघांचीही वाट पाहून आई थोड्या वेळाने हळूच मला हाका मारायची, 'राजू, राजू.' बोलणं अर्धवट थांबवून अप्पा मला म्हणायचे, "आईला सांग, माझी वाट पाहू नकोस. माझ्यासाठी थोडा ताक-भात आणि लिंबाच्या लोणच्याची एक फोड वाडग्यात काढून ठेवायला सांग. मी नंतर जेवीन. वाडगा चुलीजवळ ठेवून दे म्हणजे गरम राहील." आठवड्याचे जवळजवळ पाच दिवस अप्पांचा हा आहार ठरलेला असे. 'शिवाय मला विशेष भूकही नाही...' ते न चुकता म्हणायचे आणि दोस्तमंडळींबरोबर तब्येतीच्या तप्रारींचा ऊहापोह करण्यात मग्न व्हायचे.

मी मात्र पुढचं न ऐकता घरी जाण्यासाठी धूम पळत सुटायचो. दुकान आणि घरामध्ये फारसं अंतर नव्हतं. पण मध्ये साधारण दहा यार्ड भागामध्ये मिट्ट काळोख असे. घराच्या उंबऱ्यावर कंदील ठेवलेला असे. त्याचा मिणमिणता प्रकाश दिसेपर्यंत माझ्या जिवात जीव नसे. जंगली जनावरं, भुतं, हडळी आपल्यावर हल्ला करतील या भीतीने माझी गाळण उडायची. आई दाराजवळच माझी वाट पाहत उभी असे. अप्पा आले नाहीत हे पाहून "भूक नाही वाटतं! आता रात्रभर त्या लोकांबरोबर चकाट्या पिटायला मोकळे! मग तासभर झोपतील. पहाटे तो मूर्ख

कोंबडा बांग देईल तेव्हा जाग येईलच. अशा वागण्याने तब्येतीचं खोबरं होईल!” असं आई वैतागून बडबडायची.

तिच्यामागोमाग मी स्वयंपाकघरात जायचो. आम्हा दोघांची ताटं मांडून ती भात वाढायची. भिंतीवर खिळ्यामध्ये अडकवलेल्या चिमणीच्या मिणमिणत्या प्रकाशात आमचं जेवण व्हायचं. पुढच्या खोलीत तिने चटई अंथरली की मी आडवा व्हायचो. ती अप्पांची वाट पाहत शेजारी बसायची. झोपाळलेल्या मला तिच्या जवळकीमुळे एक अनामिक ऊब जाणवायची. तिच्याकडून लाड करून घ्यावेत म्हणून मी उगीचच कुरकुरायचो, ‘माझ्या केसांमध्ये खाज येतेय...’ मग ती माझ्या केसांमध्ये बोटं फिरवायची, मानेवर खाजवायची. मला ते खूप आवडायचं. मी पुढची फर्माईश करायचो, ‘गोष्ट सांग.’ तीही लगेच सुरुवात करायची. ‘फार फार वर्षांपूर्वीची गोष्ट. एक देवक नावाचा माणूस होता...’ जवळजवळ रोजच हे नाव कानी पडायचं. संत किंवा पराप्रमी वीर पुरुष किंवा असाच कोणीतरी असावा. तो कोण होता, काय करायचा वगैरे गोष्टी मला कधीच कळायच्या नाहीत. कारण आईने गोष्ट सांगायला सुरुवात करायचाच अवकाश - माझे डोळे पेंगुळायचे आणि मी गाढ झोपी जायचो...

सकाळच्या कोवळ्या सूर्यप्रकाशात चमचमणारं नदीचं वाहतं पाणी पाहत राजू पायऱ्यांवर स्वस्थ बसून होता. हवेच्या शीतल झुळुकांचा आनंद घेत एकट्यानेच बसावं असं त्याला वाटत होतं. पण ते शक्य दिसत नव्हतं. डॉक्टरची वाट पाहणाऱ्या रुग्णांप्रमाणे त्याचे पाहुणे शांतपणे खालच्या पायरीवर बसून होते - राजू आपली समस्या कधी सोडवतोय याची वाट पाहत. राजूला स्वत:लाच कितीतरी प्रश्न भेडसावत असताना वेलन त्यामध्ये भर घालत होता. राजूला अचानक या गोष्टीचा रागच आला. “वेलन, तुमच्या समस्या सोडवायला मला आतातरी वेळ नाही,” तो फटकन म्हणाला.

“असं का म्हणता आपण?” वेलनने नम्रपणे विचारलं.

"काही कारण नाही," राजू ठामपणे म्हणाला.

"साहेब, मग पुन्हा कधी येऊ?" वेलन पिच्छा सोडायला तयार नव्हता.

"योग्य वेळ येईल तेव्हा..." राजू अधिकारवाणीने म्हणाला. याचा अर्थ अनंतकाळापर्यंत कधीही! विनातक्रार राजूची आज्ञा शिरसावंद्य मानून वेलन जाण्यासाठी उठला. त्याचा सोशिकपणा पाहून राजूला थोडंसं वाईट वाटलं. शिवाय त्याने आणलेल्या खाद्यपदार्थांचं कर्जही डोक्यावर होतंच. तो चुचकारत म्हणाला, "हीच तुझी बहीण का? हिच्याविषयीच बोलला होतास ना?"

"होय साहेब. तीच ही."

"तुझी समस्या काय आहे हे समजलंय मला. पण मला थोडा विचार करावा लागेल. महत्त्वाचे प्रश्न झटपट सोडवता येत नाहीत. त्यांच्यावर साधकबाधक विचार करून निर्णय घ्यावा लागतो. मी काय म्हणतोय समजतंय ना?"

"होय, साहेब." वेलन म्हणाला. कपाळावर हात फिरवून तो पुढे म्हणाला, "नशिबात जे असेल तेच होणार. त्यापुढे कोणाचाच इलाज नसतो हेच खरं..."

"व्हायचं तेच होणार हे खरं असलं तरी, तसं का घडतंय, समस्येचं कारण काय हे समजून घेण्याने बरीच मदत होईल," राजू तत्त्ववेत्त्याप्रमाणे म्हणाला. "शिवाय प्रकरणाचा सर्वांगीण अभ्यास करण्यासाठी थोड्या अवधीची गरज असते." स्वत:चं उदात्त तत्त्वज्ञान ऐकून आपल्याला देवदूताप्रमाणे पंख वगैरे फुटलेत की काय असं राजूला वाटायला लागलं! लवकरच आपण तरंगत मंदिराच्या कळसावर विराजमान होणार असे विचार त्याच्या मनामध्ये येऊ लागले. कोणत्याही गोष्टीचं आश्चर्य करण्याच्या पलीकडे तो पोचला होता. अचानक त्याच्या मनाने प्रश्न विचारला, 'खरोखर मी तुरुंगामध्येच होतो, की माझा संपूर्ण कायापालट झालाय?'

वेलनच्या चेहऱ्यावर सुटकेचे भाव तसंच आपल्या स्वामीकडून इतकं सारं ज्ञान मिळाल्याचा अभिमानही दिसून येत होता. आपल्या हट्टी बहिणीकडे त्याने अर्थपूर्ण कटाक्ष टाकला तशी तिची मान शरमेने खाली झुकली. तिच्यावर नजर रोखून राजू मोठ्या गांभीर्याने म्हणाला, “नियतीमध्ये लिहिलेलं चुकत नाही. ह्या विश्वामधील कोणतीही शक्ती विधिलिखित बदलू शकत नाही. या नदीचा प्रवाह बदलण्याइतकी अशक्य गोष्ट आहे ती...” तिघेही नदीकडे एकटक पाहत राहिले. जणू काही त्यांच्या प्रश्नांची उत्तरं नदीच्या पाण्यामध्ये लपली असावीत अशा तऱ्हेने नजर नदीवर खिळून होती. असाच थोडा वेळ गेल्यानंतर दोघंही निघाले. नदी पार करून पैलतीरी पोचले आणि दिसेनासे झाले, तोपर्यंत राजूची नजर त्यांचा पाठलाग करत राहिली.

# २

आमच्या घरासमोरील मोकळ्या मैदानात गेल्या काही दिवसांपासून गडबड चालू होती. रोज सकाळी शहरातून माणसं यायची. दिवसभर मैदानात त्यांचं काम चाले. रेल्वेचे रूळ बांधण्याचं काम सुरू होतं, असं समजलं. ते कामगार अप्पांच्या दुकानात चहापाण्यासाठी येत. “गाडी कधी सुरू होईल?” असं अप्पा मोठ्या चिंतेने विचारायचे.

कामगार खुषीत असले तर ‘नक्की सांगता येत नाही, सहा ते आठ महिने लागतील’ असं उत्तर मिळायचं. कामामुळे वैतागलेले असले तर मात्र ते तिरसटून म्हणायचे, ‘आम्हाला काय विचारता. उद्या म्हणाल, रेल्वेचं इंजिन माझ्या दुकानापर्यंत घेऊन या...’ त्यांची अशी टर उडवून ते हसायचेही.

त्यांचं काम जलद गतीने चालू होतं. माझ्या चिंचेच्या झाडाखाली त्यांचे ट्रक उभे असायचे. माझ्या खेळण्यावर त्यामुळे थोडं बंधन आलं होतं. मी ट्रकमध्येच खेळायचो. दिवसभर ट्रकमध्ये चढायचो, उतरायचो. कोणीही मला हटकत नसे. ट्रकमधून लाल माती आणली जायची. त्यामध्ये खेळून माझे कपडे रंगायचे. मैदानाच्या कडेला लाल मातीचे ढीग व्हायला लागले. लवकरच आमच्या घरासमोर छोटासा लाल डोंगर उभा राहिला. मला हा डोंगर फारच आवडायचा. त्याच्या माथ्यावर चढून उभा राहिलो की, दूरवरची दृश्यं दिसायची. मेम्पी डोंगराच्या अस्पष्ट रांगादेखील नजरेस पडायच्या. कामात व्यस्त असणाऱ्या त्या कामगारांइतकाच मीदेखील दिवसभर कायम काही ना काही करत असायचो. सारा वेळ मी त्यांच्याच संगतीत असायचो. त्यांच्या गप्पागोष्टी, हास्यविनोद कान देऊन ऐकायचो. नंतर लाकडं आणि लोखंडाच्या सळ्या वगैरे घेऊन ट्रक यायला लागले. मैदानाभोवती वेगवेगळ्या वस्तूंचे ढीग जमायला लागले. धातूचे तुकडे, नट, बोल्ट पडलेले असायचे. त्यांतले काही उचलून माझा हा खजिना आईच्या भल्यामोठ्या ट्रंकेमध्ये मी जपून ठेवायचो. ट्रंकेत आईच्या

जुन्या रेशमी साड्या ठेवलेल्या असायच्या. आई कधीही ह्या साड्या नेसत नसे. साड्यांच्या बाजूला माझ्या नट, बोल्ट आणि अशाच वस्तूंसाठी राखीव जागा होती!

त्या दिवशी मी नेहमीप्रमाणे ‘माझ्या’ मातीच्या डोंगरावर खेळत होतो. तेवढ्यात एक गुराख्याचा पोर गाई घेऊन आला. त्याच्या गाई ढिगाऱ्याच्या पायथ्याशीच चरायला लागल्या. माझ्या खेळायच्या जागी गाई सोडायची त्याची हिंमत कशी झाली? एव्हाना मी ‘रेल्वे ही माझी मालमत्ता आहे’ असं समजायला लागलो होतो. मला कोणाचीही घुसखोरी नको होती. त्या मुलाकडे रागाने पाहून मी ओरडलो, “चल, नीघ इथून.”

“का?” त्याने प्रत्युत्तर केलं. “माझ्या गाई इथे चरताहेत. मी राखण करतोय. नाही जाणार इथून.”

“तू आणि तुझ्या गाई... इथून जा. लवकरच गाडी येईल. तुझ्या गाई चिरडतील.” मी त्याला घाबरवलं.

“चालेल. तुला का पंचायती?” त्याने असं उलट उत्तर दिलेलं पाहून मी चांगलाच भडकलो. मोठी आरोळी ठोकून त्याच्यावर चालून गेलो. अलीकडेच शिकलेल्या गाळीव शिव्यांची लाखोलीही चालू होती, “साला अक्कर...” उलटून मला मारण्याचं सोडून ते कार्टं आरडाओरडा करत अप्पांकडे पळालं. “तुमचा मुलगा घाणेरड्या शिव्या देतोय,” त्याने तक्रार केली.

हे ऐकून अप्पा खवळले. माझं दुर्दैव, दुसरं काय! मी खेळायला सुरुवात केली तोच ते माझ्यावर धावून आले. “तू ह्या मुलाला काय म्हणालास?” त्यांची चवताळून विचारलं. ‘गप्प राहावं’ इतपत समजण्याची अक्कल मला होती. मी चूपचाप उभा होतो. ते पाहून त्या पोराने मोठ्या तत्परतेने माहिती पुरवली. त्या शेलक्या शिव्या ऐकून अप्पा प्रचंड हिंस्र झाले. माझं मानगूट घट्ट आवळून त्यांनी विचारलं, “कुठे शिकलास ह्या शिव्या?” मी मूकपणे रुळांवर काम करणाऱ्या मजुरांकडे बोट दाखवलं. अप्पांनी त्यांच्याकडे नजर टाकली. क्षणभर विचार करून

ते म्हणाले, “अच्छा? असं आहे तर! घाणेरड्या शिव्या शिकण्यासाठी ह्यापुढे तुला मोकाट सोडणार नाही, याद राख. उद्यापासून शाळेत डांबतो तुला. रोज शाळेत जायचं ह्यापुढे!”

ही काळ्या पाण्याची शिक्षा ऐकून मी हादरलोच. “अप्पा...” मी किंचाळलो. माझ्या अत्यंत आवडत्या मातीच्या ढिगाऱ्यावरून माझी रवानगी तितक्याच नावडत्या जागी होणार होती! - शाळा!

शाळेत जाण्यापूर्वी रोज माझी समारंभपूर्वक तयारी चालायची. आई मला लवकरच जेवू घालायची. दुपारच्या सुट्टीत खाण्यासाठी पत्र्याच्या डब्यामध्ये खाऊ भरून द्यायची. माझी पाटी, पुस्तकं काळजीपूर्वक पिशवीमध्ये भरून माझ्या खांद्यावर अडकवायची. स्वच्छ शर्ट, अर्धी चड्डी, नीट विंचरून मागे वळवलेले केस मानेवर रुळत असायचे. अशी आमची स्वारी तयार व्हायची. आई माझी अशी जी काळजी घ्यायची, ते मला सुरुवातीला फार आवडायचं. पण हळूहळू शाळेत जायचा मला कंटाळा यायला लागला. रोज उठून शाळेची तयारी करा... शाळेत जा... हे नकोसं वाटायला लागलं. पूर्वीप्रमाणे मुक्तपणे खेळावं, घरी राहावं, कोणी आपल्याकडे लक्ष देऊ नये असं मला फार वाटायचं. पण अप्पा अतिशय कडक, शिस्तप्रिय होते. त्यांच्यापुढे माझं काही चालत नसे. सकाळी मी शाळेसाठी निघेपर्यंत त्यांचं माझ्याकडे बारीक लक्ष असायचं. दुकानात बसलेले असायचे, पण दर दोन मिनिटांनी त्यांचा आवाज येई, ‘काय रे पोरा, निघालास की नाही?’ ते शिष्ट होते आणि ‘आपला मुलगा शाळेत जातो’ अशी शेखी त्यांना इतरांपुढे मिरवायची होती, असा मला संशय आहे!

शाळेत पोचण्यासाठी खूप तंगड्या तोडायला लागत. त्या दिशेने जाणारा मी एकटाच मुलगा असल्याने रमतगमत, स्वत:शीच बोलत चालायचो. मध्येच थांबून एखाद्या वाटसरूचं, बैलगाडीचं निरीक्षण करायचो. कधी रस्त्याच्या कडेला नाल्यामधला नाकतोडा बघत रेंगाळायचो. शाळेच्या दिशेने होणारी माझी प्रगती इतकी मंदगतीने आणि थबकत होई की, मार्केट स्ट्रीटला पोचेपर्यंत शाळा सुरू झाल्याचं ऐकू येई. माझे वर्गमित्र तारस्वरात धडे म्हणायचे,

ते दूरवर स्पष्टपणे ऐकू येत असे. आम्हाला शिकवणाऱ्या मास्तरांचा 'मुलांनी मोठ्याने ओरडून धडे गिरवले म्हणजेच त्यांच्या डोक्यात शिरेल' ह्या तत्त्वावर दृढविश्वास होता!

वास्तविक पाहता 'अल्बर्ट मिशन स्कूल' ही अद्ययावत शाळा आमच्या घराजवळच होती. तिथे न पाठवता ह्या दूरच्या शाळेत कोणाच्या सल्ल्यावरून अप्पांनी मला पाठवलं होतं कोणास ठाऊक. 'अल्बर्ट मिशन शाळेचा मी विद्यार्थी आहे' हे सांगायला मलाही खूप अभिमान वाटला असता. पण अप्पांचं मन कलुषित झालेलं होतं. 'माझ्या मुलाला मी त्या शाळेत पाठवणार नाही. तिथे शिकणाऱ्यांना ख्रिश्चन बनवतात असं ऐकलंय मी. आपल्या देवदेवतांविषयीही वाईटसाईट बोलतात,' असं ते वारंवार म्हणायचे. त्यांना तसं का वाटायचं कोणास ठाऊक, पण मी जायचो तीच शाळा सर्वोत्कृष्ट आहे असं त्यांचं ठाम मत होतं. 'आमच्या वृद्ध गुरुजींच्या हाताखालून गेलेली मुलं आज मोठमोठ्या पदांवर काम करताहेत. कोणी कलेक्टर झालंय, कोणी...' अशी बढाई ते सर्वांसमोर मारायचे. ह्या गोष्टीत जराही तथ्य नाही असं मला वाटे. तो बहुधा अप्पांचा कल्पनाविलास असावा किंवा खुद्द त्या गुरुजींनीच ही अफवा पसरवली असावी! सर्वोत्कृष्ट तर सोडाच, पण त्यांची शाळा साधी 'शाळा' देखील वाटत नसे.

गुरुजी कबीर गल्लीत राहायचे. अरुंद घरापुढे सिमेंटचा कट्टा होता. त्याखालून सांडपाण्याचा नाला जायचा. ह्या कट्ट्यावर आमची शाळा भरायची. साधारण माझ्या वयाच्या लहान मुलांना गोळा करून ते रोज सकाळी कट्ट्यावर बसायचे. स्वत:ला बसण्यासाठी कोपऱ्यात एक उशी ठेवलेली असायची. तिच्यावर रेलून, वेताची छडी चमकवत, आम्हा विद्यार्थ्यांवर ओरडत ते वर्ग चालवायचे. सर्व इयत्ता एकाच वेळी भरत. गुरुजी प्रमाप्रमाने सर्व इयत्तांचा अभ्यास घेत. मी सर्वांत लहान मुलांच्या तुकडीमध्ये होतो. शिक्षणाची सुरुवात बाराखडी आणि अंक इथूनच व्हायची. गुरुजी आम्हाला पुस्तकातील मुळाक्षरं, आकडे मोठ्याने म्हणायला लावायचे. नंतर ती पाटीवर गिरवायची असा खाक्या असे. गुरुजी प्रत्येकाची पाटी तपासायचे, चुका सुधारायचे, पुन: पुन्हा त्याच चुका करणाऱ्यांना छडीचा प्रसादही मिळायचा! गुरुजी भयंकर शिवराळ होते.

रेल्वे कामगारांकडून शिव्या शिकलो म्हणून अप्पांनी मला दूरच्या शाळेत घातलं, पण तिथेही आनंदच होता! गुरुजी उठताबसता आपल्या विद्यार्थ्यांना 'गाढव' म्हणून संबोधत. क्षुल्लक कारणावरून ते थेट घराण्याचा, आई-माईचा उद्धार करायचे.

केवळ आमच्या चुकांमुळे त्यांचा पारा चढायचा असं नव्हे; मला वाटतं, आमच्या केवळ अस्तित्वामुळेच ते कायम वैतागलेले असत. सतत धडपडणारी, गोंगाट करणारी कार्टी पाहून त्यांचा कपाळशूळ उठे. अर्थात आम्हीदेखील फार मस्ती करायचो. गुरुजी डुलकी काढायला, जेवायला किंवा अन्य कोणत्याही कारणासाठी घरामध्ये गेले की आम्हाला ऊतच यायचा. मारामाऱ्या, एकमेकांना ओरबाडणं, आरडाओरडा अशी आम्ही एकच धमाल उडवून द्यायचो. कधी हळूच त्यांच्या घरात डोकावून कानोसा घ्यायचो. एकदा न राहवून आम्ही आत घुसलोच. खोल्यामागून खोल्या मागे टाकत शेवटी स्वयंपाकघरापर्यंत पोचलो. गुरुजी चुलीपाशी बसून काहीतरी भाजत होते. आम्हाला हसू आवरेना. “गुरुजी, तुम्हाला स्वयंपाक पण करता येतो...” असं म्हणून आम्ही फिदीफिदी हसायला लागलो. तिथेच एक बाई उभ्या होत्या. त्यांनाही हसू फुटलं.

गुरुजी वस्सकन आमच्या अंगावर आले, “कार्ट्यांनो, आत का आलात? निघा इथून.” आम्ही बाहेर धूम ठोकली. थोड्या वेळाने गुरुजीही आलेच. दातओठ खाऊन त्यांनी आमचे कान जोरात पिरगाळले. आमच्या किंचाळण्याकडे दुर्लक्ष करून ते कडाडले, “तुम्हा माकडांवर चांगले संस्कार व्हावेत म्हणून मी एवढा आटापिटा करतो. पण तुमचे चाळे वाढतच चाललेत...” एवढं बोलून त्यांनी आमच्या अपराधांची भलीमोठी यादीच वाचून दाखवली.

हे ऐकून आम्हाला फारच पश्चात्ताप होऊ लागला. आमची उतरलेली तोंडं पाहून गुरुजी विरघळले. हळुवार आवाजात ताकीद देऊन म्हणाले, “ह्यापुढे घरात पाऊल टाकलंत तर खबरदार. सरळ पोलिसांच्या ताब्यात देईन.” आम्ही चांगलेच टरकलो. त्यानंतर पुन्हा त्यांच्या घरात डोकावण्याची आम्हाला हिंमत झाली नाही. गुरुजींची पाठ वळली की आमचा मोर्चा

कट्ट्याखालून वाहणाऱ्या नाल्याकडे वळत असे. वह्यांमधील सुट्टी पानं फाडून आम्ही होड्या बनवायचो आणि नाल्यात सोडायचो. पुढे तर होड्यांच्या शर्यती सुरू झाल्या. पोटावर पालथं पडून नाल्यात वाहणाऱ्या होड्या पाहत आमचा वेळ मजेत जायचा. आमचे हे उद्योग पाहून गुरुजी बजावून सांगत, “गटारात पडलात तर वाहत वाहत शरयू नदीमध्ये पोचाल. मग मला तुमच्या वडिलांनाच तिथे तुम्हाला शोधायला पाठवावं लागेल!” ते संभाव्य भयंकर चित्र डोळ्यांसमोर येऊन त्यांना हसूही फुटायचं.

फीदाखल त्यांना महिन्याला एक रुपया मिळायचा म्हणून ते आम्हाला सहन करायचे. त्याशिवाय काहीबाही वस्तूदेखील भेट मिळत. उदाहरणार्थ : माझे अप्पा दर महिन्याला गुळाच्या दोन ढेपा पाठवत. कोणी तांदूळ, भाज्या पाठवत. अनेकदा ते काही गोष्टी हक्काने मागूनही घेत. घरातील एखादी वस्तू संपली की आमच्यापैकी कोणाला ते जवळ बोलावून सांगत, “तू शहाणा मुलगा आहेस ना? मग माझं एक काम कर. घरी जा आणि थोडीशी साखर घेऊन ये. अगदी जराशीच बरं का. बघू तुझी हुशारी.” अशा प्रसंगी त्यांच्या आवाजात अतिशय मार्दव येई. त्यांची सेवा करायला मिळतेय ह्यात आम्हाला स्वत:चा गौरव वाटे. त्यांनी कामं सांगावीत ह्यासाठी आम्ही धडपडायचो. आमचे पालकदेखील गुरुजींच्या मागण्या तत्परतेने पुरवायचे. बहुधा आपली कार्टी गुरुजी सकाळपासून दुपारी चार वाजेपर्यंत संभाळतात ह्याविषयी कृतज्ञता व्यक्त करण्याचा तो मार्ग असावा!

मस्ती, धांगडधिंगा करत असतानाच एकीकडे आमचं ज्ञानार्जनही उत्तम प्रकारे चालू होतं. परिणामत: माझी अभ्यासात चांगली प्रगती होऊन बोर्ड हायस्कूलमध्ये मला पहिल्या इयत्तेमध्ये प्रवेश मिळाला. मला मोठी पुस्तकं वाचता येत, वीसपर्यंतचे पाढेही मुखोद्गत होते. बोर्ड स्कूलचा नावलौकिक चांगला होता. तिथे प्रवेश घेण्यासाठी मी आणि इतर दोन मुलांसह गुरुजी स्वत: आमच्याबरोबर आले होते. आम्हाला नवीन वर्गात बसवून त्यांनी आम्हाला शुभेच्छा

दिल्या आणि आमच्या वयोवृद्ध गुरुजींनी आमचा निरोप घेतला. त्यातून त्यांच्यातील दयाळूपणाचं प्रथमच दर्शन झाल्याने आमच्यासाठी तो एक सुखद आश्चर्याचा धक्काही होता.

काहीतरी महान चमत्कार घडला असावा. वेलनच्या चेहऱ्यावरूनच ते कळून येत होतं. राजूपुढे तो हात जोडून उभा होता. "साहेब, सारं काही व्यवस्थित झालंय." तो आनंदाने म्हणाला.

"वा! हे ऐकून मला बरं वाटलं. पण काय घडलं?"

"माझ्या बहिणीने आम्हा सर्वांसमोर आपलं चुकल्याचं कबूल केलं. तिने मान्य केलंय..." वेलनने सारं काही सविस्तर सांगितलं. "सकाळी अचानकच तिने जाहीर केलं, गेले काही दिवस मी फारच विचित्र वागत होते. माझ्या भावाच्या, वडीलधाऱ्यांच्या सांगण्यानुसार ह्यापुढे वागीन. त्यांनाच माझं हित कळतं. ते सांगतील तेच करीन."

"माझा माझ्या कानावर विश्वासच बसत नव्हता. स्वप्नात तर नाही ना, असं वाटून मी स्वत:ला चिमटाही काढला." वेलन म्हणाला, "ह्या पोरीमुळे आम्ही सारेच फार चिंतेत होतो. संपत्तीच्या वाटणीसाठी चाललेले दिवाणी दावे आणि त्यामुळे निर्माण झालेले गुंते, कटकटी अशा गोष्टी सोडल्या तर अन्य काही पीडा आमच्या आयुष्यात नव्हत्या. पण आता ह्या मुलीमुळे पुन्हा एकदा आमची मानसिक शांती नाहीशी झाली होती. आम्हा सर्वांची खूप लाडकी आहे ती. त्यामुळेच अन्नपाणी न घेता ती खोलीत स्वत:ला बंद करून रुसून बसली तेव्हा आम्हाला फार वाईट वाटलं. ती पुन्हा हसावी-खेळावी म्हणून आम्ही फार प्रयत्न केले. पण तिच्यामध्ये काही फरक झाला नाही. आम्ही तर हात टेकले होते तिच्यापुढे. आज सकाळी ती अचानक खोलीतून बाहेर आली. छान वेणी-फणी करून केसात गजरा माळून आली होती. चेहराही हसरा दिसत होता. आम्ही सारे चकित झालो. 'गेले काही दिवस मी तुम्हाला फारच त्रास दिला. मी तुम्हा सर्वांची क्षमा मागते. मला माफ करा. तुम्ही सांगाल तशी वागायला तयार आहे मी,' ती

म्हणाली. धक्क्यातून सावरल्यानंतर आम्ही विचारलं, 'त्याच्याशी लग्न करायला होकार आहे ना तुझा?' ती काही न बोलता खाली मान घालून उभी होती. माझ्या पत्नीने तिला बाजूला नेऊन विचारलं की, मुलाकडल्या लोकांना निरोप पाठवायचा का, तेव्हा तिने होकारभरला. आम्ही ही आनंदाची बातमी सर्वांना कळवली असून लवकरच विवाह-समारंभसाजरा होईल. पैसे, दागदागिने, सर्व काही तयार आहे. उद्या सकाळी सनई-चौघडेवाल्यांना बोलावून कार्य उरकून टाकणार. ज्योतिषालादेखील विचारलं - त्यानेही शुभमुहूर्त असल्याचं सांगितलंय. आता शुभमंगल करायला एक क्षणही विलंब करायचा नाही."

"कदाचित तिचं मत बदलेल अशी भीती वाटतेय का?" राजूने विचारलं. वेलनची लगीनघाई का चाललीय ह्याची त्याला कल्पना होती. अर्थात ते समजणं फारसं कठीण नव्हतं. एकूण परिस्थिती पाहता लवकरात लवकर लग्न करून मोकळं होणं उत्तम असं कोणीही म्हणालं असतं, पण वेलनला राजूचं फारच कौतुक वाटलं. त्याने मोठ्या विस्मयाने विचारलं, "माझ्या मनात काय आहे हे आपल्याला कसं समजलं, साहेब?"

आपण काहीही बोललो तरी, वेलनला त्याचं आदरमिश्रित आश्चर्य वाटतंय हे पाहून राजू हतबुद्ध झाला. साराच प्रकार गंभीर होत चालला होता. त्याला जमिनीवर आणायलाच हवं या विचाराने राजू कडक स्वरात म्हणाला, "मी तर्प केला त्यात एवढं चमत्कार वाटण्यासारखं काही नाही." यावर वेलनचं उत्तर तयार होतं, "साहेब, चमत्कार नाही असं कसं म्हणता? आपल्यासारख्या महान व्यक्तीला ते कठीण नसेल, पण आम्हा सर्वसामान्य लोकांना इतरांचे विचार ओळखणं जमत नाही."

आता विषय बदलला तर बरं अशा विचाराने राजू म्हणाला, "नवऱ्यामुलाचं काय म्हणणं आहे? त्याची तयारी आहे का? मुलीने नकार दिला होता म्हणून तो नाराज नाही ना?"

"पोरगी तयार झाल्यानंतर मी आमच्या पुरोहिताबरोबर त्याला निरोप पाठवला होता. मुलगा तयार आहे अशी बातमी त्यांनीच दिली. झाल्यागेल्या गोष्टींचा विचार करायचा नाही, झालं ते

झालं असं त्याचं मत आहे."

"अगदी खरंय," दुसरं काय बोलावं हे न सुचल्याने राजू एवढंच म्हणून गप्प बसला. शिवाय आपल्या साध्या बोलण्यातही वेलनला काहीतरी महान अर्थ दडला आहे असं वाटतं, हे माहीत असल्याने राजू हुशारी दाखवून पुढे काहीच बोलला नाही. अलीकडे त्याला स्वत:च्याच विद्वत्तेची भीती वाटायला लागली होती. काहीही बोललं तरी त्यातून वेलनला गूढार्थ दिसून येई, त्यामुळे तो बोलायलाच घाबरत असे. अर्थात मौनव्रत धारण केलं तरीही धोका होताच!

इतकी काळजी घेऊनही वेलनने त्याचा पिच्छा सोडला नाहीच. बहिणीच्या होकारामुळे त्याच्या मनासारखं झालं. साहजिकच तो राजूला लग्नाचं निमंत्रण देण्यासाठी आला. राजूने अतिशय गयावया केल्यानंतर त्याची कशीबशी समजूत पटली आणि तो जड अंत:करणाने परतला. तथापि, त्याने मोठमोठ्या तबकांमधून फळफळावळ भेट म्हणून आणली, त्यांचा स्वीकार राजूला करावाच लागला. गाइड असताना राजू पर्यटकांना प्राचीन राजवाड्यांची सैर करायला घेऊन जाई. तेव्हा तो अशीच रेशमी वस्त्रांनी आच्छादलेली तबकं पेश करायचा. वेलनची भेट पाहून राजूला त्या गोष्टीची आठवण झाली.

विवाह-समारंभाला जायचं त्याने कटाक्षाने टाळलं. लोकांसमोर त्याला जायचंच नव्हतं. शिवाय 'एका हट्टी मुलीचं मनपरिवर्तन करणारा' म्हणून स्वत:ची प्रसिद्धी व्हावी असंही त्याला अजिबात वाटत नव्हतं. पण तो गेला नाही, तशी लग्नाची वरातच त्याच्याकडे आली! संधी मिळताक्षणी वेलन नवविवाहित दांपत्य आणि नातेवाइकांचा मोठा तांडा घेऊन हजर झाला. स्वत: वधूनेच 'आपला तारणहार' म्हणून त्याची सर्वांसमोर भलावण केली होती - "ते कोणाशीही बोलत नाहीत, पण त्यांच्या केवळ एका नेत्रकटाक्षामुळे तुमच्यामध्ये आमूलाग्र बदल घडून येतो."

राजूचा परिवार दिवसेंदिवस वाढत चालला होता. दिवसभर शेतामध्ये खपून वेलन रोज संध्याकाळी त्याच्या पायाशी येऊन बसे. राजू काही बोललाच तर भक्तिभावे ऐकत असे, अन्यथा राजूचं मौनदेखील तो तितक्याच नम्रपणे स्वीकारत असे. अंधारून आल्यावर वेलन शांतपणे निघून जात असे. हळूहळू आणखीही काही लोक नियमितपणे येऊ लागले. नदीतीर ही सार्वजनिक जागा असल्याने तक्रार करणं शक्यच नव्हतं. खरं पाहता तो स्वत:च आगंतुक पाहुणा असल्याने घाटाच्या पायऱ्यांवर कोणी बसावं हे ठरवण्याचा त्याला अधिकार नव्हता. राजू नेहमीच्या जागी बसायचा. राजू नदीच्या वाहत्या प्रवाहाकडे आणि वेलन आणि कंपनी त्याच्याकडे अनिमिष नजरेने बघत राहायचे. राजूच्या डोक्यात विचारचक्र गरगरत असायचं. 'पुढे काय करावं, कुठे जावं' असे प्रश्न त्याला भंडावून सोडत. भक्तगण श्वास रोधून त्याच्याकडे भक्तिभावाने बघत असायचे. साऱ्याच प्रकाराचा राजूला त्रास व्हायला लागला. ह्या लोकांना कसं टाळावं ही चिंता त्याच्या मनाला कुरतडत होती. दिवसभर तो एकटाच असे, पण संध्याकाळ झाली रे झाली की सारी कामं आटोपून मंडळी हजर होत!

एका संध्याकाळी राजू मंदिराच्या मागे, एका मोठ्या झुडुपाआड लपून बसला. लालचुटुक फुलांनी डवरलेल्या झुडुपामागून राजूला मंडळी आल्याची चाहूल लागली. आपलं दैवत अदृश्य झाल्याचं पाहून त्यांची हलक्या आवाजात चर्चा चालू झाली. त्याला शोधण्यासाठी मंदिराला प्रदक्षिणा घालत मंडळी 'त्या' झुडुपाजवळ आली. कोंडीत सापडलेल्या श्वापदाप्रमाणे राजूचं काळीज जोरात धडधडायला लागलं. श्वास रोधून तो निश्चल बसून होता. त्यांना आपला शोध लागलाच तर लपून बसण्याचं काय कारण सांगावं याविषयी विचारचक्र मनात चालू होतं. 'मी गहन विचारात होतो. झाडाच्या सावलीमध्ये शांतपणे विचार करावा या उद्देशाने इथे बसलो होतो' ही सबब सांगावी असं राजूने ठरवलं. त्याच्या सुदैवाने तशी वेळ आली नाही. जवळच त्यांचा घोळका उभा होता. अचंबित, दबक्या स्वरात त्यांची कुजबूज सुरू होती. "कुठे गेले असतील बरं?" एकजण म्हणाला.

"महान हस्ती आहे ती. त्यांच्यामागे हजार कामं असतील. कुठेही गेले असतील ते."

"तसं नाही. त्यांनी सर्वस्वाचा त्याग केलाय. ध्यानधारणा करण्यातच त्यांचा सर्व वेळ जातो. आज त्यांचं दर्शन झालं नाही ह्या गोष्टीचं वाईट वाटतंय."

"त्यांच्यासमोर नुसतं बसून राहिलं तरी किती प्रसन्न वाटतं... त्यांच्यामुळे अनेक चांगल्या गोष्टी घडताहेत. एकच उदाहरण सांगतो- काल रात्री माझा चुलतभाऊ आपणहून माझ्या घरी आला आणि मी दिलेली प्रॉमिसरी नोट त्याने चक्क परत दिली. त्याच्या हाती ती नोट होती तोपर्यंत माझ्या डोक्यावर टांगती तलवार होती. कधी ती आपल्यावर पडते अशी मला कायम चिंता लागली होती."

"ह्यापुढे कोणत्याही गोष्टीची फिकीर करायला नको. असा महात्मा आपल्या आयुष्यात आला हे आपलं अहोभाग्य म्हणायला हवं..."

"पण आज कुठे अदृश्य झाले? आपणा सर्वांना सोडून कायमचे निघून गेले की काय?" एकाने चिंता व्यक्त केली.

"तसं असेल तर आपलं दुर्दैव म्हणायचं," दुसऱ्याने दुजोरा दिला.

"त्यांचे कपडे अजूनही देवळाच्या सभागारात आहेत."

"त्यांना कशाचीही फिकीर नाही."

"कालचं जेवण संपवलेलं दिसतंय."

"आजही आणलं असेल ना? इथेच ठेवा ते. परततील तेव्हा त्यांना भूक लागलेली असणार." त्या माणसाची सहृदयता पाहून राजूचा ऊर कृतज्ञतेने भरून आला.

"मी तर असं ऐकलंय की, काही योगी पुरुष केवळ मनोबलाने क्षणार्धात हिमालयात पोचतात!"

"ते तशा प्रकारचे योगी पुरुष आहेत असं वाटत नाही," दुसऱ्याने त्याला खोडून काढलं.

"'नक्की कोणाला माहितीय? काही वेळा बाह्य रूप अतिशय फसवं असू शकतं."

तिसऱ्याने त्याला परस्पर उत्तर दिलं. शोधाशोध थांबून अखेर सारेजण तिथेच स्थिरावले. नंतर कितीतरी वेळ त्यांचं संभाषण राजूच्या कानी पडत होतं. अखेर मंडळी घरी जाण्यासाठी निघाली. "फार काळोख होण्यापूर्वी गेलेलं बरं. नदीच्या ह्या भागात मगर आहे असं म्हणतात." नदी पार करताना होणारा पाण्याचा खळबळाट राजूला स्पष्ट ऐकू येत होता.

"बरोबर ह्याच जागी माझ्या ओळखीच्या एका मुलाचा पाय मगरीने पकडला होता."

"बाप रे, मग काय झालं?"

"काय होणार? मगरीने त्याला ओढून नेलं. दुसऱ्या दिवशी..."

हळूहळू त्यांचे आवाज अस्पष्ट होत गेले. राजूने अत्यंत सावधपणे बाहेर डोकावून पाहिलं. पैलतीरी सर्वांच्या अंधुक आकृती दिसत होत्या. त्या संपूर्णपणे दिसेनाशा होईपर्यंत राजू थांबला. नंतर गाभाऱ्यात जाऊन त्याने दिवा लावला. एव्हाना त्याला कडकडून भूक लागली होती. देवाच्या मूर्तीसमोर केळीच्या पानामध्ये त्याच्यासाठी जेवण ठेवलेलं होतं. ते पाहून राजूला पुन्हा एकदा गावकऱ्यांविषयी कृतज्ञता दाटून आली. 'या योगीपुरुषाला अन्नपाण्याची गरजच काय? केवळ हवेवर जगता येतं अशा लोकांना... असा वेलन आणि मंडळींचा समज कधीही न होवो,' अशी मन:पूर्वक प्रार्थना राजूने केली.

दुसऱ्या दिवशी तो भल्या पहाटे उठला. प्रातर्विधी उरकून नदीच्या पाण्यात कपडे धुऊन टाकले. स्टोव्ह पेटवून कॉफी बनवली आणि मोठ्या मजेत ती प्याला. आज त्याला खूप शांत, मनावरचं ओझं उतरल्यासारखं वाटत होतं. भविष्यात काय करायचं याविषयी आज निर्णय घ्यायचा असं त्याने ठरवलं. समोर दोन पर्याय होते - आपल्या गावी परतायचं. लोक थोडे

दिवस हसतील, रोखून पाहतील ते सहन करायचं; किंवा दुसरीकडे निघून जायचं. पण कुठे? श्रम करून पैसे कमावण्यासाठी एखाद्या कामात प्रावीण्य मिळवायला हवं. तसं त्याच्याकडे कोणतंही कसब नव्हतं. मग उदरनिर्वाह कसा होणार? सध्यातरी त्याला आरामात जेवण मिळत होतं. कुठेही गेला तरी त्याला कोणीही असं फुकटात जेवायला घातलं नसतं. अर्थात तुरुंगामध्ये ती सुविधा मिळाली असती! अन्य पर्यायच नाही हे राजूला स्पष्ट दिसून आलं. दूरवर डोंगरउतारावर गाई चरताना दिसत होत्या. आसमंतात असीम शांतता पसरली होती. इथेच राहावं हे उत्तम... वेलनने त्याला देव्हाऱ्यात बसवलं होतंच. तीच भूमिका पार पाडायची असा निर्णय त्याने घेतला.

एकदा इथे राहायचं असं ठरवलं तेव्हा वेलन आणि मंडळींना भेटणं प्रमप्राप्तच होतं. संध्याकाळ झाली तेव्हा तो आपल्या नेहमीच्या शिळेवर स्थानापन्न झाला. चेहऱ्यावर असीम शांतीचं सात्त्विक तेज चमकवण्याची आज त्याने विशेष काळजी घेतली होती. चिंता एकाच गोष्टीची होती - काहीही बोललो तरी त्यातून महान अर्थ काढला जातो हे त्याला माहीत होतं. मौनव्रताचा उपाय तो त्यासाठीच अंगिकारत असे. पण यापुढे मात्र आपल्या बुद्धिमत्तेचं, ज्ञानाचं जास्तीत जास्त प्रदर्शन त्यांच्यासमोर करायचं, आपली वैचारिक प्रगल्भता किती महान आहे हे दाखवण्याची एकही संधी सोडायची नाही, त्यांना मोलाचं मार्गदर्शन करायचं, सल्ला द्यायचा असा सुज्ञ निर्णय राजूने घेतला. योग्य वातावरणनिर्मिती करावी या हेतूने त्याने मंदिराच्या गाभाऱ्यामध्ये मुक्काम हलवला. त्यामुळे उदात्त पार्श्वभूमी तयार झाली. वेलन आणि अन्य येण्याची वेळ झाली तेव्हा राजूने स्थान ग्रहण केलं. चेहऱ्यावर गंभीर, उदात्त भाव आणले आणि मोठ्या उत्सुकतेने मंडळींच्या आगमनाची वाट पाहू लागला.

सूर्यास्ताची वेळ झाली. संधिप्रकाशामुळे मंदिराच्या भिंतीवर गुलाबी छटा चढली. सभोवतालच्या नारळाच्या झाडांच्या झावळ्या लाल रंगाने झळाळून उठल्या. पक्ष्यांचा कर्पश कलकलाट हळूहळू शांत झाला. चोहीकडे अंधाराचं साम्राज्य पसरलं. वेलन व अन्य

गावकऱ्यांचा अजूनही पत्ता नव्हता. त्या रात्री ते फिरकलेच नाहीत. अर्थात त्याचं जेवणही आलं नाही. अजूनही थोडी केळी शिल्लक होती त्यामुळे उपास घडला नाही. पण कोणीही का आलं नाही? समजा, यापुढे कोणी फिरकलंच नाही तर?' या प्रश्नांमुळे राजू फारच चिंतित झाला. भीतीने त्याची झोपही उडाली. या गावात आरामात, सुखात जीवन व्यतित करायची योजना बारगळणार की काय या विचाराने त्याचा थरकाप उडाला. अखेर आपल्या गावी परतायला लागणार. म्हणजे गहाण टाकलेलं घर सोडवायला हवं... त्यासाठी पैसे जमवायला हवेत. ते जमलं नाही, तर स्वत:च्याच घरात आसरा मागायची वेळ येणार.

'काय करावं? नदी पार करून पल्याड गावी जावं का? तिथे वेलनचा शोध घेता येईल,' असा विचार त्याच्या मनात चमकून गेला. 'पण ते बरं दिसेल का? त्यात आपली प्रतिष्ठा काय राहणार? लोकांच्या नजरेतून आपली किंमत कमी होईल. मग आपल्याकडे ते ढुंकूनही पाहणार नाहीत.' राजूचा गोंधळ उडाला.

पैलतीरी एक मेंढपाळाचं पोर मेंढ्या चरत होतं. राजूने टाळ्या वाजवून त्याचं लक्ष वेधलं, "ए, इकडे ये." पायऱ्या उतरून राजू खाली उतरला आणि मोठ्याने ओरडून म्हणाला, "ए पोरा, मी या मंदिराचा नवीन पुजारी आहे. हे केळं घे." राजूजवळच्या साठ्यामधील हे शेवटचं केळं होतं. ते त्या मुलाला देताना तो मोठाच धोका पत्करत होता. केळं घेऊन ते पोर पसार झालं असतं तर राजूला वेलनची किती गरज होती हे अखेरपर्यंत समजलंही नसतं! इकडे राजू अन्नपाण्याविना तडफडून मेला तरी कोणाला पत्ता लागला नसता. कधीतरी त्याची हाडं सापडली असती, ती त्यांनी आसपासच्या भग्नावशेषांमध्ये टाकून दिली असती. ते भयानक दृश्य नजरेसमोर तरळताच राजूने मोठ्या तत्परतेने ते केळं गुराख्याच्या पोराला देऊ केलं. त्या आमिषाने तो पोर नदी पार करून राजूजवळ आला. लहान असल्याने नदी पार करताना कानापर्यंत भिजला होता. "डोक्यावरच्या फेट्याने अंग पुसून घे," राजू त्याला म्हणाला.

"मी पाण्याला घाबरत नाही."

“पण इतकं भिजलेलं बरं नाही. आजारी पडशील.”

राजूच्या बोलण्याकडे दुर्लक्ष करून त्याने केळ्यासाठी हात पुढे केला. “मला पोहता येतं. नेहमी पोहतो मी.”

“पण मी तुला यापूर्वी कधीही पाहिलं नाही,” राजू म्हणाला.

“इथे नाही, पुढे जातो पोहायला.”

“इथे का नाही?”

“इथे मगरी असतात.”

“मी तर कधीही पाहिल्या नाहीत.”

“कधीतरी मिळतील पाहायला. माझ्या मेंढ्याही त्या तिकडे चरायला नेतो. आज मुद्दाम इकडे आलो होतो. एक माणूस आहे का ते पाहायचं होतं.”

“का?”

“माझ्या काकाने सांगितलं होतं लक्ष ठेवायला. मेंढ्या चरायला देवळाजवळ जा असं ते म्हणाले. तिथे एक माणूस आहे का हे बघायला सांगितलं त्यांनी. म्हणूनच तर इकडे आलो मी,” पोराने सारं तपशीलवार सांगितलं.

राजूने त्याला केळं दिलं आणि म्हणाला, “तुझ्या काकांना सांग तो माणूस परत आलाय. संध्याकाळी बोलावलंय म्हणून निरोप दे.”

काकाचं नाव विचारायच्या भानगडीत तो पडला नाही. कोणीही असला तरी तो इथे येणं महत्त्वाचं होतं. त्या मुलाने केळं सोलून अख्खं तोंडात घातलं. ते संपल्यावर केळ्याची सालही खाऊ लागला.

“अरे, साल का खातोयस? पोटात दुखेल तुझ्या,” राजू म्हणाला.

“नाही दुखणार,” पोरगं ठामपणे म्हणालं. आपलंच म्हणणं खरं करण्याचा त्याचा स्वभाव दिसला.

त्याचा नाद सोडून राजू म्हणाला, “हुशार आहेस तू. जा आता. तुझ्या काकांना सांग...”

“तोपर्यंत माझ्या मेंढ्यांकडे लक्ष ठेवा,” पलीकडच्या पठारावर चरणाऱ्या मेंढ्यांची जबाबदारी त्याच्यावर सोपवून ते पोरगं पळालं.

# ३

अखेर चिंचेच्या झाडापलीकडे स्टेशनची इमारत बांधून तयार झाली. नवेकोरे चकचकीत स्टीलचे रूळ सूर्यप्रकाशात चमकत होते. लाल-हिरव्या पट्ट्यांचे, रंगीबेरंगी दिव्यांचे सिग्नलचे खांब उभे राहिले. रुळापलीकडे आणि अलीकडे असे आमच्या छोट्याशा जगाचे चक्क दोन भाग पडले. सारी तयारी पूर्ण झाली. रुळांच्या बाजूने चालत जायचं - पुढे अर्ध्या मैलावर रुळाखालून झरा वाहत होता तिथपर्यंत - हा आमचा फावल्या वेळेचा आवडता उद्योग झाला होता. फलाटावर येरझारा घालण्यातही बराच वेळ जाई. स्टेशनच्या आवारात गुलमोहोराचं रोपटं लावण्यात आलं. आम्ही स्टेशनवरच्या कॉरिडॉरमधून फिरायचो. स्टेशनमास्तरांच्या खोलीत डोकावून पाहायचो.

एके दिवशी शाळेला सुट्टी जाहीर झाली. आमच्या गावात प्रथमच ट्रेन येणार होती त्यामुळे सारेच उत्साहाने फुलले होते. माळा आणि पताका लावून स्टेशन सजवलं होतं. सनई-चौघडे वाजत होते. रुळावर नारळ फोडल्यानंतर इंजिन आणि दोन डबे झुकझुक करत स्टेशनमध्ये शिरले. शहरातील अति महत्त्वाच्या व्यक्ती या खास प्रसंगी उपस्थित होत्या. कलेक्टर साहेब, पोलीस सुपरिंटेंडंट, म्युन्सिपल चेअरमन, स्थानिक व्यापारी अशी सारी प्रतिष्ठित मंडळी स्टेशनच्या उद्घाटन समारंभासाठी उपस्थित होती. हिरव्या रंगाची निमंत्रण-पत्रिका असणाऱ्यांनाच आतमध्ये प्रवेश होता. सर्वसामान्य जनतेला पोलिसांनी अडवून धरलं होतं. मला ही गोष्ट मुळीच आवडली नाही. मला अटकाव करणारे हे कोण? जरा लांब जाऊन मी पुंपणातून आत शिरलो. इंजिन स्टेशनमध्ये शिरलं तेव्हा स्वागतासाठी मी प्लॅटफॉर्मवर हजर होतो. सर्व मोठ्या माणसांमध्ये माझ्या छोट्या मूर्तीकडे कोणाचं लक्षही गेलं नाही.

अल्पोपाहाराची व्यवस्था केली होती. सर्व आमंत्रित मंडळींनी त्याचा आस्वाद घेतला. नंतर अनेक मान्यवरांची भाषणं झाली. भाषणांमध्ये 'मालगुडी'चा वारंवार उल्लेख होत होता. मला फक्त तेवढाच शब्द समजला. भाषणं संपली. टाळ्यांचा कडकडाट झाला. बँड वाजायला

लागला. इंजिनची शिट्टी वाजली आणि आमंत्रित पाहुणे गाडीत चढले. मलाही त्यांच्यामागोमाग चढायचा मोह झाला, पण कडक पोलीस बंदोबस्त असल्याने मी नाइलाजाने खालीच थांबलो. गाडी सुरू झाली आणि लवकरच दिसेनाशी झाली. त्यानंतरच सामान्य जनतेला प्लॅटफॉर्मवर प्रवेश मिळाला. अप्पांच्या दुकानात त्या दिवशी विप्रमी धंदा झाला.

स्टेशनच्या मागे चिमुकल्या दगडी घरामध्ये स्टेशनमास्तर आणि पोर्टर स्थिरस्थावर झाले. हे घर आमच्या घरासमोरच होतं. अप्पांचा धंदा एव्हाना एवढ्या तेजीत चालायला लागला की शहरात जाऊन खरेदी करण्यासाठी त्यांनी चक्क घोडागाडी विकत घेतली.

माझ्या आईला मात्र ही गोष्ट विशेष आवडली नव्हती. "म्हशींचं करतानाच मला वेळ पुरत नाही. त्यात भर म्हणून हा घोडा, त्याला खायला चणे... माझ्या डोक्यावर आणखी एक काम अजून टाकलंय..." ती वैतागून म्हणाली.

अप्पा कोणत्याही गोष्टीचं समर्थन करायच्या फंदात पडले नाहीत. "तुला यामधलं काही समजत नाही. मला शहरामध्ये रोज कितीतरी कामं असतात. बँकेतही वारंवार जावं लागतं." ते एवढंच म्हणाले. 'बँके'चा उल्लेख केला तेव्हा त्यांच्या आवाजात अभिमान भरला होता. आईला मात्र त्याचं फारसं महत्त्व वाटलेलं दिसलं नाही.

आमच्या अंगणामध्ये घोड्यासाठी गवती छप्पर तयार झालं. तिथे अप्पांचं तपकिरी रंगाचं घोडं बांधलेलं असे. त्याची देखभाल करण्यासाठी त्यांनी एक गडीही ठेवला होता. साऱ्या गावात आमची 'घोडागाडी' चर्चेचा विषय झाली होती. घोडागाडीविषयी आईचा राग मात्र कमी झाला नाही. अप्पा अति देखावा करताहेत, असं तिचं मत होतं आणि त्यांनी कितीही समजावलं तरी त्यामध्ये बदल झाला नाही. "धंद्याचा त्यांना अंदाज आलेला नाही, अचानक पैसा मिळाला म्हणून श्रीमंतीचं प्रदर्शन करणं बरोबर नाही," असं ती म्हणायची. घोडागाडी रिकामी असली, अप्पा घरी बसलेले आढळले की, तिची कटकट सुरू होई. गाडीत बसून त्यांनी सतत कामं करत हिंडावं अशी तिची अपेक्षा असे. अप्पांची शहरातली कामं तासाभरात संपत. नंतर ते दुकानात

हजर व्हायचे. त्यांच्या गैरहजेरीत त्यांचा मित्र दुकान सांभाळायचा. अप्पा घरी बसलेले आहेत आणि अंगणात घोडागाडी बेकार उभी आहे असं बघितलं की आईचं टोमणे मारणं सुरू व्हायचं. ते ऐकून नंतर अप्पांनाही अपराध्यासारखं वाटायला लागलं होतं. “तू टांग्यात बसून बाजारहाट करायला का जात नाहीस?” असं ते तिला सांगू पाहत. पण आई त्यांची सूचना फेटाळून लावायची. “मी रोज कुठे जाऊ टांग्यात बसून?” ती वैतागून म्हणायची. “एखाद्या शुक्रवारी देवळात जाता येईल. पण त्यासाठी वर्षभर घोडागाडीची चैन करायची गरज नाही. घोड्यासाठी दाणापाणी, गवताचा खर्च किती येतो हे माहितीय का तुम्हाला?” आईची सततची कटकट ऐकून अप्पा अखेर - घोडा विकून टाकायचा आणि त्याऐवजी बैलगाडी ठेवायची असा निर्णय घेण्याइतपत - कंटाळले. त्यांच्या ओळखीच्या एका लोहाराने घोडागाडीचं बैलगाडीत परिवर्तन करून द्यायचं कबूल केलं.

घोड्याची रखवाली करणाऱ्या गड्याला ही कल्पना फारच हास्यास्पद वाटली. ‘त्यामुळे काही फायदा होणार नाही’ असं त्याचं मत पडलं. “बैलगाडी चिंचेच्या झाडाखाली नुसती पडून राहील. त्या लोहाराचं काही ऐकू नका. त्याला टांग्याची बैलगाडी करता येणार नाही. घोड्याचं बैलामध्ये रूपांतर करण्यासारखी अशक्य गोष्ट आहे ती!” त्याने पुढे अप्पांसमोर दुसरा प्रस्ताव मांडला, “मला टांगा भाड्याने चालवायला द्या. घोड्याचं चारापाणी, चण्याचा खर्च माझा. तुम्ही फक्त मला घोडा छपराखाली ठेवायला द्या. मी तुम्हाला दिवसाचे दोन रुपये आणि छपराचं भाडं म्हणून महिन्याला एक रुपया देईन. दोन रुपयांच्या वरचं जे काही उत्पन्न होईल ते माझं.” अप्पांना हा व्यवहार फारच पसंत पडला.

असं केल्याने त्यांचे सर्व प्रश्न सुटणार होते. हवं तेव्हा घोडागाडी वापरायला मिळणार होती, रोज काही न करता दोन रुपये मिळणार होते, शिवाय कसलीही जबाबदारी नाही, सारंच सोयीस्कर होतं. पण लवकरच त्यांच्या भ्रमाचा भोपळा फुटला. टांग्याला गिऱ्हाइकं मिळत नाहीत असं म्हणून गडी पैसे देण्याची टाळाटाळ करायला लागला. एके दिवशी अप्पांनी

त्याच्याशी मोठं भांडण काढलं. आमच्या अंगणात संध्याकाळी काळोखातच दोघांची जुंपली. अप्पांना त्यांचे दोन रुपये पाहिजे होते. आईनेही भाग घेतला. “ह्या अशा लोकांवर विश्वास ठेवायचाच नाही. आज सणाचा दिवस आहे. म्हणजे बाजारात चांगली गर्दी असणार. तरीही गिऱ्हाइकं मिळाली नाहीत या त्याच्या म्हणण्याला अर्थ आहे का?” तिने बरोबर मुद्दा मांडला.

टांगेवाला सर्व कमाई दारू पिण्यावर उडवतो याविषयी आईला तिळमात्र शंका नव्हती. पण अप्पा चिडून म्हणायचे, “तो पीत असला तर काय झालं? त्याच्याशी आपला काय संबंध?”

रोज हा तमाशा चालायचा. रात्री तो चिंचेच्या झाडाखाली उभा राहून गयावया करायचा. पैसे माफ करावेत म्हणून अक्षरश: भीक मागायचा. आमच्या पैशांचा तो गैरव्यवहार करत होता हे स्पष्टच होतं. काही आठवड्यांनी त्याच्या लबाडीवर शिक्कामोर्तब झालं. कारण तो अप्पांना शहाजोगपणे म्हणाला, “हा घोडा फारच हडकुळा होत चाललाय. विकून दुसरा घेतलेला बरा. टांग्यात बसणारे सारे प्रवासी त्रास होतोय अशी तक्रार करतात. भाडंसुद्धा कमी देतात. चाकाच्या स्प्रिंगसुद्धा जुन्या झाल्यात. बदलायला हव्यात.” त्याने तक्रारींचा पाढा वाचला. नवीन घोडागाडी घ्यावी म्हणून तो सतत कटकट करायचा. ती ऐकून आईचा पारा चढायचा. “एक घोडागाडी घेतली ती पुरे आहे. आणखी खर्च नकोय,” ती संतापून म्हणायची. एकूणच प्रकारामुळे अप्पांचा पुरता भ्रमनिरास झाला. ‘घोडागाडी ठेवली हे चुकलंच’ असं अखेर त्यांना वाटायला लागलं. नेमकं तेव्हाच आमच्या टांगेवाल्याने ‘घोडा आणि गाडीसाठी गिऱ्हाईक आलंय. सतर रुपये मोजायला तो तयार आहे,’ असा प्रस्ताव अप्पांपुढे ठेवला. त्यांनी घासाघीस करून किंमत पंचाहत्तर रुपयांवर आणली. आमच्या गड्याने तेवढे पैसे अप्पांना दिले आणि घोडागाडी तो स्वत:च घेऊन गेला! त्या चोराने आमचेच पैसे खाऊन त्या पैशांनी घोडागाडी विकत घेतली होती. एका अर्थी आमच्या मागची डोकेदुखी एकदाची गेली म्हणून आम्हालाही बरंच वाटलं. त्याने मात्र मोठ्या चलाखीने आणि दूरदृष्टीने सर्व व्यवहार केला होता. आमच्या स्टेशनवर

नियमितपणे गाड्या धावायला लागल्या. आमच्या टांगेवाल्याचा धंदा फारच तेजीत चालायला लागला.

स्टेशनवर दुकान चालवायची सुवर्णसंधी अप्पांना मिळाली. दुकानही खूप प्रशस्त, सिमेंटच्या भिंती, त्यांमध्येच खूप शेल्फं असं होतं. अप्पांनी त्यांच्या जुन्या दुकानातून सर्व सामान आणून लावलं तरी बरीचशी शेल्फं रिकामीच राहिली. जेमतेम एक चतुर्थांश भरलेलं दुकान पाहून अप्पा फारच खिन्न झाले. एवढी वर्षं आपण खूप मोठा धंदा चालवत होतो या त्यांच्या कल्पनेला धक्का बसला होता.

आई नवीन दुकान बघायला आली. एकूण परिस्थिती पाहिल्यानंतर तिने अर्थातच अप्पांना टोमणे मारायची संधी वाया घालवली नाही, "हे एवढंसं सामान विकून तुम्ही गाड्या आणि बंगले घेण्याची स्वप्नं बघताय? फारच छान!" वास्तविक पाहता अप्पांनी गाडी घेण्याविषयी चकार शब्दही कधी काढला नव्हता, पण आईला त्यांचा पाणउतारा करायला आवडायचं.

अप्पा क्षीण स्वरात म्हणाले, "हे सारं तू कशाला उगाळतेस?" मग विचार करत म्हणाले, "निदान पाचशे रुपयांच्या वस्तू आणल्या तरच हे दुकान भरलेलं दिसेल."

एवढ्यात दुकानाची पाहणी करायला खुद्द स्टेशनमास्तरही आले. डोक्यावर हिरवा फेटा, चंदेरी फ्रेमचा चष्मा, वयस्कर असे होते आमचे स्टेशनमास्तर. अप्पा त्यांच्यासमोर अतिशय विनम्रपणे वागत होते. निळा शर्ट आणि फेटा बांधलेला रिया नावाचा पोर्टरही स्टेशनमास्तरांच्या मागोमाग आला. त्यांना पाहून आई हळूच घरी गेली. स्टेशनमास्तरांनी दुरूनच दुकानाकडे नजर टाकली. चित्रकाराने आपल्या कलाकृतीकडे पाहावं तशी मान कलती करून त्यांनी दुकान बारकाईने न्याहाळलं. त्यांच्या इमानी पोर्टरने मालकाचा कित्ता गिरवला. मास्तर काहीही बोलले तरी त्यांची री ओढायची त्याची पद्धत होती. निरीक्षणाअंती मास्तर म्हणाले, "ही रिकामी शेल्फं

भरून टाका, नाहीतर मोठे साहेब शंभर प्रश्न विचारतील. तुम्हाला ही जागा देण्यासाठी खूप खटपट करावी लागली आहे मला."

अप्पांनी जराही वेळ वाया न घालवता सामान घेण्यासाठी शहराकडे कूच केलं. दुकानाकडे लक्ष ठेवायला अस्मादिकांना बसवण्यात आलं. 'डाळ, तांदूळ अशा वस्तू दुकानात ठेवू नका. रेल्वेप्रवासी चिंच, डाळी विकत घ्यायला येणार नाहीत,' मास्तरांनी मोलाचा सल्ला दिला. 'प्रवासात अशा वस्तू कोण कशाला घेईल? त्या तुमच्या जुन्या दुकानात ठेवत जा.' अप्पांनी विनातप्रार त्यांच्या सूचनांचं पालन केलं. स्टेशनमास्तर त्यांना देवासमान असल्याने त्यांचे आदेश ते मोठ्या आनंदाने पाळायचे. आत्तादेखील त्यांच्या सांगण्यानुसार अप्पांनी दुकानात माल भरला. केळ्यांचे मोठे घड खिळ्यावर लटकायला लागले. त्याबरोबरच मेंपू संत्री, चिवडा-चकल्यांसारखे चटपटीत तळलेले पदार्थ, काचेच्या बरणीत ठेवलेल्या रंगीबेरंगी पेपरमिंट गोळ्या, पावाच्या लाद्या, बन अशा वस्तूंनी दुकान सजलं. खाद्यपदार्थच नव्हे, तर अप्पांनी सिगरेटच्या पाकिटांचाही भरपूर साठा भरून ठेवला. हरतऱ्हेच्या प्रवाशाच्या गरजा लक्षात घेऊन त्यांनी दुकानाची शेल्फं खचाखच भरून टाकली.

आमच्या जुन्या, झोपडीवजा दुकानाची जबाबदारी अप्पांनी माझ्यावर सोपवली. जुनी गिऱ्हाइकं अजूनही तिथे येत असत. पूर्वीप्रमाणे त्यांना गप्पाही मारायच्या असत. पण माझ्यासारख्या पोराशी हवापाण्याच्या, कोर्टकचेरीच्या गप्पा मारणं अशक्यच होतं. मलाही ते विषय कंटाळवाणे वाटत. त्यांच्या समस्या, खटल्यातील बारकावे समजण्याइतपत मी मोठा नव्हतो. त्यामुळेच मी मुकाट्याने त्यांच्या गप्पा ऐकत असे. माझ्याकडून कोणत्याही प्रकारचा प्रतिसाद मिळत नसल्याने ती मंडळीही लवकरच मला कंटाळली. अप्पांच्या नव्या दुकानाकडे त्यांनी मोर्चा वळवला. तिथे अप्पा असायचे, पण दुकानाचा एकूण थाटमाट आणि भपक्याशी त्यांचं जमेना. त्यांना तिथे बुजल्यासारखं वाटायचं. लवकरच अप्पांनीही जराही गाजावाजा न करता आपल्या जुन्या, साध्यासुध्या दुकानात स्थलांतर केलं. ओघाने स्टेशनवरील चकचकीत

दुकान सांभाळण्याची जबाबदारी माझ्यावर आली. मालगुडीजवळचा एक पूल तयार झाल्यानंतर आमच्या स्टेशनवर गाड्यांची नियमित ये-जा सुरू झाली. रोज दुपारी मद्रासहून एक गाडी आणि संध्याकाळी त्रिचीहून एक अशा तब्बल दोन गाड्या आमच्या स्टेशनवर थांबायच्या. त्या वेळी स्टेशनमास्तर आणि निळा डगलेवाला पोर्टर अशा दोघांची धावपळ पाहायला मजा यायची. गाड्यांचं 'आगमन' आणि 'निर्गमन' सुरळीतपणे पार पाडण्याची त्यांच्यावर जबाबदारी असे. दुकानात गर्दी व्हायची त्यामुळे मीही खूप व्यस्त असायचो. व्यवसायामध्ये अशी वाढ झाल्यामुळे माझा एक फार मोठा फायदा झाला. तो कोणता हे कदाचित तुमच्या लक्षात आलंही असेल - माझी शाळा आपोआप बंद झाली!

# ४

एक केळं दिल्याने राजूचं काम चुटकीसरशी झालं. घरोघरी जाऊन त्या पोराने स्वामी परत आल्याची बातमी पोचवली. त्यानंतर बायका, पोरं आणि पुरुषांच्या झुंडी त्याला पाहायला लोटल्या. सर्वांना तेज:पुंज चेहऱ्याच्या स्वामींचं दर्शन हवं होतं. पोरंबाळं फार मोठं आप्रित पाहिल्यासारखा चेहरा करून त्याच्याकडे टक लावून पाहत होती. राजूनेही प्रसंगावधान राखून छोट्या बाळांचे गाल प्रेमाने ओढले, निरर्थक आवाज काढले. बोबड्या गप्पाही मारल्या. परिस्थितीचं गांभीर्य कमी करण्यासाठी त्याची ही धडपड चालू होती. थोड्या मोठ्या मुलांजवळ जाऊन त्याने 'कितवीमध्ये शिकताहात?' अशी चौकशी केली. शहरी लोकं असं विचारायचे हे त्याने पाहिलं होतं. पण इथे त्यांचं अनुकरण करणं मूर्खपणाचं ठरलं. त्याचा प्रश्न ऐकून मुलं हसत सुटली. एकमेकांना खुणावत ती म्हणाली, "आम्ही शाळेत जात नाही."

राजूला त्यांच्या शालेय शिक्षणात रस नव्हता, पण संभाषण पुढे चालू ठेवण्याच्या उद्देशाने त्याने विचारलं, "अरे, मग दिवसभर काय करता तुम्ही?"

एका पोक्त गृहस्थाने मध्ये तोंड घातलं. "शहरी लोकांप्रमाणे आमच्या मुलांना शाळेत पाठवणं जमत नाही आम्हाला. गाईगुरांची राखण करायची असते त्यांना," तो म्हणाला.

राजूने चप् आवाज करून निषेध व्यक्त केला. डोकंही नकारार्थी हलवलं. सर्व मंडळी धास्तावली. चेहरे चिंताग्रस्त दिसू लागले. राजूने महान तत्त्वज्ञान सांगितलं, "मुलांनी प्रथम लिहायला-वाचायला शिकलं पाहिजे. पालकांना मदत करायला हवी, पण त्याचबरोबर शिक्षणही घ्यायला हवं." हे बोलत असतानाच राजूला एक चमकदार कल्पना सुचली, "मुलांना दिवसा शिकायला जमत नसेल तर संध्याकाळच्या वेळी सर्वांनी एकत्र बसून अभ्यास करावा."

“पण कुठे बसायचं?” एकाने मुद्दा उपस्थित केला. मंदिरामधील प्रशस्त सभागाराकडे निर्देश करून राजू म्हणाला, “इथे अभ्यासाला बसायला हरकत नाही. तुमच्या गावात शिक्षक असेल ना? त्यांना विनंती करता येईल.”

“हो, हो, शिक्षक आहेत ना,” सर्वांनी दुजोरा दिला.

“त्यांना मला भेटायला सांगा,” राजूने अधिकारवाणीने फर्मावलं. दुय्यम नोकराला जाब विचारण्यासाठी बोलवावं तशी त्याच्या आवाजात जरब होती.

दुसऱ्या दिवशी दुपारी एक दीनवाणा दिसणारा इसम देवळात हजर झाला. राजू नुकताच मस्त जेवला होता. वामकुक्षीसाठी खाली थंडगार लादीवर पहुडला असतानाच तो इसम घाबरतच हलकेच खाकरला. त्या आवाजाने राजूची झोप मोडली. डोळे उघडून त्याने त्या गृहस्थाकडे दृष्टिक्षेप टाकला. मंदिरात नेहमीच भाविकांची ये-जा चालू असे. त्यामुळे ‘तुम्ही कोण, का आलात’ अशा चौकशा तो करत नसे. खांबाजवळ उभ्या असलेल्या त्या इसमाला राजूने हातानेच बसायची खूण केली आणि डोळे मिटून पुन्हा झोपी गेला. राजू पुन्हा उठला तेव्हादेखील तो माणूस जवळच बसून होता.

“मी शिक्षक आहे,” त्याने असं म्हणताच अर्धवट झोपेत असलेल्या राजूला बालपणीचे कडक शिक्षक आठवले. ‘आपण आता मोठे झालो आहोत, शिक्षकांना घाबरायचं कारण नाही’ हे विसरून तो धडपडत उठून बसला.

ते पाहून गुरुजी काहीसे दचकले. “तुम्ही झोपा. मी थांबतो,” ते घाईघाईने म्हणाले.

एव्हाना राजू नीट जागा झाला होता. स्वत:ला सावरून तो म्हणाला, “हरकत नाही. मी उठलोय.” काहीशा अधिकारवाणीने त्याने विचारलं, “तुम्ही शिक्षक आहात?” मग क्षणभर थांबून तो सहज स्वरात म्हणाला, “बाकी सारं कसं काय आहे?”

ते उतरले, “कशात काही फरक नाही. आहे तसंच आहे.”

"तुम्हाला आवडतं का?"

"ते महत्त्वाचं नाही. माझं काम मी शक्य तितक्या चांगल्या रीतीने आणि मन:पूर्वक करायचा प्रयत्न करतो."

"खरं आहे. अन्यथा काहीही करूच नये," राजू अजूनही काहीसा झोपेतच असल्याने काहीतरी बोलून वेळ काढत होता. 'मुलांचं शालेय शिक्षण' या गंभीर विषयावर बोलण्याची त्याची अजूनही तयारी नव्हती. "सरतेशेवटी प्रत्येकाचं कर्तव्य..."

त्याचं वाक्य पूर्ण होण्यापूर्वीच गुरुजी स्वतःची बाजू सावरत म्हणाले, "मी माझ्याकडून सर्वतोपरी प्रयत्न करतो." अशाच तऱ्हेची बोलणी अर्धा तास चालली. अखेर त्यांनी स्वतःच विषयाला तोंड फोडलं. "रात्रीच्या वेळी मुलांनी इथे जमावं आणि मी त्यांना शिकवावं अशी सूचना तुम्ही केल्याचं समजलं."

"अरे हो," राजू म्हणाला. "होय, मीच सुचवलं. पण अंतिम निर्णय तुम्हीच घ्यायचाय. अखेर स्वावलंबी असलेलं सर्वांत उत्तम. मी काय - आज इथे आहे, उद्या नसेनही. सर्व व्यवस्था तुम्हीच करायचीय. मी केवळ रात्रशाळेसाठी ही जागा वापरण्यासाठी देऊ केली होती," गावकऱ्यांना फार मोठी देणगी देत असल्याच्या रुबाबात राजूने हात फैलावले.

गुरुजी विचारात पडले. थोड्या वेळाने म्हणाले, "पण मला अजूनही खात्री वाटत नाही..."

राजू अचानक आग्रमक आणि निर्णायक झाला. मोठ्या अधिकारवाणीने त्याने जाहीर केलं, "मुलं शिकून-सवरून शहाणी व्हायला पाहिजेत असं मला वाटलं." आपलं बोलणं त्याला स्वत:लाच आवडलं त्यामुळेच आवाजात कळकळ आणून तो पुढे म्हणाला, "प्रत्येकाला सुखी आणि ज्ञानी करणं हे आपलं कर्तव्य आहे, हे विसरता कामा नये."

ह्या पराकोटीच्या उदात्त विचारांनी गुरुजी फारच प्रभावित झाले. "तुमच्या मार्गदर्शनाखाली मी काहीही करायला तयार आहे," ते भारावून म्हणाले.

“मी केवळ एक साधन आहे. मला मार्ग दाखवणारा दुसराच कोणी आहे,” राजू नम्रपणे म्हणाला.

या संभाषणाच्या परिणामत: गुरुजींचं आमूलाग्र मतपरिवर्तन झालं. दुसऱ्याच दिवशी गावातल्या डझनभर मुलांना घेऊन ते मंदिराच्या सभागृहात हजर झाले. सर्व मुलांच्या भालप्रदेशावर भस्म लावलेलं होतं. गुरुजींची शिकवणी सुरू झाली तशी रात्रीच्या नीरव शांततेत मुलांच्या पाट्यांवरून फिरणाऱ्या पेन्सिलींचा कुरकुर आवाज ऐकू यायला लागला. राजू नेहमीच्या चौथऱ्यावर बसून मोठ्या कनवाळूपणे ते दृश्य पाहत होता. केवळ बाराच विद्यार्थी गोळा करता आले या गोष्टीविषयी दिलगिरी व्यक्त करून गुरुजी म्हणाले, “रात्रीच्या वेळी नदी पार करायला मुलं घाबरतात. त्यांना मगरींची भीती वाटते.”

“स्वच्छ मन आणि स्थिर सदसद्विवेकबुद्धी असल्यावर तुम्हाला कसलीही भीती बाळगायला नको,” राजूने मोठं गंभीर तत्त्वज्ञान सांगितलं. असे उदात्त आणि विद्वत्ताप्रचुर विचार आपल्याला सुचतात याचं त्याला कौतुकमिश्रित आश्चर्य वाटलं. त्याच ओघात तो गुरुजींना समजुतीच्या स्वरात म्हणाला, “बाराच मुलं आली म्हणून निराश होऊ नका. या बारा मुलांना तुम्ही व्यवस्थित शिकवलंत तर शंभर पटीने जास्त मुलांना ज्ञानदान दिल्याचं पुण्य तुम्हाला लाभेल.”

“गैरसमज करून घेऊ नका, पण शक्य असेल तेव्हा या मुलांशी बोलाल का?” गुरुजींनी नम्र विनंती केली.

जीवन, अनंत विश्व अशा विषयांवर भाष्य करायची संधी राजूपुढे आयतीच चालून आली. ती न दवडता त्याने सुविचार, स्वच्छता, रामायण आणि त्यामधील व्यक्ती अशा अनेकविध विषयांवर व्याख्यान दिलं. स्वत:च्याच आवाजाने तो मंत्रमुग्ध होत होता. तन्मयतेने त्याचं बोलणं ऐकणाऱ्या मुलांचे वर उचललेले चेहरे मंदिरातील मंद प्रकाशात चमकत होते. त्यांवरील

भक्तिभाव पाहून राजूला आपली प्रतिमा उंचावते आहे असा साक्षात्कार झाला. एकूण प्रकारामुळे सर्वच प्रभावित झाले असले तरी स्वत: राजूवर त्याचा सर्वांत जास्त परिणाम झाला होता!

आता त्या गोष्टीचा विचार करता मी इतका काही अडाणी, वाया गेलेला नव्हतो असं जाणवतं. स्वत:ची बौद्धिक कुवत मोजण्यात आपण कमी पडतो असं मला वाटतं. स्टेशनवरील आमच्या दुकानात ब्रेड, पाण्याच्या बाटल्या विकत बसायचो तेव्हा माझ्याकडून उत्तम दर्जाचं वाचन झालं. मी सतत काही ना काही शिकत, आत्मसात करत असे. विद्यार्थी आपली शालेय पुस्तकं आमच्या दुकानात विकण्यासाठी ठेवत. ती मी वाचायचो. अप्पांना आपल्या दुकानाचा भारी अभिमान होता. पण मी मात्र मोठमोठी स्वप्नं पाहायचो. ब्रेड, बिस्किटं विकण्यात मला अजिबात रस नव्हता. मी काहीतरी भव्यदिव्य करण्यासाठी जन्मलोय असं मला वाटायचं.

अप्पांचं त्याच वर्षी पावसाळ्याच्या दिवसांत निधन झालं. सारं काही अचानक घडलं. त्या रात्री नेहमीप्रमाणे ते आपल्या झोपडीवजा दुकानात उशिरापर्यंत बसले होते. नित्यप्रमानुसार दोस्तमंडळींशी गप्पाविनोद चालूहोता. दुकान बंद करायची वेळ आली तेव्हा गल्ला मोजून ते घरी आले. ताक-भात खाऊन झोपले ते उठलेच नाहीत. काळझोप लागली त्यांना.

आईने विधवेचं जिणं स्वीकारलं. अप्पांनी तिच्यासाठी पैशांची सोय करून ठेवली होती. मीही तिच्यासमवेत शक्य तितका वेळ घालवत असे. तिच्या परवानगीने मी अप्पांचं झोपडी-दुकान बंद करून टाकलं. स्टेशनवरच्या दुकानातच बस्तान ठोकलं. त्याच सुमारास मी काही नवीन बदलही अमलात आणले. जुनी वृत्तपत्रं आणि मासिकं दुकानात ठेवायला लागलो. शालेय पुस्तकांची खरेदी-विप्रीही चालू केली. गिऱ्हाइकं फार नसली तरी गाडीने येणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या वाढत होती. मालगुडीमध्ये अल्बर्ट मिशन कॉलेज नव्यानेच सुरू झालं होतं. साडेदहा वाजताची लोकल गाडी कॉलेजतरुणांनी भरलेली असे. मला लोकांशी बोलायला, तसंच त्यांचं बोलणं ऐकायला आवडायचं. केवळ केळं खाण्यासाठी तोंड उघडणारी गिऱ्हाइकं मला कंटाळवाणी वाटत. पीकपाणी, मालाचे भाव आणि कोर्टकचेऱ्या हे विषय वगळून अन्य

कोणत्याही विषयावर चर्चा, मतं व्यक्त करणारे लोक मला भावायचे. अप्पांच्या मृत्यूनंतर त्यांचे जुने मित्र येईनासे झाले. बहुधा गप्पांचा फड रंगवण्यासाठी त्यांना प्रेक्षक कमी पडायला लागले असावेत.

गाडीची प्रतीक्षा करणारे विद्यार्थी माझ्या दुकानामध्ये वेळ काढायला येत. दुकानात नारळांच्या जागी पुस्तकं दिसायला लागली. लोक जुनी, चोरलेली आणि अन्य सर्वच प्रकारची पुस्तकं माझ्या दुकानात विकायला तसंच विकत घ्यायला येत. घासाघीस करण्यात मी चांगलाच तरबेज झालो होतो. उदाहरणार्थ: पुस्तक विकत घेताना मी फारसा उत्साह दाखवत नसे. त्यामुळे कमी किमतीत सौदा होई. त्याउलट काही विकायचं असल्यास माझ्या रसवंतीला बहर येई. खरं पाहता माझा हा व्यवहार नियमामध्ये बसत नव्हता. पण आमचे स्टेशनमास्तर उदारमनस्क होते. अर्थात ते आणि त्यांच्या मुलांना माझ्या दुकानातून काहीही आणि कितीही वस्तू उधारीवर मिळायच्या हा महत्त्वाचा मुद्दा होताच. शिवाय दुकानातील वाढत गेलेल्या पुस्तकांच्या आणि मासिकांच्या गठ्ठ्यामधून हवं ते मोफत वाचायची सवलतही त्यांना होती.

माझा पुस्तकांचा व्यवसाय काहीसा अनपेक्षितपणे सुरू झाला. त्याचं असं झालं की, आमच्या दुकानात खरेदी करून लोक त्या वस्तू हातामध्येच घेऊन जात. वस्तू कागदामध्ये व्यवस्थित बांधून द्याव्यात असं मला वाटायचं, पण अप्पांचा त्या गोष्टीला विरोध होता. 'स्वत:चे कागद घेऊन आले तर ठीक, मी कागद देणार नाही. जेमतेम थोडा पैसा मिळतो. त्यात कागदाचा खर्च मला झेपणार नाही,' असं ते म्हणायचे. 'तेलासाठी स्वत:चं भांडं घेऊन येतातच की... आपण थोडंच त्यांना डब्यात घालून देतो?' असं समर्थनही ते करायचे. त्यांच्या या धोरणामुळे आमच्या दुकानात कागदाचा एक कपटादेखील सापडत नसे. त्यांच्या निधनानंतर मी हा नियम बदलला. मला जुनी पुस्तकं, वर्तमानपत्रं वगैरे हवी आहेत अशी बातमी फैलावताच दुकानात रद्दीचा ढीगच लागला. कामं नसली की मी पुस्तकांचं वर्गीकरण करत बसे. दोन गाड्यांच्या मधल्या वेळात स्टेशनवरची गर्दी कमी होई, सारी गजबज शांत होत असे. अशा वेळी

पुस्तकं वाचत बसण्यात मला परमानंद मिळायचा. वाचताना मध्येच मी समोरच्या विशाल चिंचेच्या वृक्षाकडे नजर टाकत असे. सर्व तऱ्हेची पुस्तकं वाचायचा मी सपाटाच लावला. मनोरंजक, कंटाळवाणी, न कळणारी, विचार करायला लावणारी पुस्तकं वाचताना कधीमधी डुलकीही काढायचो. एखाद्या पुस्तकातील तत्त्वज्ञान मला आवडायचं. कधी उदात्त विचार वाचून मी भारावून जायचो. प्राचीन मंदिरं, भग्नावशेष, आधुनिक इमारती, युद्धनौका, सैन्य अशीविविध चित्रं पाहताना मी तल्लीन होऊन जायचो. सुंदर युवतींची चित्रं पाहताना जरा जास्तच रमायचो. रद्दीमुळे मला बरंच ज्ञान आणि माहिती मिळाली हे मात्रखरंय.

राजूने दिलेल्या भाषणामुळे वर्गातील मुलं अक्षरश: मंत्रमुग्ध झाली होती. (केवळ मुलंच नव्हे, तर त्यांचे गुरुजीदेखील आश्चर्याने आ वासून ऐकत होते.) राजूने सांगितलेल्या अद्भुत गोष्टींची मुलांनी आपापल्या घरी रसभरित वर्णनं केली. आणखी नवनवीन काय ऐकायला मिळतंय याची उत्सुकता असल्याने सारेच दुसऱ्या दिवसाची अत्यंत आतुरतेने वाट पाहत होते. लवकरच मुलांबरोबर त्यांचे पालकही मंदिरात येऊ लागले. “गुरुजी, मुलांना रोज घरी यायला खूप उशीर होतो, घाबरतात ती. रात्रीच्या अंधारात नदी पार करायला त्यांना फारच भीती वाटते,” हे सांगताना सर्वांच्या स्वरामध्ये अजीजी होती.

“फारच छान, फारच छान,” राजू त्यांचा संकोच दूर करण्यासाठी म्हणाला. “खरं म्हणजे मीच हे सुचवणार होतो. तुम्ही आलात तर माझी काहीही हरकत नाही. कानावर चार सुविचार पडले तर तुमचं भलंच होईल. ‘कान उघडे ठेवून तोंड बंद ठेवायचं’ हा मंत्र ध्यानात ठेवलात तर तुमची प्रगती होईल.” बोलता बोलता राजूला हे चमकदार सुभाषित सुचलं होतं.

सर्व मंडळी खाली कोंडाळं करून बसली होती. लहान, थोर सारेच मोठ्या अपेक्षेने राजूकडे पाहत होते. गुरुजींची नजरही राजूकडेच लागली. मंदिराचं सभागृह गावकऱ्यांनी सोबत आणलेल्या कंदिलांच्या उजेडात झळकत होतं. महत्त्वपूर्ण सभा असावी असं एकंदर वातावरण तयार झालं. नाट्यगृह प्रेक्षकांनी गच्च भरलेलं असावं आणि रंगमंचावर उभ्या असलेल्या नटाला

संवाद किंवा अभिनय आठवू नये तसं काहीसं राजूला वाटत होतं. अखेर तो गुरुजींना म्हणाला, "तुम्ही कोपऱ्यामध्ये मुलांचा वर्ग घेतलात तर बरं होईल. एखादा कंदील घ्या बरोबर."

'या परक्या मुलांसंबंधीचे निर्णय आपण का घेतोय? गुरुजी आपली आज्ञा का पाळताहेत? तो कंदीलही आपला नाही, तरीही कोणत्या अधिकाराने आपण तो गुरुजींना देऊ करतोय?' राजूच्या मनात असे विचार चमकून गेले. गुरुजी तत्परतेने उठले, पण मुलं अजूनही रेंगाळत होती. अखेर राजू त्यांची समजूत घालत म्हणाला, "प्रथम अभ्यास करा. मी नंतर बोलेन तुमच्याशी. या मोठ्या माणसांशी जे काही बोलणार ते तुम्हाला समजणार नाही." आता मात्र सारे विद्यार्थी उठले आणि आपल्या गुरुजींच्या मागोमाग सभागृहाच्या एका कोपऱ्यामध्ये अध्ययनासाठी गेले.

"साहेब, प्रवचन सुरू करा," वेलनने नम्रपणे सुचवलं. काहीही प्रत्युत्तर न देता गहन विचारात असल्याच्या आविर्भावात राजू शांत बसून राहिला. "आपल्या ज्ञानाचा आम्हालाही लाभ होईल," वेलन पुढे म्हणाला. इतरांनीही सहमतिदर्शक आवाज केले.

राजूची अवस्था कोंडीत पकडल्यासारखी झाली. 'यातून आता सुटका नाही. माझ्याकडून अपेक्षित असलेली भूमिका निभावली पाहिजे.' कुठून सुरुवात करावी हे न सुचून राजूने मनातल्या मनात डोकं खाजवलं. 'मालगुडीमधील सुप्रसिद्ध पर्यटन स्थळांविषयी बोलावं का? की नैतिकता, नीतितत्त्वं अशा विषयांवर बौद्धिक घ्यावं? 'फार फार वर्षांपूर्वी एक अतिशय सज्जन अथवा दुर्जन माणूस फार मोठ्या दुविधेत सापडला. मार्ग सापडेना तेव्हा तो ईश्वराला शरण गेला...' ही कहाणी सांगावी का? राजूला अचानक सर्वाचा कंटाळाच आला. आत्मविश्वासाने बोलता येईल असा एकच विषय त्याच्या नजरेसमोर होता - 'तुरुंगातील दिवस आणि त्याचे फायदे!' चुकून संतपदी पोहोचलेल्या त्याच्यासारख्या व्यक्तीसाठी तर तो विषय योग्यच होता. राजूला कधी प्रेरणा मिळतेय याची मंडळी विनम्रतेने वाट पाहत होती. ते पाहून राजू अधिकच चिडचिडला. 'अरे मूर्खांनो, का माझा पिच्छा पुरवताय? माझ्यासाठी जेवण

आणताय ना? तेवढं काम करून जा इथून. त्याबद्दल आभार. पण मला एकांत हवाय,' असं बोलून त्यांना हाकलून लावावं अशी ऊर्मी त्याला झाली.

अखेर प्रदीर्घ काळ चिंतन केल्यानंतर राजू म्हणाला, "प्रत्येक गोष्टीसाठी एक ठरावीक वेळ यावी लागते." वेलन आणि त्याचे मित्र समोरच बसले होते. ते काहीसे चिंतेत पडले. राजूविषयी त्यांना आदर वाटत होता, हे खरं असलं तरी त्याच्या म्हणण्याचा अर्थ त्यांना नीटसा समजला नाही. त्यांचे चेहरे प्रश्नार्थक झाले. क्षणभर थांबून राजूने मोठ्या रुबाबात जाहीर केलं, "योग्य वेळ आल्यावर मी बोलेन. आज नाही."

"साहेब, आज का नाही?" कोणीतरी न राहवून विचारलंच.

"कारण ते तसंच आहे," राजू मोठ्या गूढपणे म्हणाला. "मुलांची शिकवणी संपेपर्यंत आज दिवसभरात तुम्ही काय केलंत आणि काय काय बोललात या गोष्टीवर चिंतन करावं असं मला वाटतं."

"म्हणजे काय करायचं?" अत्यंत बुचकळ्यात पडून एकाने विचारलं.

"उठल्यापासून आत्तापर्यंत तुम्ही जे काही बोललात, जे काही संभाषण केलंत, त्यातला प्रत्येक शब्द आठवून त्याविषयी विचार करा," राजूने समजावून सांगितलं.

"पण मला तर आठवतही नाही, काय बोललो ते."

"म्हणून तर स्मरण करा आणि विचार करा असं मी म्हणालो. स्वत:चेच शब्द आठवत नसतील तर इतरांचं बोलणं तुम्ही कसं काय लक्षात ठेवणार?" राजूचं हे उपरोधिक बोलणं मंडळींना फार आवडलं असावं, कारण सर्वांमध्ये खसखस पिकली. हास्याची लाट ओसरल्यावर राजू म्हणाला, "तुम्ही अंतर्मुख होऊन, स्वतंत्ररीत्या विचार करायला शिकलं पाहिजे. शेळ्या-मेंढ्यांप्रमाणे तुम्हाला हाकावं लागायची गरज भासू नये अशी माझी इच्छा आहे."

हे ऐकून सर्वांनीच नम्रतेने का होईना, पण नापसंतीचा सूर काढला. “साहेब, ते कसं काय जमणार? आम्ही जमिनीची नांगरणी, गाईगुरं पाळणं अशी कामं व्यवस्थित करतो, पण तात्त्विक विचार करणं अशक्य आहे. तो आमचा प्रांत नाही. आपल्यासारख्या विद्वान लोकांनी विचार करायचा आणि आम्हाला मार्ग दाखवायचा,” वेलनने गावकऱ्यांची बाजू मांडली. “दिवसभरात आम्ही काय बोललो त्याचं स्मरण तुम्ही करायला सांगितलंत, ते कशासाठी?” वेलनने विचारलं.

वास्तविक खुद्द राजूलादेखील आपण असं का सांगितलं असावं, याची कल्पना नव्हती! त्याने काहीतरी थातूरमातूर उत्तर द्यायचा प्रयत्न केला, “तुम्ही तसं करा म्हणजे त्यामागील कारण आपोआप समजेल.” काहीतरी प्रचंड गूढ, न समजलेलं बोलणं हे संतपदी पोचल्याचं लक्षण असावं. “प्रयत्न केल्याशिवाय आपल्याला काय जमतं आणि काय जमत नाही हे कसं समजणार?” राजूने विचारलं. असं बोलून राजू या साध्यासुध्या भोळसट लोकांना धूसर वैचारिक दलदलीमध्ये अधिकाधिक खोल बुडवत होता.

“काही क्षणांपूर्वी बोललेलं मला आठवत नाही. एका वेळी दहा गोष्टी डोळ्यांसमोर फेर धरायला लागतात.” एकाने गळा काढला.

“मला नेमकं हेच म्हणायचंय. तुमच्यामध्ये हा बदल घडायला हवा. अन्यथा तुम्हाला त्यामधील आनंदाची अनुभूती मिळणार नाही,” असं म्हणून राजूने गावकऱ्यांमधून तिघांची निवड केली. “उद्या किंवा पुढच्या वेळी इथे याल तेव्हा प्रत्येकाने दिवसभरात जे काही संभाषण केलं असेल त्यातील फक्त सहा शब्द मला सांगायचे. मी फक्त सहा शब्द लक्षात ठेवायला सांगतो आहे,” हे सांगताना फार मोठी सवलत देत आहोत असा राजूचा आविर्भाव होता. “सहाशे नव्हे, फक्त सहा शब्द,” राजू खेळीमेळीच्या स्वरात म्हणाला.

“सहाशे? इतके सारे शब्द लक्षात ठेवणं कोणालाही शक्य आहे का?” एकाने अचंब्याने विचारलं.

“मला जमतं,” राजू म्हणाला. आपल्या या अफाट कर्तृत्वाचं साऱ्यांनी कौतुक करावं ही राजूची रास्त अपेक्षा होती. गावकऱ्यांनी पसंतीदर्शक आवाज काढून ती पूर्ण केली. एवढ्यात मुलांचा वर्ग सुटला त्यामुळे राजूनेही सुटकेचा नि:श्वास सोडला. ‘आपलाही वर्ग संपला’ हे दर्शवण्यासाठी तो उठून तडक नदीच्या दिशेने चालायला लागला. मंडळी मागोमाग आलीच. “मुलांना झोप आली असेल. त्यांना सांभाळून घरी घेऊन जा. पुन्हा या,” असं म्हणून राजूने त्यांना निरोप दिला.

पुढच्या सभेत काय करायचं, याचा विचार राजूने करून ठेवला होता. मंडळी जमल्यावर त्याने हलक्या टाळ्या वाजवत भजन म्हणायला सुरुवात केली. ध्रुवपदाला बाकीचेही साथ देत. प्राचीन मंदिराचं सभागार पवित्र मंत्रोच्चारांनी दुमदुमून गेलं. पुरुष, स्त्रिया, लहान मुलं एकमुखाने भजनं म्हणत होती. कोणीतरी ब्रॉन्झच्या उंच समया आणल्या होत्या. दुसऱ्या कोणी त्यांमध्ये तेल भरलं. आणखी कोणी दिवसभर कापसाच्या वाती वळल्या होत्या. समयांचा प्रकाश मंदिरात पसरला. गावकऱ्यांनी देवदेवतांच्या छोट्या तसबिरी मंदिराच्या खांबांवर लावून टाकल्या. बायकाही मागे नव्हत्या. रोज त्या आळीपाळीने मंदिराची फरशी धुऊन स्वच्छ करत. सुरेख, रंगीबेरंगी रांगोळ्या काढून मंदिर सजवत. फुला-पानांच्या माळा-तोरणांनी सभागृह सुशोभित करत. मंदिराचं रूपच पालटून गेलं. मधल्या चौथऱ्यावर कोणीतरी मुलायम, रंगीत गालिचा अंथरला. गावकऱ्यांना बसण्यासाठी चटया टाकल्या होत्या.

लांब दाढी आणि केस वाढवले तर आपल्या आध्यात्मिक स्थानाला अधिक बळकटी येईल असं राजूला वाटू लागलं. तुळतुळीत दाढी आणि छोटे केस असलेला संतमहात्मा ही गोष्ट विरोधाभासी वाटते. भरघोस दाढी, मानेवर रुळणारे केस अशी प्रतिमा निर्माण करण्यासाठी राजूने जोरदार प्रयत्न सुरू केले. त्या मधल्या काळात अर्धवट वाढलेले दाढीचे खुंट टोचायचे तेही त्याने धीरोदात्तपणे सहन केलं. तपश्चर्येचं फळ मिळून त्याची दाढी चांगलीच वाढली. विचारमग्न होऊन दाढी कुरवाळण्याच्या अवस्थेपर्यंत पोचला तेव्हा त्याची प्रतिष्ठा कल्पनेच्या

पलीकडे उंचावली होती. स्वतंत्र, खाजगी जीवन संपलंच. त्याच्या सभांना प्रचंड गर्दी होऊ लागली. मंदिराचं सभागार अपुरं पडून मंडळी बाहेरच्या व्हरांड्यात, नदीतीरावरसुद्धा बसायला लागली.

वेलन आणि थोडे गावकरी वगळता अन्य कोणाचीही नावं अथवा चेहरे लक्षात ठेवायची तसदी राजू घेत नसे. आपण कोणाशी संभाषण करत आहोत, त्या व्यक्तीचं नाव-गाव काय हे जाणण्याची आवश्यकता त्याला भासेनाशी झाली. कोणा एकाचाच नव्हे, तर सर्वांचाच त्याच्यावर हक्क असावा अशी परिस्थिती निर्माण झाली. जनमानसातील त्याच्या प्रभावाला सीमा उरली नाही. धार्मिक मंत्रपठण आणि तत्त्वज्ञानपर प्रवचनं हा त्याच्या दैनंदिन जीवनाचा नित्यप्रम झाला होताच, पण त्याहीपुढे जाऊन तो औषधोपचारही करायला लागला. 'मुलं रात्री नीट झोपत नाहीत, किरकिर करतात' अशी तप्रार घेऊन येणाऱ्या मातांना तो धीर द्यायचा. किरकिरणाऱ्या बाळाचं पोट तपासून वनौषधी सुचवायचा. 'त्यानेही बरं वाटलं नाही, तर पुन्हा माझ्याकडे येऊन या' असा सल्लाही द्यायचा.

छोट्या बाळाच्या मस्तकावरून त्याने केवळ हात फिरवला तरी त्याच्यात सर्वांगीण सुधारणा दिसून येतात असा सर्वांनाच दृढविश्वास वाटायला लागला. वडिलोपार्जित मालमत्तेवरून भांडणं, विवाद या गोष्टींमध्ये मध्यस्थी करावी म्हणून गावकरी त्यालाच गळ घालायचे. अशा विविध गोष्टींमध्ये लक्ष घालण्यासाठी त्याला दुपारचे अनेक तास राखून ठेवावे लागत. व्यक्तिगत कामांसाठी त्याला जराही फुरसत मिळेनाशी झाली. पुढे तर अशी वेळ आली की, मंडळी येण्यापूर्वी भल्या पहाटे उठून त्याला आपली दैनंदिन आन्हिकं उरकावी लागत. या साऱ्याच धावपळीमुळे त्याच्यावर फार ताण येई. रात्री अखेर सामसूम झाली की तो सुटकेचा प्रदीर्घ नि:श्वास सोडायचा. पूर्वीसारखंच सर्वसामान्य माणसाप्रमाणे जीवन जगावं; सामान्य माणसासारखं खावं, प्यावं, ओरडावं, झोपावं अशी प्रचंड ऊर्मी त्याचं मन व्यापून टाकत असे.

# ५

'रेल्वे राजू'. लोक मला याच नावाने ओळखायचे. अनोळखी प्रवासीदेखील माझी कीर्ती ऐकल्याने मालगुडी स्टेशनवर उतरल्यावर आधी 'रेल्वे राजू'चा शोध घ्यायचे. काही लोकांच्या नशिबातच नावलौकिक, प्रसिद्धी लिहिलेली असते. मी अशा लोकांपैकी एक होतो. मी सहसा कोणाशी बोलायला जात नसे. पण लोकच आपणहून माझ्याशी संवाद साधत. नुकताच स्टेशनवर उतरलेला प्रवासी माझ्या दुकानात सोडा प्यायला वा सिग्रेटी खरेदी करायला हटकून थांबायचाच. मग 'ते अमुक-तमुक इथून किती लांब आहे?' किंवा 'इथे बरीच ऐतिहासिक स्थळं बघण्यासारखी आहेत का?' 'शरयू नदीचं उगमस्थान त्या पर्वतावर आहे आणि ते ठिकाण अप्रतिम सुंदर आहे असं ऐकलंय, ते खरं आहे का?' अशा चौकशा व्हायच्या. वारंवार अशा तऱ्हेचे प्रश्न ऐकून त्याविषयी आपल्याला सविस्तर माहिती नाही हे माझ्या लक्षात आलं. अर्थात 'मला माहिती नाही,' असं उत्तर मी कधीच देत नसे. तो माझा स्वभावच नव्हता. 'तुम्ही काय विचारताहात याची मला कल्पना नाही.' असं उत्तर दिलं असतं तर माझ्या आयुष्याची दिशा बदलली असती. पण तसं न करता मी म्हणायचो, "होय, खरोखरच ती जागा फार प्रेक्षणीय आहे. तुम्ही पाहिली नाही? जरूर वेळ काढा. अन्यथा इथे येण्याचा फायदा काय?" हे खरं असेलच असं नसायचं. आपण खोटं बोलतोय याचं मला वाईटही वाटायचं. पण 'एवढ्या उत्साहाने आपल्याला माहिती विचारताहेत, त्यांना नाराज का करा,' अशा विचाराने मी अशी उत्तरं देत असे.

त्यानंतर अर्थातच 'तिथे कसं जायचं' हा प्रश्न येई. 'मार्केटचा चौक त्या बाजूला आहे. तिथे एखाद्या टॅक्सीवाल्याला विचारलं तर तो सांगेल....' या माझ्या म्हणण्याला फारसा अर्थ नसायचा, कारण त्यामुळे त्यांचं शंकानिरसन व्हायचं नाही. एकदा एकाने या उत्तरानंतर मलाच बाजाराचा चौक आणि टॅक्सीपर्यंत घेऊन जाण्याची विनंती केली. आमच्या स्टेशनपोर्टरचा मुलगा

जवळच रेंगाळत होता. गाडी येण्याच्या वेळी पॉइंट-सिग्नलिंगचं काम तो करायचा. एरवी तो रिकामटेकडाच असे. त्याला दुकानाकडे लक्ष ठेवायला सांगून मी त्या प्रवाशाबरोबर निघालो.

चौकात कारंजाजवळ गफूर उभा होता - सावजाच्या शोधात. जुना खिलाडी होता गफूर. मोडक्या, टाकून दिलेल्या जुन्या गाड्या देशभरातून गोळा करून त्या दुरुस्त करण्यात त्याचा हातखंडा होता. भंगार गाड्यांमध्ये प्राण फुंकून तो त्यांचं रूप अक्षरश: पालटून टाकायचा आणि त्या गाड्या डोंगरदऱ्यांतून, रानावनातील ओबडधोबड रस्त्यांवर झोकात पळवायचा. गाडी रस्त्याच्या कडेला असलेल्या गटाराजवळ लावून तो त्याच्या नेहमीच्या जागी, कारंजाच्या कट्ट्यावर बसला होता. "गफूऽऽऽर," मी हाक मारली. "हे सद्गृहस्थ माझे अत्यंत चांगले स्नेही आहेत. त्यांना ती... जागा पाहायची आहे. तिथे सुरक्षितपणे नेऊन आणायची जबाबदारी तुझ्यावर. म्हणूनच ही धंद्याची वेळ असूनही दुकान सोडून मी स्वत: त्यांना घेऊन आलोय." यानंतर पैशांवरून थोडी घासाघीस झाली. नेहमीचं गिऱ्हाईक किती पैसे मोजायला तयार आहे हे विचारून मी गफूरला पटवायला बघायचो. त्याप्रमाणे आत्ताही भाडं ठरलं, पण गफूरचा खटारा पाहून गिऱ्हाईक काहीसं साशंक झालं. आता मात्र मी गफूरची बाजू घेतली, "घाबरायचं अजिबात कारण नाही. गफूरला या रस्त्यावरून कोणती गाडी सुखरूप चालवता येईल हे बरोबर माहिती आहे. त्यासाठी बरीच शोधाशोध करून त्याने अखेर खास हे मॉडेल निवडलंय. ही गाडी कोणत्याही जागी कशाही रस्त्यावरून चालवता येते. अनेकदा कच्चा रस्तादेखील नसतो, पण गफूर तुम्हाला व्यवस्थित परत आणेल. रात्रीच्या जेवणापर्यंत परत येशील ना, गफूर?"

"म्हणजे कसं आहे..." गफूर सावकाशपणे म्हणाला. "जायला सत्तर मैल आणि यायलाही तेवढेच. आत्ता एक वाजतोय. लगेच निघालो आणि वाटेत पंक्चर वगैरे झालं नाही..." मी वाक्य पूर्ण करायची संधी न देता घाईघाईने त्याला बाहेर काढलं. परतायला रात्रीच्या जेवणापर्यंत नव्हे, तर मध्यरात्र झाली. मात्र गफूरने त्याला सुखरूप परत आणलं हेही नसे थोडके! हॉर्न

वाजवून गफूरने मला उठवलं आणि भाड्याचे पैसे घेऊन गेला. दिवसभर रखडून आलेल्या प्रवाशाला सकाळी आठपर्यंत गाडी नव्हती. त्याने फलाटावरच, माझ्या दुकानाच्या छपराखाली पथारी टाकली. दुकान उघडून मी त्याला फळं आणि तत्सम काहीबाही खायला दिलं- अर्थात विकत...

प्रवासाची आवड असणारी मंडळी खूप उत्साही असतात हे मात्र खरं. प्रेक्षणीय स्थळं बघण्यासाठी ते वाटेल तेवढा त्रास सहन करायला तयार असतात. आरामात खायचं-प्यायचं सोडून एखादी सुंदर जागा पाहण्यासाठी शंभर मैल रखडत जायचं यामध्ये काय आनंद मिळतो कोणास ठाऊक! अर्थात तो त्यांचा प्रश्न आहे. मी कशाला निष्कारण मध्ये पडू? माझ्या दुकानातून कोण काय विकत घेतो - खाद्यपदार्थ, विडी-सिग्रेट याच्याशी जसा माझा संबंध नाही, मी केवळ विकायचं काम करतो, तसंच आहे हे. शरयू नदी पर्वतावरून खळाळत खाली गावामध्ये आलीय ना? मग तिचा उगम बघण्यासाठी धडपडत शंभर मैल जायचं हा मला तद्दन मूर्खपणा वाटतो. मी स्वत: या गावचाच असूनही मला शरयू नदी त्या तिथे उगम पावली हे आत्तापर्यंत माहिती नव्हतं! हा परगावाहून आलेला प्रवासी त्या स्थळाच्या सौंदर्याची फार स्तुती करत होता. “माझ्या आईला आणि पत्नीलाही बरोबर आणायला हवं होतं. त्यांना ते अनुपम सुंदर उगमस्थान पाहायला मिळालं नाही याचं वाईट वाटतंय.” पुढे या गोष्टीचा प्रत्यय वारंवार येत असे. एखादं प्रेक्षणीय स्थळ पाहिल्यानंतर ती व्यक्ती पत्नी किंवा कन्या बरोबर नाही याविषयी हमखास चुकचुकत असे. आपल्या हातून प्रचंड गुन्हा घडलाय असं त्यांचं वागणं असे. नंतर पूर्ण वेळ गाइडचा पेशा स्वीकारल्यानंतर या गोष्टीचा मी बरोबर उपयोग करून घेई. एखाद्या सुंदर जागी गेल्यावर मी मुद्दाम म्हणायचो, “या सौंदर्याचा आस्वाद घ्यायला तुमचा सर्व परिवार इथे असायला हवा होता.” साहजिकच माझ्या गिऱ्हाइकाला भयंकर अपराधी वाटायचं. पुढच्या वेळी सर्व कुटुंबकबिल्यासहित यायचं आश्वासन तो तत्काळ देऊन टाकायचा.

नदीच्या पवित्र उगमस्थानाविषयी तो माणूस रात्रभर भरभरून बोलत होता, "पर्वतशिखरावर पुंडाजवळ लहानसं मंदिर आहे. तेच शरयू नदीचं उगमस्थान असावं. देवी पार्वतीने अग्निपुंडात उडी घेऊन स्वत:ला जाळून घेतल्याची कहाणी पौराणिक ग्रंथांमध्ये वाचायला मिळते. तेच हे पुंड असावं. मंदिराच्या एका खांबावरील चित्रामध्ये तो प्रसंग कोरलेला आहे. देवीने अग्निप्रवेश केल्यानंतर तिथून पाण्याचा स्रोत निघालाय," वगैरे वगैरे. कधी एखादा जाणकार विद्वान माझ्या ज्ञानात आणखी भर घालत असे. उदाहरणार्थ: "मंदिराचा कळस ख्रिस्तपूर्व तिसऱ्या शतकामध्ये बांधण्यात आला असावा..." किंवा "वस्त्रांच्या शैलीवरून मंदिर तिसऱ्या शतकात उभारलं असावं असं दिसतंय..." मला या सनावल्यांमध्ये अजिबात रस नव्हता. एखादं प्रेक्षणीय स्थळ कोणत्या साली अस्तित्वात आलं हे माझ्या त्या वेळच्या मन:स्थितीनुसार मी ठोकून द्यायचो! माझा ग्राहक कोणत्या प्रकारचा आहे यावरदेखील ते अवलंबून असे. उदाहरणार्थ: तो अभ्यासू असला तर फारसं तपशिलात न जाता मी ढोबळ माहिती द्यायचो. इतकंच नव्हे, तर त्यालाच बोलण्यास उद्युक्त करायचो. तोही मोठ्या आनंदाने मला माहिती पुरवायचा. माहितगार लोकांपुढे तोंड न उघडणारा मी, सामान्य सावज मिळालं की घडाघडा बोलत सुटायचो. 'ती जगातील एकमेव, सर्वांत महान, सर्वांत भव्य गोष्ट आहे' असं बेधडक सांगायचो. मनात येतील ते खोटेनाटे तपशील द्यायचो. अमुक भग्नावशेष ख्रिस्तपूर्व तेराव्या शतकातील किंवा ख्रिस्तजन्मानंतर तेराव्या शतकातील आहेत असं वाटेल ते सांगायचो. सर्वांत कहर म्हणजे दमलो असेन किंवा त्या व्यक्तीचा कंटाळा आला असेल तर रमणीय स्थळाविषयी टोकाचं खोटं बोलून प्रकरण संपवूनच टाकायचो. उदाहरणार्थ : "हे बांधकाम गेल्या वीस वर्षांमधील आहे. पडझड झाल्याने प्राचीन अवशेष वाटताहेत. असे अवशेष ठिकठिकाणी आढळतील." हे ऐकल्यावर उत्साहाने पर्यटनाला निघणाऱ्याचा रसभंग होई यात नवल ते काय! पण इतक्या सराईतपणे थापा मारण्याइतपत आत्मविश्वास आणि कोडगेपणा येण्यासाठी बरीच वर्षं लोटावी लागली.

पोर्टरचा मुलगा दिवसभर माझं दुकान सांभाळायचा. रात्री मी हिशेब घेत असे. त्याला किती मोबदला द्यायचा हे ठरवलं नव्हतं. अधूनमधून थोडे पैसे त्याच्या हातावर टेकवायचो. आईला हा व्यवहार अजिबात पसंत नव्हता. "राजू, त्याला कशाला कामावर ठेवलंय? गावभर हिंडत फिरतोस त्यापेक्षा स्वत: दुकान चालवत जा. नाहीतर निदान त्याची दलाली तरी ठरवून टाक. हे उद्योग करून काय फायदा?" ती कळकळीने विरोध करत म्हणायची.

त्या रात्री परतायला उशीर झाला होता. मी जेवायला बसलो होतो. "आई, तुला यातलं काही समजतं नाही. दुकानात बसण्यापेक्षा हे काम कितीतरी छान आहे. नवनवीन जागा बघायला मिळतात. गाडी, बसमधून प्रवास, गिऱ्हाइकांबरोबरच अनेकदा खाणंपिणं होतं. शिवाय पैसेही मिळतात. मी किती प्रसिद्ध आहे याची तुला कल्पना तरी आहे का? बॉम्बे, मद्रास अशा दूरवरच्या शहरांमधून येणाऱ्या पर्यटकांनाही 'रेल्वे राजू' हवा असतो. पार लखनौपर्यंत माझं नाव पोचलंय. अशी प्रसिद्धी मिळवणं हे साधं काम नाही. तंबाखू, विडी-काडी विकण्यापेक्षा हे कितीतरी पटीने चांगलंय की नाही?" मी फुशारकी मारत म्हणालो.

"का रे? तुझे अप्पाही विडी-काडीच विकायचे ना? त्यांचं काय वाईट चाललं होतं?" आई अजूनही चिडलेलीच होती.

"मला तसं म्हणायचं नव्हतं. मी दुकानही संभाळीन," मी आईला शांत करण्यासाठी म्हणालो. तीही खूष झाली. झोपण्यापूर्वी ती मधूनच आपल्या भावाच्या मुलीचा - ललिताचा विषय काढायची. खेडेगावात राहणाऱ्या या भाचीबरोबर शुभमंगल करायला मी होकार देईन अशी तिला आशा होती. अर्थात तसं ती स्पष्टपणे कधीही बोलत नसे. 'तुला माहितीय, ललिताला शाळेत बक्षीस मिळालं. भावाचं आजच पत्र आलंय. त्याने ही बातमी दिली.' असं काहीतरी सांगून ती आडवळणाने तिचा विषय काढायची.

गाडी झुकझुक करत फलाटावर शिरण्यापूर्वीच मला गिऱ्हाइकाचा वास यायचा. पाणी कुठे लागेल याचा अचूक अंदाज वर्तवणारी माणसं असतात ना? माझंही काहीसं तसंच होतं. सावज आलंय हे मला अंत:प्रेरणेनेच समजायचं. गाडीतून उतरल्याबरोबर दिसेन अशा मोक्याच्या जागी मी फलाटावर उभा राहायचो. 'खांद्यावर कॅमेरा अथवा दुर्बीण लटकलेली' ही जातिवंत पर्यटकाची खूण असली तरी त्याविनादेखील मी त्यांना अचूक ओळखायचो. माझी देहबोलीही सराईत गाइडसारखी झाली होती; म्हणजे एखाद दिवशी गाडी थांबण्यापूर्वीच मी फलाटावरून निघणं, म्हणजे त्या दिवशी माझ्यासाठी खास काही गिऱ्हाईक नसणार, असा तुम्ही सहजच अंदाज करू शकला असता! काही थोड्याच महिन्यांच्या उमेदवारीनंतर मी एक उत्तम गाइड झालो. नवशिका गाइड आणि व्यावसायिक दुकानदार हे चित्र हळूहळू बदलत गेलं. मी पूर्ण वेळ गाइड आणि अंशत: दुकानदार अशा भूमिकेत कधी शिरलो ते माझं मलाच समजलं नाही. ग्राहक नसेल तरी मी दुकानात न बसता गफूरशी गप्पा मारायला जायचो. तो त्याच्या नेहमीच्या जागी, कारंजाच्या कट्ट्यावर बसलेला असायचा. 'जुन्या, मोडक्या गाड्या' या आवडत्या विषयावर तो बडबड करायचा आणि मी ऐकायचो.

माझ्या सर्व ग्राहकांची त्यांच्या स्वभावविशेषांवरून मी वर्गवारी करायचो. फारच वैविध्यपूर्ण नमुने असायचे हे मात्र खरं. काहींना फोटोग्राफीची मनस्वी आवड असे, त्यामुळे ते प्रत्येक गोष्टीकडे कॅमेऱ्याच्या डोळ्यातूनच बघायचे. फलाटावर पाऊल टाकल्याबरोबर, सामानही उचलण्यापूर्वी त्यांचे प्रश्न सुरू होत, "इथे फिल्म डेव्हलप करायची सोय आहे ना?" "अर्थात, मालगुडी फोटो ब्यूरो सर्वांत मोठं..." माझं वाक्य पूर्ण व्हायच्या आतच दुसरा प्रश्न येई, "आणि मला रोल हवे असतील तर? तसा मी भरपूर साठा बरोबर आणलाय, पण तरीही संपलेच तर... सुपर-पॅन्क्रो थ्री-कलर किंवा तशाच तऱ्हेचा रोल मिळू शकेल का?"

"नक्की मिळेल. त्या दुकानात हमखास असणार."

"लगेच डेव्हलप करून बघायला मिळेल का?"

“काळजीच नको. फार हुषार आहे तो. तुम्ही वीस आकडे मोजेपर्यंत प्रिंट डेव्हलप करून फोटो तुमच्या हातात पडतील,” मी आत्मविश्वासाने म्हणायचो.

तोही खूष होऊन म्हणायचा, “फारच छान. मग आता सर्वप्रथम कोणत्या ठिकाणी जायचं?”

सर्वसाधारणत: अशाच प्रकारचे प्रश्न पर्यटक मंडळी विचारायची. माझी उत्तरंही तयार असत. पण ‘प्रथम कुठे जायचं?’ हा प्रश्न कोणाकडून येतो हे नीट बघून मगच मी उत्तर देत असे. उदाहरणार्थ, विचारणाऱ्या गिऱ्हाइकाजवळ किती वेळ आणि पैसा आहे ह्याचा अंदाज घेतल्यानंतरच कोणती प्रेक्षणीय स्थळं, कोणत्या प्रमाने दाखवायची हे मी ठरवत असे. मालगुडी आणि आजूबाजूच्या सर्व परिसराची मला खडान्खडा माहिती होती. त्यातल्या कोणत्या गोष्टी कशा आणि किती वेळात पाहायच्या हे प्रत्येकाच्या इच्छेनुसार चालायचं. काहींना धावती तर काहींना रमतगमत भेट द्यायला आवडायचं. मी सर्वांची मर्जी सांभाळायचो. काही तासांत सर्व ठिकाणं उरकणारे महाभागही असायचे. काहींना नद्या, पर्वतांमध्ये भटकंती करायला, निसर्गाच्या सान्निध्यात रमायला आवडे. प्राचीन अवशेषांमध्ये विशेष रस असणाऱ्यांची संख्याही कमी नव्हती. अशांना फिरण्यासाठी एक आठवडाही कमी पडायचा. प्रवाशाकडे किती पैसे आहेत, चेकबूक असेल तर ते कितपत विश्वासार्ह आहे याची खातरजमा केल्यानंतरच पुढचा कार्यप्रम ठरायचा. ‘चेक’ प्रकरण फारच नाजूक होतं. कधीमधी एखादा पर्यटक चेकने पैसे देऊ करायचा. अर्थातच आमचा गफूर, फोटो ब्यूरोचा मालक किंवा मेम्पी पर्वतशिखरावरच्या डाकबंगल्याचा रखवलादार अनोळखी माणसाकडून चेक घ्यायला तयार नसत. अशा वेळी मी अत्यंत कौशल्याने प्रसंग हाताळायचो. त्याला न दुखवता समजवायचो, “अरे बापरे, आमच्या इथल्या बँकांचा कारभार फारच ढिला आहे. कधी कधी चेक वटण्यासाठी वीस दिवसही लागतात. या गरीब लोकांना एवढे दिवस थांबणं परवडणार आहे का?” असं बोलण्याने आमच्या गावातल्या बँकांची बदनामी व्हायची, पण त्याला इलाज नव्हता.

पर्यटक फलाटावर उतरल्यापासून त्याच्या हालचालींकडे माझं लक्ष असे. उदाहरणार्थ, सामान कोण उचलतोय? हमाल की तो स्वत:? हॉटेलात जाण्यासाठी टॅक्सी घेतो की टांगा? टांगेवाल्याबरोबर भाड्यासाठी हुज्जत घालतो, की टॅक्सी-टांगा न करता तंगड्या तोडत चालायला लागतो? अर्थात हमाल किंवा वाहन ठरवण्यासाठी मीच पुढे व्हायचो. स्टेशनवर उतरल्याक्षणी त्याने 'रेल्वे राजू'ची चौकशी केली या एकमेव कारणामुळे त्याची ही कामं करायची जबाबदारी मी घ्यायचो. हॉटेलमध्येदेखील स्वस्त की महाग खोली घ्यायची हे त्याच्या मर्जीनुसार ठरवायचो. अगदी स्वस्तातली खोली घेताना समर्थनार्थ ते म्हणायचे, "नाहीतरी दिवसभर भटकायचंच आहे. रात्री फक्त झोपण्यापुरती जागा हवी, मग विनाकारण जास्त पैसे कशाला खर्च करायचे? तुला पटतंय की नाही?"

"हो, हो, अगदी बरोबर," मी मान हलवून दुजोरा द्यायचो. 'सर्वप्रथम कुठे जायचं?' याचं उत्तर देणं मात्र मी टाळायचो. एवढ्या थोड्या वेळेत त्याचा स्वभाव, आवडीनिवडी समजणं कठीण असल्याने मी कोणत्याही प्रकारच्या सूचना देत नसे. एक म्हणजे नुकताच प्रवास करून दमून-भागून आलेल्या माणसाला नीट विचार करणं काहीसं जडच जातं. स्वच्छ अंघोळ वगैरे करून, कपडे बदलून, इडली-कॉफीचा नाश्ता करून ताजातवाना झाल्यानंतरच कोणाही दक्षिण भारतीयाची बुद्धी काम करायला लागते. मलादेखील नाश्ता-पाण्याचा आग्रह करणारी व्यक्ती उदार मनाची आहे हे समजायचं. तरीही मी थोडी जवळीक वाढल्यानंतरच त्याचा स्वीकार करत असे. यथावकाश मी सरळ विचारायचो, "इथे किती दिवस मुक्काम आहे?"

"फार तर तीन दिवस. तेवढ्या वेळात सर्व पाहून होईल का?"

"नक्की. तुम्हाला कोणती ठिकाणं पाहणं खूपच आवश्यक वाटतं, ते लक्षात घेऊन त्यानुसार कार्यप्रम ठरवता येईल." मालगुडीच्या परिसरातील ऐतिहासिक, नैसर्गिक आणि आधुनिक अशा अनेक प्रकारच्या प्रेक्षणीय स्थळांविषयी माहिती देऊन त्याला नेमक्या कोणत्या गोष्टींमध्ये रस आहे हे मी जाणून घेत असे. धार्मिक यात्रा करणाऱ्यांसाठी पन्नास मैलांच्या

परिघातील किमान डझनभर मंदिरांची मी जंत्री वाचायचो. पवित्र स्नान करून पावन व्हायची इच्छा असणाऱ्यांसाठी आमची शरयू नदी होतीच.

गाइडच्या कारकिर्दीमधील अनुभवांवरून एक गोष्ट माझ्या प्रकर्षाने लक्षात आली, ती म्हणजे, प्रत्येक पर्यटकाच्या आवडीनिवडी वेगवेगळ्या असतात. खाण्यापिण्याच्या सवयीप्रमाणेच आहे हे. काही उसळता धबधबा पाहून खूष होणारे, तर काही भग्नावशेष (तडा गेलेल्या भिंती, भंगलेल्या मूर्ती आणि विटांचे तुकडे) पाहून वेडे होणारे असे नमुनेही पाहायला मिळतात. देवदर्शनापासून जलविद्युत कारखाना असे संपूर्णतया भिन्न रुची दर्शवणारे पर्यटक माझ्या पाहण्यात आलेत. प्रेक्षणीय स्थळं पाहण्यासाठी धावपळ न करता एखाद्या रमणीय ठिकाणी चार दिवस शांतपणे व्यतीत करायलाही पर्यटक येत असत. उदाहरणार्थ, मेम्पीच्या माथ्यावर चारही बाजूंना काचेच्या खिडक्या असलेला सुरेख बंगला होता. सभोवतालचा मैलोगणती रम्य परिसर तिथून दिसायचा. वन्य प्राण्यांचंही दर्शन व्हायचं. निसर्गसौंदर्य पाहून झिंगणारे कविमनाचे आणि दारू पिऊन झिंगणारे असे दोन्ही प्रकारचे पाहुणे बंगल्यामध्ये मुक्कामाला येत. मदिरेबरोबर कधी मदिराक्षीही सोबतीला असत. सर्वांगसुंदर निसर्ग आणि अथांग शांतता असल्यावर फार तर कविता सुचाव्यात किंवा मनन-चिंतनात मग्न व्हावं. पण काहींना तेवढं पुरेसं वाटत नसे. त्यांचा रंगेलपणा तिथे अधिकच उफाळून येई. अर्थात हा त्यांचा प्रश्न होता. मला त्यांच्या वागण्यावर टिपणी करायची गरज नाही. त्यांना बंगल्यावर नेऊन सोडायचं आणि ठरल्यावेळी त्यांना घेण्यासाठी गफूरला पाठवायचं एवढंच माझं काम.

एकूण एक प्रेक्षणीय स्थळांची तपशीलवार माहिती घेऊन जय्यत तयारीनिशी आलेल्या प्रवाशाशी गाठ पडल्यावर मात्र माझी चांगलीच भंबेरी उडायची. तो माझी रीतसर परीक्षाच घेत असे. 'शहराची लोकसंख्या किती आहे? क्षेत्रफळ किती? थापा मारू नकोस. ते अमुक-तमुक दुसऱ्या शतकात नव्हे, बाराव्या शतकात बांधण्यात आलंय हे मला बरोबर माहिती आहे,' असं तो मला खडसावायचा; आडवेतिडवे प्रश्न विचारून तो मला खिंडीमध्ये पकडायचा. एखाद्या

शब्दाचा उच्चार 'असा नाही तसा आहे' अशा चुकाही काढायचा. मी अशा वेळी अत्यंत विनयशीलपणे, अदबीने वागायचो. चुका नम्रपणे स्वीकारायचो. मला धड काहीच माहीत नाही हे पाहून तो वैतागून म्हणायचा, "तू स्वत:ला गाइड म्हणवतोस आणि तुला या साध्या गोष्टी माहीत नाहीत...?" वगैरे वगैरे.

एवढे सारे उपद्व्याप करून मला काय मिळायचं असं तुम्ही विचाराल. निश्चित उत्पन्न असं काहीच नव्हतं. किती पैसे मिळायचे हे एकंदर परिस्थिती आणि पर्यटकांवर अवलंबून असायचं. माझा दर होता - किमान दहा रुपये. दूरवर न्यायचं असेल तर भाव चढायचा. शिवाय गफूर, फोटो स्टुडिओवाला, हॉटेल मॅनेजर आणि संपर्कात आलेली अन्य सारीच मंडळी ठरल्यानुसार माझी जोरदार भलावण करत! धंद्याच्या खाचाखोचा शिकत असतानाच मी पैसेसुद्धा कमावत होतो. गाइडचा हा व्यवसाय मला फारच आवडत होता.

पर्यटकांना आकर्षित करतील असे खास प्रसंगही असायचे. उदाहरणार्थ - हत्तींचा कळप पकडणं. थंडीच्या मोसमामध्ये वनखात्याचे अधिकारी हत्ती पकडण्याची मोहीम आखायचे. त्याआधी बराच काळ हत्तींच्या हालचालींवर बारीक नजर ठेवली जाई. नंतर एका ठरलेल्या दिवशी सर्व कळपाला कोंडीत पकडून मजबूत लाकडी पुंपणाकडे वळवलं जाई. हा चित्तथरारक प्रकार पाहण्यासाठी लोकांचा फार मोठा जमाव एकत्र होत असे. देशाच्या कानाकोपऱ्यातून लोकांच्या झुंडीच्या झुंडी आमच्या गावी लोटत. मेम्पी बांबूच्या बनातील हा खेळ पाहण्यासाठी मोक्याची जागा मिळावी म्हणून लोक मला मस्का मारत. वनाधिकाऱ्यांकडे माझा खास वशिला आहे असा लोकांमध्ये समज होता. सर्वांची सोय व्हावी यासाठी मला बरीच खटपट करावी लागत असे. शहरामधून छोट्या-मोठ्या वस्तू आणणं अशासारखी छोटी-मोठी कामं करून अधिकाऱ्यांना खूष ठेवावं लागे. असंख्य खटपटी-लटपटी केल्याने माझ्याबरोबर येणाऱ्या पर्यटकांना खास मंडपामध्ये बसायची परवानगी मिळत असे. सर्वांच्याच मनासारखं होई. मोक्याची जागा मिळाली म्हणून माझी गिऱ्हाइक खूष होत. माझीही भरपूर कमाई होई. लोकांचे

छोटे छोटे गट करून मी आत नेऊन बसवत असे. प्रत्येक गटासमोर प्रसंगाचं महत्त्व विशद करत असे. ‘जंगली हत्तींवर अनेक महिने बारीक नजर ठेवावी लागते. त्यांच्या हालचाली...’ पुन:पुन्हा ही माहिती दिल्याने माझा घसा कोरडा पडे. अत्यंत मन:पूर्वक मी हे काम करत असे. त्यामागे मला हत्तींविषयी फार मोठा कळवळा होता असं अजिबात नव्हतं. ‘गिऱ्हाइकांची पसंती तीच माझी पसंती’ असं माझं धोरण होतं. कोणी व्याघ्रदर्शनाची वा वाघाच्या शिकारीची इच्छा व्यक्त केली तर मी त्याच उत्साहाने सारी तयारी करत असे. वाघाला आमिष म्हणून शेळी मिळवणं, शूर शिकाऱ्यांसाठी उंच जागी मचाणं बांधून घेणं (शेळीला खाण्यासाठी गरीब बिचारा वाघ आला की मचाणावर सुरक्षित बसलेल्या शिकाऱ्यांना तो टिपणं त्यामुळे सोयीस्कर पडायचं) अशी कामं मी सराईतपणे करायचो. अर्थात वाघ आणि शेळी अशा दोघांचाही बळी पडणं मला आवडत नसे, पण माझाही नाइलाज असायचा. फणा काढलेला नागराज पाहायचा असेल तर त्याचीही व्यवस्था मी करत असे.

दूर मद्रासहून आलेल्या एका तरुणीने मालगुडीमध्ये पाय टाकताक्षणी पहिला प्रश्न हाच केला होता, “मला नाग बघायला मिळेल का? नागराज? पुंगीच्या तालावर नाचणारा?”

“का?” मी विचारलं.

“मला आवडतो, बस. दुसरं काही कारण नाही,” ती उत्तरली.

“रोझी, आल्याबरोबर हे काय? दुसरी कितीतरी कामं आहेत. हे नंतरही करता येईल,” तिच्या पतिदेवाने तिला अडवलं.

“मी काही अगदी आत्ताच नागराजाला बघायला जायचंय असं म्हणत नव्हते. फक्त सांगून ठेवलं, इतकंच,” ती फणकाऱ्याने म्हणाली.

“तुझी इच्छाच असेल तर तुझी तू व्यवस्था कर आणि एकटी जा. मी तुझ्याबरोबर येईन अशी अपेक्षा करू नकोस. मला तर सापाला पाहूनच कसंतरी होतं. तुझ्या आवडी विचित्रच

आहेत," पतिराज तणतणले.

मला त्या माणसाचा रागच आला. तिच्यासारख्या स्वर्गीय अप्सरेचा असा अपमान? मला त्या तरुणीविषयी फारच सहानुभूती वाटायला लागली. किती सुरेख आणि आकर्षक होती ती...तिच्यासमोर मला माझा नेहमीचा खाकी बुशकोट आणि धोतर हा वेष फारच गबाळा वाटायला लागला. त्या दोघांना नंतर हॉटेलवर भेटायला जाताना मी रेशमी झब्बा आणि तलम धोतर परिधान केलं. एकदम नीटनेटका तयार होऊन निघालो तेव्हा आई म्हणाली देखील, "काय नवरदेवासारखा सजलाहेस!" गफूरनेही मला पाहून डोळा मारला. सूचक चावट टिपण्याही केल्या.

तिचं आगमन काहीसं अनपेक्षितच होतं. तो आधी एकटा आला होता. मी त्याची राहण्याची सोय आनंदभवनमध्ये केली होती. एके दिवशी दुपारी भटकंती झाल्यावर तो अचानक म्हणाला, "मद्रास ट्रेन येण्याची वेळ झाली. आज आणखी एक व्यक्ती येणार आहे. तिला घ्यायला स्टेशनवर जायचंय."

गाडी किती वाजता येईल हेही त्याने मला विचारलं नव्हतं. प्रत्येक गोष्ट त्याला अगोदरच माहिती असायची. फारच चमत्कारिक असे त्याचं वागणं. आपण काय आणि कशासाठी करतोय हे समजावण्याच्या फंदात तो सहसा पडत नसे. अद्वितीय सुंदरीच्या स्वागतासाठी स्टेशनवर जायचंय हे त्याने आधी सांगितलं असतं तर मी व्यवस्थित तयार होऊन गेलो नसतो का? खाकी बुशकोट आणि धोतर हे नेहमीचे अत्यंत अनाकर्षक कपडे मी त्या वेळी घातले होते. दिसायला विचित्र असला तरी माझा हा गणवेष माझ्या व्यवसायाच्या दृष्टीने फारच सोयीस्कर आणि व्यवहार्य होता.

ती गाडीतून उतरली. तिला पाहून मला माझ्या गबाळ्या अवताराची लाज वाटली. अतिशय रूपवती म्हणता येणार नाही, पण एकूण व्यक्तिमत्त्व आकर्षक होतं. सुरेख अटकर बांधा. अद्ययावत राहणी, नाचरे डोळे, वर्ण सावळ्यात जमा होईल असा. त्यामुळे कोवळ्या नारळाच्या

दुधाळ रसाच्या तलम पडद्याआडून तिला बघतोय असा भास होत होता. मी फारच काव्यात्म बोलतोय असं वाटत असेल तर माफ करा, पण तिला पाहून माझी तशीच काहीशी अवस्था झाली होती. त्या दोघांना हॉटेलमध्ये पाठवून मी काहीतरी सबब काढून घरी पळालो. कपडे बदलून, नीट तयार होऊन मगच त्यांच्या भेटीला गेलो.

नॉर्थ एक्स्टेन्शनवर प्राचीन 'ईश्वर मंदिर' आहे तिथे आम्ही गेलो. तिथल्या दगडी भिंतीवर रामायणाची चित्रमय कथा कोरली आहे. अक्षरश: शेकडो शिल्पं असतील. तो क्षणाचाही विलंब न करता वाकून एकेक चित्र अत्यंत बारकाईने पाहायला लागला. डोळ्यांवर पट्टी बांधून त्या शिल्पांची प्रमवार माहिती देण्याइतपत मी जाणकार होतो, पण तो स्वत:देखील तितकाच जाणकार असल्याने माझे कष्ट वाचले. त्याला तिथेच सोडून मी गफूरच्या मदतीने नागराजाच्या शोधात निघालो. तो मला एल्लामन स्ट्रीटवरील एका माणसाकडे घेऊन गेला. त्याचा चुलतभाऊ नगरपालिकेत नोकरीला होता. त्याला गारुड्याचा पत्ता माहीत होता.

मोहीम फत्ते करून मी परतलो. तो अजूनही रामायण शिल्प पाहण्यामध्ये रमला होता. सुंदरी एका बाजूला उभी होती. चेहऱ्यावरून ती अतिशय कंटाळलेली दिसत होती.

"तासाभरासाठी माझ्याबरोबर येता येईल का? नाग बघायचा होता ना?" मी विचारलं.

हे ऐकून तिचा चेहरा खुलला. खाली वाकून शिल्पपट्टीचं एकाग्रपणे निरीक्षण करण्यात गुंतलेल्या त्याच्या खांद्याला स्पर्श करत तिने विचारलं, "तुम्हाला आणखी किती वेळ लागणार आहे?"

"कमीत कमी दोन तास," मागे वळूनही न पाहता त्याने उत्तर दिलं.

"मग मी थोडा वेळ जाऊन येते."

"हवं ते कर," असं म्हणून त्याने विषय तिथेच संपवला. "तिकडूनच हॉटेलवर जा. मी एकटा येईन नंतर." ही सूचना मला होती.

नगरपालिकेमधील आमच्या मार्गदर्शक कझिनला घेऊन आम्ही नागराजाच्या दर्शनाला निघालो. गफूरची गाडी नदीकिनाऱ्यावरील वाळूच्या कडकडेने रखडत निघाली. नल्लपाच्या वनराईतून पुढे नदीच्या पैलतीरी पोचलो. संपूर्ण मार्गावर बैलगाड्यांच्या चाकांमुळे खड्डे झाले होते. गफूरने बाजूला बसलेल्या वाटाड्याकडे रागीट कटाक्ष टाकला. "कसला बेकार रस्ता आहे हा. कुठे फरफटत घेऊन चालला आहेस? माझ्या गाडीचीही बैलगाडीसारखी अवस्था होईल आता... त्या स्मशानाखेरीज काही वस्तीही दिसत नाही," तो तणतणला. नदीतीरावर दूरवरच्या कोपऱ्यात भिंतीपलीकडून धुराची वलयं निघत होती. कोणाची चिता जळत असावी. गाडीत बसलेल्या अप्सरेसमोर असा अभद्र विषय काढलेला मला अजिबात आवडलं नाही. मी लगबगीने विषय बदलून दुसरंच काहीतरी मोठमोठ्याने बोलायला लागलो.

मजल-दरमजल करत अखेर आमची गाडी एका वस्तीजवळ पोचली. गाडी थांबताक्षणी आजूबाजूच्या झोपड्यांमधून अनेक डोकी डोकावून पाहू लागली. दोन-चार उघडीनागडी पोरं गाडीभोवती जमली आणि आ वासून गाडीतल्या प्रवाशांकडे पाहू लागली. आमचा वाटाड्या टुणकन उडी मारून खाली उतरला. पळतच तो रस्त्याच्या पार दुसऱ्या टोकाला गेला. परतला तेव्हा त्याच्याबरोबर लाल फेटा बांधलेला एक इसम होता. अर्ध्या चड्डीव्यतिरिक्त दुसरा कोणताही कपडा त्याच्या अंगावर नव्हता.

"याच्याजवळ नागराज आहे?" त्याच्याकडे नजर टाकून मी काहीशा साशंकपणे विचारलं. "चल, दाखव पाहू."

हे ऐकून साऱ्या पोरा-टोरांनी दुजोरा दिला. "हो, हो, खरंय ते. खूप मोठा नाग आहे त्याच्या घरी."

"जायचं का बघायला?" मी बाईसाहेबांना विचारलं.

गफूर म्हणाला, "मी इथेच थांबतो, नाहीतर ही माकडं माझ्या गाडीची वाट लावून टाकतील."

आम्ही निघालो. ती दोघंजण थोडे पुढे गेल्यावर मी हळूच गफूरला विचारलं, “गफूर, तू आज एवढा चिडचिड का करतोयस? यापेक्षादेखील वाईट रस्त्यांवरून तू गाडी नेली आहेस. मग आजच एवढी कुरकुर का चालली आहे?”

तो तक्रारीच्या स्वरात म्हणाला, “हल्लीच गाडीमध्ये नवीन प्रिंगा आणि शॉक ऍब्सॉर्बर बसवून घेतलंय. किती पैसे खर्च झाले याची कल्पना आहे का तुला?”

“अरे बाबा, सर्व खर्च भरून निघेल बघ. चिडणं बंद कर आता,” मी त्याला चुचकारत म्हणालो.

पण अजूनही त्याचा पारा उतरत नव्हता. “काही लोकांना गाडीत नाही, ट्रक्टरमध्येच बसवायला हवं. तो मूर्ख...” गफूरचा राग आमच्या वाटाड्यावर होता. “साप पाहण्यासाठी एवढ्या दूर आणायची काय गरज होती? परत जाताना त्याला पायी रखडत पाठवायला हवं म्हणजे समजेल...” गफूरला शांत करण्यात अर्थ नव्हता. बहुधा सकाळी बायकोबरोबर वाजलं असावं!

ती तरुणी झाडाच्या सावलीत उभी होती. टोपलीमधून बाहेर काढण्यासाठी गारुडी नागाला डिवचत होता. ‘हिस्स’ करून नागोबाने विशाल फणा उभारला. पोरं किंचाळून सैरावैरा धावत सुटली, पण त्याच वेगाने परतही आली... “गोंगाट करून त्याला बिथरवू नका. नाहीतर चावायला तुमच्या मागे येईल,” गारुडी त्यांच्यावर खेकसला.

मी त्या पोरट्यांना गप्प राहायला सांगितलं. “नागोबा खरोखरच निसटून जाणार नाही ना?” मी गारुड्याला विचारून खात्री केली.

“तुम्ही पुंगी वाजवून त्याला डोलायला लावा ना,” तिने सुचवलं. गारुड्याने पुंगी वाजवायला सुरुवात केली. त्या कर्कश सुरांवर नागराज डोलायला, झुलायला लागले. मला तो सारा प्रकारच आवडला नाही, पण ती मात्र मंत्रमुग्ध होऊन बघत राहिली. नागाचा डौलदार नाच ती काही वेळ

एकटक पाहत होती. मग तिने हलकेच हात लांबवून नागासारखी वळणदार हालचाल केली. संपूर्ण शरीरदेखील मोठ्या डौलदारपणे झुलवलं. त्या क्षणभरातील तिचे ते हावभाव 'ती'च शतकातील सर्वश्रेष्ठ नृत्यांगना आहे, अशी माझ्या मनाची खात्री पटवण्यास पुरेसे होते.

हॉटेलवर परतायला संध्याकाळचे सात वाजले. गाडीतून उतरल्यावर ती हळूच 'थँक्स' म्हणाली आणि पायऱ्या चढून आत गेली. तिचा पतिदेव पोर्चमध्येच होता. "आता तुम्ही जा. नंतर पैशांचा हिशेब एकदमच करू. उद्या सकाळी दहा वाजता गाडी पाहिजे," एका फटक्यात एवढं बोलून तोही आपल्या खोलीत नाहीसा झाला.

आता मात्र मी काहीसा चिडलोच. ही काय बोलायची पद्धत झाली? मला काय समजतोय तो? 'अमूक वाजता गाडी हवी' अशी ऑर्डर सोडायला मी काय त्याचा नोकर आहे की काय? मी मनातच तणतणलो. पण वास्तविक पाहता मी नोकरच नव्हतो का? गफूर, गारुडी, तो स्वत: या सर्वांसाठी नाचत होतोच ना... नोकर वेगळं काय करतो? तो देखील इतरांची असंख्य कामं करत असतोच की. मी स्वत:लाच समजावलं. तो माणूस जगावेगळाच आहे हे मात्र खरं. स्वत:विषयी एक अक्षर सांगायला तयार नाही. सकाळी कुठे जायचंय हेदेखील गुलदस्त्यात आहे. विचित्रच आहे सगळं.

मला त्याचा प्रचंड तिरस्कार वाटायला लागला. यापूर्वी मी कोणाही ग्राहकाचा असा राग केला नसेल. 'उद्या सकाळी!' अशा रुबाबात गाडी पाहिजे सांगतोय की जणू काही त्याच्या बापाचीच गाडी आहे. "तुला माहितीय का कुठे जायचंय?" मी रागानेच गफूरला विचारलं.

"मला त्याच्याशी काय करायचंय? त्याला हवी तेव्हा गाडी देईन. पैसे दिले की बाकीच्या गोष्टींशी मला काय देणंघेणं? मला पैसे मिळाले की झालं," गफूरने मलाच तत्त्वज्ञान शिकवलं. हे ऐकून मी गप्प बसलो.

आई नेहमीप्रमाणे माझी वाट पाहत होती. मला जेवण वाढताना तिने विचारलं, "आज दिवसभर कुठे होतास? काय केलंस?"

मी तिला नागोबा, गारुडी यांच्याविषयी सांगितलं. त्यावर ती म्हणाली, “ते बहुधा ब्रह्मदेशातून आले असावेत. तिथले लोक नागाची पूजा करतात. माझा एक चुलतभाऊ तिथे राहायचा. तो तिथल्या नाग-स्त्रियांविषयी बोलत असे.”

“आई, काहीही निरर्थक बोलू नकोस. ती एक चांगली मुलगी आहे. नर्तकी आहे, नागपूजा करणारी बाई नव्हे.” मी आईला फटकारलं.

“नर्तकी! या नाचणाऱ्या बायकांविषयी काही सांगू नकोस. एकजात साऱ्या वाईट चालीच्या असतात.” यावर काही न बोलता मी जेवायला लागलो. मनामध्ये त्या अप्सरेच्या सुगंधी आठवणी दरवळत होत्या.

दुसऱ्या दिवशी दहा वाजता आमची स्वारी हॉटेलवर हजर झाली. गफूरही गाडीसह पोर्चमध्ये थांबला होता. मला पाहिल्यावर तो खोचकपणे ओरडला, “आहा! पुन्हा नटून-थटून आलेत साहेब! फारच सुधारणा होत चालल्या आहेत!” हे बोलताना त्याने डोळा मारलाच.

मी त्याच्या चावटपणाकडे दुर्लक्ष करून कोरड्या स्वरात विचारलं, “दोघंही अजून आतमध्येच आहेत का?” “बाहेर आले नाहीत, म्हणजे बहुधा आतच असावेत,” गफूर उत्तरला. केवळ एका शब्दात उत्तर देता आलं असतं, पण तो उगीचच फापटपसारा वाढवत होता. काय झालंय गफूरला? फारच बकबक करायला लागलाय. तोदेखील त्या सुंदर तरुणीमुळे असा बावचळल्यासारखा वागतोय की काय? हा विचार मनात येताच माझ्या काळजात कळ उठली. गफूरचा मत्सर वाटून मी अतिशय बेचैन झालो. ‘गफूर असाच वागणार असेल तर त्याला डच्चू देऊन दुसरा ड्रायव्हर शोधावा लागेल,’ मी मनाशी ठरवून टाकलंदेखील. बाष्कळ बडबड करणाऱ्या, नको तिथे नाक खुपसणाऱ्या टॅक्सी ड्रायव्हरची कटकट नकोच!

दुसऱ्या मजल्यावरील अठ्ठावीस नंबरच्या खोलीत ती दोघं राहत होती. वाट पाहून अखेर मी त्यांच्या दारावर जोराने थाप मारली. “थांब.” आतून त्याचा आवाज आला. तिचा मधुर आवाज ऐकण्याची अपेक्षा होती त्यामुळे माझी निराशा झाली. मी काही वेळ थांबलो. अस्वस्थपणे

घड्याळाकडे नजर टाकली. दहा तर वाजलेच...तो थांबायला का सांगतोय? तो अजूनही तिच्या मिठीमध्ये पहुडलाय की काय! ते दृश्य नजरेसमोर येताच दरवाजा फोडून आत घुसावं अशी तीव्र ऊर्मी मला वाटायला लागली. तेवढ्यात फटकन दार उघडून तो बाहेर आला. जाण्यासाठी कपडे वगैरे करून तो तयार झालेला दिसला. बाहेर येऊन त्याने दार बंद करून घेतलं. ते पाहून मला धक्काच बसला. म्हणजे काय? ती कुठेय? त्याला तसं विचारायला मी तोंडही उघडलं, पण वेळीच स्वत:ला आवरून निमूटपणे त्याच्यामागोमाग खाली गेलो.

माझ्या टिपटॉप अवताराकडे त्याने पसंतीदर्शक नजर टाकली. जणू काही त्यालाच खूष करण्यासाठी मी व्यवस्थित तयार झालोय! गाडीत बसण्यापूर्वी तो म्हणाला, "मला पुन्हा ती भित्तीशिल्पं पाहायची आहेत. थोडा वेळ तिथे जाऊ या.'

"ठीक आहे, ठीक आहे." ती शिल्पं पाहा किंवा आणखी कुठेही जा, पण त्यासाठी मी कशासाठी हवा आहे? मी मनातच बडबडलो. माझे विचार त्याला कळले की काय कोणास ठाऊक, कारण "त्यानंतर..." असं म्हणून त्याने खिशातून कागदाचा कपटा काढला. बहुधा प्रेक्षणीय स्थळांची यादी त्याने बनवली असणार!

हा गृहस्थ आयुष्यभर चित्रशिल्प पाहत आनंदाने जगेल! त्या बिचारीला हॉटेल रूममध्ये बसवून ठेवील. विचित्रच आहे. आत्ता तिला बरोबर का नेत नाहीये? तिला विसरला की काय? न राहवून मी अखेर विचारलंच, "तुम्ही एकटेच जाणार? दुसरं कोणी येत नाहीये?"

माझ्या मनात काय आहे हे ओळखून तो तटकन म्हणाला, "नाही." तो विषय तिथेच संपवून त्याने हातातल्या कागदावर नजर टाकून विचारलं, "या भागामध्ये कुठेतरी गुहा-चित्रं आहेत. ती कुठे आहेत माहितीय का?"

हा प्रश्न ऐकून मला हसायला आलं. सर्वांनाच त्या गुहा पाहण्याइतपत उत्साह नसला तरी क्वचित कोणा चोखंदळ पर्यटकाला ती चित्रं पाहण्याची इच्छा असे. "पण... खूप दूर जावं

लागेल. संपूर्ण दिवस जाईल आणि रात्री परत येण्याची खात्री नाही. कदाचित मुक्काम करावा लागेल," मी म्हणालो.

हे ऐकून साहेब पुन्हा वरती खोलीत गेले. ती संधी साधून मी गफूरच्या मदतीने खर्चाचा अंदाज घेतला. गुहा खरोखरच दूर अंतरावर होत्या. पीक हाऊस फॉरेस्ट बंगल्यावर रात्री मुक्काम करावाच लागेल. गुहांपर्यंत पोचण्यासाठी साधारण दोन मैल चालावं लागलं असतं. गुहा कुठे आहेत हे माहीत असलं तरी मी पूर्वी गेलो नव्हतो. मालगुडी अजूनही नवनवीन पर्यटन स्थळांचं आव्हान माझ्यासमोर ठेवत होती.

तो गृहस्थ पडेल चेहऱ्याने खाली येऊन गाडीत बसला. "स्त्रियांशी कसं वागावं याची कल्पना नसेल तुला..." तो वैतागलेल्या स्वरात म्हणाला.

खाजगी गोष्टी बोलण्याइतपत तो माणसाळलेला पाहून मला थोडं बरं वाटलं. त्याचा विनोद आवडला हे दाखवण्यासाठी मोठ्याने हसून म्हणालो, "मला खरंच कल्पना नाही." मोठं धारिष्ट्य दाखवून मी विचारलं, "नेमकं काय झालंय?" पूर्वीच्या खाकी बुशकोट आणि धोती या गबाळ्या अवतारातील मला असा प्रश्न विचारण्याची आणि गाडीत त्याच्या शेजारी बसायचीही हिंमत झाली नसती. आधुनिक जामानिमा करून मला नवीनच आत्मविश्वास जाणवत होता.

त्याने माझ्याकडे मित्रत्वाचं हास्य फेकलं आणि माझ्या बाजूला झुकून म्हणाला, "मन:शांती हवी असेल तर स्त्रियांपासून चार हात लांबच राहिलेलं उत्तम!" तीन दिवसांच्या सहवासामध्ये आज प्रथमच तो माझ्याशी मोकळेपणाने बोलत होता. अन्यथा तो फारच कमी आणि तेदेखील तुसडेपणाने बोलायचा. आज तो एवढ्या सैलपणे बोलतोय म्हणजे परिस्थिती फारच गंभीर असावी असं मी अनुमान काढलं. गफूर हनुवटी हातावर टेकवून बाहेर पाहत होता. 'तुमच्यासारख्या वेळ वाया घालवणाऱ्या लोकांमुळे माझी सकाळ निष्कारण वाया जातेय,' असा त्याचा एकंदरीत आविर्भाव होता. माझ्या डोक्यामध्ये एक धाडसी योजना आकार घेत होती. ती यशस्वी झाली तर डाव माझ्या मनासारखा पडला असता. पण बाजी उलटी पडली तर मला लाथ

मारून हाकलून देईल किंवा पोलिसांना बोलवील हे निश्चित. “मी तुमच्या वतीने मॅडमशी बोलून पाहू का?” मी अखेर विचारलंच.

हे ऐकून त्याचा चेहरा उजळला. “तुझ्यात तेवढी हिंमत असेल तर नक्की जा,” तो आनंदाने म्हणाला.

पुढचं काही ऐकण्यासाठी मी थांबलोच नाही. टुणकन उडी मारून मी गाडीतून उतरलो आणि झपाट्याने पायऱ्या चढून वर गेलो. अठ्ठावीस नंबरच्या खोलीसमोर थांबून मी श्वास घेतला आणि दारावर टकटक केलं.

“मला त्रास देऊ नका. मला तुमच्याबरोबर यायची अजिबात इच्छा नाही...मला एकटीला सोडा!” ती आतून म्हणाली.

तिच्याशी काय आणि कसं बोलावं अशा विचाराने मी काहीसा घुटमळलो. स्वर्गीय सुंदरीशी एकट्याने बोलायची ही माझी पहिलीच वेळ होती. मी काहीतरी मूर्खासारखं बोलून जाईन अशी मला भीती वाटत होती. कदाचित जिंकेनसुद्धा असंही एकीकडे वाटत होतं. कोण आहे म्हणून सांगावं? तिला माझं सुप्रसिद्ध नाव माहिती तरी असेल का? माझा गोंधळ उडाला. शेवटी धीर एकवटून मी म्हणालो, “ते नाहीत. मी आहे.”

“काय?” तिच्या मधुर आवाजात गोंधळ, थोडासा रागही होता.

“तुमचे पती नाही, मी आलोय,” मी पुन्हा म्हणालो, “माझा आवाज ओळखला नाही का? काल आपण गारुड्याकडे गेलो नव्हतो का?” पुढची वाक्यं मी हलक्या आवाजात म्हणालो, “रात्रभर मला झोप लागली नाही. तुमचं नृत्य, रेखीव आकृती आणि रूप पाहून मी पुरता भारावून गेलोय,” एवढं बोलतोय तोच तिने अर्धा दरवाजा उघडला. माझ्याकडे पाहून ती उद्गारली, “अच्छा, तू आहेस होय!” मला ओळखल्यामुळे तिचे डोळे चमकले.

“माझं नाव राजू.”

तिने माझ्याकडे निरखून पाहिलं आणि म्हणाली, “अर्थातच मी तुला ओळखते.” तिच्याकडे पाहून मी एक सुंदर (माझ्या मते) आणि प्रेमळ स्मितहास्य फेकलं.

“ते कुठे आहेत?” तिने विचारलं.

“खाली गाडीत तुमची वाट पाहताहेत. तयार होऊन येणार ना?” तिचा एकूण अवतारच झाला होता. रडल्यामुळे डोळे लाल झालेले, जुनी, चुरगळलेली सुती साडी, भकास चेहरा. मला ती कशीही दिसली तरी आवडलीच असती. मी तिला म्हणालोदेखील, “आत्ता आहात तशाच आलात तरी चालेल. तयार व्हायला नको, कारण इंद्रधनुष्याला आणखी सजायची काय गरज? जातीच्या सुंदर व्यक्तीला सर्वच चांगलं दिसतं.”

“माझी अशी स्तुती केल्याने मी खूष होईन आणि तुमच्याबरोबर यायला तयार होईन असं तुला वाटतंय का?”

“होय. तसंच वाटतंय!”

“मी त्यांच्याबरोबर जावं अशी जबरदस्ती का? मला एकटीला शांतपणे राहू दे,” ती डोळे मोठे करून म्हणाली.

तिच्याजवळ झुकून मी हळुवार स्वरात म्हणालो, “तुमच्याशिवाय सारं काही व्यर्थ आहे, असं वाटतं.”

‘तुझी हिंमत कशी झाली असं बोलायची?’ असं म्हणून मला ढकलून तिला दरवाजा बंद करता आला असता. पण तसं न करता ती एवढंच म्हणाली, “तू एवढा त्रास देशील असं वाटलं नव्हतं. ठीक आहे. थांब, एक मिनिट,” असं म्हणून ती आत गेली. तिने बंद केलेल्या दरवाजावर धडाधड थापा माराव्यात, ‘मलाही आत येऊ दे’, असं ओरडावं, अशी ऊर्मी मी मोठ्या प्रयासाने दाबून धरली. एवढ्यात पावलांचा आवाज आला. माझ्या प्रयत्नांना यश आलंय की नाही हे पाहण्यासाठी तिचे पतिदेव आले होते.

"काय झालं? ती येतेय की नाही? संपूर्ण दिवस फुकट घालवायची माझी तयारी..." मी त्याला मध्येच अडवलं. "आता काहीही बोलू नका. मॅडम येताहेत. तुम्ही कृपया गाडीत जाऊन बसा."

"खरंच?" तो आश्चर्यातिरेकाने म्हणाला. "काय जादू केलीस?" एवढं बोलून तो अलगद मागे वळला आणि खाली गेला. अखेर तयार होऊन ती बाहेर आली तेव्हा चित्रासारखी सुंदर दिसत होती. "चला, जाऊ या. तू आलास म्हणून, नाहीतर मी तुम्हा सर्वांना चांगला धडा शिकवणार होते," ती म्हणाली.

"म्हणजे काय?"

"पुढची गाडी पकडून मी घरी परतणार होते."

"आपण फार सुरेख जागी जाणार आहोत. निदान माझ्यासाठी तरी तुम्ही नेहमीसारखी आनंदी राहा."

"ठीक आहे" असं म्हणून ती पायऱ्या उतरू लागली. मीही तिच्या मागोमाग गेलो. गाडीचं दार उघडून ती पतीच्या शेजारी जाऊन बसली. त्याने सरकून तिला जागा करून दिली. मी दुसऱ्या बाजूने त्याच्याजवळ बसलो. अशा परिस्थितीमध्ये मला गफूरच्या शेजारी बसायची अजिबात इच्छा नव्हती.

गफूरने मागे पाहून "निघायचं का?" असं विचारलं. "पीक हाऊसला जायचं असेल तर रात्री परतणं शक्य नाही," तो म्हणाला.

"प्रयत्न तरी करू या परतायचा," तो आग्रहाने म्हणाला.

"प्रयत्न करायचा हे खरंय, पण मुक्काम करावा लागलाच तर तयारीतअसलेलं बरं. बदलण्यासाठी कपडे घ्यायला काय हरकत आहे? मीही जाता-जाता घरून कपडे घेणार आहे."

हे ऐकून 'एक मिनिट, मी आलेच' असं म्हणून ती वरती पळाली. परतली तेव्हा तिच्या हातात छोटीशी बॅग होती. "तुमचेही कपडे आहेत बॅगेमध्ये," ती त्याला म्हणाली.

"फारच छान," असं म्हणून तो हसला, तीदेखील हसली. वातावरणातील तणाव बराच कमी झाला तरी थोडासा अस्वस्थपणा जाणवत होताच.

गफूरला सांगून मी स्टेशनजवळ गाडी थांबवली. त्यांनी माझं घर पाहू नये म्हणून मोठ्या चलाखीने गाडी उलट्या बाजूला लावायला सांगितली. 'आत्ता आलोच' असं म्हणून मी वेगाने गाडीबाहेर पडलो. माझ्या दुकानातील पोराने मला पाहताक्षणी काहीतरी बोलायला तोंड उघडलं. त्याच्याकडे दुर्लक्ष करून मी पळतच घरात शिरलो. पटकन बॅग उचलली आणि त्याच पावली बाहेर पडलो. आई स्वयंपाकघरात होती. "माझी वाट पाहू नकोस. रात्री कदाचित परत येणार नाही," मी तिला ओरडून सांगितलं.

पीक हाऊसला पोचायला दुपारचे चार वाजले. तिथल्या रखवालदाराने आमचे आनंदाने स्वागत केले. ग्राहकाने दिलेल्या पैशातून मी त्याला नेहमी उदारहस्ते बक्षिसी देत असे. "त्याला खूष ठेवा. मग बघा तुमची कशी व्यवस्थित देखभाल करेल तो. तुम्ही म्हणाल ती वस्तू हजर करेल तुमच्यासमोर," तिथे मुक्कामाला येणाऱ्यांना मी पूर्वीच कल्पना देऊन ठेवत असे. आतादेखील मी ती ठरलेली रेकॉर्ड वाजवली. पतिराज - यापुढे त्यांचा उल्लेख 'मार्को' या नावाने होईल - म्हणाले, "मी सारं काही तुझ्यावर सोपवतोय. तुला योग्य वाटेल ते कर. माझा एकच नियम आहे - लहानसहान गोष्टींसाठी मला त्रास द्यायचा नाही. पैशांचा प्रश्न नाही. सतत माझं डोकं खायचं नाही एवढीच गोष्ट लक्षात ठेवायची."

रखवालदाराचं नाव जोसेफ. दोन मैलांवर असलेल्या गावातून आमच्यासाठी खाण्यापिण्यासाठी खाद्यपदार्थ आणण्यासाठी मी त्याला पिटाळलं.

"मला थोडे पैसे देऊन ठेवणार का? हिशेब मी नंतर देईन. सारखं तुमच्याकडे पैसे मागून त्रास द्यायला नको," मी मार्कोला म्हणालो.

पैशांच्या मागणीवर त्याची प्रतिप्रिया नेमकी कशी असेल हे सांगणं कठीण होतं. पैशांच्या बाबतीत त्याचं मन स्थिर नव्हतं. कधी त्या बाबतीत उदासीनता दाखवायचा, तर कधी अतिशय कंजुषी करायचा, पै-पैचा हिशेब मागायचा. पावत्या दाखवल्यानंतर मात्र जराही खळखळ न करता तो पैसे चुकवतो ही गोष्ट माझ्या ध्यानी आली होती. पावती नसेल तर एक आणाही त्याच्या हातून सुटायचा नाही. उलट पावती दाखवली तर मात्र सर्व संपत्तीही देऊन टाकील, असा त्याचा विचित्र स्वभाव होता.

आत्तादेखील मी पैसे मागताच तो गोंधळला. मला युक्ती माहीत असल्याने, ‘प्रत्येक वस्तूची पावती नक्की देईन’ असं आश्वासन देताच त्याने आनंदाने पाकीट उघडलं.

मी गफूरची टॅक्सी परत पाठवून दिली. दुसऱ्या दिवशी दुपारी आम्हाला घेण्यासाठी परत यायचं असं ठरलं. गफूरकडून मी रीतसर पावती बनवून घेतली. जेवण आणण्यासाठी जोसेफला थोडे पैसे दिले. सर्व कामं माझ्यावरच पडल्यामुळे माझ्या प्रियेच्या मुखचंद्रम्याकडे लक्ष द्यायला मला वेळ मिळाला नाही. अर्थात मधून मधून तिच्याकडे नजर टाकत होतोच.

“गुहा त्या तिथे खालच्या बाजूला आहेत. मैलभर अंतर असेल,” जोसेफ म्हणाला, “पण आता जाता येणार नाही. उद्या सकाळी नाश्ता करून निघालात तर दुपारच्या जेवणाच्या वेळी परत येऊ शकाल.”

‘पीक हाऊस’ मेम्पीच्या सर्वोच्च शिखरावर विराजमान झालं आहे. वर जाणारा रस्ता तिथेच संपतो. उजवीकडल्या व्हरांड्याला काचेची भिंत आहे. तीमधून शंभर मैल दूरवरचा परिसर पाहायला मिळतो. खालच्या दरीमध्ये घनदाट जंगल पसरलेलं आहे. निरभ्र वातावरण असेल तर शरयू नदीचा सूर्यप्रकाशात चमकणारा जलप्रवाहदेखील स्वच्छ दिसतो. निसर्ग, वनराई, पशू-पक्षी यांमध्ये रमणाऱ्यांना ही जागा म्हणजे स्वर्गच वाटते. काचेच्या खिडकीतून रात्रीच्या वेळी सावजाच्या शोधात निघालेली वन्य श्वापदंही पाहायला मिळत. बंगल्याभोवतालची दाट वनराई पाहून ती सुंदरी तर आनंदाने वेडीच झाली. एखाद्या लहान मुलीसारखी ती चीत्कारत होती,

वृक्षवेलींमधून बागडत होती. तो अलिप्तपणे तिचा सळसळता उत्साह पाहत होता. तिला आवडणाऱ्या, आनंद देणाऱ्या कोणत्याही गोष्टीमुळे त्याचं डोकं उठायचं हे मात्र खरं!

अचानक तिची नाचरी पावलं थबकली. सूर्यप्रकाशात न्हाऊन निघालेल्या, हजारो फूट खाली असलेल्या मैदानावर तिची नजर खिळली. रात्री कोल्हेकुई आणि अन्य श्वापदांच्या गर्जना, गुरगुर आवाज ऐकून ती भयभीत होईल या आशंकेने मी चिंतित झालो. एवढ्यात खाण्यापिण्याचे पदार्थ घेऊन जोसेफ परतला. ती टोकरी त्याने टेबलावर ठेवली. सकाळसाठी दूध, साखर आणि कॉफीही आणली होती. कोळशाची शेगडी कुठे आहे हेही मला दाखवलं.

“सकाळी मी बोलावेन तेव्हाच तुम्ही सर्वांनी उठायचं. मी सर्वांसाठी कॉफी बनवीन,” ती उत्साहाने ओरडली.

“दरवाजा आतमधून नीट बंद करून घ्या,” जोसेफ म्हणाला. “व्हरांड्यात बसलात तर वाघ, अन्य प्राणी बघायला मिळतील, पण त्यासाठी एक गोष्ट लक्षात ठेवायची - जराही आवाज करायचा नाही, अन्यथा सारे क्षणार्धात नाहीसे होतील,” त्याने सल्ला दिला. कंदील उचलून घरी जायला निघाला. झाडीमधून कंदिलाचा मंद प्रकाश थोड्याच वेळात दिसेनासा झाला.

“बिच्चारा जोसेफ! एकट्याने जंगलातून जाण्यासाठी किती धाडस पाहिजे...” ती कौतुकमिश्रित काळजीने असं म्हणाली, पण तिच्या पतिदेवाने लगेचच तिला उडवून लावलं, “त्यात काय मोठं! इथेच जन्मला आणि वाढला असणार तो. त्याला कसली भीती!” नंतर माझ्याकडे वळून त्याने विचारलं, “तू ओळखतोस का त्याला?”

“अर्थात. तो गावातच जन्मलाय. लहानपणापासून या बंगल्यात कामाला लागला. साठीचा असेल आता.”

“पण तो ख्रिश्चन आहे, हे कसं?”

"इथे जवळपास मिशनरी संस्था होती तेव्हा. ख्रिस्ती धर्मप्रचारक कुठेही जाऊन स्थिरावतात हे तुम्हाला सांगायलाच नको," मी स्पष्ट केलं.

आमच्यासाठी जोसेफने केरोसिनचे दोन कंदील तयार ठेवले होते. एक स्वयंपाकघरामध्ये टेबलवर ठेवून मी दुसरा त्याच्या खोलीसाठी दिला. बाकी सर्व बंगला अंधारात होता. व्हरांड्याच्या काचेतून आकाशातील चमचमते तारे दिसत होते. आम्ही जेवण्यासाठी टेबलावर बसलो. थाळ्या टेबलावर मांडून मी जोसेफने आणलेलं जेवण जमेल तसं वाढलं. संध्याकाळचे साडेसात वाजले असावेत. अप्रतिम सुंदर सूर्यास्त आणि नंतर उत्तरेकडील अवकाशामध्ये जांभळ्या रंगाचा मनोहर उत्सव सुरू झाला होता. तो पाहून आमच्या डोळ्यांचं पारणं फिटलं. सूर्य दिसेनासा झाल्यानंतरदेखील काही चुकार रक्तवर्णी सूर्यकिरणांमुळे विशाल वृक्षांच्या माथ्यावर आभा पसरली होती. निसर्गाचा हा अप्रतिम सुंदर आविष्कार पाहून आमची भाषाही काव्यमय झाली होती. प्रशंसा करायला शब्द अपुरे पडत होते.

तो मात्र अलिप्तपणे सारं पाहत होता. माझी काव्यात्म स्तुतिसुमनं ऐकून तो अचानक म्हणाला, "अरे वा, राजू, तू कवीदेखील आहेस तर!" मी मोठ्या विनम्रपणे त्याच्या कौतुकाचा स्वीकार केला.

जेवायला बसलो तेव्हा मी वाढण्यासाठी डिश उचलली. तिने मला अडवलं, "नको, नको. मी तुम्हा दोघांना वाढते. आदर्श गृहिणीप्रमाणे मी नंतर जेवीन."

हे ऐकून तो विनोदाने म्हणाला, "अरे वा, फारच चांगली गोष्ट..." माझ्या हातातील डिश घेण्यासाठी तिने हात पुढे केला तरीही मी आग्रहाने म्हणालो, "मी वाढतो ना." यावर तिने फटकन पुढे होऊन माझ्या हातामधील डिश हिसकावून घेतली. अहाहा, तिच्या स्पर्शाने मी क्षणभर थरारलो. काही दिसेनासं झालं. गोड गुंगी चढली. तिच्या मृदु स्पर्शाशिवाय काही आठवेना. तंद्रीमध्येच मी जेवत होतो. काय जेवलो, काय बोललो काहीही समजत नव्हतं. खाली मान घालून मी घास ढकलत होतो. नजर उचलून तिच्याकडे पाहायची मला हिंमत होत

नव्हती. कधी जेवण झालं, कधी तिने प्लेट्स उचलल्या, काहीही आठवत नाही. तिचं मोहक अस्तित्व, हळुवार हालचाली, तिचा रेशमी स्पर्श यांव्यतिरिक्त मला कसलीच जाणीव नव्हती. एकीकडे माझी सदसद्विवेकबुद्धी मला फटकारत होती, 'तू करतोयस ते चुकीचं आहे. ती विवाहिता आहे, मार्को तिचा पती आहे याचा विसर पडू देऊ नकोस. तिचा विचारसुद्धा मनात आणू नकोस.' पण माझ्या मनावर काबू ठेवणं केवळ अशक्य झालं होतं. 'तो तुला गोळी घालून ठार करेल,' माझ्या विवेकी मनाने मला सावध करायचा क्षीण प्रयत्न केला. बेदरकार मनाने क्षणार्धात त्याला उडवून लावलं, 'गोळी घालण्यासाठी त्याच्याकडे बंदूक आहे का?'

जेवणं झाल्यावर ती म्हणाली, "व्हरांड्यात जाऊ या. मला वन्य प्राणी बघायचेत. या वेळी प्राणी येतील का?"

"हो. पण त्यासाठी भरपूर चिकाटी हवी. थोडा नशिबाचाही भाग आहे. भीती नाही ना वाटणार? मिट्ट काळोखात बसून वाट पाहावी लागेल," मी म्हणालो.

तिने हसून मला उडवून लावलं. मार्कोने तिच्याबरोबर जाण्यास नकार दिला. "मला काम आहे," असं म्हणून त्याने खुर्ची कंदिलाजवळ ओढली आणि कंदिलाच्या मिणमिणत्या प्रकाशात कागदपत्रं वाचण्यात बुडून गेला. "तुमच्या कंदिलाचा प्रकाश बाहेर यायला नकोय. उजेड पाहून जनावरं बुजतील," असं त्याला बजावून ती हलक्या पावलांनी व्हरांड्यात गेली. जाता जाता तिने मला तिरकसपणे विचारलं, "तुलाही कागदपत्रं वाचायचीत का?" "छे, छे," मी असं म्हणताच तिने मला आपल्याबरोबर चलण्यास सांगितलं. "मला एकटीला हिंस्र श्वापदांच्या तोंडी देणार नाहीस अशी आशा आहे," असंही म्हणाली. यावर पतिदेवांची प्रतिप्रिया जाणून घेण्यासाठी मी त्यांच्याकडे नजर टाकली. तो एकाग्रपणे वाचत होता. "तुम्हाला काही हवंय का?" मी खुंटा हलवून बळकट केला. "नाही," तो उत्तरला.

"मी व्हरांड्यामध्ये असेन."

"ठीक आहे," कागदांवरची नजर न उचलताच त्याने परवानगी दिली.

व्हरांड्याच्या काचेच्या खिडकीजवळ खुर्ची ओढून ती विराजमान झाली. मीही आवाज न करता दुसरी खुर्ची घेऊन तिच्याजवळच बसलो. ती मोठ्या उत्सुकतेने बाहेरच्या निबिड काळोखात पाहत होती. काही वेळाने म्हणाली, “हे काय, एकही प्राणी दिसत नाही. खरोखरच जनावरं इथे येतात का? की नेहमीप्रमाणे नुसत्या अफवाच आहेत?”

“तसं नाही. बऱ्याच लोकांनी पाहिलेत...” मी घाईघाईने म्हणालो. मला मध्येच तोडून ती म्हणाली, “कोणते प्राणी पाहिलेत?”

“सिंह...”

“सिंह इकडे कुठे?” असं म्हणून ती हसायला लागली. “सिंह फक्त आफ्रिकेत आढळतात असं मी वाचलंय. हे मात्र अतिच झालं...”

“मी चुकून तसं म्हणालो,” मी सावरून घेतलं. “मला वाघ, चित्ता, अस्वलं म्हणायचं होतं. कधी कधी हत्तींचे कळपदेखील दरीतून जाताना दिसतात. तळ्याजवळ पाणी प्यायलाही ही जनावरं येतात.”

“असं असेल तर मी रात्रभर इथे बसायला तयार आहे,” ती आनंदाने म्हणाली. “एकट्याला मोकळं सोडलं म्हणून माझा नवराही खूष होईल. इथे किती नीरव शांतता आहे. असीम शांती... गडद काळोख, निस्तब्ध, निश्चलपणे कसलीतरी वाट पाहत बसायचं.”

यावर काय बोलावं हे मला सुचेना. तिच्या अंगांगाला येणाऱ्या सुगंधामुळे माझं चित्त थाऱ्यावर नव्हतं. आकाशभर चमचमत्या तारकांचं मायाजाल पसरलं होतं.

“हत्ती ही काच फोडून आत आला तर?” तिने जांभई देत प्रश्न विचारला.

“तसं नाही होणार. पलीकडे खंदक आहे. तो ओलांडून हत्ती येऊ शकणार नाहीत.”

अचानक झुडपामागून डोळे चमकले. ते पाहून माझ्या शर्टची बाही खेचून ती अत्यंत उत्तेजित होऊन कुजबुजली, “काहीतरी आहे तिथे... काय असेल?”

"बहुधा चित्ता असावा," कसंही करून मला संभाषण चालू ठेवायचंहोतं, त्यामुळे मी काहीही ठोकून दिलं. आहा... तिचं हळुवार आवाजात कुजबुजणं, चमकते तारे आणि चहूबाजूने दाटून आलेला अंध:कार... या सर्वांच्या एकत्रित परिणामामुळे माझ्या हृदयात प्रचंड खळबळ माजली. श्वास जड झाला. माझा जड श्वासोच्छ्वास ऐकून तिने विचारलं, "तुला सर्दी झालीय की काय?"

मी 'नाही' म्हटलं तरी तिने पिच्छा सोडला नाही. "मग श्वास घेताना एवढा आवाज का करतोयस?"

तिच्या निकट जाऊन हळुवार आवाजात, 'तुझं नृत्य अतिशय मोहक होतं. प्रतिभासंपन्न आहेस तू. पुन्हा एकवार तुझं नृत्य बघायला आवडेल. देवाचा आशीर्वाद असू दे तुला. तू माझी प्रियतमा होशील का?' असं म्हणून माझं मन मोकळं करावं असं मला तीव्रपणे वाटत होतं, पण सुदैवाने मी स्वत:ला आवरलं. सुदैवाने म्हणण्याचं कारण मार्को चोरपावलांनी येऊन आमच्या मागेच उभा होता.

"काही दिसलं का?" त्याने कुजबुजत्या स्वरात विचारलं.

"एक जनावर आलं होतं खरं... पण लगेच गेलं. तुम्ही बसा ना," असं म्हणून मी त्याला खुर्ची दिली. तिच्यावर बसून तो काचेतून बारीक नजरेने पाहू लागला.

दुसऱ्या दिवशीच्या सकाळी वातावरण पुन्हा तंग झालं होतं. आदल्या संध्याकाळचं दोघांचं प्रसन्न, खेळीमेळीचं वागणं अल्पजीवी ठरलं म्हणायचं. खोलीतून तो एकटाच जय्यत तयारीनिशी बाहेर पडला. मी कोळशाच्या शेगडीवर कॉफी बनवली होती. जणू काही हॉटेलमधला वेटर असावा तसा त्याने यांत्रिकपणे हात पुढे केला. मी कॉफीचा कप त्याच्या हाती देऊन विचारलं, "नाश्ता करणार का? जोसेफने टिफिन आणलाय."

"नको. निघू या आपण. त्या गुहा कधी बघतोय असं झालंय मला."

“पण मॅडम?” मी चिकाटीने विचारलं.

“तिला राहू दे इथेच,” तो तुसडेपणाने म्हणाला. “फालतू गोष्टीमध्ये वाया घालवण्यासाठी माझ्याजवळ वेळ नाही.” झालं! म्हणजे आजदेखील कालचीच आवृत्ती होणार तर! रोज सकाळी दोघांचा मूड बिघडलेला असतो असं दिसतंय. काल संध्याकाळी व्हरांड्यामध्ये तो किती सहजपणे तिच्याजवळ जाऊन बसला होता. रात्री झोपायला गेले तेव्हादेखील दोघं मजेत होते. मग सकाळी एकमेकांना खाऊ की गिळू करण्यासारखं रात्री काय घडलं असेल? कडाक्याचं भांडण? की तिने रात्रभर कटकट करून त्याचं डोकं खाल्लं? मी मनातच ओरडलो, ‘अरे दुष्टा, का तिला असं छळतोस? रोज सकाळी ती कोमेजलेली, दु:खी दिसते. ती सर्वगुणसंपन्न आहे, पण तुला तिची कदरच नाही - माकडाच्या हाती माणिक लागलंय.’ अचानक माझ्या मनामध्ये विचार चमकला, ‘ती रागावण्याचं नाटक तर करत नसेल? मी पुन्हा तिची मनधरणी करावी म्हणून ती अशी वागतेय का?’

कॉफी संपवून त्याने कप खाली ठेवला आणि म्हणाला, “चल, निघू या.” पुन्हा एकवार त्याच्या पत्नीविषयी विचारायचं धैर्य मला झालं नाही. तो हातामधली छोटी छडी अस्वस्थपणे गरगर फिरवत होता. रात्री तो या छडीनेच तिला मारत नसेल ना?

मनात असे विचित्र विचार येत असले तरी ‘तिला मी बोलावून आणू का?’ असं विचारण्याची चूक मी केली नाही. त्यामुळे परिस्थिती फारच गंभीर झाली असती याची मला कल्पना होती. “कॉफी तयार आहे हे मॅडमला समजेल ना?” एवढाच प्रश्न मी घाबरतच विचारला.

“हो रे बाबा,” तो वैतागून ओरडला, “तिथेच ठेव ती कॉफी. ती घेईल. तेवढी अक्कल आहे तिला.” त्याने छडी जोरात फिरवली तसे आम्ही निघालोच. ती खिडकीशी उभी असेल आणि आम्हाला परत बोलावेल या आशेने मी मागे वळून पाहिलं. डोंगरउतारावरून त्याच्या मागोमाग जाताना माझ्या मनात एकच विचार येत होता, ‘मी एवढ्या दूरवर आलो ते या राक्षसाबरोबर

हिंडायला की काय?' अडखळून पडला पाहिजे...जाऊ दे दरीमध्ये गडगडत...! नंतर मी स्वत:लाच दटावलं, 'किती दुष्ट विचार करतोय मी.' तो माझ्या पुढे चालत होता. आफ्रिकेमधील शिकाऱ्यांसारखी दिसत असणार आमची जोडी. किंबहुना त्याचे कपडे, डोक्यावरची हॅट आणि जाडजूड जॅकेट - आफ्रिकन शिकाऱ्यासारखेच होते.

गवत आणि झाडंझुडुपं यांच्यामधून आमची पायवाट पुढे दरीपर्यंत जात होती. गुहा मध्येच कुठेतरी होत्या. त्याच्या झपाझप चालण्यामुळे मला अचानक चिडचिडल्यासारखं झालं. छडी मस्त गरागरा फिरवत तो एखाद्या माहितगाराप्रमाणे माझ्या पुढे चालत होता. कागदपत्रांचा पोर्टफोलिओ छातीशी कवटाळून धरला होता. अशी जवळीक अन्य कोणाविषयी दाखवली असती तर...!

"जायचा रस्ता माहितीय का तुम्हाला?" मी अचानक त्याला विचारलं.

"ओह... नो." तो गडबडून म्हणाला.

"मग तुम्ही मला मार्ग दर्शवत आहात का?" आवाजात शक्य तेवढा उपरोध आणून मी विचारलं.

तो गोंधळून उद्गारला, "अरेच्चा!" मग बाजूला होऊन म्हणाला, "चल, तू पुढे हो." पुढे त्याने असंबद्धपणे टिपणी जोडली, "कृपया तूच उजेड पाड."

गुहेचं प्रवेशद्वार अतिशय दाट झाडाझुडपांच्या मागे लपलेलं होतं. विशाल दार उघडंच होतं. दाराच्या बिजागिऱ्या गंजलेल्या, पडझड, मोडक्या विटा, सुटून आलेलं प्लास्टर असं गुहेमधील वातावरण होतं हे ओघाने आलंच. वरचं छत म्हणजे एक विस्तीर्ण आणि अखंड कातळ होता. दूर जंगलामध्ये अशा अडचणीच्या ठिकाणी गुहा खोदायचे कष्ट कोणी का घेतले असतील हे समजणं कठीण होतं!

तो बाहेरून प्रवेशद्वाराचं निरीक्षण करत होता. “मला वाटतं, हे दार नंतर बांधलं असावं. गुहा मात्र पहिल्या शतकात कोरली आहे. प्रवेशद्वार नंतरचं सातव्या किंवा आठव्या शतकातील आहे. मी असं म्हणतोय कारण अशा प्रकारचे उंच आणि कोरीव काम केलेले दरवाजे त्या काळातील दाक्षिणात्य राजांच्या राजवटीमध्ये लोकप्रिय झालेले होते...” तो उचंबळून भडाभडा बोलत सुटला. सजीव आणि जीवनाने रसरसलेल्या वस्तूंपेक्षा मृत, पडझड झालेल्या वास्तूंमध्ये त्याला अधिक रस आहे, हे त्याच्या अचानक बहरलेल्या रसवंतीवरून सहज लक्षात येत होतं. त्याला प्रत्येक गोष्टीविषयी इतकी बारीकसारीक आणि तपशीलवार माहिती होती की गाइड म्हणून मला कामच उरलं नाही.

आत गुहेमध्ये आल्यानंतर तर तो देहभानच विसरला. छत ठेगणं होतं, पण सर्व भिंतींवर रंगीत चित्रं चितारलेली दिसत होती. तसूभरही जागा मोकळी सोडलेली नव्हती. टॉर्चच्या प्रकाशात तो भित्तिचित्रं निरखून पाहत होता. खिशातून आरसा काढून त्याने तो बाहेर सूर्यप्रकाशात बरोबर कोन करून ठेवला. त्याच्यावर परावर्तित झालेल्या सूर्यकिरणांमुळे गुहेच्या भिंती प्रकाशमान झाल्या. आमचं आगमन झाल्यावर वरती वटवाघळांची फडफड चालू झाली होती. पायाखालची जमीन ठिकठिकाणी फुटली होती. खूप सारे खड्डे पडले होते. पण मार्कोला या कशाचीही पर्वा नव्हती. तो आनंदाने कामाला लागला. मोजमापं घेऊन ती लिहून ठेवायची, एकीकडे फोटो काढायचे, अशी त्याची गडबड चालू होती. तोंडाने धावती टीका-टिपणीही करत होताच. माझं त्याच्या बोलण्याकडे लक्ष आहे वा नाही, याचीही तो दखल घेत नव्हता.

तो भग्नावशेषांमध्ये रमला, पण मी लवकरच कंटाळलो. भित्तिचित्रं पौराणिक कथा आणि महाकाव्य यांवर आधारित होती. वैविध्यपूर्ण नक्षीकाम, कोरीवकाम, स्त्री-पुरुष, राजे-महाराजे आणि पशू-पक्षी यांच्या आकृत्यांनी भिंती सजल्या होत्या. अतिशय प्रमाणबद्ध आणि कमालीची आखीव-रेखीव शिल्पंसुद्धा होती तिथे. पण मी पूर्वी अशी शेकडो कोरीव कामं पाहिली असल्याने

पुन्हा तशीच शिल्पं पाहण्यात मला जराही स्वारस्य वाटत नव्हतं. त्याला अन्य कोणत्याही गोष्टीत रस नव्हता त्याचप्रमाणे मलाही ती भित्तिचित्रं वगैरे बघण्यात स्वारस्यनव्हतं.

"जरा सावध, भेगा आणि बिळांमध्ये साप असायची शक्यता आहे," मी म्हणालो.

"छे, छे, साप वगैरे अशा प्रेक्षणीय ठिकाणी फिरकत नाहीत," तो बेफिकिरीने म्हणाला. मग छडी गरगर फिरवत त्याने मला दिलासा दिला, "शिवाय ही आहे ना माझ्याजवळ. मी घाबरत नाही सापांना."

मग त्याबाबत अधिक काही बोलायचं टाळून मी अचानक म्हणालो, "मला गाडीचा आवाज ऐकू येतोय. बहुधा गफूर आला असावा. मला बंगल्यावर जायला हवं. मी गेलो तर चालेल का? परत येईन नंतर," तिथून पळ काढायच्या उद्देशाने मी थाप मारली.

"गफूरला जाऊ देऊ नकोस. थांबवून ठेव," तो म्हणाला.

"हो. पण तुम्ही परत याल तेव्हा याच रस्त्याने या. उगाच रस्ता चुकायला नको." यावर काही उत्तर न करता तो भित्तिचित्रांच्या अभ्यासामध्ये बुडून गेला.

मी क्षणाचाही वेळ न दवडता धावतच निघालो आणि थेट बंगल्याच्या मागच्या बाजूला जाऊन थांबलो! चांगलीच धाप लागली होती. धापा टाकणं बंद झालं तेव्हा हातानेच केस नीट केले, चेहऱ्यावरचे भाव काबूत आणले आणि आत शिरलो. "मला शोधतोयस का?" मागून तिचा आवाज ऐकू आला. ती झाडाच्या सावलीत दगडाच्या मोठ्या शिळेवर बसली होती. मला येताना तिने पाहिलं असावं. "मी तुला दूर, अर्ध्या मैलावर असल्यापासून पाहत होते. तू मात्र मला पाहिलं नाहीस," आवाजात तक्रार होती, जणू काही तो माझा दोष असावा!

"पण मी खाली दरीत होतो आणि तुम्ही इथे, माथ्यावर. मग मला तुम्ही कशा दिसणार?" मी स्पष्टीकरणार्थ म्हणालो. "कॉफी, नाश्ता घेतला का?" अशी चौकशीही केली. ती कमालीची उदास आणि गंभीर दिसत होती. मीही जवळच्याच दगडावर बसलो.

"तू एकटाच परतलास. ते भिंतीकडे बघत बसले असतील."

"होय," मी थोडक्यात उत्तर दिलं.

"ते जिकडे जातात तिथे हे असंच वागतात!"

"मला वाटतं त्यांना आवड आहे अशा गोष्टींची... बाकी काही नाही," मी समर्थन केलं.

"अच्छा? मग माझं काय? मलाही दुसऱ्या गोष्टींची आवड असू शकते."

"काय आवडतं?"

"त्या थंडगार, भग्न भिंती सोडून काहीही..." ती म्हणाली.

मी घड्याळाकडे नजर टाकली. मार्कोला तिथे सोडून निघालो त्या गोष्टीला साधारण तासभर झाला होता. मी वेळ फुकट घालवतोय, संधी मिळाली आहे तिचा उपयोग करून घेतला पाहिजे, जराही वेळ वाया न घालवता... असा विचार करून मी मोठ्या धाडसाने विचारलं, "रोज रात्री तुमची भांडणं होतात ना?"

"साध्या बोलण्यातून आमची वादावादी सुरू होते - कोणत्याही विषयावरून, प्रत्येक गोष्टीवरून आमचे मतभेद सुरू होतात, मग भांडणं... ते निघून जातात शेवटी. रोज हेच चालतं. ते परत येतात, तोवर दोघंही शांत झालेले असतो."

"ही शांती रात्र होईपर्यंत टिकते, खरं ना?" मी विचारलं.

"अगदी खरं."

"तुमच्याशी भांडणं, वाद घालून तुम्हाला दुखवणं त्यांना जमतं तरी कसं? तुमच्या सहवासात स्वर्गीय सुख मिळत असेल त्यांना...."

ती चमकली. "म्हणजे काय?" तिने तिखट आवाजात विचारलं.

‘म्हणजे काय’ हे मी स्पष्ट शब्दात सांगून टाकलं. आज तिला सारं सांगायचं, परिणाम काहीही झाले तरी माझ्या भावना तिच्यापर्यंत पोचवायच्याच. तिने लाथ मारून हाकलून लावलं तरी बेहेत्तर, पण आज ‘आर या पार’ करायचं असं मी ठरवून टाकलं होतं. मी तिच्या नृत्यगुणांची अफाट स्तुती केली. तसं करताना आडवळणाने का होईना पण तिच्यावर प्रेम आहे हेही सांगून टाकलं. अशा सफाईने की तिला जराही संशय येऊ नये. ‘काय अप्रतिम नागनृत्य! रात्रभर मी तुमचाच विचार करत होतो. सर्व जगात तुमच्यासारखी नृत्यांगना शोधूनही सापडणार नाही. तुम्ही कायम माझ्या मनात असता हे समजत नाही का तुम्हाला?’

माझी कळकळ तिच्यापर्यंत पोचली असावी कारण ती म्हणाली, “तू माझ्या भावासारखा आहेस. (हे ऐकून मी दचकलोच. तसं मुळीच नाही असं ओरडून सांगावंसं वाटलं) काय घडतं ते तुला सांगते,” असं म्हणून तिने नेहमी त्यांची भांडणं, वितंडवाद का होतात त्याचा पाढाच वाचला.

“पण तुम्ही मुळात त्यांच्याशी लग्नच का केलं?” मी बेधडक हा प्रश्न केला.

ती उदासपणे म्हणाली, “मला माहीत नाही. झालं खरं!”

“तुम्ही त्यांच्याशी पैशांसाठी लग्न केलं असणार. तुमच्या काका-मामांनी तसा सल्ला दिला असेल तुम्हाला...”

“तसं नाही,” ती अस्वस्थपणे म्हणाली. माझ्या शर्टाची बाही खेचून तिने विचारलं, “मी कोणत्या समाजातली आहे हे माहितीय का तुला?”

मी तिच्याकडे आपादमस्तक नजर फिरवली आणि ठासून म्हणालो, “एकतर मी जातपात, सामाजिक स्थान मानत नाही. कोणत्याही जातीला, वर्गाला तुम्ही भूषणास्पद असाल हे निश्चित.”

“मी देवदासी आहे. मंदिरात देवासमोर नाचणाऱ्या, देवासाठी अर्पण केल्या जाणाऱ्या स्त्रियांच्या खानदानातील आहे मी. माझी आई, आजी, तिच्या पूर्वी तिची आई. हीच परंपरा वर्षानुवर्षं चालत आलीय. मीही आमच्या गावातील मंदिरात नृत्य करत असे. समाजात आम्हाला काय किंमत आहे याची कल्पना आहे का तुला?”

“अत्यंत मानाने वागवत असतील हे नक्की.”

“आम्हाला सार्वजनिक मालमत्ता समजलं जातं,” ती कसलाही आडपडदा न ठेवता म्हणाली, “देवदासींना काडीची प्रतिष्ठा नसते, त्यांना जराही मान नसतो.” तिच्या स्पष्ट बोलण्याने, माझ्यापासून ती काही लपवत नाही हे पाहून मला आनंद झाला.

“पूर्वी समाज अशा प्रकारचे संकुचित, मागासलेले विचार करत असेल, पण आता परिस्थिती बदलली आहे. जातपात, खालचा-वरचा वर्ग असं कोणी मानत नाही,” मी तिची सांत्वना करायचा प्रयत्न केला.

“माझ्या आईने देवदासीच्या चप्रातून माझी सुटका करण्यासाठी मला लहानपणीच शाळेत घातलं. मीही शिक्षणामध्ये उत्तम प्रगती केली. अर्थशास्त्रात एम.ए. केलंय मी. पण शिक्षण झाल्यानंतर पुढे काय करावं - नृत्यकला की आणखी काही, हा प्रश्न पडला. त्याच दोलायमान मन:स्थितीत असताना मी वृत्तपत्रात एक जाहिरात पाहिली. तशा प्रकारची जाहिरात तू अनेकदा पाहिली असशील - ‘अभ्यासू वृत्तीच्या श्रीमंत अविवाहित तरुणाला सुशिक्षित, सुंदर तरुणीशी विवाह करायचा आहे. जातीची अट नाही. आकर्षक व्यक्तिमत्त्व आणि पदवी आवश्यक.’ ही जाहिरात वाचून मी स्वत:ला प्रश्न केला, ‘मी सुंदर, आकर्षक आहे का?”

“अर्थात, शंकेला जागाच नाही,” मी तत्परतेने उत्तर दिलं.

“मलाही तसंच वाटलं. मी पदवी प्रमाणपत्राची गुंडाळी हातात घेऊन छान फोटो काढून त्यांना पाठवून दिले. त्यानंतर आम्ही भेटलो. त्यांनी माझी उलटतपासणी केली, माझं प्रमाणपत्र

पाहून खातरजमा केली. त्यानंतर रजिस्ट्रारकडे गेलो आणि लग्न केलं."

"भेटताक्षणी तुम्हाला ते आवडले वाटतं?" मी नसत्या चौकशा करतोय हे पाहून तिने मला फटकारलं, "असले प्रश्न विचारू नकोस. पण निर्णय घेण्यापूर्वी आमच्या घरात खूप चर्चा झाली. सर्वांत महत्त्वाचा मुद्दा असा होता की, आमच्या सामाजिक आणि आर्थिक परिस्थितीमध्ये महदंतर होतं. मी देवदासी, आर्थिक परिस्थिती बेताची, असं असताना त्यांच्यासारख्या उच्चवर्णीय, श्रीमंत माणसाशी विवाह करणं कितपत योग्य ठरेल? असं असलं तरी माझ्या परिवारातील सर्व स्त्रिया खूष होत्या. देवदासी वर्गातील माझ्यासारख्या मुलीशी एक उच्चकुलीन व्यक्ती लग्न करायला तयार आहे या गोष्टीचं त्यांना फारच कौतुक वाटत होतं. त्यासाठी आमच्या पारंपरिक नृत्यकलेचा त्याग करावा लागत असेल तरी हरकत नाही. गाडी, बंगला, सामाजिक प्रतिष्ठा, मद्रासबाहेरही एक घर, शिवाय एकटा, नातेवाइकांची कटकट नाही- आणखी काय हवं? अशा माणसाशी लग्न करण्यासाठी थोडाफार स्वार्थत्याग करायला हवाच. त्यांची पुस्तकं, संशोधन ह्यामध्येच मग्न असतात ते. सर्वार्थाने योग्य जोडीदार..."

"अच्छा, म्हणजे तुम्हाला सासूचा जाच नाही तर..." मी म्हणालो.

"भावना व्यक्त करणारा, खराखुरा नवरा असता तर मला कशीही सासू चालली असती," ती म्हणाली. तिच्या म्हणण्याचा अर्थ काय असेल या विचाराने मी तिच्या चेहऱ्याकडे पाहिलं, पण तिची नजर खाली झुकली होती. डोळ्यांतील भाव वाचता न आल्याने मला केवळ तर्प बांधता आला. "त्यांना फक्त पुरातन कला, चित्र अशाच गोष्टींमध्ये रस आहे," तिच्या या उद्‌गारामुळे माझ्या तर्काला पुष्टी मिळाली. "म्हणजे, त्यांना अचेतन गोष्टी आवडतात, पण जिवंत चैतन्यदायी गोष्टी आवडत नाहीत, असंच समजायचं ना," मी म्हणालो.

तिच्या दु:खी, निरस आयुष्याच्या विदारक दर्शनाने मी अस्वस्थ झालो. दीर्घ सुस्कारा सोडून मी तिच्या खांद्यावर हात ठेवला. हळुवारपणे तिच्या खांद्यावरून हात फिरवत मी भावनावेगाने म्हणालो, "तुझ्यासारख्या उत्तम नृत्यांगनेला असं विजनवासात राहावं लागतंय या गोष्टीमुळे मला

फार दु:ख होतंय. जग खरंच एका हिऱ्याला पारखं होतंय. मी त्यांच्या जागी असतो तर तुला जगाची राणी बनवलं असतं." ती मूकपणे ऐकत होती. खांद्यावरचा हातदेखील बाजूला केला नाही. माझी बोटं तिच्या मऊसर कानावर रेंगाळली आणि मग हळूच केसांच्या बटांमधून फिरू लागली.

त्या दिवशी गफूर आलाच नाही. तिथून जाणाऱ्या एका ट्रक-ड्रायव्हरने त्याचा निरोप मात्र आणला - 'गफूरची गाडी बिघडलीय त्यामुळे तो दुसऱ्या दिवशी येईल.' आम्हा कोणालाच परतायची घाई नव्हती. जोसेफ आमची सर्वतोपरी खातिरदारी करत होता. भित्तिचित्रांचा अभ्यास करण्यासाठी अधिक वेळ मिळाला म्हणून मार्को खूष होता. माझ्या तर मनासारखं होत होतं - रात्री काचेच्या खिडकीजवळ, तिचा हात हातामध्ये घेऊन श्वापदांची वाट पाहण्याची सुवर्णसंधी मला मिळाली होती. मार्को त्याच्या खोलीमध्ये दिवसभर केलेल्या नोंदी वाचत असताना तिच्या सन्निध, तिच्या सहवासाचा स्वर्गीय आनंद लुटायला मिळणार यामुळे मीही अर्थात खूष होतो.

गाडी दुरुस्त करून गफूर आम्हाला घ्यायला आला. पण मार्कोने जाहीर केलं, "सर्व काम संपवायला मला अपेक्षित होतं त्यापेक्षा जास्त वेळ लागणार आहे. इथे राहावं लागेल. मला काही कागदपत्रं हवी आहेत. हॉटेलमध्ये माझ्या खोलीत एक काळी ट्रंक आहे. ती घेऊन येशील का? तुझी हरकत नसेल तर तू इथे असलास तर मला बरं होईल."

हे ऐकून मी काहीसा विचारात पडलो. तिच्याकडे नजर टाकली. तिच्या चेहऱ्यावरील मूक विनवणी जाणून मी अखेर तयार झालो.

"ट्रंक आणणं हा तुझ्या कामाचाच एक भाग आहे असं समज. पण त्यामुळे तुझ्या व्यवसायावर परिणाम होणार नाही ना?" तो म्हणाला.

"परिणाम तर होईलच, पण तुमची कामंही करायला हवीत," मी घुटमळत म्हणालो, "एकदा कोणाची जबाबदारी घेतली की शेवटपर्यंत, गाडीत बसेपर्यंत त्यांना सांभाळणं हे माझं कर्तव्य

आहे असं मी मानतो," असं म्हणून मी निघालो. मी गाडीत बसतोय तोच ती पतीला म्हणाली, "मीही परत शहरात जाते. मला काही वस्तू हव्या आहेत."

मी पटकन म्हणालो, "रात्री परत येणं कदाचित जमणार नाही."

"तू राहशील का एकटी?" त्याने विचारलं.

"हो."

वळणदार रस्त्याने आमची गाडी खाली निघाली. मागे बसलेल्या आम्हा दोघांकडे गफूर आरशातून वारंवार नजर टाकत होता. अखेर आम्ही दोघं बाजूला सरकलो. हॉटेलवर पोचलो तेव्हा संध्याकाळ झाली होती. मी तिच्या मागोमाग त्यांच्या खोलीत गेलो. "सामान घेऊन लगेच परत जायचं का?" मी विचारलं.

"कशाला?" तिने फटकन उडवून लावलं. "समजा, गफूरची गाडी पुन्हा बंद पडली तर? उगीच धोका कशाला पत्करायचा? मी रात्री इथेच राहीन," ती म्हणाली.

मी कपडे बदलण्यासाठी घरी पळालो. मला पाहताच आईची, 'काय विचारू आणि किती सांगू' अशी अवस्था झाली. दिवसभरातल्या बातम्या, चौकशा; पण मला तिच्या गप्पा ऐकायला मुळीच वेळ नव्हता. झटपट प्रसाधन आवरून मी कपडे बदलले. धुवायच्या कपड्यांची गुंडाळी आईला देऊन म्हणालो, "दुकानातल्या पोराबरोबर हे धोब्याकडे पाठव. स्वच्छ धुऊन, कडक इस्त्री मारून तयार ठेवायला सांग. उद्या कदाचित लागतील मला." आईने माझ्याकडे नीट निरखून पाहिलं. "अलीकडे फारच नटायला लागलाहेस आणि सारखा पळत का असतोस? कसली घाई आहे?" थातूरमातूर उत्तर देऊन मी घाईघाईने निसटलोच.

रोझीला आमचं शहर दाखवायचं असल्यामुळे माझ्यामध्ये प्रचंड उत्साह संचारला होता. सच्च्या गाइडप्रमाणे मी तिला प्रेक्षणीय स्थळांची सफर घडवली. गफूर सोबतीला होताच. टाऊन हॉल टॉवर, शरयू नदी, नदीकाठच्या वाळूत बसून खाऱ्या शेंगदाण्यांचं मोठं पाकीट आम्ही

संपवलं. ती लहान मुलासारखी आनंदली होती, प्रत्येक गोष्ट अतिशय रस घेऊन पाहतहोती. बाजारात गेल्यानंतर ‘तुला हवं ते घे’ असं सांगितल्यावर तर तिचा आनंद गगनात मावेनासा झाला. बहुधा प्रथमच ती अशी मोकळेपणाने बाहेरचं जग पाहत असावी. दुकानाबाहेर मी एकटाच सापडल्यानंतर गफूरने मला सावध केलं. आमचं स्वच्छंद वागणं गफूरच्या नजरेतून अर्थातच सुटलं नव्हतं. तो म्हणाला, “ती एक विवाहित स्त्री आहे हे विसरू नकोस.”

“मग काय झालं? मला का सांगतोस?” माझी नाखुषी ओळखून तो म्हणाला, “रागावू नका, साहेब. जरा सांभाळून, एवढंच सांगायचं होतं.”

“गफूर, तुझं मन घाणेरडं आहे, म्हणून असले विचार तुला सुचताहेत. ती मला बहिणीसारखी आहे,” असं म्हणून मी त्याचं तोंड बंद केलं. तरीही तो म्हणालाच, “तुमचं बरोबर आहे. मला काय करायचंय? माझा संबंधच काय? तिच्याशी जन्मगाठ बांधलेला प्रत्यक्ष तिचा नवरा इथे हजर असताना मी तिची कशाला काळजी करू? काळजी करायला मला माझी बायको आहे की!”

काही न बोलता मी दुकानात गेलो. तिने चांदीचा ब्रूच घेतला होता - मयूराकृती, रंगीबेरंगी. ब्रूचची किंमत चुकती करून तो मी तिच्या साडीवर लावून टाकला. तिथून मी तिला जेवायला घेऊन गेलो. ताजच्या गच्चीवरून, नागमोडी वळणांनी जाणाऱ्या शरयू नदीचं विहंगम दर्शन व्हायचं. ते दृश्य दाखवल्यानंतर ती म्हणाली, “सुंदर आहे, पण दऱ्याखोऱ्या, वनराई, नद्या, निर्झर पाहून अजीर्ण व्हायला लागलंय.” यावर दोघांनाही हसू कोसळलं. कोणत्याही क्षुल्लक कारणामुळे आम्हाला हसण्याच्या उकळ्या फुटत होत्या.

बाजारामध्ये हिंडणं, गर्दी असलेल्या हॉटेलमध्ये जेवणं, निरुद्देश भटकणं, सिनेमा बघणं - सर्वच गोष्टी तिला मनापासून आवडत होत्या. असे सर्वसामान्य छोटे-मोठे आनंददायी अनुभव तिच्या नशिबी आले नव्हते हे तिच्या फुललेल्या चेहऱ्यावरून सहज समजत होतं. सिनेमा बघायला गेलो तेव्हा मी गफूरला रजा दिली. माझे काय उद्योग चालले आहेत हे त्याला न

समजलेलंच बरं! थिएटरमध्ये मी बॉक्सची तिकिटं काढली होती, पण सिनेमा बघण्याकडे आम्हा दोघांचंही लक्ष नव्हतं. हलक्या पिवळ्या रंगाच्या क्रेप साडीत ती इतकी देखणी दिसत होती की, लोकांच्या नजरा तिच्यावरच खिळल्या होत्या. सिनेमा सुटल्यानंतर आम्ही रमतगमत हॉटेलवर गेलो. तिचे डोळे खुषीने चमकत होते. नजरेमध्ये माझ्याविषयी कृतज्ञता दाटून आली होती. 'माझ्यामुळे ही संध्याकाळ एवढ्या मजेत गेली' या उपकाराच्या भावनेखाली ती दबली आहे हे मला सहज समजलं.

हॉटेलला पोचेपर्यंत मध्यरात्र झाली. आत गेलो तेव्हा हॉटेल-डेस्कवरील माणसाने आमच्याकडे अलिप्तपणे पाहिलं. बहुधा ग्राहकांच्या भानगडीत फारसं पडू नये असे धडे त्यांनी गिरवलेले असावेत. अठ्ठावीस नंबरच्या खोलीसमोर मी घुटमळत उभा राहिलो. दरवाजा उघडून ती आत गेली. मग वळून माझ्याकडे पाहत उभी राहिली - पहिल्या दिवशी पाहिलं तसंच...

"मी निघू?" मी अत्यंत हळुवार स्वरात विचारलं.

"हो, शुभ रात्री," ती असं म्हणाली, पण तिच्या आवाजात जोर नव्हता.

कमालीचा दु:खी, उदास दिसण्याचा प्रयत्न करत मी विचारलं, "मला आत येऊ दे ना?"

"नको, नको. जा तू," तिच्या नकाराकडे दुर्लक्ष करून मी तिला हळुवारपणे बाजूला सारलं आणि आत जाऊन दरवाजा बंद करून घेतला.

# ६

दिवसामागून दिवस, ऋतूमागून ऋतू चालले होते. काम आणि लोकांच्या गर्दीत राजूला काळाचं भान राहिलं नव्हतं. अनेक महिने (कदाचित अनेक वर्षंदेखील असू शकतील) उलटून गेले होते. खास गोष्टीवरून वा वैशिष्ट्यावरून कोणता महिना वा ऋतू असेल याचा त्याला अंदाज येत असे. ऊस, गूळ घालून केलेला भात असे पदार्थ जेवणात असले म्हणजे जानेवारी महिना चालू आहे हे समजे. तामीळ नववर्षाला मिठाई आणि फळफळावळ घेऊन भक्तगण येई. दसऱ्याच्यावेळी तर नऊ दिवस उत्सव असे. मंदिरात दीपोत्सव होई. बायाबापड्या रंगीबेरंगी कागद आणि कलावस्तूच्या माळा लावून गाभारा सजवत. त्यानंतर दीपावली. त्याच्यासाठी नवे कपडे, फटाके येत. तो गावच्या पोरांबरोबर फटाके फोडून दिवाळी साजरी करत असे. ऋतुचप्रावरून - उन्हाळा, पावसाळा, थंडी - राजूला कोणते महिने चालू आहेत याचा अंदाज येई. त्यासाठी कॅलेंडरची गरज नाही हे त्याला अनुभवान्ती उमजलं होतं.

एव्हाना त्याच्या दाढीचे केस छातीवर रुळायला लागले होते. माथ्यावरचे केस देखील पाठीपर्यंत पोचले होते. गळ्यामध्ये तो रुद्राक्षांची माळ घालायचा. डोळ्यांमध्ये ममता आणि मृदू भाव काठोकाठ भरलेले असायचे, शिवाय ज्ञानाचा प्रकाशही त्यांमधून ओसंडून वाहायचा. गावकरी भक्त त्याच्यासाठी कायम काही ना काही आणत असत. त्या असंख्य वस्तू जमा करून ठेवायचाही त्याला अखेर कंटाळा येऊ लागला. शेवंतीच्या फुलांचे भलेमोठे हार, गुलाबपाकळ्या, मोगऱ्याच्या फुलांनी भरलेल्या टोपल्या - सारं दिवसअखेरी बायका-पोरांमध्ये तो वाटून टाकायचा.

साऱ्याचा अतिरेक झाल्याचं पाहून वेलनला तो नाखुषीने म्हणालादेखील, "अरे बाबा, मीही तुमच्यासारखाच एक गरीब माणूस आहे. का तुम्ही माझ्यासाठी एवढ्या साऱ्या भेटी आणताय? बंद करा हे सारं.' पण त्याच्यासाठी काही ना काही वस्तू मोठ्या प्रेमाने आणणाऱ्या त्याच्या

भक्तगणांनी अर्थातच त्याच्या तप्रारीकडे लक्ष दिलं नाही. त्यांचा 'स्वामी' होता तो. तो राहायचा ती जागा 'मंदिर' म्हणून संबोधली जायची. 'स्वामी' आणि 'मंदिर' हे शब्द लोकांच्या तोंडी रुळले. 'स्वामी असं म्हणताहेत' आणि 'स्वामी तसं म्हणतात', 'मी मंदिरात चाललोय' वगैरे...गावकऱ्यांना स्वामी, त्यांचं वास्तव्य असलेलं मंदिर यांविषयी इतका भक्तिभाव होता की, त्यांनी मंदिराच्या भिंती चुना लावून छान रंगवल्या. वरती लाल रंगाचे पट्टे काढले.

वर्षातील सुरुवातीचे सहा महिने संध्याकाळी पाऊस पडायचा - दोन एक तास वादळ, वारे, विजांचा कडकडाट असं साग्रसंगीत चालायचं. त्यानंतरच्या सहामाहीमधील पाऊस संततधार धरायचा, पण शांतपणे - गडगडाट, विजा असं काही नसे. असा वर्षभर पाऊस असला तरी गावकरी मंदिरात जमायचेच. बचावासाठी छत्र्या, नारळाच्या झावळ्या, बांबूच्या चटया असं काहीही घेऊन लोकांची पावलं स्वामींच्या दर्शनासाठी मंदिराकडे वळायचीच. पाऊस कोसळत असताना मंदिराचा गाभारा गच्च भरायचा. बाहेरच्या आवारात बसणं शक्य नसे. सर्वांना आतच गाभाऱ्यात गर्दी करून बसावं लागत असे. छान, बंदिस्त, उबदार वाटत असे. पावसाचे चाबूक सपकारे, झाडांची प्रचंड सळसळ आणि पावसाने फुललेल्या नदीचा फुफाटा (पूर आलेल्या नदीचं पात्र उथळ जागी ओलांडणारे गावकरी पोराबाळांना खांद्यावर उचलून घ्यायचे) या सर्वांच्या एकत्रित परिणामामुळे वातावरण भारलं जाई. राजूला वर्षा ऋतू अतिशय आवडायचा. चोहीकडे हिरवंगार, अवकाशात विविध आकाराचे धक्काबुक्की करणारे ढग हे न्याहाळताना त्याचं भान हरपायचं.

यंदा मात्र वर्षअखेर झाली तरी आकाशात एकही ढग तरंगला नाही. उन्हाळा संपायची लक्षणं दिसेनात. "अजून पावसाला सुरुवात कशी झाली नाही?" राजूने विचारलं.

वेलन दु:खी आवाजात म्हणाला, "स्वामीजी, पावसाची जराही लक्षणं दिसत नाहीत. मक्याचं उभं पीक जळून गेलं पाण्याविना. परिस्थिती फारच वाईट आहे."

"केळ्याची हजारो बियाणं सुकून वाया गेली," दुसरा म्हणाला. "असंच चालू राहिलं तर पुढे काय होईल देव जाणे!" सर्वांचे चेहरे चिंतातुर दिसू लागले.

'द्रष्ट्या' राजूने गावकऱ्यांना दिलासा द्यायचा प्रयत्न केला. "होतं असं कधीतरी. पण निराश होऊ नका, सारं ठीक होईल अशी आशा करू या."

पण गावकरी अजूनही अस्वस्थ होते. "स्वामीजी, गुरांना चरण्यासाठी चारा नाही याची कल्पना आहे का तुम्हाला? बिचारी गाईगुरं धूळ, चिखलामध्ये तोंड खुपसून चारा शोधत असतात." त्यांच्या तक्रारीचा सूर ऐकून राजूने पुन्हा एकवार त्यांचं समाधान करायचा प्रयत्न केला. अखेर काहीसे शांत झाल्यावर सर्वजण घरी गेले. पाऊस न पडल्याने नदीच्या पाण्याची पातळीही खाली गेली आहे हे राजूला आठवलं. अलीकडे स्नान करण्यासाठी त्याला घाटाच्या तीन पायऱ्या उतरून खाली जावं लागायचं. खाली उतरून तो नदीच्या प्रवाहाकडे पाहू लागला. डाव्या हाताला मेम्पी पर्वतरांगा पसरल्या होत्या. तिथेच उगम पावलेली नदी वळणं घेत परत उगमाकडे निघाल्यागत वाटत होतं. पवित्र उगमस्थानाचं दर्शन होण्यासाठी तो असंख्य वेळा पर्यटकांना घेऊन गेला होता. लहानसं पुंड, शंभर चौरस फूटही नसेल, बारकंसं मंदिरही होतं तिथे. असं काय घडलं म्हणून नदी एवढी आटली? पाण्याची पातळी खाली गेल्यामुळे पात्र रुंदावल्यासारखं वाटत होतं. खडक उघडे पडले होते.

दुष्काळाची अन्य लक्षणंही दिसू लागली होती. एरव्ही कापणीच्या वेळी हर्षोल्हासाचं वातावरण असायचं, पण यंदा त्याचा मागमूसही नव्हता. "ऊस तर साराच्या सारा सुकून गेला. फार प्रयासाने हा थोडासा मिळालाय. कृपा करून स्वीकार करावा." राजूला मिळणाऱ्या भेटवस्तूंची संख्या तसंच आकारमानही दिवसेंदिवस घटत चाललं होतं. "मला नको. पोरांना वाटून टाका," तो म्हणाला.

"येत्या वर्षी खूप लवकर पाऊस पडेल असं भविष्य ज्योतिषबुवांनी वर्तवलं आहे," कोणीतरी आशादायक चित्र उभं केलं. आजकाल सर्व विषय पावसाशी संबंधितच असायचे.

प्रवचनं आणि तत्त्वज्ञानप्रचुर भाषणांकडे मंडळीचं फारसं लक्ष नसे. त्यांच्या मनातील चिंता आणि आशा यांभोवती संभाषण फिरत राही. शंका-निरसनासाठी राजूला साकडं घातलं जाई. "स्वामीजी, विमानांच्या हालचालींमुळे आकाशातील ढग विखुरले जातात आणि त्यामुळेच पाऊस पडत नाही ही गोष्ट खरी आहे का? विमानांची गर्दी फारच झालेली दिसते आकाशात..." कोणी विचारत असे. "अणुबाँबमुळे ढगांमधील पाणी आटलं असं म्हणतात. ह्या गोष्टीमध्ये कितपत तथ्य आहे?" विज्ञान, पौराणिक कथा, हवामानाचे अंदाज, सत् आणि असत् अशा असंख्य विविध गोष्टींचा पावसाशी संबंध जोडून प्रश्न विचारले जात होते. राजूही जमेल तसं शंकासमाधान करत होता, पण गावकऱ्यांची चिंता दूर होत नव्हती.

अखेर त्याने फर्मान काढलं, "यापुढे पावसाविषयी विचार करायचा नाही. सतत पर्जन्यदेवतेविषयी विचार करत राहिलात तर ती कोपते आणि अधिकच दूर पळते. दिवसरात्र तुमच्या नावाचा जप करत राहिलं तर तुम्हाला ते आवडेल का? तुम्हीही त्रासून लांब जाल की नाही? तसंच आहे हे." मंडळींना हे पटलं. आपल्याबरोबर पावसाची तुलना केली या गोष्टीचं हसूही आलं. निदान तेवढ्यापुरतं त्यांच्या मनावरचं ओझं उतरलं. पण ते तात्पुरतंच ठरलं. परिस्थिती गंभीर होत चालली. राजूचं तत्त्वज्ञान, समजुतीचे बोल काम करेनासे झाले. गाईम्हशींचं दूध आटलं, बैलांमध्ये नांगर ओढण्याइतपत शक्ती उरली नाही, शेळ्या-मेंढ्या रोगट, अशक्त दिसायला लागल्या.

गावोगावी विहिरी आटायला लागल्या. हंडा-कळशा घेऊन बायकांचे थवे नदीवर पाणी भरायला यायचे. दिवसभर त्यांची रांगच लागायची. नदीचं पाणीही कमी होत होतं.

पलीकडील बांधावरून रांगेत पाण्याला निघालेल्या स्त्रियांचं चित्रवत दृश्य राजू रोजच पाहायचा, पण त्यामधून अपेक्षित शांती त्याला अनुभवायला मिळत नसे. प्रथम कोणी पाणी भरायचं या गोष्टीवरून त्यांची भांडणं होत. चिंता, अगतिकता आणि भयाची भावना सर्वांच्याच आवाजात जाणवायची. गुरं मरायला लागली तेव्हा परिस्थितीचं गांभीर्य अधोरेखित झालं.

सर्वप्रथम एक म्हैस पायवाटेवर मरून पडलेली आढळली. भल्या पहाटे वेलनच ही बातमी घेऊन आला. राजू झोपलेला होता. त्याला उठवून वेलन म्हणाला, “स्वामी, आमच्याबरोबर चला.”

“कशाला?” राजूने झोपेतच विचारलं.

“गाईगुरं प्राण सोडायला लागलीत, स्वामी,” वेलनच्या आवाजात खोल अगतिकता भरली होती.

राजू उठून बसला. ‘यामध्ये मी काय करणार?’ असं तो विचारणार होता, पण त्याने स्वत:ला आवरलं.

“अरेरे, असं कसं झालं?” मोठ्या सहानुभूतीपूर्ण आवाजात त्याने विचारलं.

“गावाबाहेर, जंगलामधल्या पायवाटेवर एक म्हैस मरून पडलीय.”

“तू स्वत: पाहिलंस का?”

“होय स्वामी, मी तिकडूनच आलो.”

“वेलन, परिस्थिती एवढी काही वाईट नाही. ती म्हैस रोग झाल्यानेही मेली असेल.”

“आपण स्वत: बघून सांगा कशाने मेली. तुमच्यासारख्या विद्वान माणसाला बरोबर समजेल. तुम्ही सांगाल तरच आमचं समाधान होईल.”

‘नक्कीच गावकऱ्यांच्या डोक्यावर परिणाम होत चाललाय. वेड्यासारखे काहीही बोलताहेत. स्वामीला जीवित अथवा मृत गुरांविषयी काहीही माहिती नाही, मेलेल्या म्हशीला पाहून स्वामी काहीही सांगू शकणार नाही,’ राजूच्या मनामध्ये असे विचार आले, पण गावकऱ्यांच्या इच्छेला मान तुकवून तो वेलनबरोबर निघाला. रस्त्यावर शुकशुकाट दिसत होता. दुष्काळ असल्याने लोकांना मदत मिळावी यासाठी शाळेचे मास्तर महसूल अधिकाऱ्यांकडे अर्ज द्यायला गेले होते. अर्थात त्यामुळे शाळेला सुट्टी होती. मुलं मातीत खेळत होती. आया-बाया

हंडे-कळशा घेऊन पाण्यासाठी वणवण फिरत होत्या. “माझी कळशी जेमतेम अर्धी भरली,” एकजण जाता जाता म्हणाली, “स्वामी, काय चाललंय हे? तुम्ही मार्ग दाखवा.”

राजूने आश्वासनदर्शक हात हालवला. ‘काळजी करू नका. सारं काही ठीक होईल. मी परमेश्वराला सांगून व्यवस्थित करतो,’ असंच जणू काही त्याला म्हणायचं असावं! त्याच्या आणि वेलनच्या मागोमाग गावकऱ्यांचा छोटा घोळकाही येत होता. साऱ्यांच्या तोंडी अवर्षण, पावसाचा अभाव हाच विषय होता. शेजारच्या गावात तर याहूनही भीषण परिस्थिती होती. ‘तिथे पटकीच्या साथीने हजारो लोकांचा बळी पडलाय’ अशी बातमी कोणीतरी दिली. ‘खोट्या कंड्या पिकवून घाबरवू नकोस’ असं म्हणून बाकीच्यांनी त्याला परस्पर गप्प बसवलं. या सर्व गडबडीकडे राजूचं लक्षही नव्हतं.

अखेर ‘ती’ जागा आली. गावाबाहेर, जंगलात जाणाऱ्या पायवाटेवर हाडं निघालेल्या म्हशीचा मृतदेह पडला होता. एव्हाना कावळे, घारी वरती घिरट्या घालायला लागले होते, मात्र गावकऱ्यांची चाहूल लागताच सारे पांगले. अतिशय वाईट दुर्गंधी पसरली होती. नंतर कधीही ‘वर्षा ऋतू’ म्हटल्यावर राजूला हा मळमळवणारा वास आठवायचा. केवळ सहानुभूती दाखवून दुर्गंधीची तीव्रता कमी होणार नव्हती. उपरणं नाकाला लावून राजू काही वेळ म्हशीच्या सांगाड्याकडे पाहत उभा होता. “कोणाची आहे ही म्हैस?” अखेर शांततेचा भंग करीत त्याने विचारलं.

मंडळींनी एकमेकांकडे प्रश्नार्थक पाहिलं. “आमची कोणाचीच नाही. शेजारच्या गावची असणार,” कोणीतरी म्हणालं. अजूनतरी हे संकट आपल्या गावात पोचलं नाही अशा विचाराने सर्वांनाच किंचित दिलासा मिळाला. बुडत्याला काडीचा आधार या न्यायाने गावकरी कोणत्याही गोष्टीमध्ये समाधान शोधत होते.

“मला वाटतं, ही जंगली म्हैस असावी. कोणाचीही पाळलेली दिसत नाही,” कोणीतरी असं म्हटल्यावर साऱ्यांना अधिकच बरं वाटलं. म्हशीच्या मृत्यूची अन्य कारणं आणि शक्यता असू

शकतात हे पाहून राजूच्या मनावरचं ओझं थोडंसं कमी झालं. पुन्हा एकवार म्हशीकडे नजर टाकून तो म्हणाला, "म्हैस बहुधा विषारी जनावर किंवा कीटक चावून मेली असणार." या स्पष्टीकरणामुळे सर्वांचं समाधान होईल अशी आशा बाळगून तो निघाला. निष्पर्ण, वठलेली झाडं, पाण्याविना शुष्क झालेली उजाड जमीन या ढळढळीत दिसणाऱ्या गोष्टींकडे त्याने सोयीस्कररीत्या दुर्लक्ष केलं होतं.

स्वामींनी म्हशीच्या मृत्यूचं कारण दिलं ते ऐकून जनताही खूष झाली. साऱ्यांच्या मनावरील ताण नाहीसा झाला. रात्री गाई-गुरांना गोठ्यामध्ये बांधताना 'उद्या काय बघायला मिळेल' या विचाराचं सावट नव्हतं. 'गाईगुरांना चरण्यासाठी भरपूर चारा आहे. स्वामीजींनी हेच सांगितलं. ती म्हैस उपासमारीने नव्हे, तर विषारी जनावर चावल्याने मेली. त्यांना सगळं माहिती आहे.' स्वामींच्या म्हणण्याला पुष्टी देण्यासाठी गुरांचा रहस्यमय परिस्थितीत मृत्यू झाल्याची अनेक उदाहरणंही एकमेकांना सांगण्यात आली - 'खुरांना चावणारे साप देखील असतात बरं का...' 'विषारी मुंग्या चावून गुरं मृत्युमुखी पडली आहेत.' वगैरे, वगैरे.

असं असूनही गुरांचे बळी पडत होतेच. जमिनी संपूर्णत: सुकल्यामुळे जराही खणलं तरी धूळ उडायची. घरोघरी धान्य साठवण्याच्या कणग्या रिकाम्या होऊ लागल्या. दुकानदाराने परिस्थितीचा बरोबर फायदा घेतला. भाव चढायची वाट पाहत असल्याने त्याने साठेबाजी सुरू केली. तांदळाच्या एका मापट्याचे तब्बल चौदा आणे मागितल्यावर एका गिऱ्हाइकाचं अखेर टाळकं सटकलं. त्याने दुकानदाराच्या थोबाडीत मारली. दुकानदाराने सुरा काढला आणि तो त्याच्या अंगावर गेला. दरम्यान बाकीही लोक जमले आणि त्या माणसाची कड घेऊ लागले. जमलेल्या जमावाने दुकानाला वेढाच घातला. मग दुकानदाराचे नातेवाईक आणि समर्थक गप्प बसले नाहीत. चाकू-सुरे, पहारी घेऊन त्यांनी रात्रीच्या वेळी त्या लोकांवर आप्रमण केलं.

वेलन आणि त्याचे साक्षीदार कुऱ्हाडी, सुरे घेऊन मदतीला धावून गेले. किंकाळ्या, आरोळ्या, शिव्यागाळी यांनी सारा परिसर दणाणून गेला. गवताच्या थोड्याफार गंज्या होत्या त्या

पेटवून दिल्यामुळे आसमंत उजळला. गोंगाट ऐकून राजूला जाग आली. दूरवर आग लागलेली दिसली. फक्त काही तासांपूर्वी शांत आणि मैत्रीपूर्ण वाटणारं वातावरण असं पेटलेलं पाहून राजूने निराशेने मान हलवली. 'या गावकऱ्यांना नीट प्रेमाने राहायचं माहितीच नाही... सगळ्यांचे पारे चढायला लागलेत. असंच चालू राहिलं तर मला दुसरा गाव शोधायला लागेल...' तो मनाशीच म्हणाला. 'त्यांना हवं ते करू दे' असं म्हणून तो झोपी गेला.

त्याची इच्छा नसली तरी भल्या पहाटेच बातमी देण्यासाठी वेलनचा भाऊ हजर झाला. राजू अर्धवट झोपेतच होता. "वेलनच्या डोक्याला मार लागलाय, भाजलाही आहे," तो म्हणाला. युद्धात जखमी झालेल्या बायकापोरांची जंत्री देऊन 'रात्री हमला करण्याची जय्यत तयारी चालली आहे' हेही सांगितलं.

हे ऐकून राजू थक्कच झाला. आता आपण काय करावं? मोहीम यशस्वी व्हावी म्हणून शुभाशीर्वाद द्यायचे की त्यांना परावृत्त करायचं? त्याचं वैयक्तिक मत विचाराल तर 'सर्वांनी एकमेकांची डोकी फोडावीत हे सर्वांत उत्तम' असं होतं! त्यामुळे दुष्काळी परिस्थितीवरून त्यांचं लक्ष उडायला मदत झाली असती. वेलनची बातमी ऐकून मात्र त्याला वाईट वाटलं. "फार लागलंय का त्याला?" त्याने भावाला विचारलं.

"छे, छे. तसं काही विशेष नाही. जरासं लागलंय," त्याच्या आवाजावरून वेलनला फारशी दुखापत न झाल्याने जणू त्याचं समाधान झालं नसावं, असंच वाटत होतं! दुखापत झाली नाही या गोष्टीचं त्याला वाईट वाटतंय असं जाणवत होतं.

राजू 'वेलनला भेटायला जावं किंवा नाही' अशा द्विधा मन:स्थितीत होता. त्याला जायची इच्छा अजिबात नव्हती. जखमा काय बऱ्या होतील. बघायला जाऊन काय होणार? शिवाय त्याच्या भावाने 'वेलनला फारसं लागलं नाही' अशी बातमी (खरी-खोटी कोणास ठाऊक!) दिल्याने राजूच्या अनिच्छेला पुष्टीच मिळाली. वेलनला भेटायला जायची घाई नको असं त्याने ठरवलं. शिवाय तसं केल्याने अनिष्ट पायंडा पडेल ही भीती होतीच. गावकरी बारीकसारीक

कारणांवरून त्याने धावत यावं अशी अपेक्षा करतील. म्हणजे कधीच आराम मिळायला नको! “तू कसा काय बचावलास? तुला कसं लागलं नाही?” त्याने वेलनच्या भावाला विचारलं.

“अहो, मी तर होतोच तिथे. माझ्या वाटेला गेले नाहीत, नाही तर दहा जणांना भारी पडलो असतो! पण माझा भाऊ विचार न करता पुढे गेला...” तो फुशारकीने म्हणाला.

‘आहे काडी पैलवान, पण आव किती आणतोय,’ राजू मनात म्हणाला. “तुझ्या भावाला सांग जखमांवर हळद लाव,” त्याने सल्ला दिला. हा इसम ज्या सहजतेने वेलनच्या दुखापतींविषयी बोलत होता त्यावरून त्याने स्वत:च तर वेलनच्या डोक्यावर ठोसा मारला नसेल ना, अशी दाट शंका राजूच्या मनाला चाटून गेली. या गावात काहीही घडणं शक्य आहे याविषयी राजूच्या मनात तिळमात्र शंका नव्हती. इथे भाऊबंदकी, भावाभावांमध्ये कोर्टकचेऱ्या, खटले चालू होते. सगळे कायम एकमेकांच्या उरावर बसलेले असत. त्यामुळेच सद्य परिस्थिती पाहता कोणाचं कधी डोकं फिरेल आणि काय घडेल हे सांगता आलं नसतं! वेलनचा भाऊ जाण्यासाठी उठला. “वेलनला संपूर्ण विश्रांती घ्यायला सांग,” राजूने प्रेमाचा निरोप दिला.

“अरे बापरे, स्वामी, ते कसं शक्य आहे? आज रात्रीच्या हमल्यामध्ये तोही सामील होणार आहे. त्यांच्या घरांना आगी लावून पेटवून देईपर्यंत त्याच्या जीवाला शांती लाभणार नाही.”

या मारामाऱ्या आणि भांडणं ऐकून राजू वैतागला. “हे काही बरोबर नाही,” तो म्हणाला.

वेलनचा भाऊ डोक्याने कमीच होता. साधारण एकवीस वर्षांचा असेल. हा मूर्ख भाऊ म्हणजे वेलनची फार मोठी डोकेदुखी होती. गावकऱ्यांची गाईगुरं चरायला न्यायचं काम तो करायचा. भल्या पहाटे घरोघरी जाऊन गुरं गोळा करायचा, डोंगराजवळच्या पठारावर त्यांना चरायला सोडायचा, दिवसभर त्यांची राखण करून संध्याकाळी परतायचा. दिवसभर झाडांच्या सावलीत लोळत पडायचं, सूर्य माथ्यावर आला की ज्वारी-बाजरीची भाकरी पोटात ढकलायची आणि सूर्यास्त झाला की गुरांना हाकलत परतायचं. पूर्ण दिवस गाईगुरांव्यतिरिक्त कोणाची सोबत नसे. मग तो त्यांच्याशीच - चक्क माणसांशीच बोलावं तसं - बोलायचा. शिव्यागाळ,

आयमाय उद्धारणं असं साग्रसंगीत चालायचं. दुपारच्या शांत वेळी जंगलामधून त्याच्या निवडक शिव्यांचा प्रतिध्वनी स्पष्ट ऐकू येई. गुरांना चरायला नेणं हे एकमेव काम तो व्यवस्थित करायचा. त्याबद्दल प्रत्येकाकडून त्याला महिना चार आणे मिळायचे. दुसरं कोणतंही जबाबदारीचं काम त्याला जमणार नाही याची सर्वांना खात्री होती. स्वामींकडे कधीही न फिरकणाऱ्यांची संख्या फारच कमी होती. हे महाशय त्यांपैकी एक होते! स्वामींच्या दरबारात येण्याऐवजी रात्री ढाराढूर झोपणं त्याला जास्त प्रिय असे. आज इथे येण्याची बहुधा त्याची पहिलीच वेळ असावी. बाकी सारी मंडळी मारामारीची तयारी करण्यात आणि डावपेच ठरवण्यात व्यस्त असल्यामुळे तो स्वत:च निरोप घेऊन आला होता. शिवाय दुष्काळामुळे त्याच्या व्यवसायावर परिणाम झाला होता. चारा नसल्यामुळे गुरांना चरायला पाठवण्याची गरज संपली होती. साहजिकच या मूर्खाची कमाई बंद झाली होती. रिकामटेकडा असल्याने त्याच्याकडे वेळच वेळ होता. त्याचा सदुपयोग करावा आणि स्वामीजींचे आशीर्वाद घ्यावेत असा विचार करून स्वारी स्वत:च देवळात आली होती. गावकऱ्यांनी मारामारीची बातमी नंतर कदाचित सौम्य करून स्वामींना सांगितली असती, पण सध्यातरी हा प्रकार त्यांच्या कानी पडू नये अशीच सर्वांची इच्छा होती. ह्या दीड शहाण्याने स्वत:च पुढाकार घेऊन स्वामींना खबर पोचवली, शिवाय हाणामारीचं समर्थन केलं, “स्वामी, त्यांनी माझ्या भावाच्या चेहऱ्यावर वार करायला नको होता,” तो तावातावाने म्हणाला, “त्यांना धडा शिकवायलाच हवा.”

राजूने शांतपणे त्याचं म्हणणं खोडून काढलं, “दुकानदाराला आधी तुम्हीच मारलंत ना?”

त्या मुलाने राजूचं म्हणणं शब्दश: घेतलं, “मी नाही मारलं त्या दुकानदाराला,” असं म्हणून त्याने काही नावं घेतली. “या लोकांनी मारलं त्याला.”

आपल्या म्हणण्याचा अर्थ त्याला समजावून सांगावा एवढा उत्साह राजूमध्ये नव्हता. “हे चांगलं नाही. हाणामारी कोणीच करू नये,” एवढंच म्हणून तो गप्प बसला. त्याला ‘शांती’ या

विषयावर उपदेश करणं केवळ अशक्य आहे हे राजू जाणून होता. “कोणीही मारमारी करू नये,” तो पुन्हा म्हणाला.

“पण तेच मारामारी करतात. ते लोकच येतात आम्हाला मारायला,” तो मुलगा ऐकायला तयार नव्हता. मग थोडा वेळ विचार करून म्हणाला, “ठार मारतील ते आम्हाला एक दिवस...”

आता मात्र राजू काहीसा चिंतेत पडला. मारामारी, डोकी फोडणं असल्या प्रकारांमुळे प्रकरण कदाचित पोलिसांपर्यंत पोचलं असतं. तसं काही घडू नये अशी राजूची इच्छा होती. आत्तापर्यंत अलिप्तपणे वागणाऱ्या राजूला अचानक प्रकरणामध्ये लक्ष घालावंसं वाटायला लागलं. वेलनच्या भावाचा हात घट्ट पकडून तो म्हणाला, “पटकन जा आणि वेलन आणि बाकी सर्वांनाच माझा निरोप सांग. मारामारी, भांडणं एकदम बंद. पुढे काय करायचं ते मी नंतर सांगेन.” हे ऐकून त्याने वाद घालायला तोंड उघडलं, पण राजूने त्याला बोलायची संधीच दिली नाही. तो फटकन म्हणाला, “काही बोलू नकोस. मी सांगतो तेच कर.”

राजूचा रुद्रावतार पाहून तो काहीसा घाबरलाच.

“हो, स्वामीजी,” तो विनम्रपणे म्हणाला.

‘आत्ताच्या आत्ता, तुझ्या भावाला असेल तिथून शोधून काढ आणि सांग की, या मारामाऱ्या थांबायला हव्यात. अन्यथा मी अन्नत्याग करेन. काही खाणार नाही,” राजूने घोषणा केली.

“काय खाणार नाही?” त्या मठ्ठ मुलाने भांबावून विचारलं.

“काही खाणार नाही एवढंच सांग. काय खाणार नाही असं विचारू नकोस. सर्वजण चांगले वागत नाहीत तोपर्यंत काही खाणार नाही, बस्स!”

“चांगले? म्हणजे कसे?” त्याचा गोंधळ संपत नव्हता.

साराच प्रकार त्याच्या समजशक्तीच्या पलीकडला होता. पुन्हा 'काय खाणार नाही?' असं त्याला विचारायचं होतं, पण राजूला घाबरून तो गप्प बसला. 'मारामारी आणि या माणसाचं जेवण' यांचा काय संबंध असेल? तो डोळे विस्फारून विचार करत होता. डाव्या मनगटावरची राजूची घट्ट पकड सुटावी एवढीच त्याची इच्छा होती. या माणसाकडे एकट्याने येण्यात फारच मोठी चूक झाली - त्याची वाढलेली दाढी, रागीट चेहरा पाहून त्याला घाम फुटला. हा आपल्याला खाऊन टाकेल या कल्पनेने बोबडी वळायला लागली. कसंही करून सुटका करून घ्यावी म्हणून तो कसाबसा म्हणाला, "होय स्वामी, तुम्ही सांगताय तसंच करतो." राजूने त्याचं मनगट सोडल्यावर तो जिवाच्या आकांताने पळत सुटला आणि क्षणार्धात नाहीसा झालासुद्धा.

गावात मध्यवर्ती ठिकाणी एक विशाल प्राचीन पिंपळवृक्ष होता. भोवताली विटांचा पार. पायाजवळ देवदेवतांच्या तेल माखलेल्या दगडी मूर्ती. गावकरी त्यांची पूजा करत. या पारावर गावकऱ्यांच्या बैठकी होत. थंडगार सावलीत गावाच्या छोट्या-मोठ्या समस्या, अडचणींवर चर्चा चालायची. एकीकडे बायाबापड्या डोक्यावरच्या जड टोपल्या उतरवून विश्रांतीसाठी टेकायच्या. पोरंटोरं मस्ती करायची. कुत्री लोळत पडायची. आतादेखील गावातील जुनी जाणती वडीलधारी मंडळी मोठ्या गंभीरपणे पावसाविषयी चर्चा करत बसली होती. एवढ्यात वेलनचा भाऊ धापा टाकत तिथे पोचला.

पावसाबरोबरच 'रात्रीच्या हमल्याचे डावपेच' हा महत्त्वाचा विषय चर्चेला होता. सर्वांच्याच मनात मोहिमेबाबत अनेक शंकाकुशंका होत्या. स्वामींची त्याविषयी काय प्रतिप्रिया असेल हे नंतरच समजलं असतं. त्यांना कदाचित ही हिंसा, मारामारी आवडली नसती. गावकऱ्यांनाही नेमकं काय करावं याविषयी संभ्रम होता. त्यांच्यापैकी बऱ्याच जणांना मुका मार लागला होता, जखमा झाल्या होत्या, त्यामुळे खोडी काढणाऱ्यांना धडा शिकवायचाच याबद्दल दुमत नव्हतंच. पण पोलिसांची भीती होती. पूर्वी एकदा दोन गटांमध्ये हाणामारी झाल्यावर सरकारने पोलिसांची एक तुकडी जवळजवळ कायमचीच गावात बसवली होती! त्याहून दु:खाची गोष्ट म्हणजे

त्यांच्या खाण्यापिण्याचा तसंच राहण्याचा खर्च गावकऱ्यांच्या माथी मारला होता. अर्थात त्या गोष्टीची पुनरावृत्ती कोणालाच नको होती.

बैठकीमध्ये वेलनच्या भावाचं धावतपळत आगमन झाल्यामुळे सारेच चरकले. "अरे बाबा, काय झालं?" वेलनने विचारलं. काही उत्तर न देता तो दम खात उभा राहिला. मंडळींनी त्याचा खांदा पकडून त्याला गदागदा हलवलं. काय झालं हे जाणण्यासाठी सारेच अधीर झाले होते. पण तो बिचारा अधिकच गोंधळून गेला. तोंडातून शब्दही फुटेना. अखेर तो कसाबसा म्हणाला, "ते स्वामी...ते स्वामी आहेत ना...ते काही खाणार नाही असं म्हणाले. त्यांच्यासाठी जेवण नेऊ नका."

"का? काय झालं?" सारेच बुचकळ्यात पडले. "कारण...कारण म्हणजे... पाऊस पडत नाहीये म्हणून," त्याने ठोकून दिलं. अचानक मारामारीविषयी ते काय बोलले ते त्याला आठवलं. "मारामारी बंद झाली पाहिजे असंही म्हणालेते."

"तू तिथे गेलासच कशाला?" भावाने अधिकारवाणीने विचारलं.

आता तो अधिकच घाबरला. "मी...मी नाही गेलो, पण सहजच गेलो तेव्हा त्यांनी मला विचारलं आणि मी सांगितलं..." अडखळत त्याने उत्तर दिलं.

"तू नेमकं काय सांगितलंस?"

मूर्ख असला तरी संभाषण कोणतं वळण घेतंय आणि त्याचे परिणाम काय होतील हे समजण्याएवढी अक्कल त्याच्याजवळ होती. स्वामींना गावातील मारामारीची बातमी आपण दिली हे या लोकांना समजलं तर ते आपल्याला चांगलं बडवतील हे त्याला चांगलं माहीत होतं. त्याचा खांदा त्यांनी घट्ट पकडून ठेवला होता ही गोष्ट त्याला मुळीच आवडली नव्हती. किंबहुना कोणीही हात लावलेला त्याला खपायचं नाही. तिकडे स्वामींनी त्याचा हात धरून ठेवला होता आणि इथे हे लोक त्याचा खांदा निखळवून टाकायला बघत होते. कुठून या फंदात पडलो असं

त्याला वाटायला लागलं. या लोकांपासून दूर राहिलेलंच उत्तम! हाणामारीविषयीची खबर त्याच्याकडूनच स्वामींना समजली हे त्यांना कळायचाच अवकाश, त्याचा हात तोडून त्याच्याच हाती दिला असता हे नक्की. त्यामुळेच त्याने मोठ्या चलाखीने प्रकरण हाताळायचं ठरवलं. डोळे उघडमीट करत तो विचारात बुडला असतानाच जमलेल्या मंडळींनी पुन्हा त्याला डिवचलं, "अरे, तू काय सांगितलंस स्वामींना?"

"मी म्हणालो, पाऊस पडत नाहीये," चटकन सुचलं ते बोलून तो मोकळा झाला. हे ऐकून मंडळींनी त्याची पाठ थोपटली. "वा, वा, काय पण हुशारी दाखवलीस! ही गोष्ट स्वामींना माहितीच नव्हती. तू सांगितलंस ते बरं झालं," असं उपहासाने म्हणून सारे हसत सुटले. तोही कसनुसा हसला.

स्वामींचा निरोप आता त्याला आठवला. तो या लोकांना पोचवला नाही तर तो महान पुरुष आपल्याला शाप देईल या विचाराने तो घाबरला. अगदी सुरुवातीला सांगितली त्याच गोष्टीचा त्याने पुनरुच्चार केला, "सर्व काही ठीक होईपर्यंत त्यांना जेवण नको आहे." त्याच्या आवाजामधील गांभीर्य आणि ठामपणा जाणवून मंडळींनी त्याला विचारलं, "ते काय म्हणाले? नेमकं काय म्हणाले ते सांग."

क्षणभर विचार करून तो बोलू लागला, "माझ्यासाठी यापुढे जेवण आणायचं नाही असं तुझ्या भावाला सांग. मी खाणार नाही. मी जेवण बंद केल्यानंतर सर्व काही ठीक होईल..." सारेजण गोंधळून त्याच्याकडे पाहत राहिले. आपल्याला एवढं महत्त्व मिळतंय हे पाहून तोही खूष झाला. थोडा वेळ शांतता पसरली.

अखेर एकजण म्हणाला, "स्वामींसारखी महान हस्ती आपल्या मंगला गावात आहे ही फार मोठ्या सौभाग्याची गोष्ट आहे. ते इथे, आपल्यामध्ये असेपर्यंत काहीही दुर्घटना घडणार नाही. स्वामी महात्मा गांधींसारखे आहेत. महात्मा गांधींनी उपोषण केल्यानंतर भारतामध्ये कितीतरी चांगल्या गोष्टी घडल्या. स्वामींचंही तसंच आहे. त्यांनी अन्नत्याग केल्यानंतर पाऊस पडेल की

नाही बघा. आपल्या सर्वांच्या प्रेमापोटी ते हा त्याग करताहेत. आता निश्चित पाऊस पडेल. पूर्वी एकदा एका माणसाने एकवीस दिवस उपोषण केलं होतं. त्यानंतर मुसळधार पाऊस पडला होता. केवळ महान पुण्यात्मेच अशा तऱ्हेचे आत्मक्लेश करून घेतात...” हे शब्द ऐकताच वातावरण चैतन्यमय झालं. सारे हेवेदावे, आपापसामधील भांडणं, ताणतणाव मागे पडले.

सर्व गावात खळबळ माजली. या बातमीपुढे बाकी सर्वच तुच्छ वाटू लागलं. नदीकिनारी वाळूमध्ये एक मगर मरून पडलेली आढळल्याचं कोणीतरी सांगितलं. प्रखर ऊन आणि पाण्याचा अभाव या गोष्टींमुळे तिचा बळी पडला होता. नजीकच्या गावात तळ्याचं पाणी आटल्यामुळे शंभर वर्षांपूर्वी पाण्याखाली बुडालेल्या प्राचीन मंदिराचं दर्शन होतंय अशी बातमी दुसऱ्या कोणीतरी आणली. ‘गाभाऱ्यातील देवाची मूर्ती एवढी वर्षं पाण्याखाली राहूनदेखील अभंग टिकली आहे, इतकंच नव्हे, तर मंदिराभोवतीची नारळाची चार झाडंदेखील सुरक्षित आहेत...’ वगैरे वगैरे. तासागणिक नवनवीन तपशील येत होते. हेच आटलेलं तळं ओलांडून शेकडो लोकांच्या झुंडीच्या झुंडी मंदिराकडे लोटत होत्या. दलदलीत फसल्याने काही लोकांना प्राणही गमवावे लागले, पण त्यामुळे लोकांचा उत्साह कमी होत नव्हता. कसलीही पर्वा न करता जनसागर येतच होता. गिऱ्हाइकावर हल्ला करणाऱ्या दुकानदाराविषयीदेखील सहिष्णुतेची भावना दिसून येऊ लागली. ‘खरं पाहता त्यानेदेखील वाईट भाषा वापरायला नको होती. तो दुकानदाराला ‘रांडेच्या’ म्हणाला. हे चुकीचंच आहे’ असं जनमत तयार झालं.

‘तुमचे सगेसोयरे अर्थातच तुमच्या मदतीला धावून येणार. म्हणूनच तर नातीगोती पाळायची असतात...’ असा विचार करत असताना वेलन आणि अन्य जखमींना डोक्यावर पडलेल्या खोकींची, अंगभर उठलेल्या वळांची आठवण आली. मोठ्या मनाने क्षमा वगैरे ठीक आहे, पण त्यालाही मर्यादा आहेच, असं या मार खाल्लेल्या मंडळींना वाटायला लागलं. ‘प्रतिस्पर्ध्यांनादेखील आपण व्यवस्थित चोपून काढलंय’ हीच एक गोष्ट त्यांना दिलासा देत होती. अखेर ‘हे प्रकरण विसरून गेलेलं हिताचं आहे’ असं सर्वानुमते ठरलं. त्यासाठी तिसऱ्या

व्यक्तीने मध्यस्थी करावी, तसंच ‘त्या’ लोकांनी आमच्या गवताच्या गंजी जाळल्या त्याची नुकसानभरपाई, शिवाय गावच्या प्रतिष्ठित नागरिकांना मेजवानी द्यावी असाही ठराव झाला. पुढचा काही वेळ शांतता प्रस्थापित करण्यासाठी कोणत्या गोष्टींचं पालन करावं याविषयी विचारविनिमय झाला. अखेर ‘सर्वांचे तारणहार’ स्वामींपुढे नतमस्तक होऊन त्यांना वंदन करण्यासाठी मंडळी उठली.

इकडे राजू नेहमीप्रमाणे जेवण आणि इतर भेटवस्तू कधी येतात याची वाट पाहत होता. तशी फळं आणि अन्य काही खाण्याचे पदार्थ अजूनही शिल्लक होते, पण त्यांनी वेगळं काहीतरी आणावं अशी त्याची इच्छा होती. आपल्यासाठी गव्हाचं, तांदळाचं पीठ, मसाले आणावेत असं त्याने सुचवलंही होतं. तेच ते खाऊन कंटाळल्यामुळे नवीन काहीतरी बनवावं अशी इच्छा व्हायची. नेमकं काय काय हवंय हे सांगताना फार चतुराई दाखवावी लागे. वेलनला एका बाजूला घेऊन तो सुरुवात करायचा, “असं बघ, थोडंसं तांदळाचं पीठ, मिरची पावडर आणि बाकीच्या काही वस्तू मिळाल्या तर बरं पडेल. काहीतरी वेगळं बनवता येईल. दर बुधवारी तांदळाचं पीठ आणि अमुकअमुक मसाले घालून बनवलेलं अन्न ग्रहण करायचं असं आपलं व्रतच आहे,” असं तो मोठ्या गांभीर्याने सांगायचा. श्रोतेगण हे ऐकून प्रभावित व्हायचे. तशा प्रकारचं अन्नग्रहण ही त्यांची आध्यात्मिक गरज आहे; अंतरात्मा पवित्र राहावा तसंच परमेश्वराशी तादात्म्य पावता यावं यासाठी मानसिक अनुशासन बाळगावं लागतं, त्यासाठी स्वामींना बुधवारी विशिष्ट प्रकारचं अन्नग्रहण करण्याची आवश्यकता असते हे साऱ्यांना पटायचं. अलीकडे त्याला बोंडा खावासा वाटायचा. स्टेशनवर एक माणूस खाद्यपदार्थ विकायला येत असे. राजू त्याच्याकडला बोंडा खायचा. पीठ, बटाटा, कांदा, कोथिंबीर आणि हिरवी मिरची - वा, काय चमचमीत चव होती...बोंडे कोणत्याही साधारण तेलात तळलेले असणार हे खरं असलं तरी मस्त लागायचे. स्वस्तात मिळालं तर बोंडे केरोसिनमध्येही तळले असते त्या विक्रेत्याने! राजूला त्याच्याकडले बोंडे अतिशय आवडायचे. ‘कसे बनवतोस’ असं

विचारल्यानंतर त्याने संपूर्ण कृती सांगितली होती, 'आल्याचा छोटासा तुकडा घ्यायचा, नंतर...' वगैरे वगैरे. एकदा भगवद्गीतेवर प्रवचन देत असताना राजूला अचानक बोंडे खायची प्रचंड इच्छा झाली. कोळशाची शेगडी आणि कढई त्याच्याकडे होतीच. उकळत्या तेलामध्ये बोंड्याच्या मिश्रणाचे गोळे सोडताना होणारा चुर्र आवाज किती कर्णमधुर असेल या कल्पनेनेच राजूच्या तोंडाला पाणी सुटलं. अत्यंत हुशारीने त्याने बोंड्यासाठी लागणाऱ्या वस्तूंची यादी वेलनच्या कानी घातली.

बांधाच्या पलीकडून लोकांचे आवाज ऐकू आले तेव्हा राजूने सुटकेचा नि:श्वास सोडला. तत्काळ चेहऱ्यावर स्वामीच्या भूमिकेला साजेसे भाव आणून, डोक्यावरचे आणि दाढीचे केस ठीकठाक केले आणि पुस्तक घेऊन तो नेहमीच्या आसनावर स्थानापन्न झाला. आवाज जवळ आले तशी त्याने नजर उचलून पाहिलं. नेहमीपेक्षा बरेच जास्त लोक नदीचं पात्र ओलांडून येताना दिसत होते. क्षणभर तो गोंधळला, पण 'बहुधा आपण मारामारी थांबवली या आनंदात मंडळी आपल्याला भेटायला आली असावीत' असा विचार त्याच्या मनामध्ये आला. आपल्यामुळे गावात शांतता प्रस्थापित झाली या कल्पनेने त्याला फारच समाधान वाटलं. वेलनचा तो अर्धवट भाऊ वाटतो तेवढा बेअक्कल नाही तर! त्यांनी पीठ वगैरे सामान आणलं असावं अशी आशा त्याला वाटली, पण लगेचच तसं विचारणं बरं दिसलं नसतं. स्वयंपाकघरात ठेवून जातीलच...

मंदिराच्या नजीक आल्यावर गावकऱ्यांचा आवाज कमी झाला. पावलं हलकी पडायला लागली. उदात्त वातावरणाच्या प्रभावामुळे सोबत आलेली पोरंटोरंही शांत झाली.

गाभाऱ्यामध्ये मंडळी नेहमीप्रमाणे त्याच्यासमोर कोंडाळं करून बसली - शांतपणे. बायका लगबगीने कामाला लागल्या - झाडलोट, पणत्यांमध्ये तेल भरणं. राजू कोणाकडेही न पाहता, न बोलता पुस्तक वाचत राहिला. वेलनला कितपत दुखापत झालीय हे जाणण्याची उत्सुकता असल्याने त्याने त्याच्याकडे एक चोरटा कटाक्ष टाकला. वेलनच्या कपाळावर जखमा दिसत

होत्या हे खरं. राजूने झरकन सर्वांकडे नजर फिरवली. वाटलं होतं त्या मानाने दुखापती किरकोळच दिसत होत्या. पुन्हा एकदा त्याने पुस्तकात तोंड खुपसलं. अखेर दहा मिनिटं वाचन झाल्यावर स्वामींनी सभागृहात नजर टाकली. आपल्या भक्तगणांकडे कृपाकटाक्ष टाकून त्याने वेलनवर लक्ष केंद्रित केलं आणि म्हणाला, "भगवान श्रीकृष्ण म्हणाले..." पुस्तकाचं पान दिव्याच्या प्रकाशाखाली धरून त्याने एक उतारा वाचून दाखवला. "याचा अर्थ काय हे समजलं का तुम्हाला?" असं म्हणून त्याने तत्त्वज्ञानप्रचुर प्रवचनच दिलं. त्यामध्ये अनेकविध विषयांवर - चांगल्या दर्जाच्या अन्नग्रहणापासून परमेश्वराच्या चांगुलपणावर संपूर्ण श्रद्धा ठेवणं वगैरे - त्याने मतप्रदर्शन केलं.

श्रोतेगण शांत चित्ताने त्याचं भाषण ऐकत होते. जवळजवळ एक तासानंतर तो श्वास घ्यायला थबकला तेव्हा वेलन संधी साधून म्हणाला, "आपल्या प्रार्थनांना नक्कीच यश मिळेल आणि आमच्या गावाचं रक्षण होईल याविषयी तिळमात्र शंका नाही. या प्रसंगामधून आपण तावून-सुलाखून बाहेर पडावं यासाठी आम्ही सारेच दिवसरात्र प्रार्थना करू."

हे ऐकून राजू बुचकळ्यात पडला. अशा तऱ्हेचं शाब्दिक अवडंबर माजवणं, अलंकारिक भाषा वापरण्याची या लोकांना सवयच आहे. हाणामारीपासून परावृत्त केल्याबद्दल ते आपले आभार मानत असावेत असं त्याला वाटलं. आता सारेच त्याची वाहवा करायला लागल्यामुळे एकच गोंधळ उडाला. अचानक एक बाई राजूच्या पाया पडली. तिचं पाहून दुसरीही आली. "कधीही माझ्या पाया पडायचं नाही असं सांगितलंय ना तुम्हाला?" राजू ओरडला. "एका माणसाने दुसऱ्या माणसाचे पाय पकडायचं काय कारण?"

दोघं-तिघं त्याच्याजवळ आले. त्यांच्यापैकी एकजण म्हणाला, "पण आपण सामान्य माणूस नाही. आपण 'महात्मा' आहात. आपल्या चरणांची धूळ आमच्या मस्तकी लागते हे आम्हा पामरांचं परमभाग्य समजतो..."

"छे, छे, असं काही बोलू नका..." त्यांना झटकून टाकत राजूने पाय मागे घेतले. पण तिकडे दुर्लक्ष करून सर्वांनी त्याला घेराव घातला. त्यांचा इरादा जाणून राजूने पाय झाकून घेतले. लहान मुलांसारखी लपवाछपवी खेळताना त्याला फारच चमत्कारिक वाटत होतं, पण इलाज नव्हता. पाया पडायचंच असा निश्चय करून सारेजण त्याचे पाय शोधण्यासाठी चाचपून पाहत होते. गुदगुल्या करायलाही ते मागेपुढे पाहणार नाहीत अशी राजूला भीती वाटायला लागली. अखेर नाइलाज होऊन त्याने पराभव मान्य केला. पाया पडून त्याला एकदाचा नमस्कार केला तेव्हाच मंडळी संतोष पावली. त्यानंतरही घरी जायची लक्षणं दिसत नव्हती. त्याच्या चेहऱ्यावर खिळलेल्या नजरांमध्ये एक आगळी भावना दिसून येत होती. वातावरण नेहमीपेक्षा जास्तच गंभीर वाटत होतं.

अखेर वेलनने बोलायला सुरुवात केली, "आपण जो त्याग करीत आहात त्याची तुलना साक्षात महात्मा गांधींबरोबर होऊ शकेल. आमचा उद्धार करण्यासाठी त्यांनी तुमच्या रूपाने आपला अनुयायी पाठवला आहे असं आम्हाला वाटतंय..." नंतर सारेच जण कुवतीनुसार, जमेल तसे ते राजूचे आभार मानायला लागले. एकाच वेळी बोलल्यामुळे काहीच समजत नव्हतं. अनेकदा पुढे काय बोलावं हे न समजल्यामुळे वाक्यं अर्धवट सुटत होती. पण त्यामागील भावना राजूपर्यंत पोचत होत्या. शाब्दिक अवडंबरामधून कृतज्ञतेची भावना ओथंबून वाहत होती. गावरान भाषा असली तरी तीमधून व्यक्त होणारा त्याच्याविषयीचा भक्तिभाव वादातीत होता. त्यांचं आपल्यावरील पराकोटीचं प्रेम पाहून 'ते आपल्या पाया पडताहेत यात गैर काही नाही' असंही राजूला वाटायला लागलं! इतकंच नव्हे, तर वाकून स्वत:च्याच पाया पडावं, चरणधूळ डोळ्यांना लावावी असाही विचार त्याच्या मनामध्ये चमकून गेला. आपलं व्यक्तिमत्त्व अत्यंत तेजोमय आहे असाही भास होऊ लागला...मंडळींना आज जाण्याची घाई नव्हती. तिथेच मोठ्या लीनपणे सारे बसून होते.

त्याचा आज उपवास आहे असं वेलनने गृहित धरलेलं दिसतंय, म्हणूनच अनेक महिन्यांचा परिपाठ मोडून त्याने जेवण आणलं नव्हतं. एका अर्थी बरंच झालं. सर्वजण त्याच्या उपासाला एवढं महत्त्व देत असताना 'बोंडा बनवायचं साहित्य कुठे आहे?' असं विचारणं बरं दिसलं नसतं! बोंड्याचं नंतर बघता येईल. मारामारी थांबावी म्हणून स्वामी उपास करताहेत अशीच सर्वांनी समजूत करून घेतली होती. 'दिवसभरात मी दोन वेळा भरपेट खाल्लंय' असं सांगणं विचित्र दिसलं असतं. त्यामुळे ती गोष्ट गुप्त ठेवायची असं राजूने मोठ्या मुत्सद्दीपणे ठरवलं. झोप आली तरी 'उपासामुळे अशक्तपणा आला आहे' अशी लोकांची समजूत होईल असा त्याला विश्वास होता. पण आता ते जात का नाहीत? इथेच ठिय्या मारून का बसलेत? राजूने खुणेने वेलनला जवळ बोलावलं. "खूप रात्र झालीय. बायका-पोरांना घरी जायला सांग," तो म्हणाला.

अखेर मध्यरात्रीच्या सुमारास त्याचे भक्तगण घरी गेले. वेलन मात्र अजूनही खांबाला टेकून बसून होता. "तुला झोप आली नाही का?" राजूने विचारलं.

"नाही स्वामी, आपण आमच्यासाठी जे काही करताय त्यापुढे थोडंसं जागरण केलं तर काय झालं?"

'माझ्या उपोषणाला फारसं महत्त्व द्यायची गरज नाही. माझं कर्तव्यच आहे ते. तू घरी गेलास तरी चालेल.'

'नको महाराज. गावचा मुखिया पहाटे पाच वाजता येणार आहे. तो आला की मगच मी जाईन. तो दुपारपर्यंत थांबेल. मी घरी जाऊन थोडीफार कामं उरकून परत येईन.' वेलन म्हणाला.

"अरे, माझ्याजवळ सतत कोणीतरी असायलाच पाहिजे असं नाही. मी ठीक आहे."

"स्वामी, ते आमच्यावर सोडलेत तर उपकार होतील. आम्ही आमची कर्तव्यं पार पाडतोय. आपण महान त्याग करताहात. आपल्या सोबत राहणं एवढंच आमच्या हातात आहे. त्यापासून

तेवढं आम्हाला वंचित करू नका. आपला तेजस्वी चेहरा पाहून आम्हाला समाधान मिळतं...” वेलन भावुकतेने म्हणाला.

राजूलाही हे ऐकून भरून आलं. पण या प्रकरणाला पूर्णविराम द्यायची वेळ आली आहे असं त्याला वाटत होतं. तो वेलनला म्हणाला, “तू म्हणतोस ते बरोबर आहे. त्यागी व्यक्तीची सेवा केल्याने पुण्य मिळतं असं आपल्या पवित्र ग्रंथांमध्ये म्हटलेलंच आहे. माझ्या त्यागामुळे तुम्हा सर्वांमधील वैरभावना नष्ट झाली, माझ्या प्रयत्नांना यश आलं याबद्दल मी परमेश्वराचे आभार मानतो. तुमच्या हाणामाऱ्या हीच माझी मोठी चिंता होती. आता सर्व काही ठीक झालंय. तू घरी जायला हरकत नाही. उद्या मी नेहमीसारखा जेवीन म्हणजे मलाही बरं वाटेल. तांदळाचं पीठ, हिरवी मिरची आणायला विसरू नकोस. तसंच...”

हे ऐकून वेलनला आश्चर्याचा धक्का बसला, पण स्वामींविषयी आदर वाटत असल्याने तो काही बोलू शकला नाही. तरीही अखेर त्याने विचारलंच, “महाराज, याचा अर्थ उद्या पाऊस पडेल असं वाटतंय का आपल्याला?”

“असं बघ...” एवढं बोलून राजूने क्षणभर विचार केला. हा पावसाचा विषय मध्येच कुठून आला, हे त्याला कळेना. अखेर तो म्हणाला, “ते कसं सांगणार? सारं काही देवाच्या मर्जीवर अवलंबून आहे. कदाचित पडेलही.” आता मात्र काहीतरी गोंधळ आहे हे वेलनच्या लक्षात आलं. राजूच्या निकट येऊन त्याने आपल्या भावाने काय निरोप आणला आणि त्याचा गावकऱ्यांवर कसा परिणाम झाला ते सर्व सविस्तर सांगितलं. इतकंच नाही, तर पावसासाठी उपोषण करणाऱ्या ‘पालनहार’ व्यक्तीने (अर्थात राजूने) काय करणं अपेक्षित असतं, तेही त्याने तपशीलवार सांगितलं - म्हणजे गुडघाभर पाण्यात उभं राहणं, वरती आकाशाकडे पाहत राहणं, दोन आठवडे कडक उपवास करून सतत मंत्रपठण करणं - आणि असं सर्व करणाऱ्या व्यक्तीचं मन जर खरोखरीच निर्मळ, पवित्र असेल तर पाऊस हमखास पडतोच, वगैरे. असं सर्व सांगून

वेलनने राजूला हेसुद्धा स्पष्ट केलं की, त्याच्यासारख्या महात्म्याने असं व्रत पाळण्याचं ठरवल्याने पंचप्रोशीतील सर्व जनता आनंदून गेली आहे.

हे बोलताना वेलनचा आवाज अत्यंत भावुक झाला. त्यामागील कळकळ जाणवून राजूचे डेळे भरून आले. काही दिवसांपूर्वी राजूनेच अशा प्रकारचं 'प्रायश्चित्त, व्रत त्याचं महत्त्व आणि ते घेण्याची रीत' या विषयावर एक व्याख्यान गावकऱ्यांपुढे झोडलं होतं. गंमत म्हणजे थोडी माहिती आईकडून मिळाली असली तरी बाकी राजूच्या कल्पनाशक्तीचा खेळ होता. असं प्रायश्चित्त घेण्याची परंपरा फार जुनी आहे असं आई म्हणायची. राजूने बरेच तपशील जोडून एका प्रवचनाएवढी बेगमी जमा केलेली होती आणि त्यावर एका संध्याकाळचं प्रवचन निभवून नेलं होतं. शिवाय दुष्काळी परिस्थितीपासून चिंताग्रस्त श्रोतृगणाचं लक्ष हटवण्यासाठीही 'प्रायश्चित्त' हा विषय फारच उपयुक्त ठरला. 'योग्य वेळ येताच सारं काही व्यवस्थित होईल. पाऊस आणणारा भला माणूसही अचानक प्रकट होईल आणि सारी चिंता मिटेल,' त्याने आश्वासक शब्दात तेव्हा श्रोत्यांना धीर दिला होता. गावकऱ्यांनी त्या शब्दांचा संदर्भ सद्य परिस्थितीशी जुळवून घेतला होता - पाऊस आणणारा भला माणूस खुद्द राजू अर्थात स्वामी आहेत असं ते समजत होते. हा सर्व गोंधळ आपणच ओढवून घेतलाय आणि त्यातून सहीसलामत बाहेर पडणं अत्यंत कठीण दिसतंय याची जाणीव राजूला झाली. पण 'हा समजुतीचा घोटाळा आहे' असं सांगणंही शक्य नव्हतं. आत्तापर्यंत आपण सारंच हसण्यावारी नेलं, कोणतीही गोष्ट गांभीर्याने घेतली नाही, पण आता सारं बदलायला हवं, आपल्या शब्दांचं मोल कमी करून चालणार नाही. सर्व प्रकरणाचा गंभीरपणे विचार करायला हवा. त्यासाठी राजूला थोडा अवधी आणि एकांताची गरज होती. 'सर्वप्रथम माझ्या या उच्चासनावरून खाली उतरायला हवं' असा विचार करून राजू खाली उतरला. तो बसायचा त्या स्थानाला एक वलय प्राप्त झालं होतं. जनमानसात त्याविषयी आदर आणि श्रद्धा होती. त्यावर स्थानापन्न होणाऱ्या 'स्वामीजीं'ना कोणीही सामान्य माणूस मानत नाही ही तर पक्की गोष्ट होती. जनमानसामध्ये आपली किती महान प्रतिमा निर्माण झाली आहे, याची राजूला आता लख्ख जाणीव झाली.

स्वत:सारख्या अतिसामान्य व्यक्तीला उच्चपदी विराजमान करण्यात राजू यशस्वी ठरला होता. तो ज्यावर बसत असे त्या खडकाला अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झालं होतं. राजूला कोंडीत पकडल्यासारखं वाटू लागलं. गांधीलमाशी डसावी तसा तो ताडकन आपल्या दगडी सिंहासनावरून उठला. त्याचा एकूण आविर्भाव पाहून वेलनची बोबडी वळली. राजू कमालीच्या गांभीर्याने हलक्या आवाजात वेलनला म्हणाला, "वेलन, मी सांगतोय ते नीट ऐक." राजूच्या स्वरामधील भीती आणि आर्जव ऐकून वेलन पुतळ्यासारखा स्तब्ध होऊन ऐकत होता. "वेलन, आजची रात्र तू ये. तेव्हाच तुझ्याशी सविस्तर बोलेन. तोपर्यंत तू किंवा अन्य कोणीही इथे यायचं नाही."

साराच प्रकार इतका रहस्यमय आणि प्रभावशाली होता की वेलन काहीही प्रतिवाद न करता उठला. "स्वामी, उद्या रात्री मी येऊ ना? एकटा?" त्याने विचारलं.

"हो, हो. फक्त एकट्याने यायचं."

"ठीक आहे, स्वामी. 'असं का' वगैरे प्रश्न आम्ही पामर कसे विचारणार? आपण सर्व जाणताच. उद्या मोठ्या संख्येने लोक येतील. पण त्यांना अडवून परत पाठवण्यासाठी नदीकिनारी काही जणांना उभं करतो. कठीण होईल, पण आपली आज्ञा शिरसावंद्य." वेलनने नतमस्तक होऊन स्वामींना वंदन केलं आणि घरी निघाला. राजू काही काळ वेलनच्या परतणाऱ्या आकृतीकडे पाहत राहिला. पूर्ण दिवस बसून राहिल्यामुळे त्याचं सर्व अंग ठणकत होतं. दिवसभर काही ना काही घडत होतं, त्यामुळेही तो थकून गेला होता. आतल्या खोलीत - हे त्याचं शयनगृह - जाऊन तो आडवा झाला. वटवाघळांची फडफड, दूरवरून गावाकडून येणारे आवाज आणि काळोखी खोली. सावकाशपणे शांतता पसरली. राजूने झोपायचा प्रयत्न केला, पण त्याच्या मनामध्ये प्रचंड खळबळ माजली होती. आपण केवढ्या संकटांमध्ये सापडलो आहोत या विचारांनी तो वारंवार दचकून जागा होत होता.

'मी पंधरा दिवस उपोषण करून रोज गुडघ्याएवढ्या पाण्यात आठ तास उभं राहून तपश्चर्या करावी अशी सर्वांची अपेक्षा आहे की काय?' या विचाराने तो ताडकन उठून बसला. आपणच हे खूळ त्यांच्या डोक्यात भरवलं हे आठवून त्याला दु:ख झालं. सांगायला आणि ऐकायला ती कल्पना चांगली असली तरी प्रकरण आपल्याच अंगावर शेकेल हे माहीत असतं तर त्याने सर्वस्वी वेगळा उपाय सुचवला असता, उदाहरणार्थ - 'आसमंतातील सर्व गावातील रहिवाशांनी पंधरा दिवस सतत, कोणत्याही अडथळ्याविना त्या महान व्यक्तीला बोंडा खायला घालावा. तो नदीच्या पाण्यात रोज दोन मिनिटं उभा राहील. असं केल्याने कधी ना कधी पाऊस पडेलच!' त्याची आई तर नेहमीच म्हणायची, 'संत माणसाच्या पुण्याईने पाऊस नक्की पडेलच, मग तो कुठेही असेना.' एका तामीळ काव्यामधून ती हे वचन उद्धृत करत असे. 'इथून पळ काढणं हा सर्वांत उत्तम तोडगा ठरेल,' असा विचार राजूच्या मनात चमकला. नदी पार करून पलीकडे जायचं, तिथून एखादी बस पकडून शहरात जावं असे विचार त्याच्या मनात घोळू लागले. एवढ्या मोठ्या शहरात त्याच्याकडे कोणी लक्ष देणार नाही, 'आणखी एक दाढीवाला साधू' एवढं म्हणून सोडून देतील याची त्याला खात्री होती. वेलन आणि बाकी सारे शोधाशोध करतील आणि अखेर तो हिमालयात निघून गेला असं म्हणून गप्प बसतील...पण पलायनाचा बेत अमलात कसा आणायचा? कुठपर्यंत जाता येईल? अर्ध्या तासात कोणा ना कोणालातरी आपण दिसूच... मग काय? आपला निर्णय फारसा व्यवहार्य नाही याची राजूला जाणीव झाली. आजपर्यंत आपली पूजा करणारी ही मंडळी आपल्याला फरफटत परत आणतील; त्यांना फसवलं, मूर्ख बनवलं म्हणून शिक्षा करायला मागेपुढे पाहणार नाहीत हे नक्की. पण राजूला या गोष्टीची भीती नव्हतीच. पळण्यात यशस्वी होईन याविषयी थोडीशीही खात्री असती तर त्याने तो धोकादेखील पत्करला असता. अतीव श्रद्धेने त्याच्या पायांवर डोकं टेकणाऱ्या बायाबापड्या आणि लहानग्या मुलांचं चित्र त्याच्या नजरेसमोर आल्यामुळे त्याचा पाय निघेना. अखेर पलायनाचा बेत रद्द करून त्याने चूल पेटवली, अन्न शिजवलं. नदीच्या पाण्याने स्नान केलं (वाळू उपसून बनवलेला खड्डा पाण्याने भरायला पाच मिनिटं थांबायला लागलं) आणि अक्षरश:

वाघ मागे लागल्याप्रमाणे जेवून घेतलं. चुकून जरी कोणी इथे फिरकलंच तर स्वामीजी जेवताहेत हे भांडं फुटायला नको! त्याने रात्रीसाठी थोडं अन्न लपवून ठेवलं. पण असं रोज कसं शक्य आहे? निदान रात्री त्याच्या भक्तगणांनी त्याला एकटं सोडलं तर जेवणाची काहीतरी व्यवस्था करता येईल, अन्यथा पंधरा दिवस उपोषण करण्याचं संकट टाळणं अशक्यप्राय ठरेल. गुडघ्याएवढ्या पाण्यात (तेवढं पाणी मिळालं तर) उभं राहून प्रार्थना करणं कसंबसं का होईना जमवता येईल. (शिवाय प्रार्थनाच म्हणायला हव्यात असं नाही, काहीही पुटपुटत मनोरंजन करता येईल!) पाय दुखतील, वळ येतील, पण काही दिवस सहन करीन. पर्जन्य ऋतू असल्याने पाऊस पडणार यात शंका नाही, वेळापत्रक थोडं पुढे-मागे होईल इतकंच. उपोषणाबाबत या भोळ्याभाबड्या लोकांची शक्यतो पूर्णपणे फसवणूक करायची नाही, असं राजूने ठरवलं.

सांगितल्यानुसार रात्री वेलन आलाच. राजूने त्याला विश्वासात घेऊन विचारलं, “वेलन, तू मला मित्रासारखा आहेस. मी काय म्हणतोय ते नीट ऐक. मी पाऊस पाडू शकेन असं तुम्हाला का वाटतंय?”

“तो पोरगाच म्हणाला. आपणच त्याला तसं सांगितलं ना?”

राजू घुटमळला. वास्तविक पाहता समजुतीचा हा घोटाळा सुधारण्याची सुसंधी त्याच्यापुढे चालून आली होती.

खरं काय ते सांगून त्याला सुटका करून घेता आली असती, पण सत्याचा सामना करण्याचा त्याचा स्वभावच नव्हता. आत्ताही त्याचा डळमळीत स्वभाव प्रभावी ठरला. तो अडखळत म्हणाला, “मी तुझ्याकडून स्पष्टीकरण मागतोय असं समजू नकोस. पण मी असं करणार आहे असं तुम्हा लोकांना का वाटतंय?”

वेलनही हे ऐकून पुरता गोंधळून गेला. स्वामीजी असं का बोलताहेत, त्यांच्या बोलण्याचा अर्थ काय, त्याला समजेना. पण त्यामागेही काहीतरी उदात्त हेतू असणार याबद्दल त्याला शंका

नव्हती. त्यांच्या प्रश्नाचं उत्तर मात्र त्याला माहीत नव्हतं. अखेर तो म्हणाला, "मग आम्ही दुसरं काय करावं?"

"इथे माझ्याजवळ येऊन बस. मी सांगतो ते नीट लक्ष देऊन ऐक. मी तुम्हा लोकांसाठी उपोषण करीन, या देशाच्या भल्यासाठी काय वाट्टेल ते करीन. पण वेलन, संत-महात्म्यालाच ते जमेल. परमेश्वर त्यांची प्रार्थना ऐकेल. मी कोणी संत नाही. मी एक सर्वसामान्य माणूस आहे." वेलन त्याचं बोलणं ऐकून घ्यायलाच तयार होईना. त्याच्या श्रद्धेला अशी ठेच पोचवताना राजूला अतिशय वाईट वाटलं. पण त्याचाही नाइलाज होता. उपोषण, प्रायश्चित्त या संकटांमधून वाचायचं तर थोडं कठोर होणं भागच होतं. रात्र झाली होती. गारवा जाणवायला लागला. राजू वेलनला घेऊन घाटाच्या पायऱ्यांवर - वेलन अर्थातच एक पायरी खाली - बसला. राजू खाली उतरून त्याच्या शेजारी बसला. "वेलन, मी सांगतोय ते अतिशय लक्षपूर्वक ऐक. दूर जाऊ नकोस. मी महात्मा, संत वगैरे नाहीये, वेलन. तुम्हा सर्वांप्रमाणे मीदेखील एक साधा, सर्वसामान्य माणूस आहे. माझी जीवनकहाणी ऐकल्यानंतर तुलाही ते पटेल..." नदीचं पाणी अति संथपणे वाहत होतं. पिंपळाच्या सुकलेल्या पानांचा सळसळ आवाज येत होता. दूरवरून कोल्हेकुई ऐकू आली. राजूने बोलायला सुरुवात केली. कोणतीही प्रतिप्रिया न देता, जराही आश्चर्य न दाखवता वेलन स्तब्धपणे ऐकत होता. चेहऱ्यावर विनम्र, गंभीर भाव होते आणि थोडीशी चिंतादेखील...

# ७

मार्कोने कुटुंबाचाच एक भाग असल्याप्रमाणे मला सामावून घेतलं होतं. सर्वांचा गाइड असलेला राजू एकट्या मार्कोचा राखीव गाइड कधी झाला समजलंही नाही. प्राचीन गोष्टी, वास्तू यांचा शोध, अभ्यास, नोंद वगैरे गोष्टींमध्ये तज्ञ असलेल्या मार्कोला व्यवहारज्ञान मात्र शून्य होतं. त्याच्या ध्यानीमनी सतत पुरातन गोष्टी घोळत. बाकी साध्या गोष्टींमुळेदेखील तो कमालीचा गोंधळून जाई. उदाहरणार्थ, कुठे खायचं, कुठे राहायचं असे सोपे निर्णय घेणं त्याला भयंकर कठीण वाटायचं. साधं गाडीचं तिकीट काढणंही त्याला संकट वाटे. असे रोजच्या जीवनातील व्यवहार सांभाळण्यासाठी बहुधा त्याने लग्न केलं असावं. पण दुर्दैवाने त्याची निवड चुकली. त्याची पत्नी स्वत:च स्वप्नांच्या दुनियेत रमलेली असे. तिची नक्की काय स्वप्नं आहेत वा नाहीत हे तिला माहीतही नसेल, पण ती तिच्या दुनियेत रमलेली असे. कला क्षेत्रात तिची काही कारकीर्द घडेल या दृष्टीने तिची काळजी करणारा नवरा तिला भेटला असता, तर खरंतर तिचा खूप मोठा फायदा झाला असता; आणि नेमका इथेच माझ्यासारखा हरहुन्नरी माणूस कामी आला. माझी बाकीची सारी कामं बाजूला सारून मी त्या दोघांच्या सेवेसी सादर झालो.

'पीक हाऊस'मध्ये त्याचा मुक्काम महिनाभर होता. त्या सर्व काळात मी त्यांचे सर्व व्यवहार सांभाळत होतो. सढळहस्ते खर्च करायची मुभा होती, फक्त प्रत्येक गोष्टीची पावती त्याला दाखवावी लागे! पीक हाऊसमध्ये राहत असला तरी त्याने हॉटेलमधली खोली सोडली नव्हती. गफूरची टॅक्सी कायम दिमतीला असे. जणूकाही ती मार्कोच्या मालकीचीच झाली होती. रोज पीक हाऊस ते शहर अशी निदान एक फेरी तरी व्हायचीच. जोसेफ मार्कोची सर्वतोपरी काळजी घ्यायचा त्यामुळे अन्य कोणाची गरज नव्हतीच. मार्को आणि त्याच्या पत्नीसाठी मी जास्तीत जास्त वेळ द्यावा असं अपेक्षित होतं. त्याच वेळी मी अन्य कामंही करायला त्याची हरकत नव्हती. मार्को मला पूर्ण दिवसाचे पैसे द्यायचा. माझी 'अन्य कामं' रोझीला सोबत देणं

आणि तिचं मनोरंजन करणं ही होती! दोन दिवसांतून एकदा ती नवऱ्याला भेटायला पीक हाऊसवर जायची. त्याच्याविषयी अंमळ जास्तच कळकळ दाखवायची ती. त्याच्या अवतीभोवती नाचायची. त्याला मात्र त्याचं सोयरसुतक नसायचं. त्याचं टेबल कागदांचे कपटे, नोंदी वगैरेंनी खचाखच भरलेलं असायचं. तो म्हणायचा, "रोझी, माझ्या टेबलापासून लांब राहा. जेमतेम सर्व व्यवस्थित लावत आणलंय. तू ढवळाढवळ करू नकोस." तो नेमकं काय करतोय हे मला माहीत नव्हतं आणि माहीत करून घेण्याची इच्छाही नव्हती. तो कोणत्या कामामध्ये कायम बुडालेला असतो हे जाणून घ्यायची त्याच्या बायकोलाही फिकीर दिसली नाही. 'जेवण कसं असतं?' असले प्रश्न ती विचारायची. आम्हा दोघांची जवळीक वाढल्यानंतर तिने त्याच्याशी वागण्याचं एक नवीन धोरण आखलं होतं. त्याची खोली नीट लावणं, जोसेफला त्याच्या खाण्यापिण्याविषयी सूचना देणं वगैरे कामं करून ती कर्तव्यदक्ष पत्नीची भूमिका निभावत असे. "आज इथेच राहते. तुला सोबत होईल," कधीमधी ती असं म्हणायची तेव्हा कामात गर्प असलेला मार्को आपल्या तंद्रीत उत्तर द्यायचा, "ठीक आहे...तुझी इच्छा असेल तर...राजू, तू इथे राहणार की परत जाणार?"

खाली गावामध्ये ती संपूर्णपणे माझीच असते हे लक्षात घेऊन मी तिथे राहण्याची ऊर्मी दाबून टाकत असे. तिला त्याच्याबरोबर एकांत मिळावा हेच ठीक. मी त्याची नजर चुकवत म्हणायचो, "मला परत जायला हवं. दुसरे पर्यटक येणार आहेत. तुमची हरकत नाही ना?"

"अजिबात नाही. तुझं कामच आहे ते. मी तुझ्यावर मक्ता गाजवणार नाही. जा तू."

"उद्या किती वाजता गाडी हवी आहे?"

त्याने पत्नीकडे पाहिलं. "उद्या, शक्य तितक्या लवकर," ती म्हणाली.

"थोडे कार्बन पेपर हवे आहेत," मार्को म्हणाला.

परतीच्या प्रवासात गाडी वेगाने घाट उतरत होती. गफूर आरशामधून माझ्याकडे कटाक्ष टाकत होता. अलीकडे मी गफूरशी बोलणं टाळायचोच. त्याला गावगप्पांमध्ये फार रस असे. मला ते आवडायचं नाही. शिवाय माझ्या आत्ताच्या एकूण परिस्थितीमुळे कोणतीही चर्चा चालू करायला मी घाबरायचो. गफूर टॅक्सी, गाडी वगैरेवर बोललेला मला चाललं असतं, पण त्याच्या बोलण्याला कसलाही ताळतंत्र नसे. बोलता बोलता त्याची गाडी दुसऱ्या विषयावर कधी घसरेल सांगता यायचं नाही. आजही तेच झालं. "ब्रेक दुरुस्त करायचेत. उद्या एक तास तरी लागेल त्यासाठी. काही झालं तरी अखेर यंत्र आहे. कधी ना कधी बिघडणारच. तरीही हायड्रॉलिक ब्रेकपेक्षा हे ब्रेक चांगले. जुनं ते सोनं. आजच्या आधुनिक, फटाकड्या मुलींपेक्षा साधीसुधी, अडाणी बायको हजार पटीने चांगली...तसंच आहे हे. ओहोहो...काय या आजकालच्या पोरी... फारच बिनधास्त असतात! उद्या मला वर हिलस्टेशनवर जरी राहावं लागलं तरी मी बायकोला एकटीला हॉटेलमध्ये राहू देणार नाही. असं भलतं-सलतं मला चालणार नाही..." गफूरची गाडी सुसाट चालू झाली.

विषय कोणत्या दिशेला चाललाय हे लक्षात आल्याने मी अस्वस्थ झालो. मोठ्या हुशारीने मी चर्चा दुसरीकडे वळवली.

"गाड्या बनवणाऱ्यांपेक्षा तुला जास्त अक्कल आणि अनुभव आहे असं तुला म्हणायचंय का?"

"नक्कीच! त्यांना जास्त समजतं असं तुला वाटतं की काय? रोज धक्के मारून माझी गाडी चालू करतो मी. त्यामुळे माझं ज्ञान नक्कीच..." मला हुश्श झालं. रोझीचा विषय टाळून दुसऱ्या विषयाकडे त्याला 'वळवणं' मी सफाईने साधलं होतं. मनामध्ये खळबळ चालूच होती. मी विचारात बुडून गेलो. माझी मन:स्थिती गफूरच्या नजरेतून निसटली नव्हती. तो तप्रारवजा सुरात मधून मधून बडबडत होता, "राजू, तू अलीकडे फारच कशात तरी अडकून गेल्यासारखा वाटतोस. मनमोकळेपणाने बोलत नाहीस. तू माझा जुना मित्र आहेस, पण आजकाल तू त्या

जुन्या मित्रासारखा वागतोयस असं वाटत नाही." खरंच होतं त्याचं म्हणणं. माझी मन:शांती पार नष्ट झाली होती. ध्यानीमनी रोझी आणि फक्त रोझी असायची. तिच्या रमणीय सहवासात घालवलेले ते काही तास मी पुन:पुन्हा जागवत राहायचो. पुढच्या भेटीत काय करायचं याची स्वप्नं रंगवत राहायचो. माझ्या मार्गात अडचणींचे पहाड उभे होते हे स्पष्टच दिसायचं. तिच्या नवऱ्याची मला फारशी चिंता नव्हती. चांगला होता बिचारा, संशोधनकार्यात आकंठ बुडालेला, इतरांवर जरा जास्तच विश्वास टाकणारा. असं असूनही मी कायम बेचैन, मानसिक दबावाखाली असायचो. असंख्य चिंता कुरतडत असायच्या. 'असं झालं तर? तसं झालं तर? आणि तसं...' पण नेमकं 'कसं झालं तर'ची भीती होती माझ्या मनात? माझं मलाच ते उमगत नव्हतं. सतत कसलं तरी भय वाटत राहायचं.

अतिशय गोंधळून गेलो होतो मी. कधी प्रचंड अनामिक भीती दाटून यायची, तर कधी 'माझ्या प्रियतमेच्या मी पासंगालाही पुरत नाही', अशा आशंकेने माझी बेचैनी वाढायची. 'दाढी नीट झाली नाही' अशी चिंतादेखील वारंवार मला सतावत असे. 'ती माझ्या चेहऱ्यावर हात फिरवेल आणि खरबरीत स्पर्श झाल्यावर मला हाकलून देईल' असं वाटत राही. माझे कपडेही फारच सामान्य आहेत असा गंड माझ्यात असायचा. रेशमी झब्बा आणि काठ असलेलं धोतर हा वेष किती वेळा घालायचा? शिवाय ते किती जुनाट फॅशनचे वाटतात...मी आधुनिक, अद्ययावत नाही म्हणून ती बहुधा आपल्याला बाहेरचा रस्ता दाखवील असा विचार करून मी अधिकच घाबरून जायचो. अखेर माझ्या शिंप्याकडे धाव घेतली. फॅशनेबल बुशशर्ट, कॉर्डरॉयच्या विजारी शिवून घेतल्या तेव्हा कुठे माझी धास्ती कमी झाली. केस आणि चेहऱ्यावर चोपडण्यासाठी लोशन घ्यायचाही सपाटा लावला. पण या भानगडीत माझे खर्च मात्र भरमसाठ वाढत होते.

माझी मुख्य कमाई दुकानातून व्हायची. शिवाय मार्को रोज मोबदला द्यायचा. दुकानाच्या हिशेबांवर बारीक नजर ठेवायला हवी हे मला समजत होतं. पण प्रत्यक्ष कृती मात्र होत नव्हती.

सारा कारभार मी त्या मुलावर टाकून मोकळा झालो होतो. आई मला सावध करायला बघायची - चुकून घरी सापडलोच तर - "त्या मुलावर लक्ष ठेव जरा. हल्ली दुकानावर बरेच टोळभैरव जमत असतात. किती पैसे मिळतात, नेमकं काय चाललंय आपल्या दुकानात, तुला कल्पना आहे का?" ती तळमळून विचारायची.

माझं ठरलेलं उत्तर असायचं, "त्याला कसं हाताळायचं ते मला चांगलं कळतं. माझं लक्ष नाही असं समजू नकोस." हे ऐकून तिचं तात्पुरतं का होईना, समाधान व्हायचं. मी मग तावातावाने दुकानावर जायचो. मोठ्या आप्रमतेचा आव आणून हिशेब तपासायचो. तो पोरगाही इमाने-इतबारे हिशेब दाखवायचा. थोडेफार पैसेही हातावर टेकवायचा. दुकानातल्या सामानाची यादी द्यायचा. हे संपलंय, ते आणायला हवं वगैरे सांगून झालं की स्वत:ची रडगाणीही गाऊन दाखवायचा. मी स्वत:च चिंताप्रांत असल्याने त्याच्या अडचणी ऐकण्यात मला रस नसे. 'फालतू गोष्टी सांगून माझ्यामागे कटकट करू नकोस,' असं बजावून मी त्याला गप्प करायचो. 'हिशेबांमध्ये गडबड चालणार नाही, माझं बारीक लक्ष आहे.' हे बजावताना मी रागीटपणाचं नाटक करायचो.

"दोन प्रवासी तुमची चौकशी करत होते, साहेब," तो नम्रपणे म्हणायचा.

हे ऐकून मला कंटाळा यायचा. मला कुठे वेळ होता? तरीही कर्तव्यबुद्धीने विचारायचो, "काय हवं होतं त्यांना?"

"त्यांना प्रेक्षणीय स्थळं बघायची होती. तीन दिवसांचा कार्यप्रम होता, साहेब. अखेर निराश होऊन गेले ते." गाइडगिरी करण्यामधला माझा रस संपला असला तरी राजूचं नाव अजूनही लोकांच्या स्मरणात होतं. 'रेल्वे राजू'ची कीर्ती सर्वदूर पसरली होती. यात्रेकरू, पर्यटक आमच्या स्टेशनवर उतरल्यावर रेल्वे राजूला शोधायचे.

तो मुलगा अजूनही पिच्छा सोडत नव्हता. "तुम्ही कुठे आहात याची चौकशी करत होते," तो म्हणाला. हे ऐकून मी विचारात पडलो. या मूर्खाचा भरवसा नाही...हॉटेलवर खोली नंबर

२८ वर पाठवून द्यायचा! सुदैवाने त्याला ही गोष्ट माहीत नव्हती, नाही तर त्याने तेही केलं असतं!

"राजू सर, मी त्यांना काय सांगू?" तो नेहमी मला 'राजू सर' म्हणायचा. जवळीक आणि आदर या दोन्ही भावना त्यामधून व्यक्त होतात असं त्याला वाटायचं.

"मी खूप व्यस्त आहे, असं सांग त्यांना. मला अजिबात वेळ नाही. फार कामात आहे," मी एवढंच म्हणालो.

"मी त्यांना प्रेक्षणीय स्थळं दाखवायला नेऊ का?" त्याने उत्साहाने विचारलं. मी दचकलोच. हा आगाऊ पोरगा माझी कामं एकामागून एक काबीज करायला बघत होता. यानंतर 'तुमच्या प्रियेला सोबत करू का?' असंही विचारायचा कदाचित! मी संतापून विचारलं, "मग दुकान कोण चालवेल?"

"माझा एक चुलतभाऊ आहे ना. मी नसताना तो एक-दोन तासांसाठी दुकान सांभाळेल," त्याचं उत्तर तयार होतं.

मी गोंधळून गेलो. काय करावं समजेना. सगळीच डोकेदुखीच होती - माझ्या पूर्वायुष्याचा मला कंटाळा आला होता, पण ते माझा पिच्छा सोडायला तयार नव्हतं. आई कायम अडचणींचा पाढा वाचायची- म्युनिसिपालटीचे टॅक्स भरायचेत; स्वयंपाकघरामधल्या लाद्या फुटल्यात; दुकान; हिशेब; गावाकडून पत्रं आलीत; माझी तब्येत बरी नाही... हे आणि ते... तिच्या तप्रारी ऐकत असताना माझं मन दुसरीकडेच भरकटत असायचं. इकडे हा पोरगाही मला छळण्याचे नवनवीन मार्ग शोधून काढायचा. गफूरचे तिरकस कटाक्ष आणि कुचकट शेरेबाजीही सहन करत होतोच. तो कधीही माझ्याविषयी नाही त्या अफवा पसरवायला लागेल अशी लक्षणं दिसत होती. खरंच... अगदी थकून गेलो होतो मी. या सर्व गोष्टींना तोंड द्यायची माझी मुळीच इच्छा नव्हती. माझं मन, माझं सर्व लक्ष आणि विचार दुसऱ्याच गोष्टीवर केंद्रित झाले होते. माझी आर्थिक परिस्थितीही दिवसेंदिवस खालावत चालली होती. त्याचीही मला पर्वा नव्हती. बँकेतली

गंगाजळी कमी झालीय हे माहीत असूनही मी बेफिकीर होतो. अजूनही पैसे मिळताहेत ना, मग कशाला उद्याची बात. पिताश्री कंजूष असल्याने बँकेमध्ये चांगली पुंजी जमली होती. माझ्या आयुष्यात आता केवळ एकच सत्य उरलं होतं - रोझी. माझ्या ध्यानी-मनी-स्वप्नी फक्त तीच होती. रोझीला नेहमी आपल्याजवळ कसं ठेवता येईल, तिला कायम खूष कसं राखायचं याचा विचार करण्यातच माझी सर्व मानसिक शक्ती खर्च व्हायची. तिचा हुजऱ्या, चमचा बनायची माझी तयारी होती. तिचा सहवास मिळवण्यासाठी मी काय वाट्टेल ते केलं असतं, पण त्या हॉटेलमध्ये कायम तिच्या खोलीत पडून राहणं शक्य नव्हतं. तिथला मॅनेजर, काम करणारी मुलं यांच्या नजरा माझ्यावर रोखलेल्या असतात, त्यांची माझ्यावर पाळत आहे आणि पाठीमागे माझ्याविषयी चर्चा चालते, अशा विचारांनी माझं डोकं अक्षरश: भणभणायचं.

२८ नंबरच्या 'त्या' खोलीत जाताना कोणी पाहू नये असं मला वाटायचं. लोकांच्या नजरांची लाज वाटायला लागली होती. प्रवेशदाराशी मॅनेजरचं डेस्क होतं. ते चुकवून अन्य मार्गाने खोलीत जायला मिळालं, तर किती बरं होईल. रोझीबरोबर मी किती वाजता खोलीत जातो आणि नंतर कधी परत जातो याची तो नोंद ठेवत असणार याबद्दल मला जराही शंका नव्हती. इतकंच नव्हे, तर २८ नंबरच्या बंद दरवाजामागे आमचं काय चालतं याचासुद्धा त्याने त्याच्या विकृत, अतिचौकस मनोवृत्तीनुसार सर्व तपशीलवार अंदाज लावला असणार. त्याची नजर, त्याचं कुत्सित हसणं काहीच मला आवडत नसे. जुना सहकारी असल्यामुळे त्याच्याकडे दुर्लक्ष करणंही शक्य नव्हतं. त्याच्या समोरून जातायेताना काहीतरी बोलणं भाग असायचं. मग मी सटरफटर बोलायचो - 'नेहरू लंडनला चाललेत हे माहितीय का तुला?' किंवा 'नवीन कर लावलेत, त्याने सर्वांचं कंबरडंच मोडणार आहे,' वगैरे. तोदेखील दुजोरा द्यायचा, काहीतरी समजावून सांगायचा. कधी 'भारत सरकारचं पर्यटन धोरण', 'हॉटेल व्यवसाय' अशा विषयांवर चर्चा व्हायची. अर्थात त्यामध्ये माझा सहभाग फारच कमी असायचा. हॉटेल, पर्यटन, कर वगैरेमध्ये मला जराही रस राहिलेला नाही ह्याची त्या बिचाऱ्याला कल्पनाही नव्हती. हे हॉटेल बदलावं म्हणजे ही कटकट राहणार नाही असा विचार मनात येई. पण ते तितकं सोपं नव्हतं.

रोझी आणि तिचा नवरा, दोघांनाही हे हॉटेल फारच प्रिय होतं. खरं पाहता तो वर पीक हाऊसमध्येच मुक्कामाला होता. तरीही त्याला कोणत्याही प्रकारचा बदल फारसा आवडत नाही हे मला माहीत होतं. तिलाही हॉटेलमधली खोली सवयीची झाली होती. खिडकीतून नारळाची वाडी, विहिरीच्या पाण्याने ती शिंपणारे लोक दिसायचे. ते बघायला तिला फारच आवडायचं. त्या दृश्याचं तिला एवढं काय आकर्षण होतं हे मला समजत नसे.

मला एरव्हीसुद्धा तिचं मन समजणं कठीणच होत असे. हल्ली पूर्वीसारखी मुक्त, स्वच्छंद वागायची नाही. मनावर कसलातरी ताण आहे हे जाणवायचं. आमचा प्रणय अजूनही रंगत असे हे खरं असलं तरी आजकाल तिला नवऱ्याचा फारच पुळका यायचा. माझ्या मिठीत असताना अचानक ती दूर व्हायची. "गफूरला गाडी आणायला सांग. मला त्याला भेटायला जायचंय, आत्ताच्या आत्ता," ती म्हणायची.

आमच्यामध्ये जवळीक असली तरी अजूनही तिच्यावर रागावण्याची वा उद्धट बोलायची मला हिंमत होत नसे. मी अत्यंत शांत स्वरात तिला समजवायचो, "गफूर उद्या याच वेळी येईल, त्यापूर्वी नाही. तू कालच वर जाऊन त्याला भेटून आलीस ना? आज पुन्हा कशाला जायचंय? त्यालाही माहितीय तू आज येणार नाहीस."

"हो," एवढंच बोलून ती मुकाट बसून राहायची. तिला अशी चिंतामग्न, केस विखुरलेले, कपडे चुरगळलेले अशा अवस्थेत पाहणं मला असह्य व्हायचं. आपले दोन्ही हात कवटाळून, मान खाली घालून ती खोल विचारात बुडून जायची.

"काय होतंय तुला? कसला त्रास होतोय? मला नाही का सांगणार? मी आहे ना?" मी तिला शांतवायला म्हणायचो.

ती डोकं हलवून म्हणायची, "काही झालं तरी माझा नवरा आहे तो. त्याला असं एकट्याला नाही सोडता येणार."

बायकांच्या बाबतीमधील माझं ज्ञान फारच तुटपुंजं - एकाच स्त्रीपुरतं मर्यादित - असल्याने तिच्या विधानांचा नेमका काय अर्थ लावावा हे मला समजेना. ती नाटक करतेय? नवऱ्याविषयीच्या सर्व तक्रारी खोट्या होत्या? मला फशी पाडण्यासाठी ती असं वागतेय? सारंच अतिशय गुंतागुंतीचं आणि संदिग्ध वाटत होतं. अखेर मी म्हणालो, "रोझी, समजा गफूर आत्ता इथे आला तरीदेखील या वेळी घाट चढणं अशक्य आहे. तुला हे माहितीय ना?"

"हो, हो, मला समजतं," एवढंच बोलून ती पुन्हा त्या रहस्यमय शांततेमध्ये बुडून गेली.

"तुला काय झालंय ते तरी सांग."

अचानक तिला रडू फुटलं. "म्हणजे... मी करतेय ते बरोबर आहे का?" ती स्फुंदत म्हणाली. "तो माझ्याशी किती चांगला वागतो. मला सर्व तऱ्हेचं स्वातंत्र्य आणि आरामाचं जीवन दिलंय त्याने. कोणता नवरा आपल्या बायकोला शंभर मैल दूर, हॉटेलमध्ये एकटीला राहायची परवानगी देईल? आणि मी..."

"हॉटेल शंभर नाही, फक्त अठ्ठावन्न मैल दूर आहे," मी तिची चूक सुधारली.

"तुझ्यासाठी कॉफी मागवू? खायला हवंय काही?"

"नको," ती फटकन म्हणाली. आधीचाच धागा पकडून पुढे म्हणाली, "तो खरोखरच चांगला आहे, म्हणूनच माझं वागणं चालवून घेतोय. पण म्हणून काय झालं? नवऱ्याची सेवा करणं, त्याला मदत करणं हे पत्नीचं कर्तव्यच आहे, मग तो तिला कसंही वागवू दे." तो तिच्याशी किती तुटकपणे वागतो याची आठवण करू नये म्हणून 'तो कसंही वागवू दे' अशी आगाऊ ताकीदच तिने मला दिली होती.

एकूण परिस्थिती फारच गोंधळाची होती. या विषयावर मी काहीही बोलायचं टाळलंच. बहुधा तो दूर असल्याने तिला काहीतरी रोमँटिक वाटत असावं. मात्र त्याच्या सहवासात केवळ दोन-चार तास घालवले की रोमँटिकपणाचं भूत तत्काळ उतरायचं. त्याला शिव्याशाप देतच ती

खाली यायची. या सर्व प्रकाराचा कधी कधी मला प्रचंड कंटाळाच यायचा. त्याने खाली जमिनीवर यावं आणि दोघांनीही एकदाचं निघून जावं असं मनापासून वाटायचं. निदान हे अनिश्चित, अधांतरी लटकणं बंद होऊन प्रकरणाचा सोक्षमोक्ष तरी लागेल. मी माझ्या नेहमीच्या उद्योगांना लागेन. खरं पाहता आत्तादेखील गाइडगिरी करायला काहीच हरकत नव्हती. तिचा नाद सोडणं हे माझ्याच हाती नव्हतं का? मार्कोचं काम संपेपर्यंत हे दुष्टचक्र चालूच राहणार तर...त्याला एकांतवास फारच सोयीस्कर पडतो, जास्त आवडतो हे तर स्पष्टच दिसत होतं. कशाचाही व्यत्यय न येता फक्त काम आणि कामच करत राहावं हेच त्याचं ध्येय असावं. पण मग पत्नीचं काय? तिच्याविषयी त्याचं काही कर्तव्य नाही का? डोळ्यांवर झापडं बांधलीत का? त्याला काहीच कसं समजत नाही? मला त्याचा खूप राग यायचा. माझ्या या चमत्कारिक अवस्थेला सर्वस्वी तोच कारणीभूत आहे.

"तुला त्याची एवढी काळजी वाटते तर तू तिथे वर, त्याच्याजवळच का राहत नाहीस?" मी तिला अगतिकतेने विचारलं.

"तो रात्रभर काहीतरी लिहीत बसतो आणि..."

"मग दिवसा त्याच्याशी बोलत जा," मी भोळेपणाचा आव आणून म्हणालो.

"तसं नाही. तो दिवसभर गुहेमध्ये घुसून बसतो ना!"

"अरे! मग तूसुद्धा जा की त्याच्याबरोबर. गुहेमध्ये काय आहे बघ. तुलाही आवडेल कदाचित."

"तो नोंदी करत असताना, टिपणं काढत असताना त्याच्याशी बोललेलं खपत नाही त्याला."

"पण तू बोलू नकोस ना. गुहेमधील कोरीव काम, भित्तिचित्रांचा तूदेखील अभ्यास करू शकतेस की. एका आदर्श पत्नीला पतीच्या कामामध्ये आवड असायलाच हवी असं नाही तुला वाटत?" मी हट्टालाच पेटलो होतो.

“खरंय,” ती नि:श्वास सोडून म्हणाली. मी विनाकारणच काहीतरी बोलून तिला दुखवलं होतं. तिरकस बोलून निष्पन्न तर काहीच झालं नाही, उलट ती अधिकच खिन्न झाली.

मी नृत्याचा विषय काढला तेव्हा तिचे डोळे आशेचा किरण दिसावा तसे चमकले. वास्तविक पाहता सर्वप्रथम मी तिच्या नृत्यनैपुण्याचाच चाहता झालो होतो. मधल्या काळात आम्ही प्रणयरंगात मश्गुल झाल्याने तो अत्यंत महत्त्वाचा प्रश्न बाजूला पडला. दुकानं, खरेदी, चित्रपट आणि प्रेम अशा गोष्टींचा आनंद लुटत असताना तिलादेखील आपल्या प्रथमभक्तीचा साफच विसर पडला होता. एका सायंकाळी तिने मला अचानक प्रश्न केला, “तूसुद्धा त्याच्यासारखाच आहेस का?”

“म्हणजे काय?”

“मी नृत्य केलेलं तुलाही आवडत नाही?”

“तसं मुळीच नाही. तुला असं का वाटलं?”

“पूर्वी तुझ्या बोलण्यावरून तू कलांचा पुजारी आहेस असं भासायचं. पण अलीकडे मात्र तू त्या विषयावर चकार शब्दही बोलत नाहीस.”

ती म्हणत होती ते खरं होतं. मी काहीतरी थातूरमातूर सबब पुढे केली. मग तिचे हात हातात घेऊन भावनावेगाने म्हणालो, “मी तुझ्यासाठी काहीही करीन. तुला नृत्य करता यावं यासाठी पुरं आयुष्य पणाला लावीन. तू फक्त काय करू ते सांग. तू म्हणशील ते सर्व करीन.”

हे ऐकून ती खुलली. नृत्य करायची मनीषा पूर्ण होणार या कल्पनेने तिच्या डोळ्यांमध्ये एक नवीनच चैतन्य दिसू लागलं. मीही तिच्या स्वप्नरंजनामध्ये सहभागी झालो. ‘नृत्य’ ही तिची कमजोरी होती. तिचं स्वप्न साकार करायला मी मदत करणार हे ऐकून ती खूष झाली. एक मात्र खरं - पतिदेव आणि नृत्य या दोन गोष्टींना एकाच वेळी तिच्या आयुष्यात स्थान नव्हतं. दोघांना एकमेकांचं वावडं होतं!

मोठ्या उत्साहाने तिने वेळापत्रक आखायला सुरुवात केली - भल्या पहाटे, पाच वाजता नाचाच्या सरावाला सुरुवात करायची. तब्बल तीन तास. त्यासाठी प्रशस्त खोली हवी. जमिनीवर जाड गालिचा पाहिजे. गालिचा नेमका कसा हवा हेदेखील निश्चित होतं - जास्त मऊ अथवा खरखरीत नसावा, त्यावर पदन्यास करताना गालिचाला घड्या पडू नयेत, वगैरे वगैरे. एका कोपऱ्यामध्ये नटराजाची ब्रॉन्झ मूर्ती असेल. नटराज ही नृत्यदेवता. नटराजाच्या तांडवनृत्यामुळे जबरदस्त थरार निर्माण होऊन सारं विश्व गतिमान झालं असेल. अगरबत्तीचा मंद सुगंध खोलीमध्ये दरवळत राहील. सकाळच्या सरावानंतर शोफरला बोलवीन.

"तू गाडी घेणार की काय?" मी विचारलं.

"अर्थात. नाहीतर हिंडणार कसं? मला कितीतरी ठिकाणी जावं लागणार. त्यासाठी गाडी हवीच. गाडीशिवाय फारच अडेल असं नाही वाटत तुला?"

"नक्कीच. लक्षात ठेवीन मी."

तिचं स्वप्नरंजन पुढे चालू झालं. नंतर एक-दोन तास कलाशास्त्रावरील प्राचीन ग्रंथांचं वाचन - पारंपरिक नृत्यकलेचा अभ्यास केला नाही, तर नृत्यमुद्रा आणि रचनांची शुद्धता जपणं केवळ अशक्य होईल. त्यासाठी भरतमुनींनी हजार वर्षांपूर्वी लिहिलेलं 'नाट्यशास्त्रा'वरचं, तसंच अन्य काही ग्रंथांचं वाचन आणि मनन करायलाच हवं. ही सारी पुस्तकं तिच्या काकांच्या संग्रही होती. थोडी थोडी करून ती पाठवून द्यावी असं पत्र त्यांना लिहायचं तिने ठरवलं. ग्रंथांमधील भाषा प्राचीन शैलीची आणि अत्यंत मुद्देसूद असल्याने समजण्यास कठीण होती. ती समजावून सांगण्यासाठी एका विद्वान पंडिताची गरज भासेल.

"चांगला संस्कृत पंडित मिळेल का?" तिने विचारलं.

"नक्की मिळेल. मी शोधून आणेन," मी तत्काळ आश्वासन दिलं.

“आपल्या रामायण, महाभारतामध्ये अनुपम सुंदर कथा-कल्पनांचं भांडार आहे. कितीतरी नवनवीन नृत्यरचना बसवता येतील त्यावरून, पण त्यासाठी पंडितजींना हे महाग्रंथ मला वाचून दाखववावे लागतील.”

“दुपारच्या भोजनानंतर थोडी विश्रांती. तीन वाजता खरेदीसाठी निघायचं, गाडीतून फेरफटका करून संध्याकाळी परत घरी. कधी एखादा चित्रपट- अर्थात संध्याकाळी नृत्याचा कार्यप्रम नसला तरच- पाहायचा. कार्यप्रमाच्या दिवशी मात्र खरेदी, चित्रपट वगैरे सर्व बाद. अर्धा तास आधी हॉलवर पोचलं तरी चालेल. केशवेषभूषा घरूनच करून निघायचं म्हणजे तेवढा वेळ पुरेसा होईल.”

अगदी बारीक गोष्टींचाही तिने विचार केला होता. दिवसरात्र नृत्याचाच ध्यास. ध्यानी-मनी-स्वप्नी तेच विचार. सकाळच्या नृत्यसरावासाठी तिला तबलजी आणि अन्य काही वादकांची गरज होती. जाहीर कार्यप्रम करण्याइतपत आत्मविश्वास आल्यानंतर मी कार्यप्रम ठरवायचे होते. तिचा उत्साह, धांदल पाहून मी चप्रावून गेलो. नृत्यकलेविषयी ती भरभरून बोलायची, पण मला ती क्लिष्ट भाषा, संस्कृतप्रचुर वाक्यप्रचार अजिबात समजायचे नाहीत. मी ‘आ’ वासून ऐकत राही. आपण किती मूर्ख आहोत असं अखेर वाटायला लागलं. माझ्यासमोर दोन पर्याय होते - नशिबावर भरवसा ठेवून आपल्याला सर्व काही छान समजतंय असं नाटक करायचं किंवा प्रामाणिकपणे आपलं अज्ञान कबूल करायचं. अखेर दोन दिवसांनी धैर्य गोळा करून मी सपशेल कबुली दिली, “मी एक सामान्य माणूस आहे. नृत्यामधल्या तांत्रिक बाबी मला फारशा समजत नाहीत. तू मला थोडंफार समजावून सांगशील तर बरं होईल.”

हे ऐकून मलादेखील नृत्यकलेविषयी आवड नाही असा तिचा ग्रह होईल अशी मला भीती वाटत होती. तसं झालं तर ती नवऱ्याकडे परत जाईल, या आशंकेने मी तिच्या कलेविषयी मला कमालीची आस्था आहे असं दर्शवण्याचा आटोकाट प्रयत्न करत होतो. त्याचा योग्य परिणाम होऊन ती माझ्यामध्ये अधिकाधिक गुंतत गेली. ‘नृत्य’ हा आम्हाला जवळ आणणारा समान

धागा होता. ती माझ्याशी सतत कलेमधील विविध सूक्ष्म बारकावे आणि तंत्र यांविषयी अतिशय सोप्या भाषेत - लहान मुलाला समजावून सांगावं तशी - बोलायची. ती एवढी नृत्यमग्न झाली होती की, तिला कसलंही भान उरत नसे. गफूरच्या गाडीतून जाताना तिच्या तोंडी तोच विषय असायचा. "'पल्लवी' म्हणजे काय हे तुला माहितीय का? यामध्ये 'ताल' आत्यंतिक महत्त्वाचा असतो. नेहमीप्रमाणे साधा एक-दोन, एक-दोन असा ठेका नसून वेगवेगळ्या गती आणि पद्धतीने तालरचना केलेली असते." नंतर तिने ते बोल म्हणून दाखवले, 'त...क...त...की...त, त...क' मला तो प्रकार विनोदी वाटला. ती मात्र मोठ्या तळमळीने 'पल्लवी' बद्दल सांगतच होती, "या पाच-सात ठेक्यांमध्ये अचूक पदन्यास साधण्यासाठी खूप मेहनत करावी लागते. शिवाय गतीमध्येही विविधता असेल तर..." या विषयात खाजगी असं काहीही नसल्यामुळे गफूरच्या कानी पडलं तरी चालण्यासारखं होतं. गाडी वरती जात असताना, खरेदी करून बाहेर पडल्यानंतर, चित्रपट बघताना तिची अखंड बडबड चालायची. चित्रपट बघताना अचानक तिला काहीतरी आठवायचं, "माझ्या काकांजवळ ताडपत्रावर लिहिलेलं एक फार जुनं पद होतं. माझ्या आईव्यतिरिक्त अन्य कोणालाही ते पद माहीत नाही. त्या गाण्यावर तिने नृत्यरचना केली होती. मीही काकांकडून ते गाणं लिहून घेईन. मला थोडंसं येतं. मी तुला करून दाखवते. आपण हॉटेलवर जाऊ या का? या सिनेमात काही दम दिसत नाही. मला नाही बघायचा. निघू या."

आम्ही लगेच निघालो. २८ नंबरच्या खोलीमध्ये मला बाहेर बसवून ती आतल्या खोलीत गेली आणि नाचण्यासाठी साडीचा पदर घट्ट खोचून ती तयारीनिशी बाहेर आली. "मी करून दाखवते... अर्थात साथीलाही कोणी नाही. जमेल तसं करते, पण निदान तबलजी असते तरी बरं झालं असतं... बरं, ती खुर्ची बाजूला ठेव. तू कॉटवर बस. मला मोकळी जागा हवी आहे."

खोलीच्या दुसऱ्या बाजूला उभी राहून तिने हलक्या आवाजात ते संस्कृत पद म्हणायला सुरुवात केली. 'रम्य यमुनातीरी प्रियकर-प्रेयसीचं मधुर मिलन होत आहे' अशा अर्थाचं ते गीत

होतं. त्याच्या तालावर तिने पदन्यास करायला सुरुवात केली. एक पाय किंचित उचलून तिने मोठ्या जोशाने जमिनीवर ठेवला. पायांमधील घुंगरूंचा नादमधुर आवाज ऐकून मी रोमांचित झालो. नृत्यामधील तांत्रिक बाबी, गीतामधील शब्दार्थ यांबाबतीत संपूर्ण अनभिज्ञ असलो तरी, तिच्या मोहक हावभावांमुळे, लयदार पदन्यासामुळे मी अतिशय प्रभावित झालो. अधूनमधून ती थांबायची, एखाद्या शब्दाचा किंवा वाक्याचा अर्थ समजावून सांगायची. "नारी म्हणजे मुलगी आणि 'मणी'चा अर्थ एक रत्न...' 'या संपूर्ण वाक्याचा अर्थ असा आहे : तू माझ्या मनावर प्रेमाचं हे ओझं टाकलं आहेस, ते सहन करणं मला अशक्य होत आहे.' नाचून दमल्यामुळे ती बोलताना धापा टाकायची. कपाळ आणि ओठांवर घर्मबिंदूंची महिरप तयार व्हायची. थोडेसे पदन्यास करून ती पुन्हा थबकायची, "इथे 'प्रियकर' म्हणजे परमेश्वर. परमेश्वरच तुमचा सखा, प्रियकर, सर्व काही तोच." 'लय, ठेका' म्हणजे काय हे अतिशय सहनशीलतेने विशद करायची. नाचताना पावलं अत्यंत जोमदारपणे जमिनीवर पडत असल्याने कडक आवाज व्हायचा. खालच्या मजल्यावरचे लोक तक्रार करतील, नाचणं थांबवायला सांगतील या विचाराने मी घाबरायचो, पण तिला कोणाचीच फिकीर नसायची. तिचं बहारदार नृत्य, त्यामधून व्यक्त होणारी अप्रतिम सुंदर प्रतीकात्मक प्रेमकथा, युवावस्थेमधील ईश्वर, यशस्वी वैवाहिक जीवन, तारुण्यातून वार्धक्याकडे प्रवास, जीवनसंघर्षामधूनही प्रफुल्लित राहिलेलं हृदय, तळ्यामधील टवटवीत कमलपुष्पाबरोबर त्याच्या हृदयाशी तुलना केली होती. कमळ दाखवतानाच्या तिच्या नाजूक बोटांच्या हालचाली इतक्या हुबेहूब होत्या की, मला तळ्यातील पाण्याच्या हलक्या लाटांचा आवाजही चक्क ऐकू आला. देहभान हरपून ती जवळजवळ एक तासभर नृत्य करत होती. ते पाहून मला असीम आनंद वाटत होता. त्या वेळी माझ्या मनामध्ये कोणतेही विकार, वासना नव्हती हे मी शपथेवर सांगू शकतो. केवळ तिच्यामधील उत्कृष्ट कलाविष्कार दिसत होता, बाकी कसलंही भान मलाही उरलं नव्हतं. आश्चर्यचकित होऊन तिचं अप्रतिम सुंदर नृत्य बघत राहिलो. अचानक ती थांबली. माझ्या अंगावर तिने स्वत:ला लोटून दिलं आणि म्हणाली, "तू किती चांगला आहेस! माझ्या जीवनाला नवा अर्थ दिलास..."

त्यानंतर मार्कोकडे गेलो तेव्हा आमची व्यूहरचना तयार होती. तिला सोडून मी परतणार होतो. एकटेपणा आणि मानसिक त्रास, चिडचिड सहन करून तिला दोन दिवस तिथेच राहावं लागणार होतं. आम्ही तिच्या नृत्यसाधनेविषयी सारं ठरवलं होतं खरं, पण ते प्रत्यक्षात आणण्यापूर्वी त्याविषयी पतीला सांगणं, त्याच्याशी चर्चा करणं आवश्यक होतं. ती दोन दिवस राहून त्याच्याशी या विषयावर सविस्तर बोलणार होती. त्यानंतर मी तिथे जायचं आणि सर्वांनी मिळून पुढची योजना आखायची असं ठरलं. अचानक ती नवऱ्याविषयी फारच आशावादी झाली होती. गाडीमध्ये ती वारंवार माझ्याजवळ झुकून कानामध्ये कुजबुजायची, “मला वाटतं, आपल्या प्रस्तावाला तो नक्की होकार देईल.” हळू बोलणं गफूरला ऐकू जाऊ नये म्हणून असायचं. आशावादी स्वरात पुढे म्हणायची, “तसा तो खूप चांगला आहे. हा सर्व वरवरचा दिखावा आहे. आवड नसल्याचं केवळ नाटक करतोय तो. तू मुळीसुद्धा तोंड उघडू नकोस. मीच बोलते. त्याच्याशी कसं वागायचं हे मला बरोबर माहितीय. ते सर्व माझ्यावर सोपव.” वर पोचेपर्यंत तिची ही आणि अशीच बडबड चालू होती. डोंगरमाथ्यावर विहरणारे सुंदर पक्षी पाहून ती आनंदली. “किती सुरेख! काय ही रंगांची उधळण! ‘तरुणीच्या हातावर बसलेला पोपट’ यावर एक छोटी नृत्यरचना आहे. मी करून दाखवीन कधीतरी,” ती देखील पक्ष्यांप्रमाणे किलबिलत म्हणाली.

मार्को विश्वास बसणार नाही एवढ्या छान मूडमध्ये होता. कधी नव्हे ते बायकोचं त्याने फारच प्रेमाने स्वागत केलं. तो व्हरांड्यातच खुर्ची टाकून बसला होता. मांडीवर खूप सारी कागदपत्रं होती. बहुधा टिपणं, नोंदी करायचं काम चालू असावं. तो मोठ्या उत्साहाने म्हणाला, “तुला माहितीय का? इथे तिसरीही एक गुहा आहे. अजूनपर्यंत कोणाला पत्ताच नव्हता या गोष्टीचा. गुहेपर्यंत जाण्याचा मार्ग एका तळघरामधून आहे. भिंतींवर सुरेख प्रतीकात्मक चित्रांमधून स्वरलिपी कोरली आहे. चुना खरवडून काढल्यानंतर ती भित्तिचित्रं दिसून आली. चित्रशैलीवरून पाचव्या शतकातील कोरीव काम असावंसं वाटतं. कालखंडामध्ये एवढा मोठा फरक कसा या गोष्टीचं मला फारच आश्चर्य वाटतंय.” तो भरभरून बोलत होता. त्या

चित्तथरारक नवीन शोधाविषयीची टिपणं त्याने तिच्यासमोर धरली तेव्हा तिनेही मोठ्या उत्सुकतेने त्यावर नजर फिरवली. “संगीताची स्वरलिपी! किती छान! मला दाखवणार ना?” ती आनंदित स्वरात चीत्कारली.

“नक्की. उद्या सकाळी जाऊ या. मी सारं नीट समजावून सांगीन.”

ती पुन्हा अत्यंत कृत्रिम आवाजात किंचाळली, “फारच छान! मी त्या रचना गाऊनही दाखवीन.”

“ते जमेल का याची शंकाच वाटते. तुला वाटतंय तितकं सोपं नाही ते.” त्याने तिच्या उत्साहावर पाणी ओतलं. त्याला खूष करण्यासाठी तिची फारच धडपड चालली होती, पण फारसं यश येत नव्हतं. एकूणच आनंदी वातावरण पाहून मला मात्र चिडचिडल्यासारखं झालं. एवढ्यात त्याने मागे वळून मला विचारलं, “राजू, तू काय करतोस? मी शोधलेली गुहा तुलाही बघायचीय का?”

“अर्थात, पण मला आत्ता मात्र गावात जायला हवं. मी केवळ बाईसाहेबांना सोडण्यासाठी आलो होतो. इथे येण्यासाठी त्या फारच आतुर झाल्या होत्या. शिवाय इथली सर्व व्यवस्था ठीक आहे ना, काही हवंय का, याचीही चौकशी करायची होती,” मी मोठ्या विनयशीलतेने उत्तर दिलं.

“अरे, तक्रारीला जागाच नाही. सर्व काही छान आहे. तो जोसेफ तर फारच कर्तबगार वाटतो. पडद्यामागून, अदृश्यपणे माझी सर्व कामं वेळच्या वेळी, कमालीच्या कार्यक्षमतेने करत असतो. अगदी मशीनप्रमाणे त्याची चक्रं फिरत असतात.” तो जोसेफवर फारच खूष होता.

रोझीचं नृत्य पाहत असताना मलाही वाटत राहायचं - ‘हिच्या हालचाली किती लयदार, एखाद्या मशीनप्रमाणे निर्दोष. तक्रारीला जागाच नाही...’

मार्को अजूनही जोसेफचे गुण गातच होता. “ही अप्रतिम सुंदर जागा आणि जोसेफसारखा हुशार नोकर शोधून काढल्याबद्दल तुझे किती आभार मानावेत हेच समजत नाही. जोसेफ खरोखर सर्वगुणसंपन्न आहे. या जंगलात त्याचे गुण मातीमोल होताहेत या गोष्टीचं वाईट वाटतंय.’

“तुम्ही त्याचं एवढं कौतुक करताय हे ऐकल्यानंतर त्याला खूप आनंद होईल.” मी म्हणालो.

“ते मी त्याला अनेकदा सांगितलंय. कधीही माझ्या घरी कामाला येऊ शकतोस, असं मी त्याला स्पष्टच सांगितलंय.”

एरव्ही मार्को मितभाषी असला तरी आज मात्र खूप आणि तेही मित्रत्वाने बोलत होता. त्याचा स्वभाव एकांतप्रिय. गुहा, भित्तिचित्रं यांमध्ये रमणारा. त्याला जोसेफसारखी बायको मिळायला हवी होती - बिनबोभाट त्याची सारी कामं करणारी! तो उत्साहाने बोलत असताना माझ्या मनात असे विचार चालले होते. इकडे रोझीही आदर्श पत्नीच्या भूमिकेमधून त्याच्याविषयी चिंता दाखवत होती, “खायला-प्यायला व्यवस्थित मिळतं ना? सर्व ठीक आहे? दूध असेल तर कॉफी बनवते सर्वांसाठी...” असं म्हणून ती धावतच आत गेली. “दूध आहे घरात. मस्त कॉफी बनवते सर्वांसाठी. पाच मिनिटांत होईल...”

का कोणास ठाऊक, आज मला खूप अस्वस्थ वाटत होतं. मनामध्ये शंकाकुशंकांचं वादळ घोंघावत होतं. ‘तो रोझीला काय म्हणेल? तिला दुखवणार तर नाही ना?’ एकीकडे त्याने तिच्याशी नीट वागावं असं वाटत असलं तरी ‘त्याच्या अतिचांगुलपणामुळे रोझी त्याच्याकडे खेचली जाईल, माझी पर्वा करणार नाही’ अशी धाकधूकही मनाच्या एका कोपऱ्यामध्ये होतीच. ‘त्याने तिच्याशी नीट वागावं, तिचा प्रस्ताव लक्षपूर्वक ऐकावा, पण बाकी सर्व माझ्यावर सोपवावं,’ अशी माझी अपेक्षा होती! अशी अपेक्षा करणं किती चुकीचं आहे हेही मला समजत होतं. पण...

रोझी आतमध्ये कॉफी बनवण्याच्या गडबडीत असताना मार्को माझ्यासाठी खुर्ची घेऊन आला. इथून दरीचा सुंदर देखावा पाहायला मिळत होता. "मी नेहमी इथे बसूनच माझी कामं करतो," तो म्हणाला. दरीवर, बाहेरच्या सुरेख दृश्यावर आपण जणू काही फार मेहेरबानी करतोय असं त्याला वाटत असावं! मोठ्या ऍल्बममधून त्याने कागदांची गुंडाळी आणि थोडे फोटो बाहेर काढले. गुहांमधील भित्तिचित्रांवर त्याने प्रचंड टिपणं, नोंदी काढल्या होत्या. त्यांविषयी विस्तृत वर्णनं, उतारे वगैरेंनी कागदाचे रकाने भरले होते. मला त्यातलं ओ की ठो कळत नव्हतं, तरीही फारच आवड असल्याचं नाटक करून मी त्याच्या टिपणांवरून नजर फिरवली. त्याविषयी अभ्यासपूर्ण प्रश्न विचारावेसे वाटले, पण योग्य शब्द सापडेनात. त्यामुळे मूग गिळून गप्प बसलो. 'एखाद्या उच्च दर्जाच्या नामांकित शाळेमध्ये आपलं शिक्षण झालं असतं तर किती बरं झालं असतं' असं उत्कटतेने वाटायला लागलं. समाजातील विविध स्तरांमधील लोकांबरोबर समान पातळीवरून वावरणं सोपं झालं असतं. फक्त रोझीलाच माझ्यामधील न्यूनगंड समजतो. मोठ्या सहनशीलपणे ती आपल्याला समजावून सांगते! एकीकडे मनामध्ये असे विचार घोळत असताना मी मार्कोचं बोलणं ऐकत होतो. तारखा, पुरावे, स्पष्टीकरणं, चित्रं आणि कोरीव कामांविषयीचे सूक्ष्म तपशील - मार्को अखंड बोलत होता. 'या सर्व गोष्टींचा नेमका उपयोग काय, त्याने काय साध्य होणार' हा प्रश्न मला पडला असला तरी त्याला तो विचारण्याची हिंमत अर्थातच माझ्यामध्ये नव्हती. ट्रेमध्ये कॉफीचे कप घेऊन रोझी कधी आली ते समजलंच नाही (बहुधा जोसेफप्रमाणे मीही आवाज न करता चालू शकते हे तिला सिद्ध करायचं असावं.) माझ्या समोर कप घेऊन उभी राहिली तेव्हा मी चांगलाच दचकलो, मार्कोचं व्याख्यान अजूनही चालूच होतं, "माझं हे संशोधन प्रसिद्ध झाल्यानंतर भारतीय संस्कृतीचा इतिहास नव्याने लिहावा लागेल. या गुहांचा शोध लावण्यासाठी तुझी अमूल्य मदत मिळाली या गोष्टीचा कृतज्ञतापूर्ण उल्लेख माझ्या पुस्तकामध्ये नक्कीच असेल."

ठरल्यानुसार मी दोन दिवसांनंतर परतलो. मार्को खाली गुहेमध्ये गेलेला असणार याची खात्री असल्याने मी साधारण बाराच्या सुमारास तिथे गेलो. रोझीला थोडा वेळ एकटीला गाठता येईल असा माझा हेतू होता. पण दोघंही बंगल्यावर नव्हतेच. मागच्या बाजूला जोसेफ त्यांच्या जेवणाची तयारी करण्यात गुंतला होता. मला पाहून तो म्हणाला, “दोघंही बाहेर गेले आहेत. अजून आले नाहीत.”

एकूण वातावरण कसं आहे याचा अंदाज घ्यावा म्हणून मी जोसेफच्या चेहऱ्याकडे निरखून पाहिलं. पण त्याने दाद लागू दिली नाही. अखेर मी मोठ्या उत्साहाने विचारलं, “जोसेफ, कसं काय चाललंय?”

“फार छान, सर.”

“त्या माणसाचं तुझ्याविषयी फारच चांगलं मत आहे,” मी त्याला खूष करायला म्हणालो.

पण जोसेफने ते फारसं मनावर घेतलं नाही. “म्हणून काय झालं? मी माझं कर्तव्य करतोय. कोणी शिव्या देतं तर कोणी कधी चांगलं म्हणतं... मला काही फरक पडत नाही. मागच्याच महिन्यातली गोष्ट. मुलांचं एक टोळकं आलं होतं इथे राहायला. मी त्यांना रात्री पोरी पुरवल्या नाही म्हणून मला मारायला निघाले होते. मी घाबरतो की काय त्यांना! दुसऱ्या दिवशी सकाळीच ‘चालते व्हा’ म्हणून बजावलं. लोक इथे आरामात राहायला येतात. आणि त्यांना सर्व प्रकारच्या सुखसोयी पुरवणं हे माझं काम आहे आणि ते मी विनातप्रार करतो. कधी कधी पाण्याच्या एका मटक्यासाठी आठ आणे मोजायला लागतात. खाली जाणारं मिळेल ते वाहन - बस, ट्रक घेऊन मी पाण्यासाठी मटके, डबे पाठवून देतो. प्रवाशांना या सर्व अडचणींचा मी पत्ता लागू देत नाही. सर्व अडचणी सोडवून त्यांना व्यवस्थित सेवा द्यायची ही माझी जबाबदारी नाही का? त्यांनी फक्त पैसे मोजायचे. ही सर्व कामं मी आनंदाने करीन. पण मुली पुरवाव्यात अशी अपेक्षा माझ्याकडून केली तर मात्र मला भयंकर संताप येतो.”

“ते साहजिकच आहे. कोणालाही ती गोष्ट आवडणार नाही,” त्याची गाडी थांबवण्यासाठी मी म्हणालो. “हा तुला कोणत्याही प्रकारचा त्रास देत नाही ना?”

“छे, छे, अजिबात नाही. फार चांगलाय तो. बायकोने डोकं खायचं थांबवलं तर बरं होईल. ती नसते तेव्हा खूप आनंदात असतो तो. तू का आणलंस तिला परत? फार कटकटी आहे ती.”

हे ऐकून मी लगेच म्हणालो, “ठीक आहे. असं असेल तर मी तिला घेऊन जातो. त्याला शांतपणे राहू दे.”

गुहेकडे जाणाऱ्या पायवाटेवरचं गवत मार्कोच्या ये-जामुळे चांगलं गुळगुळीत आणि पांढरट झालं होतं. झाडाझुडपांच्या गर्दीमधून मी पुढे निघालो. वाळू तुडवत थोडा पुढे गेलो तोच समोरून मार्को येताना दिसला. नेहमीप्रमाणे अंगभर जाड कपडे घातलेला मार्को हातामधली कागदपत्रांची बॅग झुलवत वेगाने येत होता. त्याच्या मागे थोड्याशा अंतरावरून रोझी येत होती. एकूण रागरंगाचा चेहऱ्यावरून पत्ता लागत नव्हता.

“हॅलो,” मी मोठा उत्साह दाखवून ओरडलो. त्याने माझ्याकडे नजर टाकली. क्षणभर थबकून काहीतरी बोलायला तोंड उघडलं, तसंच ते लगेच मिटलंही. मग मला चुकवून तो ताडताड निघाला. रोझीदेखील झोपेत असल्याप्रमाणे त्याच्या मागोमाग गेली. माझं अस्तित्व तिच्या खिसगणतीतही नव्हतं. तिच्या मागे काही अंतरावर मीही चालत होतो. एखाद्या मालगाडीसारखी आमची वरात बंगल्याच्या गेटमधून आत शिरली. दोघंही चकार शब्दही न बोलता चालले होते. आपणही तोच कित्ता गिरवावा असा मुत्सद्दीपणाचा निर्णय मी घेतला. शिवाय त्यांना साजेलसा विचारमग्न आणि दुर्मुखलेला दिसण्याचा प्रयत्नही करत होतो!

व्हरांड्यात पोचल्यावर तो आम्हा दोघांकडे पाहून म्हणाला, “तुम्ही आत यायची गरज नाही.” तडक आपल्या खोलीत जाऊन त्याने दरवाजा बंद केला.

एवढ्यात जोसेफ स्वयंपाकघरातून बाहेर आला. हातामधील प्लेट पुसत त्याने विचारलं, “जेवणाचं काय? कधी वाढायचं?”

अवाक्षरही न बोलता रोझी पायऱ्या चढली, त्याच्या खोलीचं दार उघडून आत गेली आणि फटकन दरवाजा बंद केला. या भयानक शांततेमुळे माझं डोकं भणभणायला लागलं. तो आमच्याशी वाद घालेल, भांडेल, काहीतरी प्रतिप्रिया दाखवेल असं मला वाटलं होतं. ही शांतता अनपेक्षित होती, त्यामुळेच आता कसं वागावं, काय बोलावं हे समजेनासं झालं. त्याच्या स्वभावाशी संपूर्णत: विसंगत वागण्यामुळे मी प्रचंड गोंधळून गेलो होतो. अशातच गफूरने प्रवेश केला. दातात धरलेली गवताची काडी चघळत त्याने प्रश्न केला, “परत कधी निघायचं?”

गफूरला चांगलंच ओळखत असल्याने हे केवळ निमित्त आहे, इथे काय धमाका चाललाय हे पाहण्यासाठीच तो आत आलाय हे मला माहीत होतं. जोसेफबरोबर चकाट्या पिटल्या असणार. त्याच्याबरोबर रोझीविषयी चर्चा करून आता माझ्याकडून बातमी काढू पाहत होता.

मी कडवटपणे म्हणालो, “गफूर, तुला जायची कसली घाई आहे? इथे थांबलास तर छान तमाशा बघायला मिळेल...”

हे ऐकून तो माझ्याजवळ आला. “राजू, मला लक्षण काही ठीक दिसतनाही. आपण पळू या. त्या दोघांना एकटं राहू दे. काही झालं तरी ते नवरा-बायको आहेत. त्यांची भांडणं तेच मिटवतील. तू कशाला त्यांच्या भानगडीत पडतो आहेस? चल ना. तू तुझं पूर्वीचंच काम करायला लाग. तेव्हा किती आनंदी असायचास, कसलीही फिकीर नव्हती तुला.”

यावर मी काहीही बोललो नाही. त्याचा सल्ला अतिशय रास्त होता. त्याप्रमाणे वागण्याची बुद्धी देवाने मला दिली असती तर आज परिस्थिती किती वेगळी असती...नवऱ्याबरोबरचे मतभेद सोडवण्यासाठी रोझीला तिथेच सोडून मी लगेच निघायला हवं होतं. माझ्या आयुष्यात पुढे ज्या भयंकर उलथापालथी झाल्या त्या तरी टळल्या असत्या. पण तेव्हा हे शहाणपण सुचलं

नाही. गफूरच्या अनाहूत उपदेशामुळे आलेला राग न दर्शवता मी म्हणालो, “तू गाडीजवळ थांब. मी सांगतो काय करायचं ते.”

गफूर कुरकुरतच गेला, पण आपल्याला ही गोष्ट अजिबात आवडलेली नाही हे स्पष्ट करण्यासाठी त्याने गाडीचा हॉर्न - रस्त्यावरच्या टपरीमध्ये चहा पिण्यासाठी उतरलेल्या प्रवाशांना उशीर झाल्यावर वैतागलेला बसड्रायव्हर वाजवतो तसाच - जोराने वाजवला. मी त्याच्याकडे दुर्लक्ष केलं. तेवढ्यात मार्को खोलीतून बाहेर पडला. त्याने व्हरांड्यातून गफूरला आवाज दिला, ‘ड्रायव्हर, तयार आहेस ना?”

“होय साहेब.” गफूर उत्तरला.

“ठीक आहे,” असं म्हणून त्याने बॅग उचलली आणि गाडीच्या दिशेने चालू लागला. मी हॉलमधून काचेच्या खिडकीमधून पाहत होतो. नेमकं काय चाललंय समजेना. मी हॉलचा दरवाजा उघडायचा प्रयत्न केला, पण तो बाहेरून बंद असावा. मी दुसरीकडून धावतच बाहेर पडलो. गाडीजवळ जाऊन बघतो तर मार्को आत बसलादेखील होता. गफूरने अजून गाडी सुरू केली नव्हती. बाकीच्यांचं काय? असं सरळ विचारायची हिंमत झाली नाही म्हणून त्याने किल्ली नीट लागत नसल्याचं नाटक केलं. कुठून हॉर्न वाजवण्याची बुद्धी झाली असं त्याला वाटत होतं. नीट वाजतोय की नाही हे बघायला, की कंटाळा आला म्हणून हॉर्न वाजवला कोणास ठाऊक, पण त्याचा परिणाम असा होईल याची त्याला सुतराम कल्पना नव्हती!

अखेर मीच धाडस केलं. गाडीच्या खिडकीमधून डोकं आत खुपसून त्याला विचारलं, “कुठे चाललात?”

“हॉटेलमध्ये. तिथे हिशेब करून मुक्काम हलवायचाय.”

“म्हणजे काय?” मला धक्का बसला.

त्याने माझ्याकडे प्रोधित नजरेने पाहिलं. "तुला स्पष्टीकरण द्यायची गरज नाही. मी रूम घेतली होती आणि आता ती सोडतोय, बस्स. ड्रायव्हर, तुझं बिलही मलाच दे. रिसिट तयार ठेव म्हणजे झालं."

मी विचारलं, "दुसरं कोणी येणार नाही का?"

त्याने फटकन 'नाही' म्हटलं. मग पुढे म्हणाला, "दुसरं कोणी गाडीत आलं तर मी उतरून जाईन!"

प्रकरण हाताबाहेर गेलं होतं. "ड्रायव्हर," मी अधिकारवाणीने म्हणालो. मी 'ड्रायव्हर' म्हटल्यामुळे गफूर दचकला. तिकडे दुर्लक्ष करत मी हुकूम सोडला, "साहेबांना हवं तिथे सोडून उद्या माझ्यासाठी गाडी घेऊन ये. तुझा संपूर्ण हिशेब करून, त्यांच्याकडून झालेले पैसे मागून घे. माझ्यासाठी गाडी वापरली त्याचं भाडं मी स्वत: देईन. त्यांच्याकडून घ्यायचं नाही." हे उद्धटपणाचं बोलणं मी अधिक वाढवू शकलो असतो, पण त्याने काही साध्य होणार नाही हे समजून मी मार्कोकडे पाहत स्तब्ध उभा राहिलो. अचानक माझ्यात काय संचारलं कोणास ठाऊक, खाडकन गाडीचं दार उघडून मी मार्कोला खेचून बाहेर काढलं.

मार्को जड हॅट, जाड चष्मा घालत असला तरी तसा दुबळाच होता, त्यामुळे त्याला मी सहज उचलू शकलो. सतत गुहांमध्ये भटकंती, भित्तिचित्रांचा अभ्यास यामुळेच बहुधा तो असा अशक्त झाला होता.

"हे काय चाललंय? मला मारतोस की काय आता?" मार्को किंचाळला.

"मला तुमच्याशी फक्त बोलायचंय, तुम्हाला असं जाऊ देणार नाही मी," त्याचा श्वास जोरजोरात चालू होता, ते पाहून मी स्वत:ला सावरलं. माझा आवेश गळून पडला. आणि मी मऊ आवाजात म्हणालो, "आत चला पाहू. शांतपणे जेवून घ्या. मग आपण सविस्तर बोलू, चर्चा

करू. नंतर तुम्हाला हवं ते करा. पण पत्नीला असं वाऱ्यावर सोडून तुम्हाला जाता येणार नाही.' गफूरकडे दृष्टिक्षेप टाकून मी विचारलं, "तुला जायची घाई नाही ना?"

"छे, छे, सावकाश जेवून वगैरे या. भरपूर वेळ आहे."

"मी जोसेफला सांगतो तुलाही जेवण द्यायला." मी यापूर्वीच परिस्थिती ताब्यात घ्यायला हवी होती. प्रकरण हाताबाहेर जाईपर्यंत थांबल्याचं मला वाईट वाटलं.

अचानक मार्कोने तोंड उघडलं, "तू कोण आहेस रे? मी काय करतो याच्याशी तुझा काय संबंध?"

"खूप संबंध आहे. मी मदत केलीय तुम्हाला. तुमच्यासाठी खूप वेळ खर्चलाय. गेल्या अनेक आठवड्यांपासून तुमच्या दिमतीला आहे मी."

"आत्ता, ह्या क्षणापासून मी तुला माझ्या जबाबदारीमधून मुक्त करतोय," मार्के ओरडला. "तुझी जी काही बिलं असतील ती दे आणि चालता हो." एवढा चिडला असला तरी मार्केला रिसिटा मागण्याचं भान होतं!

"सारं काही शांतपणे केलं तर बरं होईल. नीट बसून, सर्व हिशेब करू या. तुम्ही दिलेल्या पैशांमधील थोडे शिल्लक आहेत माझ्याकडे," मी समजुतीने म्हणालो.

"ठीक आहे," तो गुरगुरत म्हणाला. "सगळे हिशेब करून सारं संपवलेलं बरं. त्यानंतर मला तोंड दाखवू नकोस."

"हे उत्तम झालं," मी म्हणालो. "पण मी इथून निघून जाईन, असं मात्र नाही. ह्या बंगल्यात दोन मोठ्या खोल्या आहेत. एकीमध्ये मी राहू शकतो."

एवढं बोलतोय तो जोसेफ अवतीर्ण झाला. "रात्रीच्या जेवणाचं काय?"

"नको आहे," मार्केने विषय संपवला. पण मी माघार घ्यायला तयारनव्हतो.

“मला कदाचित लागेल, पण तुला घाई असेल तर तू जा. मी मुक्कामाला राहिलोच तर तुला निरोप पाठवीन. आत्ता ती दुसरी खोली मला उघडून दे. भाडं मी भरेन.”

“होय साहेब,” असं म्हणून त्याने त्या खोलीचं कुलूप उघडून दिलं. मी मालकाच्या रुबाबात खोलीमध्ये प्रवेश केला. दरवाजा सताड उघडाच ठेवला, मुद्दामच. माझी खोली आहे, मला हवं ते करीन...

खिडकीतून बाहेर नजर टाकली. मावळत्या सूर्यकिरणांचा सोनेरी मुलामा चढलेल्या वनराईचं अत्यंत मनोरम दृश्य पाहून मला रोझीची तीव्रपणे आठवण झाली. तो मोहक सोनेरी गालिचा बघायला तिला खूप आवडलं असतं, पण ती तर खोलीत घुसून बसली होती. केव्हाही त्यांच्या खोलीमध्ये प्रवेश करायचा विशेषाधिकार मी गमावला होता. ‘माझ्या’ खोलीत, एकटाच बसून मी ‘आता काय करावं’ अशा विचारात गढून गेलो. नक्की काय करावं समजत नव्हतं. मार्कोला गाडीतून बाहेर काढलं, परत जाण्यापासून परावृत्त करण्यात यशस्वी झालो हे खरं असलं तरी त्याचा काय फायदा झाला? आपल्या खोलीत जाऊन तो दार बंद करून बसलाय आणि मी इथे एकटा बसलोय. त्याला उगीचच थोपवलं असं वाटायला लागलं. तो गेला असता तर निदान रोझीला बोलतं केलं असतं. तिच्या मनात काय आहे हे जाणून घ्यायची संधी होती. करायला गेलो एक आणि झालं भलतंच...मामला अधिकच गुंतागुंतीचा झालाय. काय करावं? गफूरला हॉर्न वाजवायला सांगावं का? त्यामुळे तरी मार्कोमहाशय बाहेर येतील!

उलटसुलट विचार करत मी कसाबसा अर्धा तास काढला. अजूनही कोणतीच हालचाल, कसलाही आवाज नव्हता. चोरपावलांनी मी स्वयंपाकघरात गेलो. जोसेफ गेला असावा. भांड्यांवरची झाकणं सरकवून पाहिलं. सर्व अन्न तसंच पडलेलं होतं. दोघांचाही भूक हरताळ चालू होता! मार्कोची एकाएकी मला दयाच वाटायला लागली. रोझी तर एकदम मरगळून गेली असणार. तिला दर दोन तासांनी खायला हवं असायचं. हॉटेलवर मी सतत तिच्यासाठी काही ना काही मागवत राहायचो. बाहेर गेलेलो असताना वाटेत ठिकठिकाणी थांबून फळं, खायचे पदार्थ

घेत असायचो. तिला अशी सारखी भूक लागायची आणि आज पोटामध्ये अन्नाचा कणही गेला नाही. गरीब बिचारी! थकून गेली असेल अगदी... शिवाय गुहेपर्यंत चालत जाऊन आली. त्यामुळे अधिकच दमली असणार. हे सर्व लक्षात आल्यानंतर मला तिचा प्रचंड राग आला. खायला काय झालं तिला? अन्नावर कसली नाराजी? निदान काय झालंय ते मला सांगायला काय हरकत होती? चडफडतच मी दोघांसाठी प्लेट भरल्या आणि ट्रेमध्ये घेऊन त्यांच्या खोलीकडे गेलो. दरवाजा अर्थातच बंद होता. मी घुटमळत उभा राहिलो; पण क्षणभरच. जास्त वेळ थांबलो तर कसंबसं एकवटलेलं धैर्य गळून पडेल ह्याची जाणीव असल्याने मी दरवाजा पायाने ढकलून आत शिरलो. रोझी डोळे मिटून कॉटवर पडली होती. (बेशुद्ध तर झाली नाही ना?...) रोझीला अशा केविलवाण्या परिस्थितीत आज प्रथमच पाहत होतो. तो खुर्चीत बसलेला होता. हाताची कोपरं टेबलवर ठेवून, बोटं एकमेकांत गुंतवून त्यावर हनुवटी टेकवली होती. त्यालाही अशा शून्यावस्थेत पूर्वी कधीही पाहिलं नव्हतं. त्याच्याविषयी अपार अनुकंपा मनात दाटून आली. मीच ह्या सर्वाला कारणीभूत होतो. का त्यांच्या भानगडीत नाक खुपसलं? स्वत:ला दोष देत मी जेवणाचा ट्रे त्याच्यासमोर ठेवला.

"आज कोणालाच जेवायची आठवण राहिलेली दिसत नाही. मनावर कसलाही ताण असला तरी जेवणावर का राग काढायचा?"

माझा आवाज ऐकून रोझीने डोळे उघडले. रोझीचे टपोरे, चैतन्याने रसरसलेले डोळे सुजून भप्प झाले होते. तिचे निस्तेज, रडून लाल झालेले डोळे पाहून मी घाबरलोच. तिचा एकूण अवतारच अतिशय दयनीय दिसत होता. ती तशीच उठून बसली. "तू आमच्यासाठी निष्कारण वेळ वाया घालवू नकोस. निघ इथून. माझं फक्त इतकंच सांगणं आहे तुला," हे बोलताना तिचा आवाज कापत होता. घोगऱ्या, जड स्वरात ती पुढे म्हणाली, "मी उगीचच बोलत नाही. खरंच जा इथून."

काय झालंय हिला अचानक? नवऱ्याबरोबर संगनमत करून बोलतेय की काय? मला जा म्हणायचा अधिकार तिला होता हे मात्र खरं. कदाचित एवढे दिवस माझ्या नादी लागल्याचा पश्चात्ताप झाला असावा! अखेर मी इतकंच म्हणालो, "प्रथम तुम्ही जेवून घ्या बघू. उपास करायचं काय कारण?"

"तू आधी इथून जा," ती पुन्हा म्हणाली.

ती ऐकत नाही हे पाहून मी मार्केकडे वळालो, "तुम्ही येताय की नाही?" मार्केने काहीही प्रत्युत्तर दिलं नाही. मुका-बहिरा असल्यासारखं त्याचं वागणं होतं. आमचं संभाषणदेखील त्याने ऐकलं होतं की नाही शंकाच वाटली.

रोझी पुन्हा एकदा कठोर स्वरात म्हणाली, "आम्हाला एकटे सोड म्हणून सांगितलंय ना तुला! तुला ऐकू आलं की नाही?"

तिच्या आवाजामधील जरब ऐकून मी घाबरलोच, तरीही भीत भीत पडेल स्वरात म्हणालो, "तसं नाही... पण मला वाटलं... तुला... किंवा मार्केला खाली जायचं असेल तर... म्हणून मी..."

हे ऐकून ती अधिकच संतापली. "शी:, आम्हा दोघांनाही तू इथे नको आहेस, ही साधी गोष्ट तुला समजत नाही का?"

आता मात्र मलाही राग आला. अठ्ठेचाळीस तासांपूर्वी हीच बाई माझ्या मिठीत होती आणि आता रुबाब दाखवतेय. अपमानकारक, तिखट बोलून तिला तिची पायरी दाखवावी असं तीव्रतेने वाटलं, पण कसंबसं स्वत:ला आवरलं. इथे एक क्षणभरही जास्त थांबलो तर परिस्थिती फारच चिघळेल हे जाणून मी गर्रकन वळालो आणि ताडताड गाडीकडे गेलो. "गफूर, चल, निघायचं." मी गरजलो.

"तू एकटाच?" त्याने विचारलं.

"हो," मी गाडीत बसून धाडकन दरवाजा बंद केला.

"त्या दोघांचं काय?"

"मला माहिती नाही. तुझा हिशेब नंतर कर."

"पण त्यासाठी मला पुन्हा यावं लागेल. त्याचं भाडं कोण देणार?" गफूरला पैशांची चिंता पडली होती.

मी कपाळावर हात मारला. "आता निघ रे बाबा. ते सर्व तू नंतर बघ ना." मी प्रचंड वैतागून म्हणालो.

रागरंग ओळखून गफूर गाडीत बसला आणि अखेर आम्ही निघालो. त्याच्या चेहऱ्यावर सर्व काही जाणणाऱ्या तत्त्ववेत्त्याचे भाव होते! रोझी बघत असेल अशी अंधुक आशा वाटत होती. मी वळून त्यांच्या खिडकीकडे नजर टाकली, पण माझं दुर्दैव. गाडी वेगाने डोंगरवाट उतरू लागली. तत्त्वज्ञ गफूरने मोठ्या गांभीर्याने घोषणा केली, "तुझ्या कुटुंबातील वडीलधाऱ्यांनी आता तुझं लग्न लावून दिलं पाहिजे." मी काहीच बोललो नाही. बाहेर काळोखाचं साम्राज्य पसरायला लागलं होतं. मी विचारमग्न मुकाट बसून होतो. गफूरच पुढं म्हणाला, "राजू, मी तुझ्यापेक्षा बराच मोठा आहे. वयाच्या अधिकाराने सांगतोय - तू आज फार चांगला निर्णय घेतलास. आता बघ, तुझा सर्व त्रास चुटकीसरशी नाहीसा होईल."

गफूरची भविष्यवाणी खोटी ठरली. त्रास नाहीसा होण्याऐवजी शतपटीने वाढलाच. माझी अवस्था अत्यंत दीनवाणी झाली होती. प्रेमभंगाची सर्व अपेक्षित लक्षणं दिसून येत होती. माझी तहानभूक हरपली, झोप उडाली, मन अत्यंत अस्थिर झालं होतं (एका जागी शांत बसणं मला अशक्य व्हायचं). मनाची शांती पूर्णतः गमावून बसलो. सतत चिडचिड, तोडून वागणं-बोलणं - सगळ्या बाजूंनी नन्नाचा पाढा चालू होता. पूर्वीसारखा कामात लक्ष घालण्याचा मनापासून प्रयत्न करत होतो, पण सारंच अतिशय बेगडी, खोटं वाटायचं. दुकान सांभाळणाऱ्या पोराला काढून

टाकलं. स्वत: दुकान चालवायला लागलो. सामान विकायचं, पैसे घ्यायचे- सारं इमाने-इतबारे करायचो, पण मनाच्या एका कोपऱ्यात 'हे मी काय मूर्खासारखं करतोय' हा विचार टोचत राहायचा. स्टेशनवर गाडी आली की फलाटावर चकरा मारायचो. एक तरी उतारू माझी चौकशी करत यायचाच.

एकदा लठ्ठ कुटुंबप्रमुख, पत्नी आणि दोन मुलं असा सर्व परिवार आला. लठ्ठ माणसाने मला विचारलं, "रेल्वे राजू तूच का?" मी हो म्हटल्यावर तो भडाभडा बोलू लागला, "हे बघ, आम्ही अमुकतमुक गावामधून आलो आहोत. त्या ह्याने तुझं नाव सुचवलं. तू आम्हांला नक्की मदत करशील असं तो म्हणाला... एक म्हणजे माझ्या पत्नीला शरयू नदीच्या उगमस्थानी पवित्र पुंडामध्ये स्नान करायचंय. मला हत्तींचा तळसुद्धा बघायचाय. तू आणखी काही प्रेक्षणीय जागा सुचवल्यास तरी चालेल. पण फक्त तीन दिवस आहेत माझ्याकडे. तेवढ्यात सर्व उरकून घ्यायचंय. एक तासाचीही जास्त सुट्टी मिळाली नाही. मला अमुकतमुक तारखेला कामावर हजर व्हायचंय..."

मी प्रवाशांच्या चर्पटपंजरीकडे दुर्लक्ष करायचो. ते काय बोलणार हे मला आधीच माहिती असायचं. मात्र त्यांच्या प्रयाणाची वेळ आणि आर्थिक परिस्थिती अर्थात पैसे खर्चायची कुवत किती आहे ह्या गोष्टी मी ध्यानात ठेवायचो. खरं पाहता पैशाचीदेखील मला तितकीशी पर्वा नसायची. अत्यंत यांत्रिकपणे मी माझ्या जबाबदाऱ्या पार पाडत असे. गफूरला बोलवायचं, त्याच्या गाडीत पुढच्या सीटवर बसून पर्यटकांना प्रेक्षणीय स्थळं दाखवायला निघायचं असा माझा खाक्या होता. न्यू एक्स्टेन्शनमधून जाताना मी वळूनही न बघता 'सर फ्रेडरिक लॉलींचा पुतळा' अशी माहिती द्यायचो. 'हा कोणाचा पुतळा?' हा प्रश्न नेमका कधी येणार हे मला सवयीने माहिती असायचं. पुढचा प्रश्न कोणता असेल हेदेखील मला माहीत असल्याने माझं उत्तर तयार असे, "रॉबर्ट क्वाईव्हने ह्या जिह्याचा कारभार चालवण्यासाठी त्याची नेमणूक केली होती. त्याने जिह्याचा उत्तम विकास केला, धरणं, तलाव बांधले. चांगलं कार्य केलं त्यामुळे

त्याचा पुतळा उभारलाय." विनायक स्ट्रीटवरील दहाव्या शतकामधील ईश्वर मंदिर दाखवताना माझी पोपटपंची सुरू होई, "ही भित्तिचित्रं लक्षपूर्वक पाहा. संपूर्ण रामायण कोरीव चित्रांमधून साकार झालेलं दिसून येईल..." वगैरे वगैरे. शरयू नदीच्या उगमावरील पवित्र पुंडामध्ये बाईसाहेबांना स्नान करायचं असे. मी पहाटे धुक्यामध्ये हरवलेल्या मेम्पी पर्वतशिखरावर त्यांना घेऊन जायचो. 'मला पवित्र स्नान वगैरे करायचं नाही' असं म्हणणारे पतिदेवही अखेर पत्नीचा कित्ता गिरवायचे! स्नान झाल्यानंतर गाभाऱ्यामधील गंगा नदीचा अजस्र स्रोत मस्तकावर झेलत असलेल्या भगवान शंकराची प्राचीन मूर्ती दाखवायचो.

ठरल्यानुसार कर्तव्यं पार पाडून माझा मोबदला घ्यायचा, गफूर आणि बाकीच्यांकडून कमिशन वसूल करायचं आणि दुसऱ्या दिवशी पाव्हण्यांची रवानगी करायची. सारं काही यंत्रवत, कमालीच्या निरुत्साहाने पार पाडायचो. मनामध्ये अखंडपणे रोझीचेच विचार असायचे. 'त्या माणसाने तिला उपाशी ठेवून मारून टाकलं असणार...किंवा छळून तिला वेड लावलं असेल... जंगलामध्ये वाघांच्या तोंडी दिलं असेल...' असे विचित्र विचार घोळायचे. माझी विमनस्क, दु:खी अवस्था पाहून आईला चिंता वाटू लागली. "काय झालंय तुला?" ह्या तिच्या प्रश्नावर मी 'काही नाही' असं उत्तर दिलं.

घरामध्ये मी एवढा वेळ काढतोय हे पाहून आईला नवल वाटायचं. मी उदास बसलेला पाहून ती अस्वस्थ व्हायची, पण फार खनपटीला बसायची नाही. माझे रोजचे व्यवहार व्यवस्थित चालत होते - जेवण, झोप, फलाटावर फेऱ्या, प्रवाशांना स्थळदर्शन वगैरे गोष्टी मी करत असलो तरी त्यांमध्ये माझं मन नसायचं. कायम अशांती, खळबळ, विचारचक्र ह्यातच मी गुरफटलेला असायचो. काय होतंय हे मलाच समजेनासं झालं होतं. बाह्यांगी मी शांत होतो, सर्व कामं करायचो. ही शांतता अनैसर्गिक आहे हे माहीत असलं तरी मी असा शांत कसा हे मात्र समजायचं नाही. 'तो मोठ्या मनाने आपली पत्नी माझ्या हवाली करेल' अशी स्वप्नं मी बघत होतो. 'तू माझ्या पत्नीची काळजी घेणार आहेस, तिच्या नृत्यकलेची जोपासना करणार आहेस

ह्या गोष्टीचा मला मनापासून आनंद आहे. मलाही गुहांचा अभ्यास करायला वेळ मिळेल. तू खरोखर फार चांगला आहेस. तुझ्यामुळे आम्हा दोघांना आपापल्या इच्छा पूर्ण करता येणार आहेत,' असं म्हणून तो माझे आभार मानेल किंवा मला लाथ मारून हाकलून तरी देईल, ह्या दोन्ही गोष्टींपैकी एक घडेल अशी माझी अपेक्षा होती. पण हे काहीतरी भलतंच होतंय. खरं म्हणजे काहीच होत नाहीये. कुठून तरी हे त्रांगडं सुटायला हवं होतं. ह्यामध्येही सर्वांत आश्चर्याची गोष्ट म्हणजे तिनेही मला वाऱ्यावर सोडलं. नवऱ्याची किती हिरिरीने बाजू घेतली होती... तिच्या कपटीपणामुळे मी थक्क झालो होतो. पुन:पुन्हा तिचे वाक्बाण माझ्या हृदयाला विद्ध करायचे. ती असं का वागली ह्या विचाराने माझं डोकं गरगरायचं. गफूरशी ह्या विषयावर मी चकार शब्द बोलत नसे. माझ्या भावनांची कदर करून तोही त्यांचा उल्लेख करायचा नाही. असं असूनही माझं मन गफूर त्यांचं काय चाललंय हे सांगेल अशी वेडी आशा करायचं. कधी कधी गफूरची गाडी माझ्यासाठी उपलब्ध नसे, तेव्हा तो पीक हाऊसला गेलाय हे मी समजून जाई. मी आनंदभवनच्या जवळपासही फिरकत नसे. माझ्या गिऱ्हाइकांना 'ताज'मध्ये पाठवायचो. आनंद भवनचा हिशेब मार्के परस्पर करणार होता. त्याप्रमाणे तो सर्व पैसे चुकते करणार ह्यामध्ये जराही शंका नव्हतीच. मला हॉटेल तसंच गफूरकडून कमिशन मिळायचं, पण मला कसलीच इच्छा नव्हती. माझ्या अंध:कारमय जीवनात पैशासारख्या रूक्ष गोष्टींना स्थान नव्हतं. थोडेफार पैसे असतीलच... आई पूर्वीसारखंच व्यवस्थित घर चालवत होती म्हणजे पैशांची कमी नव्हती. शिवाय दुकानही चालू होतं. गफूरचे पैसेही मार्केने दिले असणार. पण तो चकार शब्दानेही सांगत नव्हता. एका अर्थी तेच बरंय... मलादेखील त्या कटू आठवणी विसरायच्याच होत्या.

आयुष्यातील तोचतोचपणाचा मला प्रचंड कंटाळा आला. गेल्या काही दिवसांच्या रोमहर्षक, प्रेममय अनुभूतीनंतर माझं आजचं जीवन अत्यंत निरस वाटत होतं. पर्यटकांना प्रेक्षणीय स्थळं दाखवत हिंडणं कटकटीचं व्हायला लागलं. स्टेशनवर जाणंच मी टाळायला लागलो. हमालाच्या मुलावर ती जबाबदारी सोपवली. पूर्वीदेखील त्याने गाइडगिरी केली होतीच. अर्थात माझी सर

त्याला नव्हती. पर्यटकांना माझ्या बोलण्याची, माहिती देण्याची पद्धत आवडत होती. मी त्यासाठीच तर प्रसिद्ध होतो. पण अलीकडे माझ्यातील सर्व उत्साह नाहीसा झाला होता. नाइलाजाने कर्तव्य पार पाडणाऱ्या माझ्यासारख्या गाइडपेक्षा लोकांना तो पोरगाच अधिक बरा वाटत असावा. निदान तो काम मन लावून मोठ्या आवडीने करायचा. कोणी सांगावं, लोक - आणि तो स्वत:ही - त्यालाच रेल्वे राजू समजत असतील!

असा किती काळ निघून गेला? फक्त एक महिना, पण माझ्या खिन्न मनाला मात्र वर्षानुवर्षं लोटली असावीत असं वाटत होतं. एका दुपारी मी असाच सुन्नावस्थेत झोपेची आराधना करत जमिनीवर पडलो होतो. जरा डोळा लागत होता तेवढ्यात मद्रास मेल स्टेशनवर आल्याचा आवाज आला. एकच गोंधळ, कलकलाट सुरू झाला. माझी झोपमोड झाली. अखेर साडेचार वाजता गाडी निघाली. झुकझुक आवाज कमी होत अखेर ऐकू येईनासा झाला. पुन्हा झोपायचा प्रयत्न करत होतो तोच आई जवळ आली. "बाहेर कोणी तरी आलंय. तुझी चौकशी करताहेत," एवढंच सांगून ती आत गेलीसुद्धा.

झोपेचा नाद सोडून अखेर मी उठलो. बाहेर जाऊन पाहिलं तर दारात रोझी! पायाशी ट्रंक आणि खांद्यावर बॅग लटकवलेली होती. "रोझी? येणार आहेस ते कळवलं का नाहीस? दारात का उभी? आत ये ना. दार उघडलं ती माझी आई," असं म्हणून मी तिची ट्रंक उचलली. तिला काहीही प्रश्न केले नाहीत. 'काय झालं, तू इथे कशी...' मला काही जाणून घ्यायचं नव्हतं. केवळ 'ती आली आहे' हेच पुरेसं होतं. मला काही सुचेना. पुरता भांबावून गेलो मी. "आई," मी आनंदाने ओरडलो. "ही रोझी. पाहुणी आलीय आपल्याकडे."

आई शिष्टाचारादाखल बाहेर आली. हसून तिने रोझीचं स्वागत केलं. "त्या चटईवर बस ना. नाव काय तुझं?" आईने विचारलं. 'रोझी' हे नाव ऐकून आई दचकली. अशा आधुनिक नावाची तिला अपेक्षा नसावी. 'रोझी' नावाच्या मुलीला आपल्या घरामध्ये कसं ठेवून घ्यायचं ह्या विचाराने ती घाबरली.

मी अवघडून गेलो. माझा अवतार प्रेक्षणीय होता. आज दाढीही केली नव्हती. केस पिंजारलेले, मळकट, चुरगळलेलं धोतर, गंजीला भोकं पडलेली. छातीवर हात बांधून मी भोकं लपवायचा प्रयत्न केला. अर्थात त्यामुळे फारसा फरक पडण्याची शक्यता नव्हती. तिने मला अत्यंत वाईट अवस्थेत पाहिलं हे सत्य बदलता आलं नसतं. फाटकी चटई - हे घर बांधलं तेव्हापासून आहे ती - अंधारलेलं माजघर, धुरकटलेल्या भिंती आणि फरशा...घराचा अवतारही फारसा वेगळा नव्हता. मी शरमून गेलो. तिच्यावर छाप पाडण्यासाठी मी किती धडपडायचो. क्षणार्धात सारं मातीमोल झालं होतं. माझं रोजचं राहणीमान असंच असतं असं ती समजली तर? तिची काय प्रतिप्रिया होईल देवालाच माहीत...फाटका का होईना, मी बनियन घातला होता हे माझं नशीबच म्हणायला हवं. घरात असताना उघडाबंब राहायची माझी सवय होती. माझ्या केसाळ छातीकडे आईचं लक्षही नसे, पण रोझी...अरे देवा -

आई आत स्वयंपाकघरात काहीतरी काम करत होती. पण पाहुण्यांना एकटं सोडणं सभ्यतेला धरून नाही ह्याची जाण असल्याने ती मध्येच बाहेर आली. ‘रोझी’ नाव असलं तरी काय झालं, ‘अतिथी देवो भव’ ह्या नात्याने तिचा पाहुणचार योग्य रीतीने करायलाच हवा. गप्पा मारायच्या उद्देशाने आई तिच्याशेजारी चटईवर स्थानापन्न झाली. तिच्या पहिल्याच प्रश्नाने रोझीची विकेट पडली, “तुझ्याबरोबर कोण आलंय, रोझी?” रोझी गडबडली, शरमून तिने माझ्याकडे पाहिलं. माझी फाटकी अवस्था तिला फार जवळून दिसू नये म्हणून मी मागे सरकलो.

“आई, मला वाटतं ती एकटीच आली आहे,” मी परस्पर उत्तर दिलं.

ह्या गोष्टीचं आईला फारच नवल वाटलं. ती अचंबित स्वरात म्हणाली, “आजकालच्या मुली म्हणजे... किती धीट आहेस तू! आम्हाला तर साधं नाक्यावर जाण्यासाठीही सोबत लागते. बाजारात तर मी पूर्ण आयुष्यात फक्त एकदाच गेले असेन, तेही राजूचे बाबा होते तेव्हाची गोष्ट.”

ह्यावर काय बोलावं हे नकळून रोझी गप्प राहिली. भुवया उंचावून तिने डोळे विस्फारले हे मात्र खरं. मी तिला नीट निरखून पाहत होतो. काहीशी फिकुटलेली, चेहऱ्यावर तणाव दिसत असला तरी त्या दिवशीची रडून डोळे सुजलेली, कठोरपणे मला निघून जायला सांगणारी रोझी आणि ही रोझी खूप वेगळ्या होत्या. थोडी दुबळी वाटत होती, पण आवाजात मार्दव होतं. तणाव असला तरी कसलीही फिकिर नसल्यासारखी वागत होती. आई आदरातिथ्य दाखवत म्हणाली, "पाणी उकळत ठेवलंय. कॉफी देते तुला. आवडते ना?" संभाषणाची गाडी दुसरीकडे वळलेली पाहून मी सुटकेचा नि:श्वास सोडला. खाजगी प्रश्न विचारण्याऐवजी आई असंच काही बोलेल तर बरं असा विचार करतोय तोच आईची सरबत्ती चालू झाली, "कुठून आलीस? कोणत्या गावाहून?"

मीच चटकन म्हणालो, "मद्रासहून."

"इथे कशाला आलीस?"

"तिच्या स्नेह्यांना भेटायला आली आहे," मी.

"लग्न झालंय का तुझं?"

"नाही," मीच सर्व उत्तर देतोय हे पाहून आईने माझ्याकडे तिरकस कटाक्ष फेकला. मग रोझीकडे मोर्चा वळवून तिने मायेने विचारलं, "तुला तमीळ समजत नाही का?"

आता तोंडाला कुलूप लावणं शहाणपणाचं होतं. रोझीनेच तमीळमध्ये उत्तर दिलं, "घरात आम्ही तमीळच बोलतो."

"कोण कोण आहे घरात?" सटकन पुढचा प्रश्न आला.

"माझे काका, काकी, आणखी..." रोझीचा आवाज क्षीण झाला.

"तुझ्या वडिलांचं नाव काय?" नको तो प्रश्न आलाच.

रोझीसाठी हा फारच अवघड प्रश्न होता. तिला फक्त आई माहीत होती. आईविषयी ती नेहमी बोलायची, पण पित्याचा उल्लेख कधीच तिच्या संभाषणात येत नसे. मीही तिला कधीच छेडलं नव्हतं. रोझीने क्षणभर काहीच उत्तर दिलं नाही. मग हळूच म्हणाली, “मला... वडील नाहीत.”

हे ऐकून आईचं मन विरघळलं. “अरेरे, गरीब बिचारी, आईबापाविना पोरकी. काका नीट सांभाळतात ना तुला? बी.ए. झालीस का?” आईने कनवाळूपणे विचारलं.

आता मी उत्तर दिलं, “बी.ए. तर आहेच, पण तिने एम.ए.सुद्धा केलंय.”

“वा, वा, फारच छान.” आई खूष झाली. “खूपच हिमतीची आहेस तू. आता कसलीही चिंता करायला नको. जगामध्ये कुठेही तुझं अडून राहणार नाही. आम्हा अडाणी, अशिक्षित बायकांसारखं तुला दुसऱ्यांवर अवलंबून राहायला नको. तिकीट काढायचं असलं, कोणी त्रास दिला, पोलिसला बोलवायचं असेल तर तुला कोणाचीही मदत घ्यायला नको. पैसेही कमावता येतील नोकरी करून. काय करणार आहेस? सरकारी नोकरी? खूपच धीराची आहेस तू.” आईला तिचं फारच कौतुक वाटत होतं. आत जाऊन ती कॉफी घेऊन आली. रोझीला कॉफीची गरज होतीच. तिने मोठ्या कृतज्ञतेने कॉफी संपवली.

मी स्वत:चा अवतार कसा सुधारता येईल, त्यासाठी हळूच कसं सटकता येईल ह्या विवंचनेत होतो. आमच्या पिताश्रींच्या वास्तुशास्त्रामधील अगाध अज्ञानामुळे रोझीच्या नकळत ‘सटकणं’ केवळ अशक्यच होतं. मोठा हॉलआणि स्वयंपाकघर एवढंच आमचं घर. अर्थात घराबाहेर ओटा होता. येणारे-जाणारे, पुरुष पाहुणे तिथेच बसायचे. पण रोझीला तिथे बसायला सांगणं बरं दिसलं नसतं. एक तर ती सार्वजनिक जागा होती. दुकानातला मुलगा, गिऱ्हाइकं-सगळेच तिला बघायला जमले असते. नसत्या चौकशा करून तिला हैराण केलं असतं सगळ्यांनी. फारच त्रांगडं झालं होतं.

आजपर्यंत अशी अडचण झाली नव्हती. बाहेरच्या हॉलमध्ये आम्ही तिघंही आरामात राहायचो. बाबा दिवसभर दुकानात, मी दिवसभर झाडाखाली खेळत असायचो. पाहुण्यांना बाहेरच्या ओट्यावरच बसवायचो. आई, कोणी बाईमाणूस आलं तर हॉलमध्ये बसायचे. फक्त रात्री झोपायलाच आम्ही आत जायचो. उकडत असलं तर रात्रीदेखील ओट्यावर पथारी टाकत असू. आमचा हॉल म्हणजे 'पॅसेज, प्रसाधन करायची खोली, दिवाणखाना, अभ्यासाची खोली' असा सर्वगुणसंपन्न होता! माझा दाढीसाठी लागणारा आरसा तिथेच भिंतीवर अडकवलेला होता. माझे कपडेही तिथेच खुंटीवर टांगून ठेवायचो. अंघोळीसाठी मागच्या अंगणात आडोसा केलेला होता. बाजूलाच विहीर होती. तीमधून पाणी काढून घडाघडा डोक्यावर ओतायचं असा माझा खाक्या होता. ह्या सर्व नित्यप्रमांची मला आणि आईला सवय होती. एकमेकांना आम्ही चालवून घ्यायचो, पण आता रोझी असल्यावर काय होणार ?

आईला बहुधा माझी घालमेल समजली असावी. ती रोझीला म्हणाली, "मी विहिरीवर जातेय. तू येतेस का माझ्याबरोबर ? तू शहरी वातावरणात वाढली आहेस. गावात कसं राहावं लागतं हेही शिकून घे." ती निमूटपणे उठून आईच्या मागोमाग गेली. आई तिथे तिची उलटतपासणी घेणार नाही अशी मी मनोमन प्रार्थना केली. दोघींची पाठ फिरताक्षणी मी युद्धपातळीवर कामाला लागलो. घाईघाईने दाढी खरडली, थोडं कापलंदेखील. अंघोळ उरकली, केस वगैरे विंचरून बरे कपडे घातले. दोघीजणी विहिरीवरून परतल्या तोपर्यंत मी राजकुमारीच्या दरबारात पेश होण्याइतपत नीटनेटका तयार झालो होतो. दुकानातील पोऱ्याला गफूरला आणण्यासाठी पिटाळलं.

"रोझी, तुला कपडे वगैरे बदलायचे असतील तर बघ. मी बाहेर थांबतो. नंतर आपण बाहेर जाऊ," मी म्हणालो. गफूरच्या गाडीची चैन खरं पाहता परवडण्याजोगी नव्हती. पण अन्य मार्ग नव्हताच. घरात आईसमोर तिच्याशी काहीही बोलणं शक्य नव्हतं. पूर्वी तिच्याबरोबर चालत

गेलो असेन, पण आज परिस्थिती वेगळी होती. तिला सोबत घेऊन उघडपणे रस्त्यावरून जायचं ह्या गोष्टीची मला चक्क लाज वाटत होती.

"ती परत आलीय," मी गफूरला म्हणालो.

"माहितीय मला," तो म्हणाला. "ते हॉटेलवर होते. तो आत्ता मद्रासच्या गाडीने गेला."

"तू काहीच बोलला नाहीस मला?"

"मी कशाला सांगू? नाहीतरी तुला समजणारच होतं."

"पण काय झालं तरी काय?"

"तिलाच विचार की. खिशात तर टाकलंच आहेस तिला," गफूर कडवट आवाजात म्हणाला.

मी त्याला चुचकारत म्हणालो, "गफूर, अरे बाबा, रागावू नकोस माझ्यावर... संध्याकाळी मला गाडी हवी आहे."

"बंदा आपल्या सेवेसाठी हजर आहे. तुम्हाला हवं तेव्हा आणि हवं तिथे फिरवण्यासाठीच तर मी गाडी ठेवलीय," असं म्हणून गफूरने डोळा मारला. त्याचा मूड ठीक झाला हे पाहून मलाही बरं वाटलं. रोझी दाराशी आली तेव्हा मी आत जाऊन आईला सांगून आलो, "जरा वेळ बाहेर जाऊन येतोय."

आम्ही गाडीत बसलो. गफूरने आरशामधून आमच्याकडे पाहिलं. "कुठे जायचंय?"

काही न सुचून आम्ही काहीसे घुटमळलो. "पीक हाऊसकडे जायचं का?" गफूर आम्हाला चिडवत म्हणाला.

हे ऐकून रोझी घाबरलीच. "नको नको." पीक हाऊसचं नावही घेऊ नकोस." मीही तो विषय पुढे वाढवला नाही.

गाडी ‘ताज’ हॉटेलवरून जात होती. “इथे जायचं का? काहीतरी खाता येईल.” मी विचारलं.

“तुझ्या आईने कॉफी दिली ना. बस झाली तेवढी. खूप चांगलीय तुझी आई.”

“खरंय, फक्त ती तुला लग्नाविषयी विचारते ते बरोबर नाही...!” ह्या विनोदावर आम्ही सारेच माफक हसलो.

“गफूर, नदीवर जाऊ या.” त्याने बाजारच्या रस्त्यामधून गाडी काढली.

संध्याकाळची वेळ असल्याने खूप गर्दी होती. गफूर उतावीळपणे हॉर्न वाजवत लोकांच्या गर्दीतून वाट काढत चालला होता. रस्त्याच्या दोन्ही बाजूंच्या दुकानांमध्ये दिवे लागले होते. त्या प्रकाशात रस्ता न्हाऊन निघाला होता. गफूरने एलामन स्ट्रीटवरून गर्रकन गाडी वळवली. हा शहरामधील सर्वांत जुना रस्ता. तेलाच्या व्यापाऱ्यांची वस्ती. मुलं रस्त्यामध्ये खेळत असायची. गाई रवंथ करत बसलेल्या. गाढवं, कुत्री अरुंद रस्ता अडवून उभी असायची. ह्या सर्व प्राण्यांना चुकवून गाडी चालवताना बाजूच्या घरांच्या भिंतीवर खरचटण्याचा धोका असे. नदीवर जाण्यासाठी दुसरा चांगला रस्ता असूनही गफूर मुद्दाम इथूनच गाडी काढायचा. मोठ्याने हॉर्न वाजवल्यानंतर रस्त्यावरचे प्राणी सैरावैरा धावायचे तेव्हा त्याला आसुरी आनंद होत असे. एलामन स्ट्रीट संपायचा तिथे दिव्याचा अखेरचा खांब असे. तिथून पुढे नदीकिनाऱ्यावरची वाळू पसरलेली होती. तिथे पोहोचल्यावर गफूरने गचकन ब्रेक दाबून गाडी थांबवली. त्या धक्क्याने आम्ही जवळजवळ बाहेर फेकलो गेलो! गफूर आज जरा जास्तीच गमत्या मूडमध्ये होता. त्याचे मूड कधी आणि कसे बदलतील हे कधीही सांगता येत नसे. आत्तादेखील ‘आम्ही जरा फिरून येतो’ असं मी म्हणालो तेव्हा त्याने चावटपणे डोळे मिचकवले.

एव्हाना गडद संध्याछाया पसरल्या होत्या. नदीकिनाऱ्यावर अजूनही तुरळक लोक दिसत होते. विद्यार्थी पाय मोकळे करायला आले होते. वाळूत खेळणाऱ्या लहान मुलांची मस्ती, आरडाओरडा चालू होता. काही जणांचं संध्यास्नान चालू होतं. दूरवर नलाप्पाच्या आमराईजवळ

गाईगुरं नदी पार करत होती. त्यांच्या गळ्यातील माळांचा किणकिणाट कानावर येत होता. आकाशात ताऱ्यांची चमचम दिसू लागली. तालुका ऑफिसमधल्या घड्याळाने सातचे टोल दिले. सारं काही सर्वांगसुंदर होतं. नदीकिनाऱ्यावरील संध्याकाळ कायमच अशी तरल, स्वप्नवत वाटायची. वाळूत बागडणारी ही मुलं मोठी होतच नाहीत की काय...हे दृश्य मी वर्षानुवर्षं पाहत आलोय, पण आज जरा जास्तच भावुक आणि काव्यात्म वाटत होतं. बहुधा माझी प्रिय सखी सोबत असल्यामुळे असावं. "किती सुरेख संध्याकाळ आहे ना..." मी सुरुवात केली. ती नुसतं "हो" म्हणून गप्प बसली. काहीशी एकांत जागा पाहून आम्ही वाळूत बसलो.

बसण्यापूर्वी मी तिच्यासाठी रुमाल अंथरला. पण तो बाजूला सारून ती वाळूवर बसली. अंधाराचा फायदा घेऊन मी तिच्या निकट बसून म्हणालो, "काय काय घडलं ते अगदी सुरुवातीपासून सांग."

थोडा वेळ ती विचार करत शांत बसून राहिली. मग हळूच म्हणाली, "तो आज दुपारच्या गाडीने निघून गेला. बस, इतकंच घडलं."

"तू त्याच्याबरोबर का गेली नाहीस?"

"कोण जाणे...खरं तर मी त्यासाठीच आले होते. पण तसं घडलं नाही. जाऊ दे...हेच ठीक आहे. आम्ही एकमेकांसाठी अनुरूप नाही हेच खरं."

"पण नक्की काय झालं सांग ना. त्या दिवशी माझ्याशी एवढ्या कठोरपणे का वागलीस?"

"आपण एकमेकांना विसरलेलं चांगलं, मी त्याच्याकडे परत गेलेलं सर्व दृष्टीने योग्य होईल असं मला वाटलं."

तिने सर्व घटना क्रमवार सांगाव्यात अशी माझी अपेक्षा होती. पण तिला तसं जमत नव्हतं आणि मलादेखील नेमके कोणते प्रश्न आणि कशा तऱ्हेने विचारावेत हे समजत नव्हतं. ती घटनाक्रम पुढे-मागे करत होती. त्रोटक आणि तुटक माहितीमुळे मी कमालीचा गोंधळलो.

सहनशक्तीचा अंत होऊन मी अखेर म्हणालो, “तसं नको. मी तुला सुरुवातीपासून एकेक प्रश्न विचारतो. तू त्यानुसार उत्तर दे. पहिला प्रश्न : आपण चर्चा करून एक प्रस्ताव त्याच्यासमोर मांडायचा असं ठरवलं होतं. त्याप्रमाणे तुला त्याच्याजवळ सोडून मी परतलो. तू काय सांगितलंस ? काय बोलणं झालं ?”

“आपण ठरवलं होतं तेच - त्याने मला नृत्य करायला परवानगी द्यायची. पण मी लगेचच तो विषय काढला नाही - त्या दिवशी आणि दुसऱ्या दिवशी संध्याकाळपर्यंतसुद्धा नाही. प्रथम मी त्याच्या कामाविषयी चौकशी केली. आवडीचा विषय असल्याने त्यानेही मोठ्या उत्साहाने टिपणं, नोंदी, चित्रांच्या प्रतिकृती दाखवल्या, त्यांचं महत्त्व समजावून सांगितलं, इतिहास नव्याने लिहावा लागेल असंही मोठ्या अभिमानाने म्हणाला. रात्री उशिरापर्यंत आम्ही बोलत बसलो होतो. दाट वनराईमधील बंगल्यामधील एकांत, वृक्षांची सळसळ, निशाचरांची चाहूल अशा अनोख्या वातावरणात आमच्यामधील जवळीक, समजूतदारपणा वाढत होता. मला अनेक गोष्टी समजत नसूनही मी अत्यंत समरसून सारं ऐकत होते. संशोधन प्रसिद्ध करायची त्याची इच्छा होती. मेक्सिको, तसंच अतिपूर्वेकडील काही देशांमध्ये ह्याच तऱ्हेचं काम करून त्याचे तपशीलही आपल्या शोध-निबंधामध्ये समाविष्ट करायची उत्साही योजनाही त्याच्या मनात होती.

दुसऱ्या दिवशी सकाळी आम्ही गुहेमध्ये गेलो होतो. स्वरलिपी कोरलेली भित्तिचित्रं मला पाहायची होती. मुख्य गुहा पार करून पुढे झिजलेला जिना आहे, तो ओलांडून गेल्यावर तळघर लागतं. तिथेच ती चित्रं आहेत. गूढ, भीतिदायक आहे ती जागा. एरवी अशा काळोख्या, कोंदट आणि भयानक जागी मी पायही ठेवला नसता, पण आजची गोष्ट वेगळी होती. ‘साप असतील इथे’ मी घाबरून म्हणाले. ‘पण तुला तर साप बघायला आवडतात ना ?’ तो असं म्हणाला तेव्हा मीही त्याच्याबरोबर हसले. कंदिलाच्या प्रकाशात त्याने ती भित्तिचित्रं मला दाखवली. अन्य प्राचीन शिल्पांसारखीच ही होती - विचित्र, विविध प्रकारच्या आकृत्या कोरलेल्या होत्या, पण त्याला त्या आकृत्यांमध्येच अक्षरंही दिसली होती - स्वरलिपी. मला त्यामधील अवाक्षरदेखील

समजलं नाही. आणि नृत्यासाठी त्याचा काही उपयोगसुद्धा करता आला नसता. प्राचीन संगीत कलेविषयी काहीतरी अमूर्त, कठीण सिद्धांत होता तो - पद्यरूपाने मांडलेला. 'नृत्यकलेविषयी असतं तर मला प्रयत्न...' मी एवढंच बोलले, तो त्याने माझ्याकडे तीव्र कटाक्ष टाकला. 'नृत्य' हा शब्द नुसता ऐकूनही तो नेहमी कमालीचा चिडत असे. मी घाबरून गप्प बसले. पण अचानक माझ्यामध्ये धैर्य एकवटून आलं. अंधारलेल्या, जळमटं लागलेल्या त्या पुरातन गुहेमध्ये, वटवाघळांच्या साथीने, कंदिलाच्या मिणमिणत्या प्रकाशात मी त्याला विचारलं, 'मला नृत्य करायची परवानगी देणार का?'

कपाळाला आठ्या घालून तो फटकन म्हणाला, 'का?' त्याच्या आत्तापर्यंतच्या आनंदी, उत्फुल्ल चेहऱ्यावर पूर्वीसारखाच रागीट भाव दिसू लागला.

'मला फार आनंद होईल. नृत्य करायला मिळालं तर...माझ्या मनात कितीतरी नवनवीन कल्पना आहेत. मला त्या प्रत्यक्षात उतरवायला आवडेल. तू तुझ्या कामामध्ये जसा...'

'अच्छा. म्हणजे माझ्याशी स्पर्धा करायची आहे तर तुला? माझ्या संशोधनासाठी खूप अभ्यास करायला लागतो. डोंबाऱ्याच्या कसरती नाहीतत्या.'

'नृत्य म्हणजे डोंबाऱ्याच्या कसरती वाटतात तुला?' मला धक्काच बसला.

'ह्या विषयावर मला विनाकारण चर्चा करायची नाही. डोंबारी जन्मभर त्याच त्या कसरती करतात तसाच तुझा नाच आहे. त्यामध्ये सर्जनशील किंवा बौद्धिक असं काय आहे? कायम तशाच हालचाली पुन:पुन्हा करायच्या ही तुमची नृत्यकला! माकडाचा खेळ आपण का पाहतो? त्यामध्ये कलात्मक काय असतं? एक माकड तो खेळ करत असतं ह्या एकमेव कारणासाठी तो खेळ पाहायला लोक गर्दी करतात...' त्याचं मतपरिवर्तन होईल ह्या आशेवर मी हे सारे अपमान मुकाट्याने सहन करत होते. मी संभाषणाची गाडी दुसरीकडे वळवली. नंतर तो आपल्या कामात गुंतला आणि मीही त्याला डिवचलं नाही. रात्रीच्या जेवणानंतर तो अभ्यासिकेत गेला आणि मी व्हरांड्यात बसून जंगली जनावर दिसतंय का ह्याची वाट पाहू लागले. अर्थात

नेहमीप्रमाणे आजही कोणी फिरकलं नाहीच. मनामध्ये विचारचक्र चालू होतं. तो काय बोलला, त्यावर मी कोणतं प्रत्युत्तर दिलं ह्याची उजळणी वारंवार चालू होती. ह्यातून मार्ग कसा काढायचा, त्याचं मन कसं वळवायचं हेच समजेनासं झालं होतं. अखेर तो तयार होईल, होकार देईल ह्या आशेवरच मी त्याचे विखारी वाग्बाण, जळजळीत अपमानास्पद शब्द सहन करत होते. त्याच्या एका होकाराने मी सारं विसरून गेले असते. मी अशी विवंचनेत बसले असताना तो माझ्यामागे येऊन उभा राहिला. माझ्या खांद्यावर हात ठेवून म्हणाला, 'ह्या विषयावर आपण अंतिम निर्णय घेतला होता ना? पुन्हा कधीही हा प्रश्न विचारणार नाही असं वचन तू मला दिलं होतंस की नाही?"

तालुका ऑफिसच्या घड्याळाने आठचे टोले दिले. एव्हाना नदीकिनारी शुकशुकाट झाला होता. आम्ही दोघंच वाळूमध्ये बसलेलो होतो. अजूनही मला नीटसं काहीच समजलं नव्हतं. गफूरने हॉर्न वाजवला. उशीर झाला होता. निघायला हवं होतं. पण एकदा घरी गेल्यानंतर रोझीशी बोलणं शक्य होणार नाही हे मला माहीत होतं. "आपण हॉटेलात राहायला जायचं का? आजची रात्र?"

"नको. तुझ्या घरीच जाऊ या. मी परत येईन असं तुझ्या आईला सांगून आलेय."

माझी आर्थिक परिस्थिती किती नाजूक आहे हे अर्थातच मला माहीत होतं. त्यामुळे हॉटेलच्या मुक्कामाला ती नाही म्हणाली हे माझ्या पथ्यावर पडलं. "ठीक आहे. इथेच आणखी थोडा वेळ थांबू या. पुढे काय झालं ते सांग."

"त्याच्या स्वरात खूप मार्दव होतं. त्या वेळचा त्याचा प्रेमळपणा पाहून वाटलं, आपण आपला हट्ट सोडून द्यावा. तो माझ्याशी इतका चांगला वागणार असेल तर आणखी काय हवं? ह्यापुढे त्याला काहीही विचारायचं नाही असं मी ठरवून टाकलंदेखील. पण त्याचा मूड चांगला आहे तेव्हा एक अखेरचा प्रयत्न करावा म्हणून मी म्हणाले, 'नृत्याचा एक छोटासा तुकडा तुम्ही पाहावा अशी माझी इच्छा आहे. आईच्या स्मृतीला अभिवादन करण्यासाठी मी दरवेळी हे नृत्य

सादर करायचे. तिनेच बसवलंय ते.' त्याचा हात धरून त्याला मी आमच्या खोलीमध्ये घेऊन आले. खुर्ची, अन्य वस्तू बाजूला करून मोकळी जागा केली. साडीचा पदर व्यवस्थित खोचला. तुला माझा नाच पाहण्यासाठीकॉटवर बसवलं होतं ना, तसंच त्यालादेखील बसवलं. यमुनातीरी प्रियकर-प्रेयसीची भेट असा प्रसंग आहे. मी ते गीत म्हणून नृत्य करायला सुरुवात केली. तो अत्यंत थंड, कोरड्या नजरेने माझ्याकडे पाहत होता. मी पाचवी ओळ संपवलीही नसेल एवढ्यात तो म्हणाला, 'बस झालं. पाहिलं तेवढं पुरे.'

गोंधळून मी थांबले. माझ्या नृत्यकौशल्यामुळे तो प्रभावित होईल, नृत्यसाधना कधीही थांबवू नकोस असं म्हणेल अशी मला खात्री वाटत होती. पण त्याचे पुढचे शब्द ऐकून माझी घोर निराशा झाली. 'रोझी, तू जो काही नाच केलास ती कला नाही. तुझी अजूनही पुरेशी तयारी झालेली नाही. नाचायचा नाद सोडशील तर बरं,' तो म्हणाला.

हे ऐकून माझा तोल गेला आणि माझ्या हातून फार मोठी चूक घडली. 'तुझ्याव्यतिरिक्त बाकी सर्वांना माझं नृत्य आवडतं,' मी काहीशा तुच्छतेने म्हणाले.

'अच्छा? उदाहरणार्थ कोणाला?'

'राजूने माझा नाच पाहिलाय. त्याला अतिशय आवडला. तो काय म्हणाला माहितीय?' त्याचा पाणउतारा करायच्या नादात मी अधिकच घसरत गेले.

'राजू? त्याला कधी नाचून दाखवलंस?'

'हॉटेलमध्ये...'

हे ऐकून तो म्हणाला, 'इकडे ये. ह्या खुर्चीवर बस.' रात्रभर माझी कडक उलटतपासणी केली त्याने. एकामागून एक प्रश्नांच्या फैरी - इथे आल्यापासून आपण काय केलं, कुठे गेलो, रोज तू हॉटेलवर किती वाजता यायचास, कधी निघायचास, खोलीमध्ये तू नेमका कुठे बसायचास, किती वेळ... असंख्य प्रश्न. मला उत्तरं द्यावीच लागली. अखेर माझा बांध फुटला.

मला रडू आवरेना. अर्थात सारा प्रकार त्याच्या लक्षात आलाच होता. अखेर तो कडवटपणे उद्‌गारला, 'त्या हॉटेलमध्ये तुमच्यासारख्या महान कलाप्रेमींचं स्वागत होत असेल ह्याची कल्पना नव्हती! सभ्यपणाची अपेक्षा केली ही माझीच चूक.' पहाटेपर्यंत ही लढाई चालू होती. मी खुर्चीतच बसून होते. अखेर मी कमालीची थकले. तिथेच टेबलवर डोकं ठेवून झोपी गेले. जाग आली तेव्हा तो गुहेकडे निघून गेला होता.

जोसेफने कॉफी तयार ठेवली होती. ती घेऊन मी वेणीफणी करून त्याच्या शोधात निघाले. माझ्या हातून फार मोठी घोडचूक झाली होती. किती अविचाराने वागले मी. त्याच्यापुढे सारं कबूल करून बसले. फार मोठं पाप घडलंय माझ्या हातून. डोक्यात विचारांचं थैमान चालू होतं. मी एका तंद्रीमध्येच गुहेच्या वाटेवर चालत होते. मन अतिशय बेचैन झालं होतं. आता ह्या क्षणी मला दुसरं काही नको होतं. त्याची क्षमा मागायची होती, हे भांडण मिटवायचं होतं. नृत्य करायला मिळालं नाही तरी चालेल. कमालीची भीती वाटत होती. सारं काही संपल्याच्या भावनेमुळे काही सुचेनासं झालं. रात्रभर तोदेखील एखाद्या पुतळ्यासारखा बसून होता हे आठवून त्याचीही दया वाटली. त्याचा उद्ध्वस्त, विमनस्क चेहरा सारखा नजरेसमोर येऊन माझ्या काळजाचे लचके तोडत होता. काय करून बसले मी...मला आजूबाजूची शुद्ध नव्हती. समोरून वाघ आला असता तरी मला दिसला नसता...गुहेमध्ये तो नेहमीच्या घडीच्या स्टुलावर बसून भित्तिचित्रांची नक्कल करण्यात गुंतला होता. गुहेच्या मुखाकडे त्याची पाठ होती. मी दारात उभी राहिल्याने प्रकाश अडला तेव्हा त्याने मागे वळून पाहिलं. मला पाहून त्याने काहीही प्रतिप्रिया दाखवली नाही. थंडपणे माझ्याकडे नजर टाकली. मी त्याच्यासमोर कैद्यासारखी उभी होते. अखेर धैर्य एकवटून म्हणाले, 'मी तुमची मनापासून माफी मागते. तुम्ही सांगाल तसं वागेन. मी फार मोठी चूक केली...'

एक शब्दही न बोलता तो काम करू लागला. माझी दखलही न घेता तो स्केच काढत राहिला. मी निमूटपणे उभी होते. अखेर त्याचं काम संपलं. सगळी कागदपत्रं, पोर्टफोलियो गोळा

करून तो उठला. हॅट आणि चष्मा घालून गुहेबाहेर पडला. मी तिथे तीन तास उभी असेन. त्या अवधीमध्ये त्याने मापं घेणं, नकला काढणं, नोंदी काढणं अशी कामं माझ्याकडे संपूर्ण दुर्लक्ष करून पार पाडली होती. तो निघाला तशी मीही पाठोपाठ चालायला लागले. नि:शब्दपणे आम्ही बंगल्यावर पोहोचलो. तेव्हाच तूदेखील तिथे आला होतास. मी तशीच त्याच्यामागे त्याच्या खोलीत गेले. तो खुर्चीत आणि मी कॉटवर शब्दही न बोलता बसून राहिलो. तू खोलीत आलास. आम्हा दोघांना एकटं सोडून तू निघून जावंसं असं मला तीव्रपणे वाटत होतं. आम्हा दोघांमध्ये सारं काही सुरळीत व्हावं हीच माझी एकमेव इच्छा होती. असे दिवसामागून दिवस जात होते. तो माझ्याकडे दुर्लक्ष करायचा, पण मी आशा सोडली नव्हती. तो माझ्याशी अतिशय तुटकपणे वागायचा. मी जेवण वाढलं तर जेवायचा नाही, त्यामुळे ते काम जोसेफ करायचा. मी कॉटवर झोपले, तर तो खाली जमिनीवर झोपायचा. माझ्याशी अवाक्षरही बोलायचा नाही. माझ्याकडे ढुंकून बघायचा नाही तो. माझं अस्तित्वच नाकारत होता. तो दोन-तीन वेळा तो खाली शहरातही गेला होता. मी बंगल्यामध्ये एकटी आहे ह्याची जराही फिकीर न बाळगता तो निघून गेला होता. परतल्यानंतरही माझी अजिबात चौकशी केली नाही. तरीही मी चिकाटी सोडली नव्हती. कधी ना कधी त्याला माझी दया येईल ह्या आशेवर जगत होते. त्याने कितीही हडहड केली तरी एखाद्या कुत्र्यासारखी त्याच्या मागोमाग हिंडायचे. कोणीही दुसऱ्या व्यक्तीचं अस्तित्व एवढ्या अखंडपणे कसं काय नाकारू शकतं हे माझ्या समजेच्या पलीकडे होतं. माझा स्वाभिमान, अहंकार बाजूला सारून मी सावलीसारखी त्याच्यासोबत राहत होते. खोलीमध्ये, गुहेत कुठेही असला तरी मी त्याचा पिच्छा सोडायचे नाही. कधी ना कधी त्याचं मन वितळेल अशी मला आशा होती. त्या विशाल एकाकी बंगल्यामध्ये मुक्याने वावरताना माझ्यावर अतिशय ताण आला होता. माझी वाचाशक्ती नाहीशी झालीय असा भास व्हायचा. जोसेफ आला की त्याच्याशी एखाद-दुसरा शब्द बोलायचे, पण तो अंतर राखून असायचा, त्यामुळे त्याच्याशीदेखील कामाव्यतिरिक्त बोलणं होत नसे. अशा भयाण शांततेमध्ये तीन आठवडे कसेबसे काढले. अखेर त्या दिवशी मला सारं काही असह्य झालं. मी त्याच्याजवळ जाऊन

म्हणाले, 'झाली एवढी शिक्षा पुरेशी नाही का?' एवढ्या दिवसांनंतर माझा आवाज ऐकताना विचित्र वाटत होतं. दुसरंच कोणीतरी बोलतंय असा भास झाला. रात्रीची वेळ. चोहीकडे कमालीची शांती पसरली होती. त्यामुळे माझं सहज बोलणंदेखील घुमून अंगावर आलं. मी दचकले. अनपेक्षित असल्याने तोही किंचित दचकला. मग वळून माझ्याकडे नजर टाकून म्हणाला, 'मी तुला अखेरचं सांगतोय. माझ्याशी बोलायचं नाही. तुला हवं ते कर, हवं तिथे जा. काय वाटेल ते कर.'

'मला कुठेही जायचं नाही. तुमच्याबरोबरच राहायचं आहे. मोठ्या मनाने मला क्षमा करा. सारं काही विसरून जा.' मी दीन स्वरात विनवलं. कशी कोण जाणे, पण मला त्याच्याविषयी माया वाटायला लागली होती. क्षमाशीलपणे माझा स्वीकार करावा एवढंच मला पुरेसं होतं. पण तो कमालीच्या कडवटपणे म्हणाला, 'विसरण्याचा प्रयत्न तर मी करतोच आहे - माझं लग्न झालंय ही गोष्टही विसरायची आहे मला. अजूनही माझं काम अपूर्ण आहे, नाहीतर कधीच इथून गेलो असतो. तू तुझी स्वतंत्र आहेस. इथून जाऊ शकतेस. हवं ते कर.'

'पण मी तुमची पत्नी आहे आणि मी तुमच्याजवळच राहणार,' मी अजूनही प्रयत्न सोडत नव्हते.

'मी दुष्ट प्रवृत्तीचा माणूस नाहीये आणि त्यामुळेच तू अजून इथे आहेस. पण इतकं लक्षात ठेव की आता तू पत्नी म्हणून इथे नाहीयेस. तुझ्या माकडउड्यांची स्तुती करणाऱ्या कोणाहीबरोबर झोपायला तयार असलेली बाई! मला तू इथे मुळीच नको आहेस. इथे राहायचा तुझा हट्टच असेल तर माझा नाइलाज आहे. माझ्याशी बोलायला यायचं नाही एवढं लक्षात ठेव.' त्याचं कठोर वाक्ताडन ऐकून मी विद्ध झाले. ऑथेल्लोनेदेखील डेस्डिमोनाला एवढ्या प्रौर्याने वागवलं नसेल... 'अखेर त्याच्या हृदयाला पाझर फुटेल. इथून निघेपर्यंत त्याचं माझ्याशी वागणं बदलेल, तो माझा स्वीकार करील' ह्या क्षीण आशेवर मी सारे अपमान सहन केले. घरी गेल्यानंतर सारं काही पूर्ववत होईल अशी स्वप्नं मी पाहत होते.

अखेर त्याचं काम संपलं असावं, कारण तो आवराआवर करायला लागला. सामान भरायला मी मदत करू पाहत होते. पण त्याने हात लावू दिला नाही. मी माझ्या सर्व वस्तू बॅगेत भरल्या आणि त्याच्यामागोमाग बाहेर पडले. गफूर गाडी घेऊन आला होता. मीही त्याच्याबरोबर गाडीत बसले. हॉटेलवर पोहोचलो. तेच हॉटेल...तीच २८ नंबरची खोली. त्या खोलीचं दर्शनही मला नकोसं झालं. त्याने सर्व हिशेब चुकते केले, सर्वांची देणी देऊन टाकली. गाडीची वेळ झाली. सामानसुमान घेऊन तो निघाला. मी मुकाट्याने त्याच्यामागे गेले. तो मद्रासला, आमच्या घरी जातोय हे मला माहीत होतं. मलादेखील अतिशय मनापासून घरी जायचं होतं. फलाटावर मी गाडीची वाट पाहत शांतपणे उभी होते. माझ्या बॅगांकडे निर्देश करून तो हमालाला म्हणाला, 'ते सामान माझं नाही. कोणाचं आहे माहीत नाही.' हमालाने चमकून माझ्याकडे पाहिलं, पण गाडी आल्यानंतर त्यानेही काही न बोलता त्याचंच सामान उचलून डब्यात ठेवलं. तो आत जाऊन आपल्या सीटवर स्थानापन्न झाला. मी सुन्नपणे उभी होते. मग हळूच बॅग उचलून डब्यात शिरले. पण त्याने दारातच मला अडवलं. 'तुझं तिकीट काढलं नाहीये. हे बघ, एकच तिकीट आहे माझ्याजवळ,' असं म्हणून त्याने डब्याचा दरवाजा बंद करून टाकला. मी फलाटावर उभी होते - उद्ध्वस्त, अपमानित, पराजित. त्यानंतर तुझ्या घरी आले."

एवढं सांगून ती हुंदके देत रडू लागली. मी तिचं सांत्वन केलं, "योग्य जागी आलीस तू. सारं विसरून जा आता. त्या हलकट माणसाला चांगला धडा शिकवू या आपण..." मी एवढ्यावरच थांबलो नाही. एक अत्यंत महत्त्वाची घोषणाही केली, "पण सर्वप्रथम 'सर्वोत्कृष्ट कलाकार' म्हणून तुझा नावलौकिक जगभर होईल ह्यासाठी मी सर्वतोपरी प्रयत्न करीन."

खरा प्रकार काय आहे हे आई लवकरच समजून चुकली. रोझी अंघोळीला गेल्याची संधी साधून तिने मला गाठलंच, "राजू, असं चालणार नाही. बंद कर सारं."

"आई, तू ह्यामध्ये ढवळाढवळ करू नकोस. मला समजतंय मी काय करतोय ते. लहान नाही मी आता."

“पण घरात नाचणारीण आणून ठेवलीस हे बरं दिसतं का? रोज सकाळी नाच चालतोय घरात. हे घर आहे, की...”

मी प्रोत्साहन दिल्यामुळे रोझीने नृत्यसराव सुरू केला होता. भल्या पहाटे पाच वाजता उठून ती स्नान उरकायची. आईने कोनाड्यामध्ये देवाचं चित्र लावलं होतं. त्याची मनोभावे प्रार्थना करून तिचा नाच सुरू व्हायचा तो साधारण तीन तास चाले. तिच्या पायांतील घुंगरांच्या नादाने संपूर्ण घर दुमदुमत असे. देहभान विसरून रोझी नृत्य करायची. पदन्यास आणि हालचाली ह्यांवरच तिचं सारं लक्ष केंद्रित झालेलं असे. रियाझ झाल्यानंतर रोझी आईला घरकामात मदत करायची. झाडपूस करून सारं घर नीटनेटकं ठेवायची. आई तिच्यावर खूष होती. तिच्याशी प्रेमाने वागायची. त्यामुळेच आई रोझीविषयी तक्रार करेल असं वाटलं नव्हतं.

“अचानक काय झालं? असं का म्हणते आहेस?” मी विचारलं.

आई थोडी घुटमळली. “तू तिची काहीतरी सोय करशील असं वाटलं होतं. कायम अशी आपल्याकडे ठेवणं कसं शक्य आहे? लोक काय म्हणतील?’

“हे ‘लोक’ कोण आहेत?” मी तिरकसपणे विचारलं.

“म्हणजे काय? माझा भाऊ, तुझी भावंडं, आपल्या ओळखीपाळखीचे इतर...”

“मला त्यांच्या मताशी कर्तव्य नाही. तूदेखील लक्ष देऊ नकोस.”

“अरे वा... फारच छान सांगतो आहेस! पण मला ते मुळीच चालणार नाही,” आईने बजावलं.

न्हाणीघरात रोझीचं गुणगुणणं थांबलं. आईने विषय तात्पुरता संपवला आणि तिथून गेली. रोझी न्हाणीघरातून बाहेर आली. उत्फुल्ल, टवटवीत दिसणाऱ्या रोझीला पाहून ‘तिला कसलीही चिंता नाही’ असंच कोणालाही वाटलं असतं. पूर्वायुष्यातील सारी दु:खं, मनस्ताप विसरून ती

'आज' मध्ये खूष राहायचा प्रयत्न करत होती. उज्ज्वल भविष्याची स्वप्नं रंगवत होती. आईला तर ती पूजायचीच.

सुरुवातीला आईदेखील तिच्यावर माया करायची. पण दुर्दैवाने तिच्या वागण्यात बदल व्हायला लागला. मायेला ओहोटी लागली. बोलण्यात कोरडेपणा आला. रोझीविषयी काहीबाही कानी पडायचं त्यामुळे ती बिथरली होती. एका बदनाम झालेल्या बाईला घरात ठेवायची कल्पना तिला असह्य व्हायला लागली. एकटा सापडलो तर ती पुन्हा तो विषय काढील ही भीती असल्याने मी मोठ्या शिताफीने तिला टाळायचो. तरीही संधी साधून ती माझ्या कानात कुजबुजायचीच, "धोकेबाज नागीण आहे ती. मला ती कधीच आवडली नाही..."

आईचे रोझीबाबतचे अनुमान आणि तिचा दुटप्पीपणा यामुळेही मी काहीसा त्रासून गेलो होतो. रोझी मात्र याबाबत अनभिज्ञ होती आणि आईविषयी तिच्या मनात परमभक्तीच निर्माण झाली होती. एकंदरीतच रोझी निरागसपणापोटी आनंदी, निश्चिंत असल्यागत वाटायची. मला आईचा भरवसा वाटेना. एखाद्या वेळेस रोझीला फटकन 'चालती हो' म्हणेल अशी चिंता मला छळू लागली. मोठ्या चतुराईने मी खेळी बदलली. आई रोझीला नावं ठेवायला लागली की मी म्हणायचो, "हो आई, तू म्हणतेस ते खरं आहे. पण बिचारी बेघर आहे. तिला रस्त्यावर फेकायचं का? थोडं तरी सौजन्य दाखवायला हवं की नको?"

"पण मला वाटतं, तिने नवऱ्याचे पाय पकडावेत. संसार करणं म्हणजेचेष्टा आहे का? पण हे ह्या आजकालच्या मुलींना कोण सांगणार? पावडर-लिपस्टिक लावून नवऱ्याला जिंकायचं असतं त्यांना! तुझ्या अप्पांचीच गोष्ट घे. त्यांनी किती तरी प्रसंगी..." असं म्हणून तिने पिताश्रींचा हट्टी, दुराग्रही स्वभाव, त्यामुळे निर्माण होणारे समरप्रसंग आणि ती त्यामधून कशी सहीसलामत बाहेर पडायची ह्याचे किस्से सांगितले. मी मोठ्या कौतुकाने, शांतपणे ऐकायचो. रोझीचा विषय तात्पुरता का होईना, बाजूला पडायचा. नंतर रोझीविषयी बोलताना आई 'पतीपत्नीमधील विसंवाद, भांडणं' ह्यावर भाष्य करणं सोडत नसे. तिने 'नवरे आणि त्यांचे

स्वभाव' ह्याचे विविध गटच पाडले होते - चांगले, वाईट, भडक माथ्याचे, समजूतदार, महाहट्टी, क्रूर, लहरी, वेडे वगैरे वगैरे. सोशिक, निग्रही आणि समजूतदार पत्नी कोणत्याही प्रकारच्या नवऱ्याला सुधारू शकते असा तिचा लाडका सिद्धांत होता. त्याला पूरक म्हणून पुराणातील सावित्री, सीता आणि तत्सम महान स्त्रियांचे दाखले द्यायची. 'आपण सहजच आणि सर्वसाधारण विषयाबाबत बोलतोय, त्यामागे कोणताही हेतू नाही' असा तिचा वरकरणी पवित्रा असायचा. पण तिचा इशारा कोणाकडे आहे हे अगदी सहज लक्षात यायचं. आपण किती चलाखी दाखवतोय असं बिचारीला वाटायचं, पण ती एवढी पारदर्शक होती की, ती कोणाला उद्देशून बोलतेय हे सहज समजायचं. रोझीचा इतिहास तिला माहिती आहे हे रोझीला कळू द्यायचं नव्हतं, पण आई तिरकस टोमणे मारणं सोडायची नाही. रोझीला ते समजायचं, ती उदास व्हायची, पण माझा नाईलाज होता. आईला काहीही सांगायला मी घाबरायचो. रोझीला हॉटेलमध्ये ठेवता आलं असतं, पण माझी ढासळती आर्थिक परिस्थिती लक्षात घेता तेही शक्य नव्हतं. रोझीचं दु:ख मुकाट्याने पाहायचं एवढंच मी करू शकत होतो. दु:खात सुख एवढंच की, तिच्याबरोबर मीही दु:ख सहन करत होतो.

माझ्या अडचणींमध्ये दिवसेंदिवस भरच पडत होती. दुकान सांभाळणारा पोरगा जास्तच कटकट करायला लागला. जास्त फेरीवाल्यांना फलाटावर धंदा करण्याची सवलत मिळाल्यामुळे माझा धंदा बसत चालला. रोख पैशांची आवक घटली. उधारी मात्र वाढत होती. घाऊक व्यापाऱ्यांनी मला उधारीवर माल देणं बंद केलं. पोराने हिशेब लिहिण्यात असे काही गोंधळ करून ठेवले होते की, आपल्याला नफा होतोय की नुकसान हे नेमकं समजणं मुश्कील झालं. कधीतरी पैसे माझ्या हातावर टेकवायचा. दुकानातल्या बऱ्याचशा फळ्या रिकाम्याच असायच्या. खूप माल गायब झाला होता. तो पोरगा बहुधा पैसे खिशात टाकून दुकानातल्या वस्तूही चोरायचा. घाऊक माल मिळणं थांबल्यामुळे 'तुझ्या दुकानात काहीच मिळत नाही' अशा तक्रारी वाढायला लागल्या. अशा सर्व गोंधळात अचानक रेल्वेकडून दुकान बंद करण्यासाठी

नोटीस आली. स्टेशनमास्तर आणि पोर्टरपुढे मी गयावया केली, पण त्यांचाही नाइलाज होता. नोटीस वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून आली होती. दुकान चालवण्याचं कंत्राट नवीन कंत्राटदाराला दिलं गेलं.

रेल्वेशी माझे फार जुने संबंध होते. आता सारं संपलं हे मला खरंच वाटेना. खूप निराश झालो, रागही आला. ज्या दुकानात आधी बरीच वर्षे अप्पा आणि नंतर अनेक वर्षे मी बसलो होतो, त्या दुकानात आता नवीन माणूस आल्याचं पाहून मी अक्षरश: रडलो. सर्व राग पोरावर काढला. त्याच्या थोबाडीत मारली तेव्हा तो मोठमोठ्याने रडायला लागला. त्याचं ओरडणं ऐकून त्याचा पोर्टर बाप धावून आला. "एवढे दिवस तुला मदत केली त्याचं हे फळ देतोस त्याला? मी तर त्याला सांगतच होतो - नाहीतरी तू त्याला पगार देत नव्हतास."

"त्याने माझे पैसे खाल्ले, दुकानातल्या सर्व खायच्या वस्तू साफ केल्या, उधारी करून तेही पैसे बुडवले. वर त्याला मी पगारही द्यायचा? खाऊन खाऊन जाडा झालाय नुसता. माझा धंदा बुडवला. सगळे पैसे टाक माझे." मी प्रचंड संतापलो होतो.

"त्याने नाही तुला बुडवलं. ती चेटकीण बसलीय ना तुझ्या घरात... तिच्यामुळे तू असा बहकला आहेस. ती तुला असं बोलायला लावतेय." तो अर्थातच रोझीविषयी बोलत होता. ती दारातून डोकावून बघत होती. आई बाहेरच्या ओट्यावर बसून सारा तमाशा मोठ्या दु:खाने पाहत होती. एकूणच प्रकार अति अपमानास्पद होता.

पोर्टरने रोझीविषयी असे शब्द वापरलेले मला अजिबात आवडलं नाही. मीही त्याला शिव्या घातल्या. अंगावर धावून गेलो. तेवढ्यात स्टेशनमास्तर मध्ये पडले. "इथे गोंधळ घातलास तर परिणाम वाईट होतील. फलाटावर पाय ठेवू देणार नाही ह्यापुढे." त्यांनी दम भरला.

नवीन दुकानमालक अलिप्तपणे आमची बाचाबाची बघत होता. मिशाळ गृहस्थ होता. पाहताक्षणी तो खूप लबाड असावा असं माझं मत बनलं. आता मी त्याच्यावर घसरलो, "एक दिवस तुलादेखील असंच काढून टाकतील, लक्षात ठेव. फार रुबाब दाखवू नकोस."

मिशांना पीळ भरत तो म्हणाला, "तुझ्यासारखं भाग्य सर्वांनाच लाभेल असं नाही..." एवढं बोलून त्याने चावटपणे डोळा घातला. तो कशाविषयी बोलतोय हे लक्षात घेऊन मी पिसाळलोच. त्याच्या अंगावर धावून गेलो, पण त्याने हाताच्या एका फटकाऱ्याने मला उडवून लावलं - अक्षरश: एखादी माशी झटकून टाकावी तसं. मी धडपडलो. मारामारी सोडवण्यासाठी माझी बिचारी आई धावतच - आयुष्यात प्रथमच - फलाटावर आली होती. मी तिच्यावरच आदळलो. नशीब! धक्क्याने ती पडली नाही.

माझा हात घट्ट पकडून ती किंचाळली, "चल इथून. येतोस की नाही?" आईला पाहून सारेच - पोर्टर, तो मिशाळ दुकानदार, बघे - मागे सरले. "तुझ्या म्हाताऱ्या आईचा मान राखून तुला सोडतोय. नाहीतर तुझी खैर नव्हती." गर्दीतून आवाज आले. आईने मला खेचतच घराकडे नेलं. दुकानाचं रजिस्टर, थोडी कागदपत्रं आणि माझ्या एक-दोन वैयक्तिक वस्तू इतकंच सामान मी दुकानांतून उचललं होतं. ते घेऊन मी अत्यंत जड अंत:करणाने घरात प्रवेश केला. रेल्वेशी संबंध कायमचे संपले ह्या कल्पनेने मी कमालीचा उदास झालो. बाजूलाच उभ्या असलेल्या रोझीकडेही मी लक्ष दिलं नाही. हॉलच्या कोपऱ्यात आडवा झालो आणि डोळे मिटून सुन्न, विमनस्कपणे पडून राहिलो.

## ८

ह्या प्रकारानंतर दुसऱ्या दिवशीची गोष्ट. रोझी नित्याप्रमाणे नृत्यसराव करत होती. मीही तिथेच चटईवर भिंतीला टेकून बसलो होतो. तेवढ्यात सैत - उधारीने माल देणारा माझा घाऊक मालाचा व्यापारी - दारात उभा राहिला. तो का आलाय हे ठाऊक असल्याने मी शरमलो. निळ्या रंगाच्या कापडामध्ये बांधलेली जाडजूड चोपडीही त्याच्या हातात होती. बहुधा मी पळून गेलो असेन अशी शंका त्याच्या मनात असावी. कारण मला घरात आरामात बसून नृत्याचा आनंद घेताना पाहिल्यावर तो फारच खूष झालेला दिसला. क्षणभर काय बोलावं हेच मला सुचेना. मी गोंधळलोय हे दाखवायचं नव्हतं. स्टेशनवर घडलेल्या प्रकारानंतर मी काहीसा गंभीर होऊन विचार करायला लागलो. रोझीच्या लयबद्ध हालचाली पाहत असताना ह्यापुढे काय करायचं हे चित्र स्पष्ट झालं. तिच्या घुंगरांचा मंजूळ खळखळाट, मधुर स्वरातील तिचं गीत, रेखीव नृत्यमुद्रा ह्यांच्या एकत्रित परिणामामुळे मला मार्ग दिसू लागला. ह्यापुढे सर्व सूत्रं हातात घ्यायची असा निश्चय केल्याने स्वत:वरच खूष झालो. काल संध्याकाळच्या तमाशानंतर आई माझ्याशी अवाक्षरही बोलली नव्हती. मलाही झाल्या प्रकाराची लाज वाटत होती. आईने त्यावरून झाडलं नाही हे माझं सुदैवच म्हणायचं. रोझीविषयी आईच्या मनात पूर्वग्रह असला तरी तिला रोझी आवडायची. त्यामुळेच तिच्याशी ती सहृदयतेनेही वागायची; फटकून वागणं आईला जमत नसे. माझ्याशी अबोला असला तरी तिला उपाशी ठेवणं वा दुखवणं, दूषणं देणं असं आई कधीही करायची नाही. त्या मारामारीच्या प्रसंगापासून मात्र ती माझ्याशी अंतर राखून होती. बोलायला लागली तर स्फोट होईल हे बहुधा ती ओळखून असावी. आपल्या पतीने अत्यंत कष्टाने उभा केलेला धंदा मी माझ्या विचित्र वागण्याने धुळीला मिळवला असंच ती समजत असणार. एकदा तोंड सोडलं तर आवरणं कठीण होईल ह्याची कल्पना असल्याने ती माझ्याकडे दुर्लक्ष करत होती. पण माझा राग तिने रोझीवर काढला नाही. नेहमीचे उपदेशपर, नैतिक टोमणे सोडले

तर ती रोझीबरोबर सर्वसामान्यपणे चांगली वागायची. रोझीलाही तिच्या वाग्बाणांचं काही वाटत नसे. ती हसून तिकडे दुर्लक्ष करायला शिकली होती.

सैत - माझा सावकार - अंगाने कृश होता. डोक्याला रंगीबेरंगी फेटा गुंडाळलेला. यशस्वी व्यापारी होता तो. उधारी करायला त्याची कधीही ना नसे, पण ती नंतर व्यवस्थित फेडावी अशी त्याची रास्त अपेक्षा असे. आज माझ्या दारात का उभा आहे हे अर्थातच मला माहीत होतं. मी मोठा उत्साह दाखवून त्याचं आगतस्वागत केलं. “या, या. बसा. अलभ्य लाभ!!” असं म्हणून मी त्याला बाहेरच्या ओट्यावर बसवलं. काही वेळ अवघड शांतता पसरली. माझा चांगला दोस्त होता तो, त्यामुळेच पैशाची गोष्ट काढणं त्याला जड जात होतं. आतून रोझीच्या घुंगरांचा आवाज येत होता. तो थोडा वेळ ऐकत राहिला, मग विचारलंच, “हा कसला आवाज?”

मी सहजतेचा आव आणून उत्तरलो, “नृत्याची तालीम चालली आहे.”

“नृत्याची तालीम?” तो अत्यंत आश्चर्याने म्हणाला. माझ्यासारख्या रूढीप्रिय, मध्यमवर्गीयांच्या घरामध्ये नाच, हे त्याला खरंच वाटेना. त्याचा चेहरा विचारमग्न झाला. डोक्यात काहीतरी हिशेब चालू झाले. ‘घरात शिरलेल्या चेटकिणी’ची खबर त्याच्यापर्यंत पोहोचली असावी! आपला त्या गोष्टीशी संबंध नाही तेव्हा त्याविषयी बोलू नये असं ठरवून त्याने हलकेच मान झटकली. आणि अखेर मुद्द्यावर आला, “राजू, काय झालंय तुला? असा का वागतो आहेस? गेले कित्येक महिने तू एक पैसा दिला नाहीस. असं कधीच झालं नव्हतं. अतिशय नियमितपणे पैसे द्यायचास!”

“अरे, बाबा, धंदा नीट चालत नव्हता ना...” परिस्थितीला शरण जाण्याशिवाय गत्यंतर नाही, शिवाय तरीसुद्धा किती आनंदी आहे असं दाखवण्याचा मी प्रयत्न करत होतो.

“नाही, मला नाही तसं वाटत. प्रत्येकाने...” तो बोलत असताना मी मध्येच त्याला तोडत म्हणालो, “अरे हो, दुसरं कारण म्हणजे तो चोर... त्या मुलावर मी विश्वास टाकला, पण त्याने मला पुरतं नागवलंय!”

पण माझ्या रडगाण्याचा त्याच्यावर काहीही परिणाम झाला नाही. फारच दुष्ट होता तो. मला छळायचंच असा त्याचा उद्देश दिसला. “विनाकारण इतरांना दोष देण्यात काय अर्थ आहे?” असं म्हणून त्याने आपली चोपडी उघडली. एक पान दाखवून म्हणाला, “हे बघ, आठ हजार रुपये! असं किती दिवस चालवून घेऊ? तू काहीतरी करायला हवंस.”

‘तू काहीतरी करायला हवंस’ हे सतत ऐकून मी कंटाळून गेलो होतो. आईने सुरुवात केली होती. रोझीबाबत ती माझ्या कानीकपाळी हेच ओरडायची. नंतर आणखी कोणीतरी आणखी कशाबद्दलतरी तेच म्हणायचं. ती रोझीही आजकाल ‘आपण काहीतरी करायला हवं’ असं म्हणायला लागली होती. ते कमी झालं म्हणून आता हादेखील... त्याच्या उपदेशाचा डोस ऐकून मला चिडचिडल्यासारखं झालं. मी वैतागून म्हणालो, “माहितीय मला.”

“मग काय करणार आहेस त्याबाबत?”

“मी तुझे पैसे फेडीन ह्यावर विश्वास ठेव.”

“पण केव्हा?”

“ते मी कसं सांगणार?... थोडा अवधी हवा...”

“ठीक आहे. आणखी एक आठवडा चालेल?”

“एक आठवडा?” मला चक्क हसायला आलं. त्याला राग आल्याचं जाणवलं. त्या दिवसांमध्ये सारेच माझ्यावर रागावलेले असायचे.

तो अतिशय गंभीरपणे म्हणाला, “तुला हा विनोद वाटतोय? मी इथे तुझं मनोरंजन करायला आलोय असं वाटतंय का तुला?”

प्रकरण हाताबाहेर चाललेलं पाहून मी त्याला चुचकारत म्हणालो, “अरे पण सैत, आवाज का चढवतोयस? आपण दोस्त आहोत ना?”

“दोस्तीचा इथे काही संबंध नाही,” तो आवाज कमी करून म्हणाला. ओरडल्यामुळे रोझीच्या घुंगरांचा आवाज येईनासा झाला होता, तो पुन्हा गुंजायला लागला. भिंतीपलीकडे लयदार नृत्य करणाऱ्या रोझीची मूर्ती माझ्या नजरेसमोर तरळली. माझ्या चेहऱ्यावर हसू पसरलं असावं, कारण त्यामुळे त्याचा राग पुन्हा उफाळून आला. तो तणतणत म्हणाला, “काय हो महाशय, मी पैसे मागितले तर तुम्हाला हसायला येतं. आत्तादेखील एखादं स्वप्न पाहावं तसं तुमच्या तोंडावर हास्य दिसतंय. तुम्ही स्वप्ननगरीमध्येच वावरताय की काय? जमिनीवर या आता. मी तुमच्याशी व्यवहाराच्या गोष्टी करतोय, पण तुमची एकूण वागणूक पाहता ते शक्य दिसत नाही. ठीक आहे. पण मला दोष देऊ नका,” असं म्हणून त्याने चोपडी बंद केली आणि निघाला.

“सैत, असा रागावून जाऊ नकोस. काय झालं एवढं चिडायला?” मी त्याला मनवत म्हणालो. काहीही बोललो तरी त्याला ते उथळपणाचं वाटत असावं, कारण तो अधिकच गंभीर झाला. चेहरा जास्तच कठोर दिसू लागला. त्याच्या चढत्या पाऱ्याबरोबर मला हास्याच्या उकळ्या फुटायला लागल्या. अशा गंभीर प्रसंगी माझ्या अंगात काय संचारलं होतं कोण जाणे, मला हसू आवरेना. तो अधिकाधिक चिडत होता आणि ते पाहून माझा तोल जास्तचजात होता. अखेर त्याला सारं असह्य झालं. प्रचंड संतापून तो माझ्याकडे दुर्लक्ष करून निघालाच. गंभीर चेहरा, काखोटीला चोपडी मारलेली, डोक्यावर रंगीबेरंगी पगडी अशी त्याची सुकडी मूर्ती मला प्रचंड विनोदी वाटली. मी खो-खो हसत सुटलो. त्याने मागे वळून माझ्याकडे केवळ एक कटाक्ष फेकला आणि काही न बोलता तरातरा निघून गेला.

हसतच मी घरात शिरलो. चटईवर बैठक मारली, तोच रोझी नाचताना क्षणभर थांबली. “एवढं हसण्यासारखं काय झालं? तुझा हसण्याचा आवाज इथपर्यंत ऐकू येत होता,” तिने विचारलं.

“हो, हो. हसलो खरा मी.”

“कोण आलं होतं?”

“मित्र होता एक,” मी त्रोटक उत्तर दिलं. तिला किंवा अन्य कोणालाही माझ्या समस्या समजाव्यात असं मला वाटत नव्हतं. मला स्वत:लाही कोणत्याही प्रकारचा ताप नको होता. रोझी इथे, माझ्याजवळ, माझ्या घरात आहे एवढी एकच गोष्ट मला सुखावत होती. आता मला दुसरं काही नको होतं. पण वास्तव जगात हे शक्य नाही हे मी विसरलो. मी मूर्खांच्या नंदनवनात राहत असल्याने ‘पैशांविषयी बोलायचंच नाही म्हणजे आपोआप प्रश्न सुटेल’ असं काहीसं मी समजायला लागलो होतो. अर्थात तो माझा गाढवपणाच होता. मी असा काही ‘रोझीमय’ झालो होतो की, बाकी सारं झूठ वाटायला लागलं. पैसा, व्यवहार वगैरे गोष्टींचा विचारही करत नव्हतो. पण अर्थात फार काळ स्वप्नांच्या दुनियेत रमणं शक्य नव्हतं. लवकरच मी धाडकन जमिनीवरआलो.

आठवड्याभरातच माझ्यामागे कोर्टाची लफडी चालू झाली. माझ्या अनाठायी विनोदबुद्धीमुळे सैतबरोबरचे माझे दोस्तीचे संबंध पूर्णपणे खतम झाले. म्हणजे ते त्यानेच तोडले आणि सरळ कोर्टात माझ्याविरुद्ध खटला दाखल केला. आई घाबरून वेडीपिशी झाली. संपूर्ण जगात मला गफूरशिवाय कोणीही मित्र नव्हता. मी त्याला एके दिवशी चौकात कारंजाजवळ गाठलं आणि त्याच्यासमोर सारा पाढा वाचला. मी नुकता कोर्टामधूनच आलो होतो. माझी कहाणी ऐकून त्यालाही वाईट वाटलं. “वकील केला आहेस का?” त्याने विचारलं.

“होय. कापसाच्या गोदामाजवळ आहे ना, तोच माझा वकील आहे.”

‘छान! तारखा घेण्यात माहीर आहे तो. वर्षानुवर्षं खटला चालू राहील. काळजी करू नकोस. खटला दिवाणी आहे की गुन्हेगारी?”

“गुन्हेगारी! तो पैसे मागायला आला असताना मी मारायची धमकी दिली असा आरोप आहे माझ्यावर! मी खरंच मारायला हवं होतं त्याला...” मी त्वेषाने म्हणालो.

"अरेरे, हे वाईट झालं. दिवाणी खटला असता तर कैक वर्षं निघाली असती. तोपर्यंत तुला काही त्रास झाला नसता," एवढं बोलून गफूरने तिरकसपणे विचारलं, "'ते प्रकरण' आहे का अजून घरात?" मी त्याच्याकडे रागाने पाहिल्यावर तो म्हणाला, "अर्थात तुझ्या चुकांबद्दल तिला का दोष द्यायचा?... तू पुन्हा गाइडचं काम का करत नाहीस?"

"रेल्वे स्टेशनवर कसला जातोय आता... मी लोकांना मारतो अशी रेल्वेचे लोक माझ्याविरुद्ध साक्ष देतील. त्यामुळे तिकडे जाणं शक्य नाही."

"पण खरंय का ते?"

"हं... पोर्टरचा मुलगा हाताला लागला तर त्याची मुंडी मुरगाळून टाकीन," मी कमालीच्या रागाने म्हणालो.

"राजू, अरे असं वागू नकोस. आणखीच खड्ड्यात जाशील अशाने," गफूर मला समजावत म्हणाला. "आधीच एवढा गोंधळ घालून ठेवला आहेस. त्यात आणखी भर का घालतोस? सावर स्वत:ला. काहीतरी विचार करून वाग ना."

गफूरच्या आवाजातील कळकळ जाणवून मी विचारात पडलो. "मला पाचशे रुपये मिळाले ना, तर मी नव्याने सुरुवात करीन," असं म्हणून मी रोझीच्या नृत्याद्वारे पैसे कमवायची माझी योजना त्याला समजावून सांगितली. तिच्या विचारानेच माझ्यात उत्साह संचारला. उत्फुल्ल स्वरात मी म्हणालो, "रोझी म्हणजे सोन्याची खाण आहे, गफूर. थोडे पैसे मिळाले ना, तर तिचे कार्यप्रम सुरू करता येतील." मी स्वप्नं रंगवू लागलो. "भरतनाट्यमला आज अतिशय महत्त्व आलं आहे. फार मोठा कला व्यवसाय झालाय तो. उत्तम कलाकार असेल तर लोक वाटेल तेवढे पैसे मोजून कार्यप्रम बघायला येतात. भरतनाट्यम अत्यंत लोकप्रिय कलाविष्कार आहे. पैशापायी मी अडलोय गफूर, नाहीतर काहीही करून रोझीला जनतेसमोर आणलं असतं. तू काही मदत करशील का?" हे ऐकून गफूर हसायला लागला. मी त्याच्याकडून पैशाची अपेक्षा

करतोय ही गोष्ट त्याला विनोदी वाटली. मी गंभीरपणे बोलतोय आणि त्याचं त्याला हसू येतंय हे पाहून मी चिडलो. “मी तुला धंद्यामध्ये एवढी मदत केलीय ते विसरलास वाटतं?”

गफूर बाकी कसाही असला तरी मनाने चांगला होता. मला समजावत तो म्हणाला, “राजू, अरे मी काही श्रीमंत नाहीये. गाडीची मरम्मत करायलादेखील पैसे उसने घ्यावे लागतात. माझ्याजवळ पाचशे रुपये असते तर नवीन टायर नसते का घेतले? माझ्या गाडीत बसणाऱ्यांचा प्रवास तरी सुखाचा झाला असता. राजू, माझं ऐक बाबा. तिला परत पाठवून दे आणि तूदेखील व्यवहारी जगात परत ये. सर्वसामान्य जीवन जगायला लाग. कला वगैरेच्या नादाला लागू नकोस. त्या गोष्टी आपल्यासाठी नव्हेत हे लक्षात ठेव.”

हे ऐकून माझा पारा प्रचंड चढला. मी त्याला लागेलसं काहीतरी बोललो. अपमानित होऊन तो फटकन गाडीत बसला. जाता जाता अत्यंत गंभीरपणे मला म्हणाला, “तुला कधी गाडी हवी असेल तर कळव. मी तुझ्यासाठी तेवढंच करू शकतो. तू माझं देणं लागतो आहेस हेही विसरून जाईन.”

“‘पीक हाऊस’ला फेऱ्या केल्यास त्याचं कमिशन द्यायचंय तुला. त्यातून वळते करून घे तुझे पैसे,” मी मग्रूरीने म्हणालो.

“ठीक आहे,” असं म्हणून त्याने गाडी चालू केली. “कधीही गाडी हवी असेल तेव्हा बोलाव. तुझ्यासाठी सदैव तयार आहे माझी गाडी. तुला सद्बुद्धी मिळो अशी ईश्वरचरणी प्रार्थना,” एवढं बोलून तो गेला. आणखी एक मित्र मी आज गमावला होता.

दुर्दैवाने गफूरसारख्या हितचिंतकानंतर साक्षात माझी जन्मदात्री आईच मला सोडून गेली. एके दिवशी मी नेहमीच्या शिरस्त्यानुसार रोझीचं नृत्य पाहण्यात गुंगून गेलो होतो. ‘नाचरी पावलं’ असा तुकडा तिने बसवला होता. तिने त्यामध्ये काही बदल केले होते आणि त्यावर माझं मत तिला हवं होतं. मी नृत्याबाबतीत फार मोठा जाणकार झालो होतो. माझ्यासारख्या तज्ज्ञ

व्यक्तीचा सल्ला रोझीने मागितल्यामुळे मी तन्मय होऊन पाहत होतो. अर्थात तिच्या कमनीय बांध्याकडे माझं जास्त लक्ष होतं. तिला आता ह्या क्षणी मिठीत घ्यावं असं वाटत होतं. पण आई घरातच असल्याने मनावर ताबा ठेवला. आम्हाला एकांत मिळणं फारच दुरापास्त झालं होतं. त्यामुळेच प्रणयाची एकही संधी आम्ही वाया घालवत नसू. उदाहरणार्थ, आई पाणी आणायला जायची तेव्हा तिला नेमका किती वेळ लागेल ह्याचा अंदाज असल्याने आम्ही तो वेळ सत्कारणी लावायचो! घाईघाईत असे क्षण उपभोगायचे ही गोष्ट त्रासदायक वाटायची, पण त्यामध्ये चोरटा आनंदही मिळायचा. तिच्या थोड्याशा जवळकीने मी सर्व चिंता विसरून जायचो. तिची तालीम चालू असताना तिच्या डौलदार हालचाली, कमनीय बांधा पाहून मी देहभान विसरायचो. जवळपास कोणीही नसेल तर तिला मिठीत घ्यायचो. परीक्षकासारख तिचं नृत्य बारीक नजरेने पाहायचं, चुका सुधारायला मदत करायची ही माझी अपेक्षित भूमिका बाजूला पडायची आणि मी वारंवार तिच्या तालमीमध्ये अडथळे आणायचो. “काय झालंय तुला” असं म्हणून ती मला दूर लोटायची. आपल्या कलेवर तिची पराकोटीची भक्ती होती. अत्यंत एकनिष्ठेने तिने नृत्याला वाहून घेतलं होतं. तिच्यासाठी शारीरिक आकर्षण, प्रेम वगैरे गोष्टी दुय्यम होत्या.

माझ्याजवळ आता फारच थोडे पैसे शिल्लक होते. सैतबरोबरच्या झगड्यानंतर दोन दिवसांनी बँकेमधील खात्यात होते नव्हते ते सर्व पैसे मी काढून घेतले. जप्ती आली तर तेही गमावले असते. त्या पैशांवरच आमचे सर्व खर्च भागत होते. एक सामान्य वकील माझा खटला चालवत होता. त्याला थोडेफार पैसे द्यावे लागले. मार्पेट रोडवर त्याचं ‘ऑफिस’ होतं. कापसाच्या दुकानाच्या पोटमाळ्यावर त्याने आपलं दुकान थाटलं होतं. त्या एवढ्याशा कोंदट जागेमध्ये पुस्तकांचं शेल्फ, एक टेबल-खुर्ची आणि पक्षकारांसाठी एक बाकडं एवढं सामान होतं. समन्स आल्यामुळे मी कोर्टात हजर झालो. पहिलाच दिवस. आता काय होणार ह्या भीतीने माझी बोबडी वळायची वेळ आली होती. त्याने मला बरोबर हेरलं. सलगीने बोलून माझी मर्जी संपादन केली. तपशील जाणून घेतल्यावर त्याने विचारलं, “तू सैतला खरोखरच मारलंस का? मला खरा प्रकार घडला तो सांग.”

“नाही साहेब, खोटं आहे ते.”

“बहुधा खटला लवकर चालावा ह्यासाठीच तुझ्यावर गुन्हेगारी स्वरूपाचा - मारहाणीचा - आरोप ठेवलाय त्यांनी. आपण प्रथम त्याला विरोध करू, नंतर दिवाणी खटला लढू. भरपूर वेळ आहे आपल्याजवळ. तू काहीही काळजी करू नकोस. मी सगळं काही व्यवस्थित हाताळतो. किती पैसे आहेत तुझ्याजवळ?”

“फक्त पाच रुपये आहेत.”

“दे.” मी ‘दोन’ म्हटलं असतं तरी त्याने ते आनंदाने घेतले असते! पैसे मोठ्या समाधानाने खिशात ठेवून त्याने सहीसाठी एक कागद पुढे केला. “चला, झालं. आता कसलीही चिंता करू नकोस.”

कोर्टात मला आरोपीच्या पिंजऱ्यात उभं केलं. न्यायाधीशमहाराजांनी माझ्याकडे नजर टाकली. सैत अर्थातच हजर होता, त्याची ती चोपडीही बरोबर होती! आणि अर्थातच वकील त्याची बाजू मांडायला उभे होते. सैत आणि मी एकमेकांकडे खाऊ की गिळू अशा नजरेने पाहत होतो. त्याचा वकील काहीतरी म्हणाला; नंतर माझा पाच रुपयेवाला वकीलही माझ्याकडे हातवारे करून काहीतरी म्हणाला, कोर्टाच्या शिपायाने माझ्या पाठीवर थाप मारली आणि ‘तू जाऊ शकतोस’ असं म्हणाला. माझ्या वकिलाने माझ्याकडे पाहून मान डोलावली. काय चाललंय हे समजायच्या आतच सारं संपलंदेखील! वकिलाने मला बाहेर गाठलं. “पुढची तारीख घेतलीय. कोणती ते नंतर सांगीन. ऑफिसमध्ये भेट. बाजूच्या गल्लीत जिना आहे. तिथून ये,” असं म्हणून तो नाहीसा झाला. हात्तिच्या! हे तर फारच सोप्पं होतं! सहज सुटेन ह्यातून... माझा वकील फारच हुशार दिसतोय.

घरी परतल्यावर मी आईलाही तेच सांगितलं.

“आई, अगं चिंता करण्यासारखं काहीच नाही. सर्व व्यवस्थित होतंय.”

"अरे, तो आपल्याला घराबाहेर काढेल. मग कुठे जाशील, ह्याचा विचार केलास का?"

"खटला बराच काळ चालेल. तू विनाकारण त्रास करून घेऊ नकोस," मी मोठ्या आत्मविश्वासाने तिला धीर दिला.

हे ऐकून तिने माझा नाद सोडला. अत्यंत निराश आवाजात म्हणाली, "तुला काय झालंय कोणास ठाऊक! कोणतीही गोष्ट तू गंभीरपणे घेत नाहीस..."

"अगं, मला माहितीय ना कशाबद्दल विचार करायचा ते... म्हणूनच मी काळजी करत नाहीये," मी अजूनही जमिनीवर यायला तयार नव्हतो.

अलीकडे आमच्या घरगुती चर्चा, वाद रोझीसमोरच व्हायचे. तिच्या घरात असण्याची आता आम्हाला सवय झाली होती, त्यामुळे खाजगी असं काही उरलं नव्हतं. पण आई आणि मी काही विवाद्य बोलायला लागलो की रोझी न ऐकल्यासारखं करायची. खाली नजर झुकवून स्तब्ध बसून राहायची किंवा पुस्तक उघडून मन लावून वाचायची. (दुकानातून केवळ थोडीशी पुस्तकं वाचवणं शक्य झालं होतं!) आमचे आवाज ऐकू येऊ नयेत म्हणून एका कोपऱ्यात बसून राहायची. आम्ही दोघंच असतानाही रोझीने कधीही आमच्या खाजगी गोष्टींविषयी प्रश्न विचारले नाहीत. कौटुंबिक गोष्टींमध्ये नाक खुपसून मला कधीही अडचणीत टाकलं नाही.

मी पूर्णपणे वाया गेलोय ही गोष्ट आईने स्वीकारली आहे आणि हे असंच चालणार हेही तिने मान्य केलंय असा माझा समज होता. पण मला वठणीवर आणायचे तिचे छुपे प्रयत्न चालू होते. एके दिवशी मी मोठ्या एकाग्रतेने रोझीचे पदन्यास पाहत असताना माझे मामा अचानक प्रकट झाले. अंगावर वीज कोसळावी तसा मला धक्का बसला. हे मामा म्हणजे आईचे थोरले बंधू. गावाकडे त्यांचा जमीनजुमला होता. वडिलोपार्जित घरामध्ये राहायचे. आमचे कौटुंबिक सल्लागार आणि मार्गदर्शक होते ते. आमचे म्हणजे आई आणि तिच्या तीन बहिणी. चौघी चार ठिकाणी राहायच्या. पण विवाह, मृत्यू, कोर्टकचेऱ्या, पैसाअडका अशा सर्व गोष्टींमध्ये ह्या बहिणी त्यांचा सल्ला घेतल्याशिवाय पुढे पाऊल टाकत नसत. मामा क्वचितच आपला गाव

सोडून कुठे जात. त्यांच्या सर्व सल्लामसलती पत्राद्वारे पार पडायच्या. आईचाही त्यांच्याशी पत्रव्यवहार चालायचा. महिन्यातून एक पोस्टकार्ड ते नियमितपणे आईला पाठवायचेच. लहान अक्षरातल्या मजकुराने भरलेलं त्यांचं कार्ड आलं की आईला अत्यानंद होई. समाधानाने तिचा चेहरा फुलून जाई. पुढचे कित्येक दिवस ती त्या पत्राविषयी सतत बोलत राहायची. ह्याच मामांच्या लेकीशी माझं लग्न व्हावं अशी तिची मनीषा होती. सुदैवाने अलीकडच्या घडामोडींमुळे तो विषय मागे पडला होता.

असे हे माझे महाआदरणीय मामा साक्षात आमच्या दारात प्रकट झाले! त्यांनी आपल्या दणदणीत आवाजात बहिणीला हाक मारली. मी धडपडत उठून पळतच दरवाजा गाठला. आई स्वयंपाकघरात होती. ती धावतच बाहेर आली. रोझीचा नाच अर्ध्यातच थांबला. दणदणीत सहा फूट उंची, शेतात, उन्हातान्हात काम केल्यामुळे रापलेला रंग, डोक्यावरच्या लहान शेंडीची गाठ वळलेली असे माझे मामा. शर्ट, खांद्यावर उपरणं आणि गावाकडच्या मातीमुळे मळकटलेलं धोतर. हातामध्ये जूटची पिशवी (महात्मा गांधींचं हिरव्या रंगामधील चित्र पिशवीवर छापलेलं होतं) आणि छोटी ट्रंक. ते तडक स्वयंपाकघरात गेले. पिशवीतून काकडी, थोडीशी लिंबं, केळी आणि पालेभाज्या असं काहीबाही काढून ठेवलं. “हे माझ्या बहिणीसाठी...माझ्या बागेतला मेवा.” भाज्या कशा शिजवाव्यात ह्याच्या सूचनाही त्यांनी बहिणीला दिल्या!

भाऊरायाला पाहून आईला अत्यानंद झाला होता. ती प्रेमाने म्हणाली, “कॉफी बनवते तुझ्यासाठी.” तिथेच उभे राहून मामा आईशी गप्पा मारू लागले. ‘आपण बसने आलो, आईचं पत्र मिळालं तेव्हा काय करत होतो’ वगैरे ते रंगवून सांगत होते. आईने त्यांना पत्र लिहिलं ही गोष्ट मला माहीत नव्हती. मला आश्चर्य वाटलं. न राहवून मी म्हणालो, “मामांना पत्र लिहिल्याचं मला बोलली का नाहीस?”

हे ऐकून मामा भडकले. “ती का सांगेल तुला? तुझी नोकर आहे का ती?” कसंही करून त्यांना माझ्याशी भांडण उकरून काढायचं होतं. माझ्या शर्टची कॉलर पकडून त्यांनी मला जवळ

ओढलं आणि हलक्या स्वरात म्हणाले, "हे काय दिवे लावलेस तू? चांगले गुण उधळलेस. कोणालाही अभिमान वाटेल तुझ्या पराप्रमाचा!" मी धडपडत कॉलर सोडवली आणि चिडून त्यांच्याकडे पाहिलं. त्यांचा पारा अजून चढलेलाच होता. "काय झालंय काय तुला?" ते कडाडले. "स्वत:ला फार मोठा समजतोस का? तुझ्यासारख्या नालायक माणसाला मी घाबरेन की काय? बेफाम झालेल्या बैलाला आम्ही कसे वठणीवर आणतो माहितीय का तुला? खच्ची करून टाकतो त्याला. तू नीट वागायला लाग, नाहीतर तुझंही तेच करीन." मामाच्या हळू आवाजात प्रचंड जरब होती.

आईने कॉफीसाठी पाणी उकळायला ठेवलं होतं. आम्हा दोघांमध्ये जी बाचाबाची चालली होती ती न ऐकल्यासारखं तिचं वागणं होतं. ती माझ्या मदतीला धावून येईल, मामाला आवरेल असं मला वाटलं होतं, पण मामाला बोलवायचा बनाव तिनेच घडवून आणलेला असल्याने तिला आनंद झालेला दिसला! मला खूप राग आला, आता काय होणार ह्या कल्पनेने गोंधळून गेलो. मी स्वयंपाकघरातून बाहेर पडलो तेव्हा आई मामाशी हलक्या आवाजात बोलताना दिसली. ती काय बोलत असावी ह्याचा एव्हाना मला अंदाज आलाच होता. आता मात्र मी चांगलाच हादरलो.

चटईवर बसून रोझीकडे नजर टाकली. ती अजूनही त्याच स्थितीमध्ये थिजून उभी होती - दोन्ही हात कमरेवर, एकीकडे किंचित झुकलेली. मंदिरामधील खांबांवर कोरलेल्या मूर्तीसारखी भासली ती. पर्यटकांना प्राचीन मंदिरं दाखवण्यासाठी न्यायचो त्या दिवसांची स्मृती मनात जागी झाली. त्या वेळचं आयुष्य किती विविध गोष्टींनी भरलेलं असायचं - नवनवीन लोक, अनुभव...अचानक साऱ्याची आठवण होऊन मी दीर्घ सुस्कारा सोडला. बिचारी रोझी बावरली होती. "कोण आहेत ते?" तिने घाबरत विचारलं.

"तू अजिबात घाबरू नकोस. वेडा आहे तो माणूस. लक्ष नको देऊस." मी समजावलं.

तिला तेवढा दिलासा पुरेसा होता. माझ्यावर कमालीचा विश्वास असल्याने ती निर्धास्त झाली. तिची माझ्यावरची श्रद्धा बघून माझा आत्मविश्वास जागृत झाला. मीदेखील कोणीतरी आहे, कोणालाही घाबरायचं नाही अशा निश्चयाने मी तिला म्हणालो, "तू तुझा नाच चालू ठेव. थांबलीस का?"

"पण...पण ते..." तिने मामांकडे निर्देश केला.

"त्यांच्याकडे लक्ष देण्याची गरज नाही," मी फारच आप्रमक झालो होतो. 'ह्या घरामध्ये तू फक्त मला काय वाटेल, मी काय म्हणतोय ह्याचा विचार करायचास," मामा काय म्हणतील ह्या कल्पनेने अजूनही मनातून घाबरलो असलो तरी मी अधिकारवाणीने बोलत होतो. (लहान असताना मला शिस्त लावण्यासाठी मामांना खास बोलावलं जायचं!) "हे माझं घर आहे. माझी मर्जी चालेल इथे. लोकांना मी, माझं वागणं आवडत नसेल तर त्यांनी इथे येऊ नये. बस्स, मला एवढंच सांगायचंय सर्वांना," मोठ्या आवेशाने असा इशारा देऊन मी कसनुसा हसलो.

बिचाऱ्या रोझीसमोर तावातावाने बोलून काय फायदा? माझ्या धमक्या ऐकून ती निमूटपणे सराव करायला लागली. मीदेखील तिचा गुरू असल्याप्रमाणे अत्यंत बारकाईने तिचे पदलालित्य न्याहाळत होतो. घुंगरांचा आवाज ऐकून मामांनी बाहेर डोकावून पाहिलं. ते पाहून मला अधिकच चेव चढला. गुरूच्या भूमिकेतून मी मोठ्या गंभीरपणे रोझीला सूचना देऊ लागलो. नृत्याच्या तांत्रिक बाबी कळत नसताना मोठ्या अधिकाराने रोझीला मार्गदर्शन करत होतो. मामा माझे सर्व चाळे पाहत होते. आम्हा दोघांकडे दुर्लक्ष करून रोझीचा सराव चालला होता. मामा स्वयंपाकघरातून बाहेर आले. चेहऱ्यावर पराकोटीचा तिरस्कार आणि उपहास दिसत होता. मी त्यांच्याकडे संपूर्ण दुर्लक्ष केलं. क्षणभराने मामांचा तोफखाना सुरू झाला, "अच्छा...तुझे हे उद्योग चाललेत तर! हा, हा. तरीच! आमच्या खानदानात नाचणारणीचा चमचा पैदा होईल असं वाटलं नव्हतं!"

हे अति झालं. मामांना झणझणीत सुनावण्यासाठी मी धैर्य आणि आत्मविश्वास गोळा करत होतो, पण मी घाबरून गप्प बसलोय असा मामांचा गैरसमज झाला. त्यांनी पुन्हा तोंड सोडलं, "नाच्या मुलीचे पाय चाटतोय हे पाहून तुझ्या बापाच्या आत्म्याला शांती लाभेल..."

त्यांना कसंही करून मला भडकवायचं होतं. अखेर माझा संयम संपला. मी त्यांची जराही तमा न बाळगता म्हणालो, "तुम्ही आपल्या बहिणीला भेटायला आला आहात ना? मग तेवढंच करा. ती आत आहे, तुम्हीही तिथेच थांबा तिच्याबरोबर. माझ्यामागे का लागताय?"

"अरे वा," मामा आसुरी आनंदाने ओरडले. "तुझ्यात अजूनही थोडा दम बाकी आहे हे पाहून बरं वाटलं! पण मामालाच दाखवू नकोस तो रुबाब! माजलेल्या बैलांना आम्ही कसं वठणीवर आणतो हे थोड्या वेळापूर्वीच सांगितलं ना?" मामांनी तिथेच बैठक मारली होती. कॉफी पिताना ही मुक्ताफळं उधळत होते.

"ह्या वयात असलं घाणेरडं बोलू नका," मी ठणकावलं.

"अगं, ए कोल्हाटणे..." ते अत्यंत तुच्छतेने रोझीला म्हणाले, "थांबव तुझी ती नाचगाणी. एकदम बंद. मी सांगतो ते नीट ऐक. तू आमच्या कुटुंबातली आहेस का?" मामा उत्तराच्या अपेक्षेने थांबले. रोझी काहीही न बोलता त्यांच्याकडे पाहत राहिली.

"आमच्या खानदानाची नाहीस. आमच्या कुळातली आहेस? नाही. आमची जातवाली आहेस? नाही. आमचा आणि तुझा सामाजिक दर्जा एक आहे? नाही. तुझा-आमचा परिचय आहे? नाही. ह्या घरात राहण्याचा तुला हक्क आहे का? नाही." मामांनी प्रश्नांच्या फैरी झाडून उत्तरंही स्वत:च दिली. "जर प्रत्येक प्रश्नाचं उत्तर 'नाही' असंच आहे, तर तू इथे का आहेस? तू एक नाचणारीण आहेस. तुझ्यासारख्या बायांना आमच्या घरात स्थान नाही, समजलीस? तू एक चांगली, समजूतदार मुलगी वाटतेस. असं कोणाच्याही घरात घुसून मुक्काम ठोकायचा हे बरोबर नाही. तुला कोणी आमंत्रण दिलं होतं का? नाही ना? समजा, बोलावलं, तरी एवढा वेळ राहायचं का? एकूणच फार अडचणीचा होतोय तुझा इथला मुक्काम. स्वत:च्या नवऱ्याला

सोडून मूर्ख तरुण मुलांना आपल्या नादी लावते आहेस. फारच चुकीचं आहे तुझं वागणं. मी सांगतोय ते समजतंय ना तुला?" मामांच्या जिभेच्या तलवारीसारख्या फटकाऱ्यांनी बिचारी रोझी कमालीची घायाळ झाली. मटकन खाली बसून तिने चेहरा हातांच्या ओंजळीत लपवला. आपले प्रयत्न फलदायी ठरल्याचं पाहून मामांना आनंद झाला. आपला मुद्दा अधिक ठसवण्यासाठी ते म्हणाले, "हे बघ, उगीच रडण्याचं नाटक करू नकोस. आम्ही असं का म्हणतोय हे लक्षात घे. आता इथून निघायचं. पहिल्या गाडीनेच रवाना व्हायचं. कबूल कर तसं. तुझ्या तिकिटाचे पैसे मी देईन."

रोझीला आता मात्र रडू आवरेना. ती मोठमोठ्याने हुंदके देऊ लागली. ते पाहून मी रागाने वेडाच झालो. मामांच्या अंगावर धावून गेलो. त्यांच्या हातातला कप खाली पडला. "घरातून चालते व्हा," मी जोरात ओरडत होतो.

मामांनी कसंबसं स्वत:ला सावरलं. "अखेर ही वेळ आली. तू मला घराबाहेर काढतोयस. समजतोस काय स्वत:ला? तू कोण मला घराबाहेर काढणारा? मीच तुला रस्त्यावर काढतो की नाही बघ. माझ्या बहिणीचं घर आहे हे. तुला नाचणारणीबरोबर मजा मारायची असेल तर तूच चालता हो," ते कडाडले.

आई स्वयंपाकघरातून धावतच बाहेर आली. तीही रडत होती. ओक्साबोक्शी रडणाऱ्या रोझीच्या अंगावर ती त्वेषाने चालून गेली. "चांडाळणी, झालं तुझ्या मनासारखं? अगं, कैदाशिणी, का आलीस आमच्या जीवनात...सुखाने जगत होतो आम्ही - तू आलीस आणि ह्या घरातली शांती गेली. नागीण आहेस तू. विष कालवलंस आमच्या सुखी संसारात. माझ्या मुलाला डसलीस, पार बिघडला तेव्हापासून. माझ्या सोन्यासारख्या मुलाला नासवलंस. तुला 'नाग स्त्री' म्हणाला तेव्हाच माझ्या काळजात धस्स झालं होतं. काहीतरी वाईट होणार हे तेव्हाच समजलं मला." आई रोझीला भयंकर शिव्याशाप देत होती. कैक आठवड्यांपासून तिच्या मनात हे खदखदत असणार. एकदाची सारी वाफ निघून जाऊ दे म्हणून मी तिला अडवलं नाही. 'मी

पूर्वी किती गुणी आणि चांगला होतो, आता माझ्या वागण्याला कसा धरबंद राहिलेला नाही, कोर्टात जायची पाळी आलीय, बापाने एवढ्या कष्टाने उभं केलेलं घरही ह्याने घालवलं...' असा माझ्या पापांचा पाढा तिने घडाघडा वाचून दाखवला. रोझीविषयी दाबून ठेवलेलं सारं गरळ अखेर बाहेर पडलं.

"आई, मी निघून जाते, पण माझ्याशी एवढ्या कठोरपणे बोलू नका ना...एवढे दिवस किती प्रेमाने वागत होता..." रोझी हुंदके देत म्हणाली.

हे ऐकून मामा आईवर घसरले, "ही बया म्हणतेय ते खरंच आहे. तुझं चुकलंच. तू का एवढी चांगली वागलीस तिच्याबरोबर? सुरुवातीलाच कडक शब्दांमध्ये सुनवायला हवं होतंस."

ह्या गृहस्थाला चूप करणं वा घराबाहेर काढणं माझ्या शक्तीच्या पलीकडलं होतं! तो बेधडक हवं ते बोलत होता. इथून हलायचंही लक्षण दिसत नव्हतं. रोझीला त्यांच्या गरळ ओकण्यापासून वाचवायचं तर त्यांना अक्षरश: लोटून घराबाहेर काढायला हवं. मी त्यांना हात लावला तर ते मला एका फटक्यात लोळवतील ह्याची खात्री असल्याने मी तो विचार बाजूला सारला. आईच्या वागण्याने मात्र मला धक्काच बसला होता. भावाचा आधार मिळताच तिने रंग बदलला होता. आत्तापर्यंत रोझीबरोबर माणुसकीने वागणारी प्रेमळ आई आणि आज तिच्या अंगावर धावून गेलेली, जहरी वाग्बाणांनी रोझीला घायाळ करणारी आई ह्यांमध्ये जमीन-अस्मानाचा फरक आला तो मामांच्या आगमनानंतरच... मी रोझीला जवळ घेतलं. ते पाहून दोघांनाही धक्का बसला ('ह्याने तर सर्व लाज सोडली,' मामा किंचाळले.) तिकडे दुर्लक्ष करून मी हळू आवाजात रोझीला म्हणालो, "त्यांना हवं ते बोलू दे. तू आपले कान बंद कर. ओरडून दमल्यावर थांबतील. पण तू इथून जायचं नाही हे नक्की. मीही इथेच राहणार आणि तूही. ज्या कोणाला हे आवडत नाही त्यांना घराचा दरवाजा उघडा आहे."

हे ऐकून दोघांनीही तोंडाचा पट्टा चालू केला. मी एकही शब्दाने प्रत्युत्तर केलं नाही. अखेर आपल्या बोलण्याचा काही परिणाम होत नाही हे पाहून दोघंही स्वयंपाकघरात गेले. आज मला

एक चांगली युक्ती सापडली होती - 'कान बंद करून घ्यायचे'. कोणी कितीही आणि काहीही बोललं तरी अजिबात ऐकायचं नाही. मुळूमुळू रडणारी रोझीदेखील माझ्यावर भरवसा ठेवून शांत झाली होती. घरात काय चाललंय हे पाहत ती स्वस्थ बसून राहिली. असाच थोडा वेळ गेला. जेवण तयार झाल्यावर आईने हाक मारली. त्यापूर्वी मामांचं जेवण उरकून घेण्याची खबरदारी तिने बाळगली होती. त्यांनी आणलेल्या भाज्या, त्यांच्या सूचनेनुसार बनवल्यामुळे ते समाधानाने जेवले असणार! जेवून ते बाहेर ओट्यावर गेले. त्यावर पंचा पसरून बैठक ठोकली. थोडा वेळ पान चघळून तिथेच आडवे झाले. थंडगार लादीवर गाढ झोपी गेले. त्यांचं घोरणं ऐकून मी सुटकेचा नि:श्वास सोडला. रोझीला घेऊन जेवायला बसलो. आईने आमच्याकडे न पाहता मुकाट्याने जेवायला वाढलं. साऱ्या घरात भयाण शांतता पसरली होती. दुपारी साडेतीन वाजता मामा उठले तेव्हाच ह्या शांततेचा भंग झाला.

त्यांनी पुन्हा तोफ डागली. कोणा एकाला उद्देशून न बोलता त्यांनी घोषणा केली, "गाडी एक तासाने सुटणार आहे. तयारी झालीय का?" रोझी खिडकीजवळ बसून काहीतरी वाचत होती. हे ऐकून तिने नजर उचलून वर पाहिलं. चेहऱ्यावर तणाव स्पष्ट दिसत होता. दुपारभर मी सावलीसारखा तिच्याजवळच होतो. कोणी काहीही बोललं तरी मी तिची साथ सोडणार नव्हतो. मामा घरात असेपर्यंत डोळ्यांत तेल घालून रोझीची राखण करायची होती. ते कधी इथून टळतील हे समजायला मार्ग नव्हता. मी त्यांना जायला सांगितलं म्हणून तर ते नक्कीच निघणार नव्हते. आपलं तेच खरं करायचे ते.

आता काय होणार ह्या कल्पनेने रोझी काहीशी घाबरली. मी हात उंचावून तिला धीर द्यायचा प्रयत्न करीत होतो. एवढ्यात आई पुढे झाली. मोठ्या मायेने रोझीला म्हणाली, "हे बघ पोरी, तू इथे राहिलीस, फार बरं वाटलं. पण आता तुला निघायला हवं." आता आईने नवे डावपेच वापरायचा प्रयत्न सुरू केला होता - म्हणजे, रोझीने मोठ्या समजूतदारपणे स्वत:च निघून

जायचं कबूल केलं होतं, असं ती बळेच भासवू लागली होती. “रोझी, अगं, साडेचार वाजता गाडी आहे. तुझं सर्व सामान नीट भरलंस ना? तुझे कपडे इथे-तिथे पडलेत बघ.’

रोझी आईकडे टकामका बघत होती. काय उत्तर द्यावं तिला सुचत नव्हतं. अखेर मीच मध्ये पडलो. “आई, ती कुठेही जाणार नाही.” मी ठामपणे म्हणालो.

आई विनवणीच्या स्वरात म्हणाली, “राजू, जरा तरी विचाराने वाग. ती विवाहिता आहे. दुसऱ्या माणसाची पत्नी आहे. तिने त्याच्याकडेच परत जायला हवं. तेच योग्य आहे.”

आई बरोबरच बोलत होती. त्याचं खंडन करणं शक्य नव्हतंच. त्यामुळे मी पुन्हा तेच म्हणालो, “आई, ती कुठेही जाणार नाही. इथेच राहायला हवं तिने.”

मी माझं म्हणणं सोडत नाही हे पाहून आईने आपलं अमोघ अस्त्र बाहेर काढलं. “ती जाणार नसेल तर मलाच हे घर सोडावं लागेल. मीच जाते मग.” तिने असं म्हटल्यावर मामांनी गर्जना केली, “तुला काय वाटलं, ती तुझ्यावर अवलंबून आहे? असाहाय्य, अगतिक समजू नकोस तिला.” मला असं बजावून ते छाती ठोकून म्हणाले, “जोवर माझ्या जिवात जीव आहे, तोवर माझ्या बहिणीची मान खाली पडू देणार नाही. मी सांभाळीन माझ्या बहिणीला.”

मी काकुळतीला येऊन आईला म्हणालो, “आई, तुला जाण्याची काहीच गरज नाहीये.”

“आईने राहावं असं वाटत असेल तर या चेटकिणीची ट्रंक बाहेर फेकून दे आत्ताच्या आत्ता. तिलाही हाकल. मगच तुझी आई इथे राहील. तुला काय वाटलं, नाचणाऱ्या फालतू मुलीबरोबर तिने एकाच घरात राहावं? तिला काय...”

“मामा, एकदम चूप बसा,” मी किंचाळलो. माझ्या धारिष्ट्याचं मलाच आश्चर्य वाटलं. एकीकडे थोडा घाबरलोदेखील - मामा पुन्हा माजलेल्या बैलाच्या खच्चीकरणाची धमकी देतील म्हणून! सुदैवाने तसं न म्हणता ते कडाडले, “काय रे दीडशहाण्या, मला चूप बसायला सांगणारा

तू कोण? मी तुला घाबरीन असं वाटलं की काय तुला? तू त्या... त्या... तिला घराबाहेर काढणार की नाही एवढंच सांग. जास्त बोलायचं काम नाही.”

मी अत्यंत निग्रहाने म्हणालो, “नाही, ती कुठेही जाणार नाही.”

पराभूत होऊन मामांनी दीर्घ नि:श्वास सोडला. रोझीकडे खाऊ की गिळू नजरेने पाहिलं आणि आईला फर्मावलं, “चला तर बहिणाबाई, निघायची तयारी करा. सामान बांध. संध्याकाळच्या बसने निघू.”

आईही तत्परतेने म्हणाली, “ठीक आहे. एका मिनिटात तयार होते.”

“आई, नको ना जाऊस,” मी आईची आर्जवं करत म्हणालो.

“ह्या मुलीचा कोडगेपणा तर बघा! एवढा तमाशा चाललाय पण सारं काही शांतपणे बघत बसलीय,” मामांनी संधी साधली.

“आई, खरंच जाऊ नका ना,” रोझीने आईपुढे हात पसरले.

“अरे वा,” मामा कुत्सितपणे म्हणाले, “आता तुला ‘आई’ म्हणायला लागलीय. काही वेळाने मलाही ‘सासरेबुवा’ म्हणू लागेल!” माझ्याकडे मोर्चा वळवून ते पुढे म्हणाले, “खरं म्हणजे हे घर तुझ्या आईचं आहे. तिला इथून निघायची काय गरज?” त्यांच्या चेहऱ्यावर आसुरी आनंद दिसू लागला. “तुझ्या आईने अडवलं नसतं तर आज तुला चांगला धडा शिकवला असता. मालकीण असल्याने ती कायम इथेच राहू शकेल तुझ्या नाकावर टिच्चून! माझे मेव्हणे हुशार होते. त्यांनी तुला अर्ध्याच घराची मालकी दिलीय...” मामा अचानक मला कायदा शिकवायला लागले - अप्पांच्या मृत्युपत्रामधील तरतुदी मला ऐकवल्या; आईच्या जागी ते असते तर त्यांनी परिस्थिती वेगळ्या तऱ्हेने हाताळली असती; घराच्या मालकीसाठी, इंच इंच जागेसाठी लढले असते; प्रकरण सुप्रीम कोर्टापर्यंत नेलं असतं; घराण्याच्या नीतिमूल्यांची पर्वा न करणाऱ्या आणि तरीही बापजाद्यांनी मेहनतीने कमावलेल्या संपत्तीवर मजा मारू पाहणाऱ्या

नालायक वारसांना कसं ताळ्यावर आणायचं हे जगाला दाखवून दिलं असतं...' वगैरे वगैरे. मला कायदेशीर धमक्या देण्याच्या नादात मामाचं रोझीकडचं लक्ष निदान काही काळ का होईना बाजूला सरलं ह्यामुळे मला हुश्श झालं. 'कोर्ट-कज्जे' हा जमीनदार जमातीचा आवडीचा विषय असल्याने मामाही बराच वेळ मला कायद्याचे विविध बारकावे सांगून घाबरवायचा प्रयत्न करत होते. त्यांचं तोंड आणखीही वाजत राहिलं असतं, पण आईने रसभंग केला. दोन-चार कपडे भरून तिने निघायची तयारी केली होती. "चला, निघायचं," ती मामांना म्हणाली. मोठ्या पत्र्याच्या ट्रंकेत - वर्षानुवर्षं ही ट्रंक कोपऱ्यात पडून होती - कपडे आणि एका बास्केटमध्ये थोडी तांब्यापितळेची भांडीपुंडी असा आईचा एकूण संसार! मी तिकडे बघतोय हे मामांना आवडलं नाही. "ह्या मुलीच्या, माझ्या प्रिय बहिणीच्या विवाहप्रसंगी आमच्या वडिलांनी हे सर्व सामान तिला दिलंय. केवळ तिचा हक्क आहे त्यावर. तू तिकडे डोळे फाडून पाहू नकोस."

मी ट्रंकेवरून नजर हटवली, पराभूत स्वरात म्हणालो, "तिला हवं ते नेऊ शकते इथून. कोणीही काही बोलणार नाही."

"अच्छा? ह्या गोष्टीचा फार अभिमान वाटतोय नाही का तुला? फारच उदारपणा दाखवतोस जन्मदात्या आईला!" मामा कुत्सितपणे म्हणाले.

संपूर्ण आयुष्यात मी मामांना एवढं चिडलेलं पाहिलं नव्हतं. लहानपणी आम्ही सारेच त्यांना टरकून असायचो. त्यांचं असं रुद्र रूप आज प्रथमच पाहत होतो. आई दु:खी दिसत होती. मामा मला फारच टाकून बोलत होते हे तिला आवडलेलं दिसलं नाही. ती मामांना तटकन तोडून टाकत म्हणाली, "मला आणखी काहीही नकोय. हवं ते घेतलंय." तिचा आवाज अतिशय गंभीर होता. आई रोज सकाळच्या जेवणापूर्वी देवासमोर बसून पोथ्या वाचायची. आरत्या म्हणायची. भिंतीवरच्या कोनाड्यात देवांच्या तसबिरी होत्या. त्यांच्यापुढे भक्तिभावाने डोळे मिटून पूजा करणारी आईची मूर्ती मी वर्षानुवर्षं पाहत आलोय. आता ते दृश्य कधीच बघायला मिळणार नाही ह्या कल्पनेने माझं काळीज पिळवटलं. ती आरत्यांची पुस्तकं, पोथ्या, बाकी सटरफटर

वस्तू उचलून ट्रंकेत टाकत होती. मी मूकपणे तिच्यामागे फिरत होतो. माझ्यावर नजर ठेवण्यासाठी मामाही मागोमाग होतेच. मी आईचं मन वळवीन आणि ती त्यांच्याबरोबर जायचा बेत रद्द करील, अशी भीती त्यांना वाटत असावी.

मामांची तमा न बाळगता मी आईला विचारलं, "आई, परत कधी येशील?"

आईने पटकन उत्तर दिलं नाही. मग थोड्या वेळाने घुटमळत म्हणाली, "मी... मी... बघू या..."

मामांनी मध्ये तोंड घातलंच, "इथली पीडा गेल्याची तार पाठव. ती मिळताच तुझी आई परत येईल. आम्ही बहिणींना वाऱ्यावर सोडणार नाही. गावाकडचं घरही तिचंच आहे. कोणाच्याही दयेवर जगायची गरज नाही तिला, समजलास? माझ्याइतकाच तिचाही हक्क आहे आमच्या घरावर," मामांनी मोठ्या अभिमानाने मला बजावलं.

आई घराच्या पायऱ्या उतरू लागली. "देवापुढे दिवा लावायला विसरू नकोस. तब्येतीची काळजी घे," ती जड अंत:करणाने म्हणाली. मामांनी तिची ट्रंक उचलली होती. आईजवळ बास्केट होतं. हळूहळू रस्त्याच्या कोपऱ्यापर्यंत ते पोहोचले आणि तिथून वळून दिसेनासे झाले. मी पायरीवर पुतळ्यासारखा उभा राहून त्यांच्या आकृत्या दिसेनाशा होईपर्यंत बघत राहिलो. रोझी उंबरठ्यावर उभी होती- सुन्नपणे... वळून तिच्याकडे बघायचं धैर्य माझ्यात नव्हतं. डोळ्यांमधून वाहणारे अश्रू तिला दिसू द्यायचे नव्हते मला.

एखाद्या लग्न झालेल्या जोडप्याप्रमाणेच आम्ही राहत होतो. रोझी स्वयंपाकघर सांभाळायची. घरकाम करायची. थोडंफार सामानसुमान आणायला म्हणून मी घराबाहेर पडायचो. पण फारच क्वचित. उरलेला बाकी सर्व वेळ रोझी नृत्याची तालीम करायची. मी तर चोवीस तास प्रणयरंगात बुडालेला असे. रोझी सतत मिठीत हवी असायची. मी स्वप्ननगरीमध्ये रमलो होतो,

पण तिला कंटाळा येत चालला. कारण काही महिन्यांनंतर अखेर तिने विचारलंच, “तू काही योजना आखली आहेस की नाही?”

“योजना? कसली योजना?” मी खाडकन भानावर आलो.

ती मंद हसली. “बघ, हेच म्हणायचंय मला. तू कायम त्या चटईवर पडून माझा नाच बघतोस, नाहीतर मला मिठीत घेऊन माझे लाड करतोस. असं किती दिवस चालणार, राजू? आता माझी तयारीही उत्तम झालीय. चार तासांचा कार्यक्रम मी सहज करू शकेन. साथीदार असते तर ह्यापेक्षाही चांगली तालीम झाली असती...”

“पण मी आहे ना तुझा साथीदार. सारा वेळ तुझ्या सेवेसी सादर असतो. आणखी काय हवं तुला?” मी तिचं म्हणणं खोडून काढलं.

“तसं नाही. मला साथीला वादक हवेत. घरात बसणं खूप झालं आता,” ती म्हणाली. तिच्या आवाजातली कळकळ जाणवून मीही गंभीर झालो.

“मीही विचार करतोय. काहीतरी सुरुवात करायलाच हवी,” मी मनापासून म्हणालो.

दोन दिवस भरपूर चिंतन-मनन केल्यानंतर मी रोझीला म्हणालो, “तुझं नाव प्रथम बदलायला हवं. ‘रोझी’ नावाला काही वजन नाही, वास्तविक पाहता तुमचं घराणं पारंपरिक नर्तकांचं असूनही तुझं नाव काय ठेवावं हे त्यांना समजलं नाही? जनतेसाठी, सार्वजनिक कार्यक्रमांसाठी तुझं नाव बदलायलाच हवं. ‘मीनाकुमारी’ हे नाव कसं वाटतं?”

तिने नकारार्थी मान हलवली. “हे नाव तरी कुठे चांगलं आहे. माझं नाव बदलण्याची तशी मला तरी काही गरज वाटत नाही.” ती नापसंतीने म्हणाली.

“अगं प्रिये, ‘रोझी’ नाव सभ्य-सुसंस्कृत वाटत नाही. काही अर्थच नाही त्या नावाला. कोणी ‘रोझी’ नृत्य करतेय असं लोकांना समजलं तर भलतीच अपेक्षा ठेवून ते कार्यक्रमाला येतील!

जुगारी अड्ड्यांवर नाचणारी बाजारू बाई वाटेल त्यांना. उच्च दर्जाची शास्त्रीय नृत्यांगना आहेस तू, त्याला साजेलसं काव्यात्म आणि आकर्षक नाव असायला हवं."

माझ्या बोलण्यात तथ्य आहे हे तिलाही पटलं. लगेच कागद, पेन्सिल घेऊन तिने नावांची यादी करायला सुरुवात केलीदेखील. काही नावं मी सुचवली. वेगवेगळ्या नावांनी पानंच्या पानं भरली. त्याच वेगाने आम्ही ती नापसंत करत गेलो. प्रत्येक नावामध्ये आम्हाला काहीतरी हास्यास्पद किंवा विचित्र आढळायचं. कधी एखाद्या नावामागील संदर्भ वा त्याचा अर्थ आवडायचा नाही. अशी असंख्य नावं निकालात काढल्यानंतर हळूहळू साराच प्रकार विनोदी वाटायला लागला. उदा. मध्यरात्री गाढ झोपेतून मला उठवून रोझी विचारायची, "हे नाव कसं वाटतं?"

"अगं, हे तर एका असुर-राजाच्या पत्नीचं नाव आहे. लोक घाबरतील," मी झोपेतच म्हणायचो. अखेर चार दिवसांच्या निवडप्रप्रिया आणि गहन विचारमंथनानंतर (आम्ही व्यावसायिक कर्तव्यं पार पाडतोय ह्या गोष्टीचं फारच समाधान वाटत होतं!) आम्ही 'नलिनी' हे नाव निवडलं, अर्थपूर्ण, काव्यमय, सर्वांना आवडेल असं हे नाव छोटं आणि सहज लक्षात ठेवता येईलसं होतं. त्यामुळे आम्ही दोघांनी त्यावर शिक्कामोर्तब केलं.

नव्याने बारसं होऊन नवीन नाव मिळाल्यानंतर रोझीच्या जीवनामध्येही नवीन पर्व सुरू झालं. त्यापूर्वी तिच्या आयुष्यात जे काही घडलं, तिने सहन केलं ते 'रोझी' नावाबरोबरच संपलं. सारी दुनिया तिला 'नलिनी' नावाने ओळखायला लागली. जुन्या 'रोझी' ह्या नावाने ओळखणारा आणि त्याच नावाने संबोधणारा एकटा मीच होतो. मीदेखील आळस झटकून झडझडून कामाला लागलो. त्यासाठी शहरात खेटे घालून संबंधित व्यक्तींना भेटायचा सपाटा लावला. विद्यापीठ, टाऊन हॉल, क्लब - कुठेही मीटिंग असल्याचं समजलं की मी हजेरी लावायचो. कुठेतरी संधी मिळेल, कार्यप्रम ठरवता येईल म्हणून मी धडपडत होतो. 'अल्बर्ट मिशन'चं वार्षिक स्नेहसंमेलन आहे अशी खबर मिळताच मी - तिथला कारकून लहानपणी

माझ्याच शाळेत होता, तो धागा पकडून- तिथे शिरकाव केला. “शेक्सपीयरच्या शोकांतिका दरवर्षीच करता. यंदा नृत्याचा कार्यप्रम ठेवून पाहा,” अशी सुरुवात करून मी भारतामध्ये कलांना प्रोत्साहन देणं किती गरजेचं आहे ही गोष्ट आग्रहीपणे सांगितली. माझा आवेश पाहून संघटकांना मला उडवून लावणं कठीण झालं असावं. ‘भारतीय संस्कृती आणि त्यामधील नृत्याचं स्थान’ ह्या विषयावर मी विद्वत्ताप्रचुर भाषणच दिलं. त्याचा प्रभाव एवढा जोरदार होता की, सर्वांनाच माझं म्हणणं मान्य करावंच लागलं. तरीही एकाने शंका काढलीच. “विद्यार्थ्यांच्या संमेलनात शास्त्रीय नृत्याचा कार्यप्रम ठेवणं कितपत संयुक्तिक आहे?” असं त्याचं म्हणणं पडलं. मी तत्परतेने त्याचं म्हणणं खोडून काढलं, “शास्त्रीय नृत्यामध्ये विविध पैलू असल्यामुळे त्यातूनही हलकं मनोरंजन होऊ शकतं.” मी हिरीरीने प्रत्येक शंकेचं समाधान करत होतो. माझ्या नजरेसमोर एकच ध्येय होतं आणि ते गाठण्यासाठी मी प्राण पणाला लावत होतो. शास्त्रीय नृत्यासारख्या महान आणि गंभीर विषयाला साजेसा पोषाखही परिधान करायला मी विसरलो नव्हतो - रेशमी सदरा, त्यावर उपरणं, हातमागाचं धोतर आणि रिमलेस चष्मा (हा मार्केने दिला होता), हातात घड्याळ, अशा वेषभूषेमुळे मी चांगला भारदस्त दिसत होतो. त्यामुळेच सारे माझं बोलणं मोठ्या आदराने ऐकत असावेत, असा माझा अंदाज होता.

बाह्यरूपाप्रमाणेच माझं मनदेखील बदललं होतं. जुन्या ‘रेल्वे राजू’चा पुनर्जन्म झाला होता. रोझीप्रमाणेच आपणही नवं नाव धारण करून नव्याने आयुष्य सुरू करावं असं मला तीव्रपणे वाटायचं, पण त्यामुळे परिस्थितीत विशेष फरक पडला नसता हेही तितकंच खरं होतं. रेल्वे कॉलनीच्या बाहेर कोणालाही माझ्या भानगडींमध्ये नाक खुपसायची इच्छाही नव्हती आणि तेवढा वेळही नव्हता हे माझं सुदैवच म्हणायचं. सांस्कृतिक गोष्टींवर मी अधिकारवाणीने आणि अस्खलितपणे बरंच काही बोलू शकतो ह्या गोष्टीचं मलाच आश्चर्य वाटलं. रोझीकडून नृत्यविषयक काही तांत्रिक शब्दप्रयोग शिकलो होतो. त्यांचा मी माझ्या संभाषणामध्ये चपखल उपयोग करत होतो. उदाहरणार्थ, ‘नाचरी पावलं’ अर्थात ‘डान्सिंग फीट’ हा नृत्यप्रकार काय आहे, त्याचं महत्त्व, अर्थ मी बारकाईने विशद करून सांगायचो. रंगवून सांगताना जवळजवळ

सारा अभिनय करून दाखवायलाही मी मागेपुढे पाहिलं नाही. समोरचे सारे 'आ' वासून मोठ्या नवलाने सारं बघत होते. आयोजकांसमोर मी आणखी एक पिल्लू सोडलं, "वाटलं तर तुम्हाला नृत्याची एक झलक पाहता येईल. त्यासाठी माझ्या घरी यावं लागेल." सर्वांनी आनंदाने तयारी दर्शवली. "'नलिनी' माझी कझिन असून सध्या माझ्याकडे आलेली आहे. शहरामध्ये लौकिक आहे तिचा..." मी रोझीविषयी पार्श्वभूमी तयार केली.

दुसऱ्या दिवशी सकाळीच रोझी कामाला लागली. हॉल आवरून नीटनेटका केला, गुलमोहोराच्या फुलांनी सजवला. ब्रॉन्झच्या फुलदाणीमध्ये फुलांचा झुपका रचून कोपऱ्यात ठेवला. साध्याच गोष्टी, पण आमचं घर त्यामुळे सुंदर दिसायला लागलं. तिने गाद्या, स्टुलं, पेट्या, इतर सटर-फटर सामान कोपऱ्यात रचून ठेवलं, त्यावर धोतर पांघरलं. वरतून चट्टेरी-पट्टेरी गालिचा टाकल्याने सर्व पसारा झाकला गेला. जुनी, तुटकी चटई गुंडाळून ठेवून दिली. हॉल पाहुण्यांच्या स्वागताला सज्ज झाला. वाफाळलेली कॉफीही तयार होती. आयोजकांवर चांगली छाप पडावी ह्यासाठी रोझीचा सारा आटापिटा चालू होता. तेवढ्यात ठरल्याप्रमाणे दोघंजण आलेच. दारावर थाप पडली तशी रोझी स्वयंपाकघरात पळाली. हॉलच्या दारावर तिने नक्षी असलेला पडदा टांगला होता. मी दार उघडलं आणि पाहुण्यांना पाहून म्हणालो, "अरे वा! तुम्ही खरोखरच आलात तर!" मी फारसा उत्साह दाखवला नाही, त्यामुळे आपला आब राहील असं मला वाटत होतं. ते कसनुसं हसले. एका सुंदरीच्या आनंददायक नृत्याविष्काराचा अनुभव घ्यायची उत्सुकता त्यांच्या चेहऱ्यावर दिसत होती.

मी त्यांना चटईवर बसवलं, थोडा वेळ जागतिक राजकारणावर चर्चा केली आणि नंतर सूतोवाच केलं, "तुम्हाला सवड आहे ना? माझ्या कझिनला मोकळा वेळ आहे का बघतो."

पडदा बाजूला सारून मी स्वयंपाकघरात गेलो. ती मागेच उभी होती. मी तिच्याकडे पाहून पूर्ण बत्तीशी दाखवत हसलो. हळूच डोळाही मारला. ती पुतळ्यासारखी स्तब्ध उभी होती, पण तीही मनापासून हसली. असं नाटक, अभिनय करताना आम्ही दोघंही आनंद घेत होतो.

कार्यप्रमांना आरंभ झालाच, ही तर केवळ सुरुवात आहे असं काहीसं वाटत होतं. तिने केसांचा अंबाडा बांधला होता, कपाळावर लहानसा पुंकवाचा ठिपका आणि चेहऱ्यावर हलकीशी पावडर लावली होती. निळ्या रंगाची साधी सुती साडी - ही साधी सोज्वळ प्रतिमा निर्माण करण्यासाठी रोझीने बरेच कष्ट घेतले असणार. अशीच स्तब्धतेमध्ये पाच मिनिटं गेली. पुरेसा वेळ त्या दोघांना ताटकळत ठेवलं असा विचार करून मी रोझीला खूण करून बाहेर पडलो. तीही माझ्यामागोमाग आली.

दोघंही - एक चिटणीस आणि दुसरा खजिनदार - रोझीकडे मंत्रमुग्ध घेऊन पाहत राहिले. “हे दोघं माझे स्नेही आहेत. तू बस ना,” मी ओळख करून दिली. स्मित करून ती दूर अंतरावर छोट्या चटईवर शालीनपणे बसला. तिच्या एका स्मितहास्याने सर्व दारं उघडतील ह्याची मला त्या क्षणी खात्री पटली. काही काळ अवघड शांतता पसरली. अखेर मीच म्हणालो, “कॉलेजच्या स्नेहसंमेलनामध्ये विविध गुणदर्शनाचा कार्यप्रम करायचा आहे. ते ठरवण्यासाठी हे माझे मित्र आले आहेत. तू त्यामध्ये भाग घेशील का?”

“विविध गुणदर्शन कार्यप्रम?” रोझीने आठ्या घालून विचारलं. “नृत्याशिवाय आणखी काय कार्यप्रम आहेत?”

दोघंही ओशाळले. “वेषभूषा स्पर्धा, नकला असंच काहीबाही सादर होणार आहे,” ते दिलगिरीने म्हणाले.

“ह्या सर्वांमध्ये माझं नृत्य कुठे बसवणार आहात? मला किती वेळ मिळेल?” रोझीने सूत्रं हातात घेतली.

दोघंही फारच गोंधळून गेले. “एक तास, दीड तास... आपल्याला हवा तेवढा वेळ घ्या.”

हे ऐकून रोझीने एक व्याख्यानच दिलं, “असं पाहा, नृत्याचा कार्यप्रम अन्य ‘विविध गुणदर्शना’च्या कार्यप्रमांसारखा नसतो. अमूक वेळातच संपवता येतो, असं नसतं. नृत्य करत

असतानाही त्यामध्ये बदल अथवा सुधारणा करता येतात. त्याचा परिणाम कसा चढत जाईल, ते पाहावं लागतं. वेषभूषा, नकला अशा कार्यप्रमांशी नृत्याची तुलना कशी करता येईल?"

दोघांनी मान डोलावली. तिचे सर्व मुद्दे त्यांना सपशेल मान्य होते. मी मध्ये तोंड खुपसून म्हणालो, "आत्ता तुला भेटायला आणि तुझ्यामधील कलेचा नमुना पाहण्यासाठी हे आले आहेत. तेवढी मेहरबानी करशील का?"

परत तिच्या चेहऱ्यावर आठ्या पडल्या. द्विधा मन:स्थिती व्हावी त्याप्रमाणे ती विचारमग्न झाली.

"मग काय ठरवलंस? तुझ्या उत्तराची वाट पाहताहेत हे दोघं. त्यांनाही कामं आहेत दुसरी," थोड्या वेळाने मी विचारलं.

"अहो, त्यांना उगीच त्रास देऊ नका. काही घाई नाही. आम्ही थांबतो," दोघांनीही मलाच अडवलं.

"पण...आत्ता कसं काय नृत्य करता येईल? वाद्यं नाहीत, वादक नाहीत. त्याशिवाय मी कधीही..." तिने अडचण सांगितली. मी लगेच तिला समजवायला लागलो, "पण ही नुसती एक झलक दर्शवण्यासाठीची तालीम असेल. प्रत्यक्ष कार्यप्रम होईल तेव्हा वादक साथीला असतीलच. आता थोडासा नमुना दाखव. तू सर्वांत महत्त्वाची कलाकार असणार त्या कार्यप्रमात. तेव्हा सारं व्यवस्थित होईल," मी तिची मनधरणी करत होतो. ते दोघंही माझ्या मदतीला धावून आले. अखेर रोझीने कसाबसा होकार भरला. "तुमचा एवढा आग्रहच आहे तर मी नाही म्हणत नाही. पण नीट जमलं नाही, तर मला दोष देऊ नका," तिने आधीच स्पष्ट केलं. आत जाऊन ती सर्वांसाठी कॉफी घेऊन आली.

"कशाला उगाच त्रास घेताय?" दोघांनी उपचार म्हणून 'नको, नको' म्हटलं, पण मी आग्रह केल्यानंतर त्यांनी कप उचलले.

रोझीने नृत्य सुरू केलं. हलक्या आवाजात ती बोल म्हणत होती. मी मुरलेल्या जाणकाराप्रमाणे टाळ्या वाजवून ताल देत होतो. दोघं कमालीचे संमोहित होऊन तिचा नाच बघत होते. अचानक ती थांबली. भुवयांवर उमटलेले घामाचे थेंब टिपून तिने दीर्घ श्वास घेतला. आणि मला म्हणाली, "तू ताल धरू नकोस. माझ्या चुका होतात त्यामुळे..." तिने असं फटकारल्यामुळे मी अपमानित झालोय हे त्यांना कळू द्यायचं नव्हतं, त्यामुळे मी सारं हसण्यावारी नेलं, "ठीक आहे." नंतर हलक्या स्वरात त्या दोघांना म्हणालो, "प्रत्येक गोष्ट परिपूर्ण, निर्दोष असावी असा तिचा कटाक्ष असतो." दोघांनीही भारावून मान डोलावली.

नृत्याचा एक तुकडा संपवून रोझीने विचारलं, "आणखी पाहायचंय का? 'नाचरी पावलं' करून दाखवू?"

तिने माझा सल्ला विचारल्याने मी आनंदलो, "हो, हो, त्यांना नक्कीच आवडेल. करून दाखव ना," मी उत्साहाने ओरडलोच.

रोझीच्या जादूमधून थोडेफार सावरल्यानंतर त्यांच्यापैकी एक म्हणाला, "ह्यापूर्वी मी 'भरतनाट्यम्'ला फारसं महत्त्व देत नव्हतो. पण ह्यांचं नृत्य पाहिल्यानंतर माझं मतपरिवर्तन झालंय. लोक भरतनाट्यमची एवढी स्तुती का करतात हे आता मला उमजलं."

दुसऱ्याने त्याची री ओढली. "पण आमच्या स्नेहसंमेलनासाठी त्यांचं नृत्य फारच उच्च दर्जाचं ठरेल अशी मला भीती वाटतेय. हरकत नाही. इतर कार्यक्रम कमी करून त्यांना हवा तेवढा वेळ देईन. मनासारखं नृत्य करू द्या त्यांना."

"लोकांची अभिरुची बदलण्यासाठी आपण अथक प्रयत्न करत राहिलं पाहिजे. सातत्याने उत्कृष्ट कार्यक्रम सादर करत राहिलो तर जनतेच्या आवडीही हलक्या मनोरंजनाकडून शास्त्रीय कलाविष्काराकडे वळवता येतील."

“मला वाटतं, मध्यंतरापर्यंत बाकीचे सर्व हलकेफुलके मनोरंजनात्मक कार्यप्रम उरकून घ्यावेत. त्यानंतरचा संपूर्ण वेळ ह्यांच्यासाठी राखून ठेवता येईल.”

मी रोझीकडे कटाक्ष टाकला, आणि तिचा होकार मिळाला असं दाखवून म्हणालो, “तुम्हाला मदत करायला तिला नक्कीच आवडेल. आनंदाने नृत्य सादर करेल, पण साथ देणारे वादक तुम्ही द्यायला हवेत,” मी त्यांच्याकडून कबूल करून घेतलं. अशा तऱ्हेने रोझीला केव्हापासून हवे असलेले साथीदार मिळवून देण्यात मला अखेर यश आलं!

# ९

अचानक माझा  कार्यभार खूपच वाढला. रोझीची घोडदौड वेगाने सुरू झाली. स्नेहसंमेलन ही केवळ सुरुवात होती. रोझीचा नावलौकिक इतका काही फैलावला की, तिची जाहिरात अथवा गुणगान करण्याची गरजच राहिली नाही. तसं करायला गेलो तर माझंच हसं झालं असतं! लोक मला थोडंफार ओळखायचे, कारण मी तिच्याबरोबर असायचो. अन्यथा रोझीला प्रसिद्धीसाठी माझी जरुरी राहिली नव्हती. तिच्यामधील अलौकिक गुणांमुळे, अत्युत्तम नृत्यकौशल्यामुळे लोकांना तिची दखल घ्यावीच लागली. आज या गोष्टी मी मोठ्या शांतपणे, कोणत्याही फुशारकीविना सांगतोय, पण त्या वेळी मात्र रोझीच्या यशाचं सारं श्रेय मी मोठ्या गर्वाने स्वत:लाच देत असे. आता तर वाटतं, ती मार्कोबरोबर असती तरीही कधी ना कधी तिला पंख फुटले असतेच. मार्को तिला फार काळ दडपून ठेवू शकला नसताच. पण मला ही उपरती आता झाली आहे; तेव्हा मात्र रोझीचं उत्तंgग यश, नावलौकिक, प्रतिष्ठा हे सारं माझ्यामुळेच असा अहंकार मला वाटत असे. कार्यप्रम सादर करणाऱ्या रोझीकडे हजारो डोळे कौतुकाने रोखलेले असत. अशा वेळी त्यामधील बराच मोठा वाटा लोक मलाच देत असतील ह्याविषयी मला शंभर टक्के खात्री वाटे. ‘तो बघा…त्याच्याच अथक परिश्रमामुळे…’ अशी स्तुतिसुमनं लोक माझ्यावर उधळत आहेत अशी चित्रं मी पाहायचो. प्रत्येक कार्यप्रमाच्या वेळी माझा हक्कच असल्याच्या रुबाबात पहिल्या रांगेतील मधल्या सोफ्यावर विराजमान होत असे. ‘ती जागा माझ्यासाठी राखीव ठेवायची, कारण मी समोर दिसलो नाही, तर नलिनीला नृत्य करण्यासाठी स्फूर्ती मिळणार नाही, थोडक्यात, ‘मी तिचं ‘स्फूर्तिस्थान’ आहे’ अशी हवा मी निर्माण केली होती. मी तिला ‘स्फूर्ती’ देण्याचा चोख अभिनय करत असे. कधी कळेल न कळेल अशी मान हलवून, कधी हलकेच ताल धरून तिला प्रोत्साहन द्यायचो. नजरेने इशारे आणि हातांनी खाणाखुणा करून काही सुधारणा सुचवायचो, कधी आवडलं नाही असंही दर्शवायचो. कार्यप्रम

ठरवणारे अध्यक्ष महोदय मला चिकटून बसायचे, झुकून माझ्याशी बोलायचे, तेव्हा मला स्वत:चा अभिमान वाटायचा. सारेच माझ्याशी बोलायला धडपडायचे. नलिनीशी नाही, तर निदान माझ्याशी जवळीक साधता येतेय ह्यातच त्यांना धन्यता वाटत असावी! पुढच्या रांगेत बसून आमचं 'संभाषण' चालायचं. मी मोजकंच हसून मान डोलवायचो. एखादं-दुसरं वाक्य बोलायचो. पाठीमागे बसलेल्या प्रेक्षकांना 'हे काय एवढी महत्त्वाची चर्चा करताहेत' असं वाटत असावं! प्रत्यक्षात 'प्रेक्षागार संपूर्ण भरलेलं दिसतंय' एवढ्यापुरतीच आमची 'चर्चा' सीमित असायची.

मी मागे वळून किती गर्दी झालीय हे पाहायचो. 'हो, खरंच' एवढं बोलून झटकन पुढे बघायचो. इकडे-तिकडे पाहणं माझ्या प्रतिष्ठेला शोभलं नसतं! विंगेतून डोकावणाऱ्या माणसाला मी खूण केल्यानंतर पडदा वर जायचा. प्रकाशयोजना, ध्वनियोजना व्यवस्थित असल्याची खातरजमा करतोय; चोहीकडे बारीक नजर फिरवायचो, हवा किती वेगाने वाहतेय, छत मजबूत आहे की नाही, खांब भरभक्कम आहेत का वगैरे गोष्टीसुद्धा तपासून बघतोय असा माझा आविर्भाव असायचा! त्यामुळे वातावरणनिर्मिती फारच चांगली होत असे. आयोजक दबून जात. सर्व बंदोबस्त व्यवस्थित झाला की नाही ह्याचा ताण त्यांच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसून यायचा. अखेर सारं काही अपेक्षेप्रमाणे आहे असा मी निर्वाळा दिल्यानंतर त्यांचा जीव भांड्यात पडे. नलिनीचा भावही त्यामुळे वधारला. वास्तविक पाहता कार्यक्रमाचा मोबदला आम्हाला मिळायचा, प्रेक्षकही पैसे खर्चून आलेले असायचे. पण माझ्या एकूणच कडक आणि गंभीर वागण्यामुळे नृत्याचा कार्यक्रम करायची परवानगी देऊन फार मोठी मेहरबानी करतोय असंच सर्वांना वाटत असे! कार्यक्रम कधी आटोपता घ्यायचा हेदेखील मीच ठरवायचो. खूप वेळ झाला असं वाटलं की, मी घड्याळाकडे नजर टाकून हळूच मान हलवायचो. तो इशारा समजून नलिनी पुढच्या एका नृत्यानंतर थांबायची. त्यानंतर कोणत्याही सूचना आल्या तरी ती हसून उडवून लावत असे. कधी प्रेक्षकांकडून विशिष्ट नृत्यासाठी फर्माईश व्हायची. त्यासाठी मागून कागदाची चिटोरी पाठवली जात. अशा वेळी चिट्ठी माझ्या हाती देणाऱ्याकडे मी आठ्या घालून बघायचो.

तो बिचारा घाबरून क्षमा मागायचा. 'मागून कोणीतरी पाठवलीय, मला कल्पना नाही...' तो गडबडून म्हणायचा. मी अधिकच आठ्या घालून चिठ्ठी घ्यायचो. पराकोटीचा सहनशील आणि कंटाळवाणा भाव माझ्या चेहऱ्यावर असे. चिठ्ठी वाचून चक्क सोफ्याच्या बाजूला फेकून द्यायचो. 'आलतू-फालतू लोक मागणीनुसार नाचणारे असतील. आम्ही त्यांतले नाही' अशी तुच्छतेची भावना त्यामागे असायची.

कार्यक्रम संपायला एखादं मिनिट राहिलं असताना मी सेक्रेटरीला खूण करून जवळ बोलवायचो. 'गाडी तयार आहे ना? मागच्या दरवाजाजवळ आणा. गर्दीतून जायला नको तिला.' हे मात्र खोटं होतं. लोकांच्या गर्दीतून, कौतुकाच्या नजरा झेलत रोझीला मिरवायला मला फारच आवडायचं. तिची एक झलक पाहायला मिळावी म्हणून बरेच रसिक कार्यक्रमानंतरही रेंगाळत असायचे. त्यांच्यामधून वाट काढत मी रोझीच्या बरोबरीने स्तुतिसुमनं स्वीकारायचो. अर्थात चेहऱ्यावर बेफिकिरीचे भाव असायचे. फुलांचे मोठमोठे हार घालून रोझीचा सत्कार केला जाई, तेव्हा माझ्याही वाट्याला एखादा हार यायचाच. मी विनम्रपणे 'कशाला, कशाला' म्हणायचो. 'दिलाच आहे तर असू द्या' अशा आविर्भावात निष्काळजीपणाने हार हातामध्ये अडकवायचो. अनेकदा प्रेक्षकांच्या समोरच मोठ्या नाटकीपणे तो हार नलिनीला अर्पण करायचो. 'ह्याची खरी हक्कदार तूच आहेस' असं म्हणून माझा हारही तिच्याकडे सोपवायचो.

घराच्या चार भिंतींमागे पोहोचेपर्यंत आम्ही दोघंही औपचारिकतेचं नाटक करायचो, अंतर ठेवून वागायचो. पहिल्या कार्यक्रमानंतर घरात शिरल्याबरोबर तिने मला अतीव आनंदाने मिठीच मारली. "सात जन्म घेतले तरी तुझे उपकार फेडता येणार नाहीत," असं ती कृतज्ञतेने म्हणाली तेव्हा माझी छाती अभिमानाने फुलली. ती म्हणतेय ते खरंच आहे, माझ्यामुळेच ती प्रकाशझोतात आली ह्याविषयी माझ्या मनात जराही संदेह नव्हता. फुलं, हार-तुरे कोमेजू नयेत म्हणून रोझीने मोठ्या काळजीपूर्वक ते ओल्या फडक्यामध्ये लपेटून ठेवले.

त्यानंतर कार्यक्रमांचा सिलसिला सुरू झाला. जाण्यापूर्वी ती आमचं रात्रीचं जेवण बनवून ठेवायची. स्वयंपाक बनवण्यासाठी आचारी ठेवण्याइतपत आमची ऐपत झाली होती, पण रोझीला ते नको होतं. "दोन माणसांचा तर स्वयंपाक... त्यासाठी आचाऱ्याची कटकट कशाला? शिवाय माझी गृहिणीची कर्तव्यं मला करायचीच आहेत." जेवताना तिची संध्याकाळी झालेल्या कार्यक्रमाविषयीचीच सतत बडबड चालायची. कधी तिथल्या व्यवस्थेमध्ये, तर कधी साथीदारांच्या संगतीमध्ये दोष आढळलेले असत. ती संपूर्ण कार्यक्रममय व्हायची. जेवणानंतर कधी कधी नृत्याचा एखादा तुकडा करून दाखवायची. अखेर एखाद्या पुस्तकाचं वाचन करून मग झोपी जायची.

काही महिन्यांनी मला घरातून निघावं लागलं. सैतने कोर्टकेस जिंकली त्यामुळे घरावर जप्ती आली. आमचे वकीलसाहेब माझी समजूत काढत म्हणाले, "काही चिंता करू नका. ह्याचा अर्थ ह्यापुढे घरावरचे कर - बाकी असलेलेसुद्धा - त्यालाच भरावे लागतील. अर्थात तुझ्या आईची सही लागेल, पण ती घेण्याची मी व्यवस्था करतो. जप्ती आली म्हणजे घर त्याच्याकडे गहाण आहे इतकाच त्याचा अर्थ. तू तिथेच राहणार असशील तर तुम्हाला नाममात्र भाडं मात्र भरावं लागेल."

हे ऐकून मी भडकलो. "वा, हे बरंय! माझ्याच घरात मी भाडं भरून राहायचं!" थोडा शांत होऊन पुढे म्हणालो, "भाडंच द्यायचं तर मी मोठं, चांगलं घर बघीन." नाही तरी आमच्या प्रतिष्ठेला हे जुनं घर शोभत नव्हतंच. एकच खोली असल्याने कोणाला बोलावणंही काहीसं गैरसोयीचं होई. फर्निचर ठेवायलाही जागा नव्हती. माझ्या बापाने घर बांधलं ते दुकानदाराच्या दृष्टिकोनामधून. भविष्यकाळामध्ये एक प्रतिष्ठित आणि श्रेष्ठ दर्जाची व्यक्ती आणि तिच्याबरोबर एक उभरती कलाकार इथे वास्तव्य करतील अशी शक्यता त्यांच्या मनामध्ये डोकावली नसणार! नलिनीला मात्र हे घर सोडून जायची कल्पना अजिबात आवडली नाही. ह्याच घराने तिला आसरा दिला होता, ही गोष्टी ती विसरू शकत नव्हती. कोमल भावनिक बंधाने ती ह्या

जुन्या, लहानशा घराला जोडली गेली होती. “अगं, पण इथे तुला तालीम करायलाही जागा नाही...” मी आणखी एक अडचण सांगितली.

माझ्या वकिलांनी स्वत: मामांच्या गावाला जाऊन आईची सही घेतली. “काय म्हणाली ती? धक्का बसला का तिला?” मला विचारल्याशिवाय राहावलं नाही.

“विशेष नाही, ठीक झालं तसं...” आमच्या ‘तारखाबहाद्दर’ वकीलसाहेबांनी सहजपणे सांगितलं. “अर्थात जुन्या पिढीच्या लोकांना आपले विचार पटवणं कठीणच असतं. थोडीशी वादावादी झालीच, पटवून द्यावं लागलं, तुमच्या आईला. पण तुमच्या मामांना समजावणं फारच मुश्किल झालं.”

नंतर चार दिवसांनी आईचं पिवळ्या रंगाच्या कागदावर पेन्सिलीने लिहिलेलं पत्र आलं... ‘मी त्या कागदांवर माझ्या मर्जीने, राजीखुषीने सही केली नाही. पण नसती केली, तर तो वकील इथून हलला नसता आणि तुझ्या मामांनी त्याला शांत बसू दिलं नसतं. काय चाललंय काहीच समजेनासं झालंय. सगळ्याचाच कंटाळा आलाय. तुझ्या मामाच्या नकळत, ते बागेत असताना मी सही केली. नाहीतर मामांनी त्याला नक्कीच बदडून काढलं असतं. पण ह्या सगळ्याचा अर्थ काय आहे? तू त्या बाईसाठी नवीन घर घेणार आहेस असं वकील म्हणाले. तसं असेल तर मी जुन्या घरात राहायला येईन. उरलेलं आयुष्य मला माझ्या स्वत:च्या घरात काढायचंय.’ राग बाजूला ठेवून आईने मला पत्र लिहिलं ह्या गोष्टीचा मला आनंद झाला. तिची तळमळ माझ्या काळजाला भिडली. पण तिची परत यायची इच्छा पाहून मात्र मी विचारात पडलो. त्यामागची कारणं मी समजू शकलो, पण ते व्यवहार्य ठरलं नसतं. सैतला ते घर देऊन टाकायचं आणि ती कटकट कायमची मिटवायची हेच सर्वांत उत्तम. नाहीतरी ते जुनाट, पडझड झालेलं घर कोणाला हवंय? आई तिथे राहिली तर सैतला भाड्याचे पैसे मोजावे लागतील. आणि तिच्याकडे कोण लक्ष ठेवील? मी तर कायम गडबडीत असतो... असा सर्वांगीण विचार करून मी ‘आईच्या पत्राला काहीही उत्तरच देऊ नये’ असा निर्णय घेतला. तिचं पत्र बाजूला

ठेवून दिलं आणि कामांमध्ये व्यग्र झालो. नवीन घर घेतलं. ह्या सर्व घाईगर्दीत 'आईचं मन दुखवलं' ही टोचणी मागे पडली. थोडंसं वाईट वाटलं, पण स्वत:ला समजावलं, 'नाहीतरी तिला आपला भाऊ फार प्रिय आहे. तोही तिची प्रेमाने काळजी घेईल. असं असताना इथे, एकटीने राहण्यात काय अर्थ आहे?'

न्यू एक्स्टेंशनवरील आमचं नवीन घर आधुनिक शैलीचं, आमच्या प्रतिष्ठेला साजेसं होतं. दुमजली, भोवताली प्रशस्त आवार, गवत, बगीचा, शिवाय गाडी ठेवायला गॅरेज. वरच्या मजल्यावर आमच्या झोपण्याच्या खोल्या आणि मोठा हॉल होता. तिथे नलिनीची तालीम चालायची. गर्द निळ्या रंगाचा जाड, रेशमी गालिचा, एका बाजूला रिकामी जागा. तिथे संगमरवरी लाद्या बसवल्या होत्या. ह्या लाद्यांवर नलिनी नाचाचा सराव करायची. कोपऱ्यात छोट्याशा चबुतऱ्यावर ब्रॉन्झचा नटराजाचा पुतळा मी खास नलिनीसाठी बसवून घेतला होता. हे तिचं कार्यालय. तिच्या दिमतीला पाच वादकांचा ताफा मी कायमस्वरूपी नेमला होता - बासरीवादक, तबलजी वगैरे. तिला नृत्य शिकवणारे एक गुरूदेखील होते. ते कोप्पाल गावामध्ये राहणारे. गेली पन्नास वर्षं पारंपरिक नृत्यसाधना करणाऱ्या ह्या अनुभवी नृत्यतपस्वींना मी मोठ्या प्रयासाने शोधून काढलं होतं. मोठ्या सन्मानाने त्यांना मालगुडीला घेऊन आलो. आता आमच्या बंगल्याच्या आउटहाऊसमध्ये त्यांच्या राहण्याची व्यवस्था केली होती. दिवसभर आमच्याकडे येणाऱ्या-जाणाऱ्यांची वर्दळ असे. नोकराचाकरांची फौज दिमतीला होती - एक ड्रायव्हर, दोन माळी, देवडीवर रखवालदार - कमरेला खुकरी अडकवलेला गुरखा होता तो. शिवाय दोन आचारी. इतक्या साऱ्या नोकरांची आवश्यकता होतीच, कारण मघाशी म्हटल्याप्रमाणे सतत कोणी ना कोणी भेटायला येत असे. येणाऱ्या-जाणाऱ्यांची संख्याच बरीच होती - संगीतकार, त्यांचे परिचित, स्नेही, नोकर-चाकर, त्यांचे मित्र वगैरे वगैरे बरेच जण... घर कायम भरलेलं असे. खालच्या मजल्यावर माझं कार्यालय थाटलं होतं. पत्रव्यवहार सांभाळण्यासाठी स्थानिक कॉलेजातील एक पदवीधर मुलगा नेमला होता- माझा खाजगी सचिव.

पाहुण्यांची मी प्रतवार विभागणी केली होती. काहींना मी बाहेर व्हरांड्यामध्येच भेटायचो. वादक, उदयोन्मुख वादक, नलिनीची साथसंगत करायची आकांक्षा बाळगणाऱ्या अशा संगीतकारांची मी थोडक्यात बोळवण करायचो. रोज दहाजण व्हरांड्यात मोठ्या आशेने रेंगाळत असायचे. मी त्यांच्याकडे फारसं लक्ष देत नसे. मला पाहून सारे मोठ्या आदराने उठून उभे राहत. लवून नमस्कार करत. मी काही न बोलता रुबाबात निघून जात असे. एखाद्याने धैर्य दाखवून मला अडवलंच तर थांबायचो, त्याचं बोलणं ऐकल्याचं नाटक करायचो. “माझ्या कारकुनाजवळ तुमचा पत्ता ठेवून जा. काही करता येण्याजोगं असलं तर तुम्हाला बोलवून घेईन,” असं म्हणून मी निसटायचो. एखादा कलाकार आपली प्रशंसापत्रं पुढे करायचा. मी त्यावरून झरकन नजर फिरवायचो. “छान छान, पण सध्या काही करता येणार नाही. तुमचं नाव ऑफिसमध्ये लिहून ठेवा,” मी मोठी मेहरबानी केल्यासारखा म्हणायचो. माझ्या भेटीसाठी दिवसभर ताटकळत बसणाऱ्या अशा इच्छुक लोकांसाठी व्हरांड्यात बरीच बाकडी ठेवली होती. मी त्यांच्याकडे ढुंकूनही पाहत नसे. ऑफिसमध्ये बसण्याच्या माझ्या वेळाही निश्चित नसत. खास नलिनीसाठी तयार केलेली गीतं ऐकवण्यासाठी अनोळखी संगीतकार टपकत. ऑफिसमध्ये आल्यानंतर कोणी भेटायला आलं तर मी चालवून घ्यायचो. स्वतःहून ‘बसा’ म्हणून सांगायचो नाही. तेच बिचारे खुर्ची ओढून बसून घ्यायचे. ‘पुरेसं ऐकून घेतलं’ असं वाटलं की मी चक्क आत निघून जायचो! माझा चिटणीस त्यांना निरोप द्यायचा. व्हरांड्यातील जमावाला टाळायचं असेल तर, माझे डावपेच तयार असत. काचेच्या खिडकीतून बाहेर किती गर्दी आहे हे मी हळूच बघत असे. मग बाजूच्या दरवाजातून सटकायचं आणि गॅरेजमार्गे तडक बंगल्याचं फाटक गाठायचं. व्हरांड्यातील जनता असाहाय्यपणे बघत असायची. हे सर्व करताना मला आपण सर्वांपेक्षा खूप श्रेष्ठ आहोत असं वाटायचं.

मदतीची याचना करणाऱ्यांपेक्षा वरच्या दर्जाच्या लोकांना आत दिवाणखान्यात बसवून आदरातिथ्य करत असे. कार्यप्रम ठरवायला आलेले ह्या वर्गात मोडत. अर्थातच त्यांचा मान राखावा लागे. आतल्या वर्तुळातील ह्या पाहुण्यांसाठीच्या कॉफीचं बिलच मुळी तीनशे रुपयांपर्यंत

यायचं. एखाद्या मध्यमवर्गीय कुटुंबाला एवढ्या पैशात महिनाभर आरामात काढता आला असता! दिवाणखाना भारी वस्तूंनी सजवला होता. पितळेचं सुरेख नक्षीकाम असलेले ट्रे, हस्तिदंती शोभेच्या वस्तू, नलिनीचे साथीदारांसमवेतचे फोटो हे सारं वैभव पाहून मी खूष होत असे. अखेर मीही 'कोणीतरी' बनण्यात यशस्वी झालो असं समाधान वाटे.

पण ह्या सर्व चित्रात नलिनी कुठे होती? नलिनी प्रसिद्धीच्या झोतापासून दूर राहायची. वाद्यवृंदाबरोबर तालीम करण्यातच तिचा दिवस निघून जाई. वरच्या मजल्यावरून घुंगरांचे, पाय आपटण्याचे आवाज सतत कानी पडायचे. अखेर तिचं स्वप्न साकार झालं होतं. नलिनीचं ओझरतं का होईना दर्शन व्हावं म्हणून लोक कासावीस होत. घरातून बाहेर पडताना वा परतताना तिचं दर्शन होईल ह्या आशेने त्यांच्या नजरा भिरभिरायच्या, पण तिचं नखही कोणाच्या नजरेस पडू नये ह्याची मी डोळ्यांत तेल घालून काळजी घ्यायचो. नलिनीवर केवळ माझा अधिकार होता. अन्य कोणाचाही तिच्याशी काही संबंध नाही हे मी ठरवून टाकलं होतं. नलिनीची कोणी चौकशी केलीच तर मी तोडून बोलायचो. 'तिला वेळ नाही' असं सांगायचो. "तुमचं काय काम आहे मला सांगितलं ना? मग बस झालं. तिला त्रास द्यायची गरज नाही," असं उद्धटपणे बोलायचो. तिच्याशी कोणीही जवळीक साधायचा प्रयत्न केलेला मला मुळीच सहन होत नसे. 'नलिनी केवळ माझी आहे. माझ्या मालकीची आहे ती,' ही भावना हळूहळू माझ्या मनात रुजू लागली.

तथापि 'आतल्या वर्तुळा'मधील काही मोजक्या निवडक मंडळींना रोझीच्या खोलीत जाण्याचीही मुभा होती. केवळ माझ्या जानी दोस्तांनाच मी ही सवलत बहाल केली होती. सुरुवातीला मला एकही मित्र नव्हता. आता चित्र बदललं होतं. माझ्याशी जवळीक वाढवण्यासाठी लोक धडपडायचे. त्यांच्यापैकी काही निवडक प्रतिष्ठित व्यक्ती आणि उच्च पदाधिकाऱ्यांबरोबर मी पाठीवर थाप मारून बोलण्याइतपत सलगी वाढवली होती. दोन न्यायाधीश, आमच्या जिल्ह्यातील चार उच्चपदस्थ राजकारणी (आपल्या मतदारसंघामधून

एकहाती दहा हजार मतं खेचून आणण्याची ताकद त्यांच्यामध्ये होती), कापडगिरणीचे दोन बडे मालक, दोन बँकेमधील आणि नगरपालिकेमधील वरिष्ठ अधिकारी, 'द ट्रूथ' ह्या साप्ताहिकाचे संपादक (नलिनीविषयक लेख वेळोवेळी या साप्ताहिकात छापून येत.) वगैरे लोकांचा समावेश होता. कधीही आमच्या बंगल्यात येऊन कॉफी पिण्याची, नलिनीला भेटण्याची त्यांना पूर्ण परवानगी होती. 'नलिनी कुठे आहे? वरती आहे का? ठीक आहे, पटकन भेटून येतो,' असं ते हक्काने सांगत. मला ते सलगीने 'राजू' म्हणायचे. मला त्यांची घसट आवडायची. समाजात वजन असलेली, श्रीमंत माणसं मला दोस्त मानतात ह्या गोष्टीचा अभिमान वाटायचा.

ह्यांच्या व्यतिरिक्त संगीतकार, अभिनेते, अन्य नर्तक नलिनीला भेटण्यासाठी अगत्याने येत. नलिनीला असे पाहुणे फार आवडत. त्यांच्या संगतीत ती तासन्तास रमायची. तिच्या हॉलमध्ये अनेकदा त्यांचा अड्डा जमलेला मी पाहायचो. कोणी खाली गालिच्यावर लोळतंय, कोणी आरामात बसलंय, हसणं-खिदळणं चाललंय, कॉफीचे कप रिचवले जाताहेत, खाद्यपदार्थ फस्त होताहेत असं दृश्य दिसे. मी क्वचित त्यांच्याशी गप्पा मारायचो. पण ह्या सर्व कलाकारांमध्ये उपरा आहे ह्या भावनेने मी अस्वस्थ व्हायचो. सर्व मजेत गप्पागोष्टी करताहेत हे पाहून कधी कधी वैतागायचो. नलिनी त्यांच्या सहवासात खूष असते, हे मला सहन व्हायचं नाही. काहीतरी निमित्त करून मी तिला बेडरूममध्ये बोलावून घ्यायचो. त्या दिवशीही 'अतिशय महत्त्वाचं बोलायचंय' अशी खूण करून मी तिला त्यांच्या गराड्यातून बाहेर काढलं. बेडरूममध्ये येऊन तिने दार लावून घेतलं. मी हलक्या आवाजात विचारलं, "अजून किती वेळ थांबणार आहेत ही मंडळी?"

"का?" तिने उलटून विचारलं.

"अगं, दिवसभर इथेच ठाण मांडलंय त्यांनी. रात्र झाली तरी हालायची लक्षणं दिसत नाहीत," मी तक्रारीच्या सुरात म्हटलं.

“असू दे, मला आवडतं त्यांच्याबरोबर वेळ घालवायला. आपल्याला भेटायला येतात हे भाग्यच म्हणायचं.”

“अच्छा? म्हणजे आपल्याकडे दुसरं कोणीच येत नाही असं म्हणायचंय का तुला?”

“पण असू दे ना. त्यांना जायला कसं सांगणार? ह्या लोकांचा सहवास मला खरंच फार आवडतो.”

“मलाही ते माहिती आहे, पण उद्या आपल्याला प्रवासाला निघायचंय लक्षात आहे ना? विश्रांती घे आता. अजून तुला बॅगही भरायचीय. कार्यप्रमाची तालीमही करावी लागेल. त्रिचीच्या कार्यप्रमामध्ये तू नृत्याचे नवीन तुकडे सादर करण्याचं वचन दिलं आहेस, हे विसरलीस का?”

“सगळं व्यवस्थित करीन मी!” असं म्हणून ती गर्रकन वळली आणि आपल्या स्नेहीमंडळींच्या मैफिलीत सामील होण्यासाठी निघून गेली. जाताना दारही लावून घेतलं. मला प्रचंड संताप आला, पण मी तो गिळून टाकला. तिनं आनंदात असावं असं मला वाटायचं, पण केवळ माझ्याबरोबर असतानाच... वेगवेगळ्या कलावंतांच्या ह्या टोळीविषयी माझं फारसं बरं मत नव्हतं. त्यांचे बोलायचे विषय कलेसंबंधीच असायचे. बोलण्याच्या ओघात नलिनी आमची धंद्याची गुपितं त्यांच्यासमोर उघडी करेल अशी मला भीती वाटायची. कुठेही असलो तरी नलिनी अशा कलाकारांना एकत्र जमवून मैफल रंगवायची. मी विरोध केला तर म्हणायची, “देवी सरस्वतीचा आशीर्वाद लाभलेले महान कलाकार आहेत हे. अतिशय गुणवंत, सज्जन लोक आहेत आणि त्यांच्याशी संवाद साधणं मला आनंद देतं.”

“तू साधीभोळी आहेस. जग कसं आहे माहिती नाही तुला. त्यांना तुझा हेवा वाटतो म्हणून इथे येतात. जातिवंत कलाकार कधीच अशी गप्पांची मैफल जमवणार नाहीत. हे सर्व कलाक्षेत्राशी संबंधित आहेत हे खरंय, पण ते तुझ्या तोलामोलाचे नाहीत हे तू विसरतेस. तू त्यांच्यापेक्षा फार मोठी कलाकार आहेस.”

“श्रेष्ठ-कनिष्ठ, तोलामोलाचे हे ऐकून कान किटले माझे. कोण चांगलं, कोण वाईट हे कसं ठरवायचं? मी त्यांच्यापेक्षा श्रेष्ठ कशी?” तिला ही तुलना आवडली नाही.

“कशी म्हणजे काय? तू नृत्याचे असंख्य कार्यप्रम सादर केले आहेत. तुझ्याशी त्यांची बरोबरी कशी होईल?”

“मला त्यांच्यापेक्षा जास्त पैसे मिळतात एवढाच त्याचा अर्थ. त्यामुळे मी श्रेष्ठ ठरत नाही,” तिने माझं म्हणणं खोडून काढलं.

हळूहळू आमच्यातील मतभेद, वादावादी वाढत गेली. आम्ही पती-पत्नीप्रमाणे राहत होतोच, भांडणांमुळे त्या नात्यावर शिक्कामोर्तब झालं! तिचा लोकसंग्रह दिवसेंदिवस विस्तारत चालला होता. लहानमोठे कलाकार, संगीत शिक्षक, कलाअभ्यासक असे कलाक्षेत्राशी संबंधित लोक तिला भेटायला येत. इतकंच नव्हे, ‘शाळेतल्या कार्यप्रमात काय सादर करावं’ ह्या गंभीर विषयावर सल्ला घ्यायला शाळकरी पोरीही नलिनीकडे यायच्या. ती सर्वांना आनंदाने भेटायची. मी शक्यतोवर ह्या मंडळींना खालच्या खालीच कटवायला बघायचो. तरीही माझी नजर चुकवून काही जण तिच्यापर्यंत पोहोचण्यात यशस्वी ठरायचे. अशा वेळी नलिनीला तासन्तास त्यांच्याबरोबर सुसंवाद करताना हताशपणे पाहण्याव्यतिरिक्त मी काहीही करू शकत नसे!

कार्यप्रमासाठी आम्हाला दूरवरची आमंत्रणं येत. आमच्या ट्रंका कायम तयार असत. अनेकदा आमचा दौरा दोन आठवडे चालायचा. दक्षिण भारताच्या कानाकोपऱ्यातून - केप कॉमोलिनपासून थेट बॉम्बेच्या सीमेपर्यंत - ठिकठिकाणी नलिनीचे कार्यप्रम ठरलेले असत. सर्व कार्यप्रमांचं सुसूत्रीकरण करण्यासाठी मी कायम नकाशा आणि दिनदर्शिका जवळ बाळगायचो. निमंत्रणांच्या तारखा आणि ठिकाणं ह्यांचा बारीक अभ्यास करून वेळापत्रक आखणं हे माझं काम. कधी एकाच दिशेने, एकाच मार्गावर कार्यप्रम असतील तर तारखा पुढेमागे करून सारं व्यवस्थित जुळवावं लागे. प्रवासाचं अचूक वेळापत्रक बनवण्यात माझी सर्व अक्कल आणि शक्ती पणाला लावायला लागायची. महिन्यातील वीस दिवस प्रवास व्हायचा. उरलेल्या दहा

दिवसांमध्ये मालगुडीतच एखादा-दुसरा कार्यप्रम ठरलेला असे. बाकीचे दिवस विश्रांतीसाठी मिळायचे. प्रचंड धावपळीमुळे खूप दमछाक व्हायची. प्रवासात असतानाही माझा सचिव रोजच्या पत्रव्यवहाराविषयी फोनवरून माहिती देत असे. त्यासंबंधीच्या सूचना देणं हेही किचकट काम करावं लागायचं. पुढील तीन महिन्यांच्या तारखांचे कार्यप्रम लागलेले असत. सुरुवातीला एका मोठ्या कॅलेंडरवर लाल खुणा करून ते तिच्या हॉलमध्ये टांगून ठेवायचो, पण तिला ते नजरेसमोर नको असायचं. "शी, किती वाईट दिसतंय ते...काढून टाक इथून."

"पण ते तुझ्या सोयीसाठीच लावलंय. पुढचा कार्यप्रम कधी आणि कुठे आहे हे तुला समजायला नको का?"

"काही गरज नाही," ती वैतागून ओरडली, "ह्या तारखा पाहून काय करू? बघवत नाही मला. इतके सारे कार्यप्रम करायचेत हे पाहून मला खूप भीती वाटते. नको वाटतं सारं." कॅलेंडर गुंडाळून तिने ते माझ्या हाती ठेवलं. अलीकडे तिचं नवीनच रूप मी बघत होतो. 'स्टेशनवर जायला तयार हो' म्हटलं की ती तयार व्हायची. 'खाली ये, सांगितल्यावर मुकाटपणे खाली यायची. मी सांगितलं की गाडीत चढायची, उतरायची. सारं काही यंत्रवत चालायचं. आपण कोणत्या शहरात आहोत, कोणती सभा चाललीय, कार्यप्रम कोणातर्फे होतोय, हे तरी तिच्या लक्षात यायचं की नाही ह्याविषयी शंकाच वाटे. मद्रास असो वा मदुरा; किंवा उटकमंडसारखं थंड हवेचं रम्य ठिकाण असो, तिला काही फरक पडायचा नाही. काही गावांत स्टेशन नसायचं. आम्हाला घ्यायला मोठ्या स्टेशनवर गाडी यायची. तिथून आमची राहण्याची सोय केल्या जागी - हॉटेल किंवा बंगला - जायचो. सोबत आलेल्या वादक, गायक कलाकारांची पलटण अन्य ठिकाणी रवाना व्हायची. त्यांना खूष ठेवणं हे माझं कर्तव्य आहे असं समजून मी त्यांच्या व्यवस्थेकडे विशेष लक्ष पुरवायचो. "ही मंडळी आमची साथीदार आहेत, त्यांची चांगली सोय केलीय ना?" मी आयोजकांकडे आवर्जून चौकशी करायचो.

"होय साहेब," ते तत्परतेने सांगायचे, "दोन मोठ्या प्रशस्त खोल्या त्यांच्यासाठी राखून ठेवल्या आहेत."

"छान. नंतर त्यांना इथे आणायचंय, तेव्हा गाडी पाठवायची व्यवस्था करा." कार्यप्रमापूर्वी दोन तास सर्व साथीदारांना गरज पडल्यास असावं म्हणून, आमच्याजवळच ठेवायचं असा माझा कटाक्ष असे. ह्या वाद्यवादकांचा दिनप्रम फारच छान असायचा. प्रत्यक्ष कार्यप्रम संपल्यानंतर त्यांच्याकडे वेळच वेळ असायचा. मस्त झोपा काढणं, खरेदी, तासन्तास पत्ते कुटणं ह्या गोष्टींमध्ये वेळ कसा निघून जाई हे त्यांनाही समजत नसे. बाकी काही काम नसल्याने घड्याळाकडे बघायचे कष्टही कोणी घेत नसे. त्यांचे मूड सांभाळणं ही तारेवरची कसरत असे. कारण जरा काही बिनसलं तर नलिनीच्या कार्यप्रमाचा बोजवारा उडवणं त्यांना सहज शक्य होतं. सढळ पैसे देऊनही मी त्यांना खूष ठेवत असे. सर्वांची अशी काळजी घेत असलो तरी बाकी वेळ मी त्यांना चार हात दूरच ठेवायचो. नलिनीशी कोणीही फाजील सलगी करत नाही ना ह्याकडेही मी डोळ्यांत तेल घालून लक्ष ठेवत असे.

कार्यप्रमाची वेळ संध्याकाळी सहाची असेल तर नलिनीने चार वाजेपर्यंत आराम करावा असा माझा आग्रह असे. अनेकदा ती कोणी पाहुण्या आलेल्या असतील तर त्यांच्याशी छान गप्पा मारत बसायची. त्यांच्याशी बडबड करण्यात ती तासन्तास रमून जायची. मी जाऊन मिठाचा खडा टाकायचो. "मला वाटतं तू थोडी विश्रांती घ्यावीस. काल रात्रीचा प्रवास त्रासदायक झाला होता..." माझ्या आवाजात खंबीरपणा, तिच्याविषयीची काळजीसुद्धा व्यक्त व्हायची. ती जराही खळखळ न करता उठायची.

त्यांच्यासमोर काहीही न बोलता नलिनी आमच्या खोलीमध्ये आली तरी एकांतात मात्र माझ्याशी वाद घालायची. माझी लुडबुड तिला आवडायची नाही. "मी सर्वांबरोबर मजेत बसले होते. तुला मध्ये यायची काय गरज होती? मी काय लहान बाळ आहे का?" ती तणतणायची. "तुझ्या भल्यासाठीच करतोय," मीही रागाने म्हणायचो. हे तितकंसं खरं नव्हतं. अंदरकी बात

वेगळीच होती. 'नलिनी फक्त माझी आहे' ही भावना माझ्या मनात एवढी प्रबळ होती की, अन्य कोणाहीबरोबर ती हसून-खेळून वागलेली मला सहन होत नसे. तिच्यावर मालकी हक्क गाजवायचो मी.

कार्यक्रमानंतर लगेच स्टेशनवर पोहोचायचं असल्यास मी गाडीची व्यवस्था केलेली असे. प्रवासात आमच्यासाठी स्वतंत्र डबा राखीव ठेवलेला असे. एकांतात आम्ही दोघं आरामात जेवण घ्यायचो. आमच्यासाठी खास चांदीच्या अथवा स्टीलच्या भांड्यांमधून खाद्यपदार्थ आणले जायचे. पण असे एकांतातील क्षण फार काळ टिकायचे नाहीत. पुन्हा दुसरं गाव, कार्यक्रम, पुन्हा नवीन गाव...असं चक्र सतत चालू असे. काही गावं विशिष्ट कारणांसाठी सुप्रसिद्ध असत. सुरेख प्राचीन मंदिर, एखादं मोठ्ठं दुकान किंवा प्रेक्षणीय स्थळ असं काही अमुक गावी आहे असं समजल्यावर नलिनी तिथे जाण्याची इच्छा व्यक्त करायची. मीदेखील उत्साहाने म्हणायचो, "हो, नक्की जाऊ या. बघतो कसा वेळ काढता येतोय." पण केव्हाही वेळ मिळायचा नाहीच. एकामागून एक कार्यक्रम लागलेले असायचे. एक संपला की गाडी पकडून दुसऱ्या गावी जायची घाई असे. ह्या धावपळीत प्रेक्षणीय स्थळं पाहायला वेळ कुठून काढणार? सारं काही यंत्रवत चालायचं. 'गाव आलं, स्टेशनवर उतरलो, स्वागतसमारंभ, आयोजकांची धांदल, भेटीगाठी, बोलाचाली, पहिल्या रांगेतील बरोब्बर तोच मधला सोफा, भाषणं, शेरेबाजी, थोडाफार हास्यविनोद, औपचारिक बातचीत, हारतुरे, फोटो, अभिनंदन, धन्यवाद, पुन्हा स्टेशन, नवीन गाव...अर्थात या सर्वांमधील अत्यंत महत्त्वाची गोष्ट मानधनाचा 'चेक'. तो कधीच विसरता कामा नये...असं आमचं रहाटगाडगं रात्रंदिवस चालू होतं.

हळूहळू अशी परिस्थिती निर्माण झाली की, प्रत्येक गोष्टीत मी स्वत:ची टिमकी वाजवायला सुरुवात केली. उदाहरणार्थ, 'त्रिचीला नलिनीचा कार्यक्रम आहे, त्यासाठी निघालो आहोत' असं बोलण्याऐवजी मी चक्क 'रविवारी माझा त्रिचीला कार्यक्रम आहे, सोमवारी मी कार्यक्रम करणार आहे...' असं म्हणायचो. सर्वांत वरताण म्हणजे, 'तुमच्या गावामध्ये फक्त xx ह्याच तारखेला

मला नृत्य करणं शक्य आहे' असंही मी अगदी सहज बोलून जाई! अव्वाच्या सव्वा बिदागी मागूनही मिळत असे. कार्यप्रम ठरवायला येणाऱ्यांना मी तुच्छतेने वागवायचो. मासिक कमाई प्रचंड व्हायची आणि माझा खर्चसुद्धा तेवढाच असायचा. नोकरचाकर, भपका वगैरे गोष्टींवर सढळ हस्ते खर्च करायचो. कमाईप्रमाणेच आयकरही खूप भरायला लागायचा. एकूणच सारी भरभराट झाली होती. पैशांची कमतरता नव्हती. असं असूनही नलिनी समाधानी दिसायची नाही. ऐश्वर्य, डामडौल साऱ्याकडेच ती काहीशा तटस्थपणे पाहायची. चेहऱ्यावर खुषी दिसत नसे. आमच्या जुन्या घरी किती आनंदात असायची. मामा तिला अद्वातद्वा बोलला होता, तेव्हाही ती एवढी उदास दिसली नव्हती.

कार्यप्रमानंतर नलिनीच्या गळ्यात हार पडायचेच. आत्तापर्यंत तिला असंख्य हार मिळाले असतील, पण ती अजूनही प्रत्येक हार मोठ्या प्रेमाने जपायची. हाराचे कापून छोटे तुकडे करायची, त्यावर पाणी शिंपडून काळजीपूर्वक ठेवून द्यायची. गाडीने जात असलो तरी ती न विसरता हळुवारपणे फुलांना सांभाळायची. एकदा असंच कुठल्यातरी कार्यप्रमानंतर आम्ही गाडीत बसलो असताना तिने ओंजळीतल्या फुलांचा सुगंध श्वासात भरून घेतला. "ही सुरेख फुलं, त्यांचा मधुर सुगंध...हीच माझी सर्वांत मोठी कमाई," ती तृप्त आवाजात म्हणाली.

मला आश्चर्य वाटलं. "असं का म्हणतेस?"

"मला ही जाईची नाजूक फुलं अतिशय प्रिय आहेत."

"फुलांबरोबर चेक मिळतो तो प्रिय नाही?"

"इतक्या साऱ्या पैशांचं करायचं तरी काय? चेकचा अक्षरशः वर्षाव होतोय. दिवसरात्र पैशाचा ओघ चालू आहे. पण उपयोग काय? आपण कधी आनंद घेणार त्या पैशांचा? वेळ कुठे असतो?" ती निराशेने म्हणाली.

“अगं, तू एवढ्या प्रशस्त बंगल्यात राहतेस, आलिशान गाडी, नोकरचाकर...हे सारं पैशांमुळेच ना? तो आनंद नाही?” मला तिची खंत समजेना.

“कोणास ठाऊक...” ती अजूनही विमनस्क होती. “छोटे छोटे आनंद गमावून बसलेय. रस्त्यावरच्या गर्दीत मिसळून जावं, निरुद्देश भटकावं, सभागृहात बसून कार्यक्रमाचा आनंद घ्यावा, असं वाटतं. एखादी संध्याकाळ स्वच्छंद मिळावी, केवळ माझी...कार्यक्रमासाठी तयार होणं नको...काही नको.”

बाप रे! रोझीच्या मनात असे भलतेच विचार घोळताहेत हे पाहून मी दचकलो. संभाषण धोकादायक वळण घेतंय तेव्हा जास्त खोलात न गेलेलंच बरं, असा सुज्ञ विचार माझ्या मनात डोकावला. कार्यक्रमांची संख्या कमी करणंही शक्य नव्हतं. “तुझे पाय दुखतात, तू दमतेस, असं तर म्हणायचं नाही ना तुला?” तिला निराश मन:स्थितीतून बाहेर काढायचा उपाय मला माहीत होता.

माझ्या प्रश्नाचा अपेक्षित परिणाम झालाच. ‘नृत्य’ तिचं सर्वस्व होतं. ते करताना तिचे पाय दुखले असं मी सूचित केल्यावर तिचा स्वाभिमान डिवचला, “मुळीच नाही. नाचून मी कधीही दमत नाही. प्रत्येक कार्यक्रमात मी अनेक तास नृत्य करू शकेन. तूच मला थांबवतोस.”

“खरंय, पण तू थकून जाशील म्हणूनच तुला थांबवतो ना?” मला तिची किती काळजी वाटते हे दाखवत म्हणालो.

माझ्याकडे दुर्लक्ष करून ती पुढे म्हणाली, “तेवढंच नव्हे, तर तुला गाडी पकडायचीही घाई असते. कार्यक्रम संपवायची घाई, मग धावतपळत गाडी गाठायची...एक दिवस गाडी चुकली तर काय आभाळ कोसळणार आहे? मला खरंच समजेनासं...” ती आवेशाने म्हणाली.

मी तिचं वाक्य पूर्ण होऊ दिलं नाही. प्रकरण हाताबाहेर जातंय असं पाहून सारं हसण्यावारी नेलं. “खूपच शहाणी होत चाललीस,” असं हसत हसत म्हणून तिला मिठीत घेतलं. आंजारून-

गोंजारून तिचे लाड केले. अखेर तो विषय बाजूला पडला. ती असे विचार करत असेल तर ती संकटाची चाहूल म्हणायला हवी. मला ते परवडणारं नव्हतं. भरपूर कमवायची संधी असताना थोडक्यात समाधान मानायची तिची वृत्ती मला मूर्खपणाची वाटत होती. 'जमतंय आणि मिळतंय तोवर घेत राहा' असं माझं ब्रीदवाक्य होतं. मला खूप श्रीमंत व्हायचं होतं. पैसा नसेल तर मला कोणी विचारणार नाही, हे कटू सत्य माहीत असल्यानेच मी वेड्यासारखा पैशाच्या मागे धावत होतो. बरोबर रोझीचीही फरफट करत होतो. आज मला जो मान मिळतोय, कुठेही गेलो तरी माझं हसून स्वागत होतं ते केवळ माझ्याकडे पैसा आहे म्हणूनच ना? पैशाबरोबर मिळणाऱ्या ऐषोआरामांची, मानसन्मानांची मला सवय झाली होती. पैशाशिवाय सारं व्यर्थ आहे. तो नसला तर आपली काय परिस्थिती होईल ह्या कल्पनेने मला प्रचंड धडकी भरायची. 'आत्ता संधी आहे तेव्हा कमवून घेतलं नाही, तर तो गुन्हाच होईल. नंतर कोणी विचारणार नाही आपल्याला,' असं मी रोझीलाही पटवून द्यायला बघायचो. बऱ्यापैकी पुंजी जमल्यानंतर पैशांची किफायतशीर गुंतवणूक करायची अशा माझ्या योजना होत्या; पण आमचं उच्च राहणीमान, आदरातिथ्य ह्यामध्येच बहुतांशी सारा पैसा खर्च होत होता.

"आपण दोघंच असूनही महिन्याला दोन हजार खर्च होतोय. हा भपका अनावश्यक आहे असं नाही तुला वाटत? साधेपणाने राहता येणार नाही का?" रोझी कधीतरी चिंतेने विचारायची.

"ते सगळं तू माझ्यावर सोपव," मी आश्वासक स्वरात म्हणायचो. "आपल्या दर्जाप्रमाणे राहायला नको का? त्यासाठी एवढा खर्च होणारच. काळजी करू नकोस."

सर्वांगीण विचार करून बँकेतील खातं मी रोझीच्या नावावर चालवत होतो. ह्याचं कारण आधीच माझ्यामागे सावकाराची कटकट लागली होती. सावधगिरीचा उपाय म्हणून माझ्या नावावर खातं न ठेवण्याची खबरदारी घ्यावी लागली. माझा तारखाबहाद्दर वकील नेहमीप्रमाणे वेळकाढूपणा करत होता. अधूनमधून सही किंवा पैसे घेण्यासाठी फेरी घालायचा, बाकी सारं

परस्पर उरकून टाकायचा. नलिनी मी पुढे केलेल्या चेकवर डोळे मिटून सही करायची. आणखी एका गोष्टीची कबुली द्यावी लागणार. आमच्या बंगल्यावर असलो की माझा दोस्तांबरोबर अड्डा पडायचा. आम्ही अक्षरश: चोवीस तास पत्ते खेळत बसायचो. त्यासाठी एक वेगळी खोलीच राखून ठेवली होती. दोन नोकर सदैव आमच्या दिमतीला असायचे. चहा, कॉफी, खाणंपिणं सारं काही खोलीमध्येच व्हायचं. चोरून मदिरापानही चालायचं. दारूबंदीचा कायदा होता, पण माझ्यासारख्या वजनदार व्यक्तीला तो लागू नव्हता. तब्येतीचं कारण दाखवून मी वैद्यकीय दाखला मिळवला होता. त्याअन्वये माझ्या आरोग्यासाठी दारू पिणं आवश्यक आहे असं मी सिद्ध करू शकत होतो! वास्तविक पाहता मला 'पिण्याची' फारशी आवड नव्हतीच. व्हिस्कीचा एक पेग मी तासन्तास खेचत राहायचो. परवाना सहजासहजी मिळत नसे त्यामुळे परवानाधारकाला समाजात वजन होतं. त्या आमिषामुळे माझ्याकडे मोठमोठे लोक जमत होते. कायद्याचा मान राखण्यासाठी मी खिडक्यादारं बंद करून ह्या विनापरवाना मंडळींना दारू पाजायचो. त्यामुळे असेल कदाचित, पण मी फारच लोकप्रिय झालो होतो. सारे 'राज' म्हणत माझ्याशी फारच सलगीने वागायचे. आमचा तीन पत्तीचा डाव कधी कधी सलग दोन दिवस चालायचा. दोन हजार रुपयांचा चेक त्यासाठी वटवायचो. इतरांनीही माझ्यासारखेच भक्कम पैसे लावावेत अशी माझी रास्त अपेक्षा असे. रोजच्या बैठकीतील हे माझे दोस्त विविध उच्च पदांवर काम करत असल्याचे मला बरेच फायदे व्हायचे. सरकारी क्षेत्रामधील आतल्या गोटातील बातम्या समजायच्या; बाजारातील, दिल्लीमधील गुप्त खबरी कानी पडायच्या. रेसकोर्सवर काय घडतंय, अमूक पदावर कोणाची नियुक्ती होणार आहे हे कळायचं. अन्य लाभ - उदा. ट्रेन तिकीट हवं तेव्हा मिळायचं, ज्युरीच्या कामातून कोणाची सुटका करणं असो वा नोकरीवरून काढून टाकलेल्या एखाद्या अधिकाऱ्याला पुन्हा ती मिळवून द्यायची असो, समितीवर नेमणूक, शाळेत प्रवेश वा नोकरी मिळवून देणं, नको असलेल्या अधिकाऱ्याची बदली - अशी हजार कामं मी सहज करायचो. मी फार महान सामाजिक कार्य करतोय आणि त्यासाठी अशा वजनदार व्यक्तींशी संपर्प ठेवणं, त्यांना खूष राखणं आवश्यक आहे, अशी माझी भावना होती.

आयुष्य असं मजेत, बेफिकिरीने चाललं होतं. त्या धांदलीत मला मार्कोचा संपूर्ण विसर पडला होता. आम्ही त्याचा कधी उल्लेखही करत नसू. तो ह्या पृथ्वीतलावर आहे हे सत्य मी कायमचं नजरेआड केलं होतं. त्याच्या घराच्या जवळपास कार्यप्रम करायचा नाही एवढी काळजी मात्र घ्यायचो. त्याची आमनेसामने गाठ पडण्याचा धोका मला पत्करायचा नव्हता. नलिनीच्या मनात त्याच्याविषयी काय भावना होत्या कोणास ठाऊक. त्याच्या कटू, दु:खद आठवणी तिला नको असणार असं माझं मत होतं. ते क्षण, त्या आठवणी पुसट झाल्या असणार, मनाच्या खोल कप्प्यामध्ये दबून गेल्या असतील, किंबहुना ती त्याला पूर्णत: विसरलीच असेल अशी मला आशा होती. शिवाय 'रोझी'ची जागा आता नलिनीने घेतली होती, त्यामुळे ती मार्कोपासून सुरक्षित आहे अशी मला खात्री वाटायची. पण माझे सारेच अंदाज चुकीचे ठरले.

त्या वेळी आमचा मुक्काम मालगुडीलाच होता. संपूर्ण सप्ताह तिथेच कार्यप्रम व्हायचे होते. तेव्हाच पोस्टाने 'ते' पुस्तक आलं. पोस्टाने बरंच काही येत असायचं - कॅटलॉग, कार्यप्रम पुस्तिका, कवितांची पुस्तकं वगैरे. माझा सचिव त्यांची योग्य ती विल्हेवाट लावायचा. काही तामीळ आणि इंग्रजी चित्रमय मासिकं नलिनीसाठी वर तिच्या खोलीमध्ये पाठवली जात. कार्यप्रमासाठी विचारणा करणाऱ्या पत्रांव्यतिरिक्त अन्य कशाकडेही - पुस्तकं, मासिकं - मी ढुंकूनही पाहत नसे. माझ्यामागे इतके व्याप असत की, पुस्तकं वगैरे वाचायला मला जराही वेळ मिळायचा नाही. माझ्याकडे तसं काही पाठवूच नकोस अशी सूचनाच देऊन ठेवली होती. तरीही ते पुस्तक घेऊन तो माझ्याकडे आला. "साहेब, हे बघता का? तुम्हाला आवडेल असं वाटतंय," तो म्हणाला.

मी झडप घालून ते पुस्तक त्याच्या हातातून घेतलं. मार्कोचं पुस्तक होतं ते. भरपूर चित्रं, फोटो आणि नोंदी टिपल्या होत्या त्यामध्ये. मार्कोने पेन्सिलने लिहिलं होतं, 'पान १५८ पाहा.' मी पानं उलटली. १५८ पानावरच्या प्रकरणाचं शीर्षक होतं- 'मेम्फी केव्ह पिक्चर्स.' प्रकरणाच्या आरंभी एक संक्षिप्त ओळ होती: 'मालगुडी रेल्वे स्टेशनवरील श्री. राजू यांच्या

अमोल सहकार्याबद्दल लेखक सदैव ऋणी राहील.' पुस्तक मुंबईच्या प्रकाशकांनी लेखकाच्या सूचनेवरून मला सप्रेम भेट पाठवलं होतं. अतिशय सुरेख होतं पुस्तक. भरपूर आर्टप्लेट्स, 'द कल्चरल हिस्ट्री ऑफ साऊथ इंडिया' ह्या विषयावर प्रदीर्घ लेख, उत्कृष्ट निर्मितिमूल्य. किंमतही पुस्तकाला साजेशी होती- २० रुपये. ते त्या विषयावरील सर्वांगसुंदर पुस्तक असावं, पण मला त्यामध्ये रस नव्हता.

"ठीक आहे. माझ्याकडे राहू दे हे पुस्तक," मी सचिवाला सांगितलं. त्याने नेमकं हेच पुस्तक माझ्याकडे का आणलं असावं? मार्को कोण आहे हे त्याला माहिती आहे की काय? किंवा...? मी हे विचार झटकून टाकले. तसं काही नसावं...निळ्या आणि सोनेरी बांधणीचं सुरेख, किमती पुस्तक मला दाखवलं नाही, तर कदाचित मी त्याला धारेवर धरीन असं त्याला वाटलं असेल. "मी वाचेन हे पुस्तक," असं म्हणून मी त्याचे आभार मानले. तो गेल्यानंतर मी पुन्हा विचारांच्या भोवऱ्यात गरगरायला लागलो. पुढे काय करावं? नलिनीला पुस्तक दाखवावं का? मग वाटलं, तिला का त्रास द्यायचा? नाहीतरी अशा अभ्यासपूर्ण, गंभीर पुस्तकामध्ये तिला काय रस असेल? कंटाळेल ती. पुस्तक उलटसुलट करून एखादं पत्र वगैरे आहे का हे पाहिलं. पत्र नव्हतंच. ह्याचा अर्थ विजेच्या बिलाप्रमाणे हे पुस्तकदेखील व्यक्तिगत कोणा एकासाठी नव्हतंच. पुन्हा एकदा १५८ पान उघडून त्याने लिहिलेला संदेश वाचला. माझं नाव पुस्तकामध्ये छापून आलंय ह्याचा आनंद होत होता, पण एक बारीक शंका मनात आलीच - त्याने नेमका कशासाठी माझा उल्लेख केला असेल? त्यामागे त्याचा काय उद्देश असेल? केवळ दिलेला शब्द राखण्यासाठी, तो अजूनही मला विसरलेला नाही, सर्व गोष्टी त्याच्या लक्षात आहेत हे दर्शवण्यासाठी? साऱ्या शक्यता आठवून माझं डोकं गरगरायला लागलं. अखेर पुस्तक नलिनीला न दाखवणं सुज्ञपणाचं ठरेल असा निर्णय घेऊन मी मार्कोचं पुस्तक कोणाच्याही नजरेस पडणार नाही अशा ठिकाणी लपवून ठेवलं. कार्डरूमच्या शेजारी मद्याच्या बाटल्या ठेवायचं कपाट होतं. हे कपाट कायम कुलूपबंद असायचं. त्याची किल्ली माझ्याजवळ असे. बाटल्यांच्या मागे पुस्तक लपवून मी कुलूप लावून टाकलं. नलिनी त्या कपाटाजवळ

फिरकत नसे. त्यामुळे ती जागा फारच सुरक्षित होती. मार्कोच्या पुस्तकाचा तिच्यासमोर उल्लेखही केला नाही. नाहीतरी तिचा काय संबंध? त्याने ते पुस्तक माझ्या नावावर पाठवलं होतं. मी केलेल्या सहकार्याची पावती होती फक्त. मी माझ्या कृतीचं समर्थन केलं खरं, पण गुन्हा लपवण्याचा कितीही प्रयत्न केला तरी तो कधी ना कधी उघडकीस येतोच. छत्री उघडून सूर्याला लपवता येत नाही ह्याचा प्रत्यय लवकरच आला.

तीनच दिवसांनंतर 'द इलस्ट्रेटेड वीकली ऑफ बॉम्बे' मध्ये मधल्या पानावर मार्कोचा फोटो झळकला. नलिनी हे साप्ताहिक वाचायची. विवाहसोहळ्यांचे फोटो, त्यामधील कथा, लेख-सारंच तिच्या आवडीचं होतं. मार्कोच्या फोटोबरोबर पुस्तकाचं परीक्षणसुद्धा होतं. 'हे पुस्तक म्हणजे भारताच्या सांस्कृतिक इतिहासातील युगप्रवर्तक संशोधन आहे' असे कौतुकोद्गार काढले होते. नलिनी धावतच मला ती बातमी दाखवायला आली. मी तेव्हा हॉलमध्ये हिशेब तपासत बसलो होतो. कोणी भेटायला आलं नसल्याने शांतपणे काम करत होतो. तेवढ्यात पावलांचा आवाज आला. मागे वळून पाहिलं, तर नलिनी. हातामध्ये ते साप्ताहिक होतं, चेहरा आनंदाने, उत्साहाने फुललेला. "हे पाहिलंस का?" तिने ते साप्ताहिक माझ्यापुढे केलं.

लेख पाहून मीही आश्चर्य वाटल्याचं नाटक वठवलं. "शांत हो, बस इथे," मी तिला चुचकारत म्हणालो.

"किती छान बातमी आहे ना! आयुष्यभर त्याने ह्यासाठी मेहनत केली. पुस्तक कसं असेल कोणास ठाऊक?" तिच्या स्वरात मार्कोविषयी कौतुक, अभिमान ओथंबलेला होता.

"काही नाही गं, किचकट, गंभीर पुस्तक असणार ते. तुला-मला त्यातलं काही समजणारसुद्धा नाही. तशा गोष्टींची आवड असणाऱ्यांनाच त्यामध्ये रस असणार," मी तिचा विरस करून म्हणालो.

"पण मला ते पुस्तक पाहायचंच आहे. कुठून तरी मिळवता येणार नाही का?" एवढं बोलून ती काय करतेय ते समजायच्या आतच तिने माझ्या सचिवाला हाक मारली. "मणी, हे बघ, हे

पुस्तक हवंय मला. बघ कुठे मिळतंय," तिने वीकलीमधला फोटो त्याला दाखवला.

मणीने सावकाश ते परीक्षण वाचलं, मग क्षणभर विचार करून माझ्याकडे कटाक्ष टाकला, अखेर म्हणाला, "ठीक आहे, मॅडम."

मी परिस्थिती ओळखून त्याला घाईघाईने म्हणालो, "अरे, पटकन ते पत्र तयार कर, स्वत: पोस्टात जाऊन टाकून ये. लेट फी भरायला विसरू नकोस." मी त्याला हाकललंच. रोझी अजूनही इथेच बसली होती. एरव्ही ती फक्त कोणी भेटायला आलं तरच खाली येत असे. पुस्तक-परीक्षण वाचून ती एवढी का नाचतेय? क्षणभर वाटलं, पुस्तक तिला दाखवावं का? पण मग ती हजार प्रश्न विचारेल, स्पष्टीकरण मागेल...त्यापेक्षा नकोच ते. थोड्या वेळाने ती तिच्या खोलीत गेली. नंतर त्या साप्ताहिकामधला मार्कोचा फोटो कापून तिने आरशावर लावून ठेवलेला पाहून मला धक्काच बसला. चक्क मार्कोचा फोटो? त्यावरून काहीतरी विनोद करावा असं वाटलं, पण योग्य शब्दच सापडेनात. अखेर काहीच टिपणी न करता गप्पच बसलो. मात्र आरशाकडे न पाहण्याची काळजी त्यानंतर घेत होतो.

त्या आठवड्यात आम्ही नेमके मालगुडीतच होतो. प्रवासाच्या गडबडीत असतो तर कदाचित वीकलीचा 'तो' अंक तिच्या नजरेस पडलाच नसता आणि पुढचं सारं भांडण टळलं असतं. दुर्दैवाने तसं घडायचं नव्हतं. त्यानंतर तिसऱ्याच रात्री झोपायच्या तयारीत असताना तिने बॉम्ब फोडला, "तू ते पुस्तक कुठे लपवलं आहेस?"

मी चमकून विचारलं, "तुला कोणी सांगितलं?"

"ते कशाला हवंय? तुझ्याकडे पुस्तक आहे हे खरंय ना? मला बघायचंय."

"ठीक आहे. उद्या दाखवीन." हे मणीचंच काम असणार ह्याविषयी मला शंका नव्हती. मणीने रोझीबरोबर थेट संपर्प ठेवायचा नाही असा अलिखित नियम मी बनवला होता. त्याने तो

नियम मोडला हे स्पष्टच दिसत होतं. ह्याची शिक्षा त्याला मिळायलाच हवी...नंतर बघतो त्याच्याकडे.

ती उशीला रेलून बसली होती. हातामध्ये कोणतंसं मासिक होतं. थोडा वेळ वाचायचं नाटक केलं, पण खदखदणारा राग अखेर उसळून बाहेर आलाच. "माझ्यापासून लपवून का ठेवलंस?" तिच्या आवाजाला धार होती.

अचानक हल्ला झाल्याने काय उत्तर द्यावं हे सुचेना. वेळ मारून नेण्यासाठी म्हणालो, "मला फार झोप येतेय. उद्या ह्या विषयावर बोललो तर चालणार नाही का?"

पण तिला आत्ताच सोक्षमोक्ष लावायचा होता. "तू असं का वागलास तेवढं सांग. मग खुशाल झोप."

उत्तर देईपर्यंत ती गप्प बसणार नाही हे दिसत होतं.

"तुला ते पुस्तक आवडणार नाही असं मला वाटलं." मी म्हणालो.

"म्हणजे काय? का आवडणार नाही? अखेर तो माझा..."

"पण तुला तर त्याचं संशोधन, खोदकाम सारंच नकोसं वाटायचं. तूच तसं म्हणायचीस," मी तिलाच दोष दिला.

"आत्तादेखील त्याचं काम मला कंटाळवाणं, निरस वाटेल. पण त्याच्या बाबतीत काही घडलं तर जाणून घ्यायला नक्कीच आवडेल. त्याचं नाव झालंय, कौतुक होतंय ह्या गोष्टीचा मला आनंद वाटतोय. नेमकं कशासाठी हे समजत नसलं तरीसुद्धा..."

"अरे वा! तुला अचानक त्याचा पुळका कसा काय आला? पण ते पुस्तक त्याने मला पाठवलंय, तुला नाही. हे विसरू नकोस," मी छद्मीपणाने म्हणालो.

"केवळ ह्या कारणामुळे तू माझ्यापासून ही गोष्ट लपवून ठेवलीस?"

“माझं पुस्तक आहे ते. मला हवं ते करीन. विषय संपला. मी झोपतोय आता. वाचणार नसशील तर लाईट बंद कर. विचार करत बसायचं तर अंधारातही करता येईल,” मी तुसडेपणाने बोललो.

मी एवढा वाकड्यात का शिरलो कोणास ठाऊक. तिने मुकाट्याने लाईट मालवला. पण ती काळोखात अश्रू गाळत बसलीय हे मला समजत होतं. तिची माफी मागावी, आंजारून-गोंजारून तिला शांत करावं असं क्षणभर वाटलंही, पण मोठ्या निग्रहाने तो विचार बाजूला सारला. अलीकडे फारच उदास, विमनस्क वागायची. मनात साचलेलं सारं दु:ख वाहून गेलं म्हणजे बरं वाटेल म्हणून मी तिच्याकडे दुर्लक्ष केलं. दुसऱ्या बाजूला तोंड फिरवून झोपायचं सोंग घेऊन पडून राहिलो. आता अर्धा तास गेला असेल. मला झोप लागेना. अखेर लाईट लावून बघतो तर ती अजूनही तशीच बसून होती. डोळ्यांतून अश्रू वाहत होते.

“अगं, काय झालंय तुला? अशी का वागतेस?”

“काहीही असलं तरी...अखेर तो माझा नवरा आहे ना...” ती हुंदके देत म्हणाली.

“बरं, बरं, एवढं रडण्यासारखं काय झालंय? त्याचं नाव झालं ह्याचा तुला आनंद व्हायला हवा.”

“आनंद झालाय ना.”

“मग रडणं बंद कर आणि झोप बरं आता.”

“त्याचं नाव काढलं की तू चिडतोस कशाला?”

प्रकरण धसास लावल्याशिवाय झोप मिळणं शक्य दिसत नव्हतं. एकदाचा सोक्षमोक्ष लावूनच टाकतो असं ठरवून मी म्हणालो, “का चिडतो हे माहीत नाही तुला? तुला त्याने कधी आणि कशा प्रकारे सोडलं हे विसरलीस का?”

“नाही विसरले. माझी तीच लायकी होती. दुसरा कोणी नवरा असता तर त्याने तिथल्यातिथे अशा बायकोचा गळा आवळला असता. मी काय केलं हे समजल्यानंतरही त्याने मला महिनाभर सहन केलं.”

“अरेच्चा! तेव्हा तर तू वेगळंच काहीतरी बोलत होतीस. कोणतं खरं समजायचं?”

“मला नाही माहिती...” ती हताशपणे म्हणाली, “त्याला समजण्यात कदाचित चूक झाली असेल माझ्याकडून. खरोखरच माझ्याशी चांगला वागलातो.”

“तो तर तुला स्पर्शही करत नसे,” मी दुष्टपणे म्हणालो.

“असं टोचून बोलायची गरज आहे का?” अचानक तिचा आक्रमकपणा कमी झाला. पडल्या आवाजात ती म्हणाली. मला तिच्या वागण्याचा अर्थच समजेनासा झाला. कधी रागवेल, भांडायला लागेल, कधी उदास होईल वा मुळूमुळू रडायला लागेल ह्याचा अंदाज येत नव्हता. तिच्या निकट सहवासात किती काळ उलटला, पण अजूनही तिच्या मनाचा थांग लागत नव्हता. ती काय आणि कसा विचार करते? विचारी आहे की अविचारी? तिच्या बोलण्यावर विश्‍वास ठेवावा की नाही? खरं बोलते की खोटारडी आहे? प्रथम भेटीमध्ये तिने नवऱ्याविषयी बऱ्याच तक्रारी केल्या, त्याच्यावर नाही ते आरोप केले. ते सारं केवळ माझी सहानुभूती मिळविण्यासाठी, मला भुलवण्यासाठी होतं का? अलीकडे तिला मीही आवडेनासा झालोय, ह्याचा अर्थ आता ती माझ्यावरदेखील खोटेनाटे आरोप करणार की काय? मी एक अत्यंत मूर्ख, मंदबुद्धी माणूस आहे असं म्हणायला कमी करणार नाही. विचार करून माझं डोकं गरगरायला लागलं. अचानक तिला नवऱ्याविषयी प्रेमाचा पाझर फुटलेला पाहून माझ्या काळजात खंजीर खुपसल्यासारखं झालं. ध्यानीमनी नसताना ती इतकी कशी बदलली? मी तिच्यासाठी एवढा झटलो, आकाशपाताळ एक करून तिला प्रसिद्धी आणि लोकप्रियतेच्या शिखरावर विराजमान केलं. असं असूनही ती अशी अस्वस्थ, उदास का? काय करू म्हणजे तिचा मूड ठीक होईल? माझंच

चुकलं. व्यावसायिक यशाच्या मागे लागून मी तिच्याकडे फारच दुर्लक्ष केलं, तिला कायम गृहित धरलं. चूक सुधारायला हवी.

“आपण कुठेतरी जायचं का? सुट्टीवर?” मी आशेने विचारलं.

“कुठे?” तिच्या आवाजात तटस्थपणा होता. तो ऐकून मी दचकलो. तरीही नेटाने म्हणालो, “कुठे असं काही नाही. कुठेही जाता येईल...हवं तिथे.”

“पण आपण सतत कुठे ना कुठे जातच असतो. वेगळं काय असणार आहे आता?” ती निरुत्साहाने म्हणाली.

“फक्त आपण दोघांनीच जायचं, निव्वळ मजा करायची. एकही कार्यक्रम नाही. निरुद्देश हिंडायचं.”

हे ऐकून ती हसली. कमालीचा विखार होता तिच्या आवाजात. “एकही कार्यक्रम नाही? खरं की काय? मी फारच आजारी पडले किंवा माझा पाय मोडला तरच शक्य आहे ते. तुला कोलूचा बैल माहितीय ना? तेलाच्या घाण्याला जोडलेला? गोल गोल फिरतो बिचारा...आदि ना अंत ना विश्रांती.”

तिचे झोंबरे वाग्बाण ऐकून मी ताडकन उठून बसलो.

“हातात घेतलेले कार्यक्रम उरकले की लगेच जाऊ या.”

“म्हणजे तीन महिन्यांनी?”

“हो. तेवढे संपले की थांबू या थोडा वेळ.”

तिने आत्यंतिक अविश्वासाच्या नजरेने माझ्याकडे रोखून पाहिलं. मी बचावात्मक पवित्रा घेतला, “अगं, तुला एखादा कार्यक्रम नको असेल तर सांगत जा ना.”

“कोणाला सांगू?”

"म्हणजे काय? अर्थात मला."

"कार्यप्रम स्वीकारण्यापूर्वी विचारलंस तरच नकार देता येईल ना? तू तर आगाऊ रक्कम घेऊन मोकळा होतोस," तिने तिखट आवाजात दोषारोप केला.

झालंय काय हिला? काय बोलतेय हे समजतंय तरी का? आता मात्र अति झालं. मी तिच्या कॉटवर, तिच्याजवळ जाऊन बसलो. खांदा हलवून म्हणालो, "का अशी वागतेस? काय खुपतंय? तू खूष नाहीस का?"

"नाही. मी मुळीच खूष नाही. तुला काय त्याचं?" ती फटकन म्हणाली.

आता मात्र मी खरोखरच गोंधळून गेलो. काय बोलायचं ह्यावर? ती समाधानी नाही? हे कसं शक्य आहे?

"कशामुळे त्रास होतोय हे सांगितलंस तरच मी काहीतरी उपाय करीन ना. सगळं तर छान चाललंय तुझ्या आयुष्यात, नाराज व्हायचं कारणच दिसत नाही मला. नावलौकिक, पैसाअडका भरपूर कमावला आहेस. तुला नृत्याची आवड होती ना? इच्छा पूर्ण झाली ना तुझी?"

"खरंय, पण आता इतकी नाचलेय की वाटतं, बस्स झालं. गावच्या जत्रेमध्ये पिंजऱ्यातल्या पोपटांचा खेळ लावतात ना? त्या पोपटाप्रमाणे अवस्था झालीय माझी. तो म्हणायचा ते खरंच आहे - डोंबाऱ्याचं माकड झालंय माझं!" इतक्या दिवसांची खळबळ, अस्वस्थपणा उफाळून आला होता.

शब्दाने शब्द वाढत जातो, माणसं तिरकस बोलून समोरच्याला जखमी करतात, ह्याचा अनुभव असल्याने मी सुज्ञपणे दुसरा मार्ग पत्करला. स्फोटक परिस्थिती काबूत आणण्यासाठी मी चक्क हसत सुटलो. माझं गदगदून हसणं पाहून तिचाही राग फार काळ टिकू शकला नाही. अखेर भांडण बाजूला पडलं. हसण्याची लागण तिलाही झाली. प्रथम ओठ मुडपून किंचित हसली, नंतर थोडी गालातल्या गालात, मग खुदकन - अशा एकेक पायऱ्या चढत तिनेही

हास्याचे मजले चढवले. हसण्याच्या महापुरामध्ये आमचे सारे रागरुसवे वाहून गेले. अखेर रात्री दोन वाजता आम्ही दोघं शांत मनाने झोपी गेलो.

ह्या बारीकशा लढाईनंतर आमचं जीवन पूर्ववत चालू राहिलं. वादाला पुन्हा तोंड फुटू नये म्हणून मी त्यानंतरचे तीन दिवस कार्डरूममध्येच लपून बसलो होतो. पत्ते खेळण्याच्या सबबीखाली तिला चुकवणं सोपं होतं. तिची भावनिक परिस्थिती अजूनही स्फोटक दिसत असल्याने चार पावलं दूर राहणं श्रेयस्कर होतं! पुढील तीन महिने अतिशय धावपळीचे होते. त्यासाठी तिचा मूड सांभाळणं अत्यावश्यक होतं. दक्षिण भारतामधील नृत्यगायन महोत्सवाचा हंगाम सुरू होणार होता. नलिनी ठिकठिकाणी आपली कला सादर करणार होती. चिकार कार्यक्रम ठरले होते. त्यासाठी आगाऊ पैसेही मिळाले होते. संपूर्ण दक्षिण भारतामध्ये दोन हजार मैलांचा प्रवास करायचा होता. ह्या तीन महिन्यांमध्ये तिची उदासी, चिडचिड कमी होईल अशी मला आशा वाटत होती. कारण त्यानंतरचे तीन महिने भरगच्च कार्यक्रम ठरवायचे असा माझा विचार होता. 'सुट्टी घेऊ' असं म्हणालो होतो, पण तसं काहीही करायचा माझा अजिबात इरादा नव्हता. विश्रांतीची गरजच काय हे मला समजत नव्हतं. हेच तर कमवून घ्यायचे दिवस होते. खंड पडला तर नंतर कार्यक्रम मिळवणं जड जाईल अशी भीती मला वाटत होती. तिला खूष ठेवायचं, तिची मर्जी राखून, मूड बिघडणार नाही ह्याची काळजी घ्यायची म्हणजे सुट्टी घ्यायचा विचारही तिच्या मनात येणार नाही, असा धूर्त निर्णय मी घेतला होता.

आमचा दौरा कोणत्याही अडथळ्याविना सुखरूप पार पडला. मालगुडीला परतलो. मणी दोन दिवसांच्या सुट्टीवर असल्याने मी एवढ्या दिवसांचा साचलेला पत्रांचा ढीग घेऊन बसलो होतो. कार्यक्रमांची विचारणा करणारी पत्रं बाजूला काढली. एरवी मी सर्वांना होकार कळवून टाकला असता. आत्ता मात्र तसं करायची माझी हिंमत झाली नाही. एकदा तिला विचारलेलं बरं असा सावध पवित्रा घेतला. अर्थात तिला नाही म्हणता येणार नाहीच, पण आपल्याला

विचारल्याचं समाधान तिला मिळायला हवं. पत्राचं वर्गीकरण करताना एकीकडे माझं विचारचक्र चालू होतं.

अचानक एक पत्र नजरेस पडलं. 'रोझी ऊर्फ नलिनी'च्या नावे ते पत्र मद्रासच्या एका वकिलाच्या ऑफिसतर्फे पाठवण्यात आलं होतं. मी विचारात पडलो. काय करावं? नलिनीला दाखवावं की नाही? ती वर, तिच्या खोलीत होती. नेहमीप्रमाणे एखादं मासिक वाचत असणार. पत्र उघडून पाहावं का? की तिलाच द्यावं? एक मन म्हणालं, 'पत्र तिच्या नावावर आलंय, सज्ञान आहे ती, काहीही समस्या आली तरी ती सोडवण्याइतपत मोठी आहे.' पत्र रजिस्टर्ड पोस्टाने, काही दिवसांपूर्वी आलेलं दिसत होतं. मणीनेच ते इथे टेबलावर ठेवलं असणार. पत्र सीलबंद होतं. मी शंकित मनाने त्या सीलकडे पाहत होतो. य:कश्चित सीलला काय घाबरायचं असा धाडसी विचार करून अखेर मी सील फोडून पत्र उघडलं. शिवाय तिची पत्रं उघडून वाचायला तिचा आक्षेप नसतो हे मला माहिती होतं. पत्रातील मजकूर पुढीलप्रमाणे होता : 'मॅडम, आमच्या पक्षकाराच्या सूचनेनुसार आपल्या सहीसाठी एक अर्ज सोबत पाठवत आहोत. खूण केलेल्या जागी सही करून अर्ज परत पाठवणे. बँक ऑफ...च्या लॉकरमध्ये दागिन्याचा डबा असून तो काढण्यासाठी सही हवी आहे. लॉकर दोघांच्या नावे आहे ही गोष्ट आपणांस माहिती असेलच. दोघांच्या सह्या मिळाल्यानंतर यथायोग्य काळात ते दागिने आपल्याकडे पोहोचवण्याची व्यवस्था केली जाईल.'

पत्र वाचून मला खूपच आनंद झाला- 'अरे वा, आणखी दागदागिने मिळणार...' हे ऐकून ती नक्की खूष होईल. पण डबा किती मोठा असेल? किती दागिने असतील? त्यांचं मूल्य काय असेल? हे सारं जाणून घ्यायला मी अधीर झालो. पत्रामध्ये तसा काही उल्लेख नव्हता. वकीलसाहेबांनी शब्द फारच मोजूनमापून वापरले होते. तिला पत्र देण्यासाठी मी जिन्याच्या काही पायऱ्या चढलोही, पण तिथेच थबकलो. काही विचार करून मागे वळलो. 'घाई काय आहे? सर्व बाजूंनी नीट विचार करून मगच ठरवतो काय करायचं ते. एवढे दिवस गेले, आणखी दोन

दिवसांनी काय फरक पडणार आहे? शिवाय तिने कधीही ह्या दागिन्यांचा उल्लेख केलेला नाही. म्हणजे तिला त्या दागिन्यांची पर्वा नसावी,' अशी सोयिस्कर समजूत करून मी पत्र मद्याच्या बाटल्यांमागे ठेवलं. कपाटाला कुलूप लावून टाकलं. नशीब! मणी रजेवर होता. नाहीतर त्याने मागच्या वेळेसारखा गोंधळ करून ठेवला असता.

त्यानंतर काही लोक भेटायला आले. ते गेल्यानंतर मीच बाहेर पडलो. पत्राचा विषय माझ्या डोक्यातून निघत नव्हता. मन रमवावं म्हणून मित्रांच्या सहवासात थोडा वेळ काढला, पण काहीही केलं तरी ते पत्र माझा पिच्छा सोडत नव्हतं. घरी खूप उशिरा परतलो. वरतून तिच्या घुंगरांचा छुमछुमता आवाज ऐकू येत होता. म्हणजे ती अजूनही सराव करतेय तर...मी कपाटातून मला छळणारं ते पत्र बाहेर काढलं. पुन्हा एकदा वाचलं. सहीसाठी छापील फॉर्म होता. तिच्या सहीनंतर तो फॉर्म मार्कोकडे जाणार...आता, एवढा काळ लोटल्यानंतर फॉर्म पाठवण्यामागे त्याचा काय हेतू असेल? अचानक एवढा उदार कसा झाला तो? नक्कीच काहीतरी वाईट उद्देश असणार... रोझीला जाळ्यात फसवायचं असेल. पण मार्को असा नाही याची जाणीव असल्याने हे सारे पर्याय मी बाद केले. मार्कोच्या कोणत्याही कृतीमागे त्याची न्याय्य वृत्ती, योग्य तेच करण्याचा स्वभाव दिसून येतो. आमच्यामध्ये इतकं सारं घडल्यानंतरही पुस्तकामध्ये माझा ऋणनिर्देश करण्यास तो चुकला नाही. दागिने परत करण्यामागेही हाच उद्देश असावा. दागिने रोझीचे आहेत, तिचे तिला परत करावेत आणि जबाबदारीतून मोकळं व्हावं, बस इतकंच. बाकी कोणताही कुटील हेतू मार्कोच्या मनातही येणार नाही. त्याचा उद्देश उदात्त आहे हे मला पटलं, पण हे रोझीला सांगावं की नाही ह्याबद्दल अजूनही द्विधा मन:स्थिती होती. पत्र पाहून तिची काय प्रतिप्रिया होईल हे एक तो परमेश्वरच जाणे! शांतपणे, फक्त एक व्यवहार म्हणून ती या गोष्टीकडे पाहणार नाही अशी सार्थ भीती वाटत होती. 'मार्को किती महान आहे, त्याचं मन किती मोठं आहे' असा साक्षात्कार होईल तिला. 'बघितलंस? मार्को किती सज्जन आहे!' असं म्हणून त्याचं गुणगान गाईल. अशा मार्कोला आपण फसवलं ह्या विचाराने दु:खी होईल, स्वत:ला त्रास करून घेईल आणि अखेर माझ्याशी भांडण उकरून काढेल. आजकाल

तिचं कशाने डोकं फिरेल ह्याचा नेम नसे. विनाकारण भडकायची. ‘वीकली’मधला मार्कोचा फोटो पाहून वेडी झाली होती. पुस्तक प्रकरणानंतर मी तिच्याशी फारच काळजीपूर्वक वागायचो. ते पुस्तक तिला अजूनही दाखवलं नाही.

पुस्तकाबाबत आमचं कडाक्याचं वाजलं, त्याच्या दुसऱ्या दिवशी ती ते पाहण्यासाठी मागेल असं मला वाटत होतं. पण तिने त्यानंतर कधीही तो विषय काढला नाही. अर्थात मलादेखील ते पथ्यावर पडलं. तिच्याशी वागताना मी अतिशय मऊ धोरण स्वीकारलं होतं. जरा खुट्ट झालं तर तिचा स्फोट होईल ह्याची जाणीव असल्याने मी तिच्या कलाकलाने घ्यायचो. आम्हा दोघांमध्ये एक विचित्र तणाव उत्पन्न झाला हे मात्र नक्की. त्यामुळे अत्यंत सावधपणे सारे व्यवहार करत होतो. थोडा काळ गेल्यानंतर सारं काही ठीक होईल ह्याविषयी मला शंका नव्हती. ह्याच कारणांमुळे पत्राविषयी द्विधा मन:स्थिती झाली होती. पत्र पाहून ती काय करेल ह्याचा नेम नव्हता. ‘मार्को किती महान, सज्जन, प्रामाणिक आहे’ ह्याची तबकडी वाजवत बसेल किंवा कोणी सांगावं, सर्व सोडून ती पुढची गाडी पकडून मार्कोकडे जायलाही कमी करणार नाही. कसलाच भरवसा नव्हता. पत्राचं काय करावं? ‘व्हिस्कीच्या बाटल्यांसोबत राहू दे सध्या, पुढचं पुढे बघू या,’ असं मनाशी म्हणून मी तो विषय संपवला. तारेवरची कसरत करतोय ह्या विचाराने मला कडवट हसू आलं.

नेहमीप्रमाणे आम्ही दोघं रात्रीचं जेवण घेत होतो. हवापाणी, राजकारण, भाज्यांचे भाव आणि दर्जा अशा निरुपद्रवी विषयांवर गप्पागोष्टी चालू होत्या. त्या तशाच विषयांवर व्हाव्यात ह्याविषयी मी कमालीची दक्षता बाळगत होतो. पुढचा एकच आठवडा सांभाळून राहायचं होतं. नंतर आमचा दौरा सुरू होणार होता. प्रवासाच्या धावपळीत त्रासदायक व्यक्तिगत विषय बाजूला पडेल, मला सतत जी धास्ती वाटत राहायची ती संपेल अशी मला आशा होती.

जेवणानंतर ती खाली हॉलमध्येच विडा चघळत बसली. सोफ्यासमोरच्या टेबलावर मासिक पडलं होतं. थोडा वेळ ते चाळून ती वर खोलीत गेली तेव्हा माझा जीव भांड्यात पडला. सारं

पूर्ववत होत होतं. हिशेब तपासत मी ऑफिसमध्ये बसलो. आयकरचं स्टेटमेंट भरायला दोन आठवड्यांचाच अवधी उरला होता. आपली आर्थिक परिस्थिती नेमकी काय आहे, जमाखर्चाचा ताळमेळ ह्यावर डोकेफोड करून अखेर मीही झोपायला गेलो. एव्हाना एकतर ती गाढ झोपली असेल किंवा पुस्तकवाचनात गुंग झाली असेल असा माझा अंदाज होता. त्यानुसारच मी बरोबर वेळ साधून खोलीत आलो होतो. कसंही करून तिच्याशी बोलणं टाळणं हा माझा महत्त्वाचा उद्योग होऊन बसला होता. स्वत:वरच ताबा उरणार नाही आणि मी पटकन पत्राविषयी सांगून टाकेन अशी सतत भीती वाटत राहायची. गादीवर आडवा होऊन मी नेहमीची वाक्यं फेकली, “मी झोपतो. तुझं वाचून झालं की लाईट बंद करशील ना?” तिने फक्त हुंकार भरला.

बंद डोळ्यांसमोर दागिन्यांचा डबा दिसत होता. किती दागिने असतील? त्याने दिलेले की आईने? कमाल आहे तिची! कधी चकार शब्दाने त्या दागिन्यांविषयी बोलली नसेल...बहुधा जुन्या पद्धतीचे असणार, म्हणूनच तिला ते आवडत नसावेत. तसं असेल तर विकूनच टाकावेत, ठेवून काय करायचंय? पैसे तरी मिळतील. आयकर अधिकाऱ्यांना पत्ताही लागणार नाही. लॉकरमध्ये ठेवलेत म्हणजे बरेच असणार. पण काहीच सांगता येत नाही. मार्को तसा चप्रम माणूस आहे. विचित्रपणा चालतो त्याचा अनेकदा! तेच योग्य आहे असं त्याला वाटलं तर अत्यंत फालतू गोष्टदेखील तो मोठ्या इतमामाने लॉकरमध्ये ठेवेल! योग्य...आहे... तेच... करणारा...आहे... तो...हेच विचार करता करता मी झोपी गेलो.

मध्यरात्र उलटली असावी. अचानक मला जाग आली. ती गाढ झोपेत घोरत होती. सही करण्यासाठी अमूक दिवसांचीच मुदत आहे असं त्या पत्रामध्ये लिहिलं आहे का ही शंका मला सतावत होती. तसं असेल तर फार मोठी समस्या निर्माण होईल. रोझीपासून पत्र लपवायच्या नादात मुदत निघून गेली तर सारं डबोलं हातचं जाईल. आत्ताच्या आत्ता खाली जाऊन ते पत्र वाचून पाहावं असं मला तीव्रपणे वाटत होतं, पण उठलो तर रोझीची झोपमोड होईल आणि ती सत्राशेसाठ प्रश्न विचारत बसेल. समजा, पत्राचं उत्तरच दिलं नाही, तर काय होईल? दागिन्यांचा

डबा लॉकरमध्ये पडून राहील किंवा वकिलांकडून एखादं स्मरणपत्र येईल. ह्यामध्ये एक धोका होता. समजा, मी घरात नसताना नेमकं ते पत्र आलं आणि रोझीच्या हाती पडलं तर रणकंदन माजेल. प्रश्नांवर प्रश्न, स्पष्टीकरणं, रडारड, भांडणं - सारं काही साग्रसंगीत होईल! बापरे, हे प्रकरण वाटलं तेवढं सोपं नाही. गुंतागुंत वाढतच चाललीय. तो माणूस एकही गोष्ट सरळ आणि सोपी करत नाही. साधं पत्र ते काय, पण त्याला असंख्य फाटे फुटतील, अनेक समस्या निर्माण होतील. विचार करकरून माझं डोकं फुटायची वेळ आली. पत्र नव्हे, तर एक ॲटमबॉम्बच त्याने पाठवलाय याविषयी शंका उरली नाही. तसाच तळमळत पहाटे पाच वाजेपर्यंत झोपलो. मग मात्र राहवेना. झपाट्याने बाटल्यांचं कपाट उघडून ते खरतनाक पत्र बाहेर काढलं. अत्यंत काळजीपूर्वक त्याची ओळन्‌ओळ पुन:पुन्हा वाचून काढली. ‘उलटटपाली’ असे शब्द वकिलांनी वापरले होते. विचार करून हलक्या झालेल्या माझ्या मनाला त्या दोन शब्दांमागे काहीतरी भयंकर महत्त्वाचा संदेश दडलेला आहे असं वाटायला लागलं. अखेर मी निर्णय घेतला. कागदाच्या तुकड्यावर रोझीच्या सहीची नक्कल करून पाहिली. फार प्रयास करावा लागला नाही. रोज खूप साऱ्या चेक आणि रिसिटींवर तिच्या सह्या घेत असल्याने सही ओळखीची झाली होती. अर्ज नीट उघडून खूण केलेल्या जागी मी सही केली - ‘रोझ, नलिनी.’ घडी करून वकिलांनी पाठवलेल्या पाकिटामध्ये तो अर्ज ठेवला आणि पाकीट चिकटवून बंद करून टाकलं. पाकिटावर पत्ता लिहिलेलाच होता. सकाळी साडेसात वाजता आमच्या विभागातील पोस्ट ऑफिस उघडलं तेव्हा रांगेत पहिल्या नंबरावर मी उभा होतो. एवढ्या लवकर मला पाहून पोस्टमास्तरांनाही आश्चर्य वाटलं.

“तुम्ही स्वत: आलात आणि तेदेखील एवढ्या लवकर?” त्यांनी विचारलं.

“माझा कारकून आजारी आहे. मी सकाळी फिरायला जातोच. म्हटलं, तेव्हाच हे कामही उरकावं. हे पत्र रजिस्टरने पाठवायचंय” असं म्हणून तो पत्ररूपी ॲटमबॉम्ब त्यांच्याकडे सुपूर्द केला! ती उठायच्या आत त्याची विल्हेवाट लावायची मला इतकी घाई होती की मी गाडी न

आणता चालत आलो होतो. गाडीसाठी गॅरेजचं दार उघडल्याच्या आवाजाने ती जागी होईल अशी भीती मला वाटली होती!

दागिन्यांचा डबा नेमका कधी आणि कसा येतोय ह्याची कल्पना नसली तरी रोज आतुरतेने वाट पाहायचो. "मणी, काही पार्सल आलंय का पोस्टाने?" असं रोज विचारायचो. तशी सवयच जडली मला. दिवसातनं शंभर वेळा तो प्रश्न विचारून मी मणीला हैराण करायचो. पत्र मिळाल्यानंतर तिसऱ्या दिवशी तो मौल्यवान डबा मिळेल अशी अपेक्षा होती! अर्थात तो माझा वेडेपणा होता. तशातच आम्हाला चार दिवसांसाठी बाहेरगावी जावं लागलं. जाण्यापूर्वी मी मणीला बजावलं; "माझं एक महत्त्वाचं पार्सल येणार आहे. आम्ही मंगळवारी परत येऊ. तोपर्यंत ते पोस्टामध्येच राहू दे असं पोस्टमनला सांग. अशा वस्तू तिथे ठेवून घेतात ना?"

"होय साहेब, पण मी सही करून घेऊ शकतो."

"अजिबात नाही. विमा उतरवलेला आहे त्या पार्सलचा. असं कोणाच्याही हाती देणार नाहीत. आम्हा दोघांपैकी एकाची सही लागेल. आम्ही नसताना आलंच तर मंगळवारी पुन्हा घेऊन ये असं सांगायचं पोस्टमनला, विसरू नकोस."

ठरल्याप्रमाणे आम्ही मंगळवारी परतलो. रोझी वर खोलीत गेल्यावर मी मोठ्या उतावीळीने मणीला विचारलं, "पार्सल आलं होतं का?"

"नाही साहेब. मी वाट पाहत होतो पोस्टमनची. भेटल्यावर विचारलं, पण काही नाही म्हणाला."

"अरे, असं कसं झालं?" मी वैतागून ओरडलो. 'उलटटपाली' असं लिहिल्याप्रमाणे मी तर सही करून लगेचच अर्ज पाठवून दिला होता. बहुधा फक्त सहीच हवी होती. दागिन्यांचा डबा मार्कोलाच हडप करायचा असणार. त्यानेच लबाडी करून हा सगळा बनाव घडवलेला दिसतोय. पण बच्चमजी, वकिलाचं पत्र माझ्याजवळ आहे पुरावा म्हणून, तुम्हाला तसं सोडणार

नाही, याद राखा! मी चिडून मनातल्या मनात धमक्या दिल्या. तसाच तावातावाने जाऊन बाटल्यांचं कपाट उघडलं. पत्र काढून काळजीपूर्वक वाचून काढलं. स्पष्ट शब्दात लिहिलं होतं, 'आम्ही पाठवण्याची व्यवस्था करू...विमा काढून...' वकिली भाषेत दागिन्यांचा डबा देण्याचा शब्द दिलेला होता. आणखी काय हवं? धोका देण्याची हिंमत होणार नाही मार्कोला. मग अजूनही दागिने आले कसे नाहीत? मी गोंधळून गेलो. 'उशिरा का होईना येतीलच. बँका, वकील आपल्या सवडीनुसार कामं करतात. आपण घाई करून फायदा नाही. नियमानुसार कामं करतात, मूर्ख लेकाचे! आपला देश ह्या अशा लोकांमुळेच खड्ड्यात चाललाय,' स्वत:लाच असं समजावून मी पत्र बाटल्यांच्या मागे ठेवून कपाटाला कुलूप ठोकलं. पत्र वाचायच्या निमित्ताने मी सारखा कपाट उघडतोय हे पाहून नोकर-चाकरांना भलताच संशय यायचा! आतमध्ये कसल्या बाटल्या आहेत हे त्यांना माहीत असल्याने मी वारंवार व्हिस्कीचे घोट मारतोय असं त्यांना वाटायचं. माझं पत्रव्यवहाराचं टेबल ही पत्र ठेवण्यासाठी योग्य जागा होती, पण त्यामध्ये धोका होता. मी चोरून ते पत्र पुन:पुन्हा वाचत असतो हे मणीच्या लक्षात आल्याशिवाय राहणार नाही. अर्थातच त्यातला मजकूर जाणून घेण्याचा मोह त्याला होणार. चोरपावलांनी माझ्यामागे येऊन हळूच पत्र वाचायला तो कमी करणार नाही. वास्तविक पाहता गेले कैक महिने तो माझं काम पाहतोय. त्याच्याविषयी तक्रारीला जागाच नव्हती. पण त्या दिवसांत मला सर्वांचाच संशय येत असे. सारे एकजात लुच्चे, लबाड, दुष्ट आणि कपटी आहेत असं माझं मत झालं होतं.

त्या दिवशी कालीपेटला आमचा कार्यक्रम ठरला होता. मालगुडीपासून साठ मैल अंतरावरील ह्या छोट्या शहरात जाण्यासाठी आयोजकांनी वाहनांची व्यवस्था केली होती. वादक साथीदारांसाठी मोठी व्हॅन, तसंच नलिनी आणि माझ्यासाठी प्रशस्त प्लिमथ गाडी. कार्यक्रम आटोपून लगेच परत येणार होतो. कालीपेटला प्रसूतिगृह उभारण्यासाठी पैसे जमा करण्यात येत होते. नलिनीचा कार्यक्रम त्यासाठीच होता. तिकिटदरही वाढवण्यात आले होते. पन्नासपासून ते दोनशे रुपये. मोठमोठे व्यावसायिक, बडे व्यापारी अशा सर्वांनी खुषीने भरघोस देणग्या दिल्या

होत्या. सर्व रसिकांची एकच अट होती- पहिल्या रांगेतील खुर्ची हवी. त्यामुळे नलिनीची नजर आपल्यावर पडेल, कार्यप्रम संपल्यानंतर ती उत्सुकतेने चौकशी करेल - 'पहिल्या रांगेत अति महत्त्वाच्या व्यक्ती आसनस्थ होत्या. त्या कोण?' बहुधा अशी स्वप्नं ही मंडळी पाहत असावीत. नलिनीच्या लोकप्रियतेमुळे तब्बल सत्तर हजार रुपयांचा गल्ला जमला होता. नलिनीशी परिचय करून घेण्यासाठी धडपडणाऱ्या ह्या रसिकांना एक गोष्ट माहीत नव्हती - तल्लीनतेने नृत्य करणाऱ्या नलिनीला कसलंही भान नसायचं. ती नेहमी म्हणायची, 'नृत्य करताना समोर कोण बसलंय ह्या गोष्टीकडे माझं जराही लक्ष नसतं. लाकडाचे ठोकळे असले तरी मी त्याच निष्ठेने नृत्य सादर करेन.'

अधिकाऱ्यांचा सहभाग असल्याने समारंभ भव्यदिव्य स्वरूपात आयोजित केलेला होता. अधिकाऱ्यांनी विशेष लक्ष घालण्याचं कारण खुद्द मंत्रीमहोदयांनी असे अनेक कार्यप्रम करण्याचा संकल्प सोडला होता. राज्य सरकारात मंत्रिपद भूषवणाऱ्या ह्या नेत्याला आपल्या विभागामध्ये उत्कृष्ट दर्जाचं प्रसूतिगृह उभारायचं होतं. हा उदात्त हेतू लक्षात घेऊन मीदेखील आमचा मोबदला कमी केला होता - एकूण फक्त एक हजार रुपये. सामाजिक कार्यासाठी अल्पस्वल्प हातभार आपणही लावावा अशी माझी नम्र इच्छा होती. आमचं त्यामुळे फारसं नुकसान होणार नव्हतं. शिवाय आयकरामध्येही सूट मिळाली असती! नलिनीला ह्या सर्व गोष्टींचं सुखदु:ख नसायचंच. ट्रेनऐवजी आम्ही गाडीने प्रवास करणार आणि त्याच रात्री आमच्या घरी परतायचं ह्याच गोष्टीचा तिला आनंद वाटत होता.

बांबू आणि नारळाच्या झावळ्या वापरून कार्यप्रमासाठी विशाल मंडप उभारला होता. रंगीबेरंगी दिव्यांच्या माळा, पताका, फुलं आणि अत्यंत सुरेख पडदे लावून मंडप सुशोभित केला होता. स्टेजदेखील कमालीच्या सुंदर सजावटीमुळे आकर्षक दिसत होतं. नलिनीचं ह्या सर्व गोष्टींकडे लक्षही नसायचं. अखेरीस मिळणाऱ्या हार-तुऱ्यांवरच ती खूष असायची, पण आजचं स्टेज पाहून तीदेखील प्रभावित होऊन उद्गारली, "काय सुरेख स्टेज आहे! आज नृत्य करताना

मनापासून आनंद होईल मला." मंडपामध्ये साधारण हजार प्रेक्षकांच्या बसण्याची सोय केली होती.

नेहमीच्या प्रथेनुसार मी खूण केल्यानंतर तिने कार्यप्रमाचा शुभारंभ केला. हातामध्ये प्रज्वलित दीप घेऊन तिने स्टेजवर आगमन केलं. विघ्नहर्ता श्रीगजाननाच्या स्तुतिस्तवनानंतर नृत्याला आरंभ झाला.

असे दोन तास गेले असतील. तिने पाचवा आयटम सादर करायला सुरुवात केली - नागनृत्य. नेहमीच हा प्रकार करत नसे ती. त्यामुळेच वादकांनी ती धून आळवायला सुरुवात केली तेव्हा मला किंचित आश्चर्य वाटलं. हे नृत्य मला आवडायचं. नलिनी अतिशय मोहक नागनृत्य करायची. सुप्रसिद्ध गाण्याच्या सुरांवर झुलत नलिनीने स्टेजवर प्रवेश केला. सावकाश बोटं फैलावली. पिवळ्या रंगाचा लाईटचा झोत तिच्या गोऱ्या, फैलावलेल्या बोटांवर पडला तेव्हा तिचे हात नागफण्यासारखे भासले. नागनृत्य करताना ती रत्नखचित मुकुट धारण करत असे. प्रकाशझोतामध्ये मुकुट झळाळून उठला. लाईटचा रंग बदलला तशी नलिनी हलकेच खाली बसली. नागराजाला डोलायला लावणारी धून हळुवारपणे वाजत होती. शंकर-पार्वतीच्या सान्निध्यात, कैलास पर्वतावर वास करणारे नागराज डौलदारपणे झुलायला लागले. फणा उभारलेल्या नागाचं मोहिनी घातल्याप्रमाणे गूढ नृत्य चालू होतं. नलिनीचं अंगांग अतिशय डौलदारपणे वळत होतं, सापाप्रमाणे थरथरत होतं. वाद्याच्या तालावर मंत्रमुग्ध होऊन डोलणारा नाग पाहून डोळ्यांचं पारणं फिटलं.

जवळपास पंचेचाळीस मिनिटं नलिनीने अप्रतिम सुंदर नृत्य सादर केलं. प्रेक्षक मोहित होऊन तिच्याकडे अनिमिष नेत्रांनी पाहत होते. माझीही समाधी लागली होती... नलिनी क्वचितच हे नृत्य करायची. त्यासाठी खास मूड लागतो असं तिचं म्हणणं होतं. "शिवाय ते करताना शरीर इतकं आणि असं वळवावं लागतं की पुढे कित्येक दिवस मला सरळ उभं राहणं कठीण जातं,"

असंही ती हसत म्हणायची. पूर्वी अनेकदा पाहिलं असूनही आजदेखील नलिनीचं डौलदार, स्वर्गीय नृत्य मी पापणीही न हलवता पाहत होतो.

अचानक आईचे शब्द आठवले - "नागकन्या! सावध राहा तिच्यापासून..." तिने धोक्याचा इशारा दिला होता. आईच्या आठवणीने मला उदास वाटायला लागलं. तिलाही आवडलं असतं हे मनमोहक नृत्य. रोझीचं आत्ताचं रूप, झगमगता पोषाख, चकाकते दागदागिने आणि रत्नखचित मुकुट पाहून आईला काय वाटलं असतं? आम्हा दोघांमधला दुरावा आठवून मला वाईट वाटलं. कधीमधी तिचं पोस्टकार्ड यायचं. मी अधूनमधून तिला थोडे पैसे पाठवायचो. 'मी बरा आहे...' अशा दोन ओळी खरडून टाकायचो. 'आपलं घर कधी परत मिळणार आहे? मला तिथं राहायला यायचंय' अशी विचारणा ती वारंवार करत असे. ते काम तितकंसं सोपं नव्हतं. घर सोडवण्यासाठी मोठी रक्कम हवी होती, सवड होईल तेव्हा बघेन असं मी मनाशीच ठरवायचो. नाही तरी घाई कसली होती? गावात, आपल्या भावाकडे सुखात राहत होती की... मामा तिची किती छान काळजी घेत. रोझीशी ती ज्या पद्धतीने वागली ते मी अजूनही विसरलो नव्हतो. त्याबद्दल तिला माफ करणं, का कोणास ठाऊक, अजूनदेखील जमत नव्हतं. जाऊ दे... सध्या आमचे संबंध सलोख्याचे होते. एकमेकांपासून दूर असलो तरी प्रेम होतं. कदाचित त्यामुळेच आमचे संबंध चांगले राहिले असावेत! नलिनीचं चित्तथरारक नृत्य पाहताना एकीकडे आईचा विचार करत होतो. एवढ्यात संस्थेचा एक माणूस हळूच नजीक येऊन म्हणाला, "तुम्हाला भेटायला आलेत, साहेब."

"कोण आहे?"

"डिस्ट्रिक्ट सुपरिंटेंडंट ऑफ पोलीस."

"हे नृत्य संपल्यानंतर लगेच येतो असं सांगा त्यांना."

निरोप घेऊन तो गेला. पोलीस जिल्हा अधीक्षक! ते का आले असतील? पत्त्यांच्या बैठकीतले आहेत ते. काय काम असेल? अर्थात मंत्रीमहोदय येणार असं अपेक्षित होतं (सोफा

त्यांच्यासाठी खास राखून ठेवलेला होता.) बंदोबस्तासाठी बरेच पोलीस अधिकारी हजर होते. शिवाय जमाव आणि वाहतूक नियंत्रणासाठीही अधिक कुमक आली होतीच. नलिनीचं नागनृत्य संपलं, तसा टाळ्यांचा प्रचंड कडकडाट झाला. पडदा खाली आला. मी डी.एस.पीं.ना भेटायला बाहेर आलो. पोलिसी गणवेषात नव्हते ते. कार्यप्रम पाहण्यासाठी आले की काय? त्यांचे साधे कपडे पाहून मी विचारात पडलो.

"हॅलो साहेब, आपण येणार ह्याची कल्पना नव्हती, नाहीतर आमच्याबरोबर गाडीतून आला असतात," मी उत्साहाने त्यांचं स्वागत केलं.

आमच्या आसपास बरेच लोक होते. त्यांनी बाही पकडून मला बाजूला घेतलं. बाहेर दिव्याचा खांब होता, तिथे घेऊन गेले. कोणीही जवळपास नव्हतं तरीही ते कुजबुजत म्हणाले, "तुम्हाला कसं सांगावं हेच मला समजत नाही. तुमच्या अटकेचं वॉरंट घेऊन आलोय. अतिशय वाईट वाटतंय, पण माझं कर्तव्य बजावलंच पाहिजे. वरून ऑर्डर आली आहे."

माझा विश्वास बसेना. माझी चेष्टा करताहेत की काय? मी कसनुसा हसलो. माझ्या चेहऱ्यावरील अविश्वासाचे भाव पाहून त्यांनी अटक वॉरंट मला वाचायला दिलं. खरं होतं ते. मार्कोच्या तप्रारीवरून हे अटक वॉरंट जारी करण्यात आलं होतं. आरोप होता - खोटी सही करणं! मी सुन्नपणे विचार करीत असताना त्यांनी विचारलं, "नलिनी मॅडमसाठी अलीकडे एखाद्या कागदावर सही केली होती का तुम्ही?"

"होय, त्या कामात असल्याने मी सही केली. पण तो गुन्हा कसा म्हणता येईल?"

"सही करताना 'त्यांच्या वतीने'- फॉर - असं लिहिलं होतं? की नुसतीच त्यांची सही केली? गंभीर आरोप आहे हा. ह्यामधून सुटाल अशी आशा आहे, पण आत्ता तुम्हाला ताब्यात घ्यावंच लागेल," त्यांनी आपली असमर्थता व्यक्त केली.

आता मात्र परिस्थितीचं गांभीर्य माझ्या लक्षात आलं. "कृपा करून सर्वांसमोर माझी बदनामी करू नका. अटक करायची तर कार्यक्रम संपेपर्यंत थांबा. घरी गेल्यानंतर येतो तुमच्याबरोबर," मी हलक्या आवाजात काकुळतीने म्हणालो.

सुदैवाने त्यांनी माझी विनंती मान्य केली. "पण मला तुमच्याबरोबरच, तुमच्या गाडीतून यावं लागेल. अटकेनंतर जामिनावर सोडवून घेण्यासाठी तुम्हाला व्यवस्था करता येईल. पण त्यासाठी न्यायाधीशमहाराजांकडे जावं लागेल. जामीन मंजूर करणं त्यांच्या हाती आहे. ह्याबाबत मी काहीही करू शकणार नाही," कायद्यापुढे दोस्तीला महत्त्व नाही, तिथे सारे समान हे त्यांनी स्पष्ट केलं. त्यांचाही नाइलाज होता.

बधिर मनाने मी आत सोफ्यावर जाऊन बसलो. कार्यक्रम संपला होता. आभारप्रदर्शन चालू झालं. कोणीतरी माझ्या गळ्यात हार घातला, 'नृत्यांगना नलिनीदेवी आणि श्रीयुत राजू ह्यांच्या अमोल सहकार्यामुळे सत्तर हजारपेक्षाही अधिक पैसे जमा झाले' ह्या गोष्टीसाठी दोघांचेही वारंवार आभार मानण्यात आले. नृत्यकला, भारतवर्षातील नृत्यकलेचं स्थान, त्यामागील तत्त्वज्ञान आणि उद्देश वगैरे गोष्टींवर वक्त्याने लंबचौडं भाषण ठोकलं. तो थांबण्याचं चिन्ह दिसेना. ते गावातील शाळेचे माननीय अध्यक्ष होते असं वाटतं. त्यामुळे प्रेक्षक एकाग्रतेने त्यांचे उच्च विचार ऐकत होते. दीर्घकाळ सुरू राहिलं ते भाषण. संपल्यावर लोकांनी जोरजोरात टाळ्या वाजवल्या. अन्य काहींची भाषणं झाली. कानावर शब्द पडत होते, पण डोक्यात काहीही शिरत नव्हतं. सुन्नपणे बसून होतो. मनामध्ये प्रचंड तुफान घोंघावत होतं. अखेर भाषणबाजी संपली. मी नलिनीच्या ड्रेसिंग रूममध्ये गेलो. तिच्याभोवती मुलींचा गराडा पडला होता. काहींना तिची स्वाक्षरी हवी होती. बाकीच्या नुसत्याच कौतुकाने पाहत होत्या. "घाई कर. लवकर निघायला हवं," मी तिला म्हणालो.

बाहेर कॉरिडॉरमध्ये डी.एस.पी. साहेब वाट पाहत थांबले होतेच. मी स्वत:ला सावरलं. आनंदी, बेफिकीर चेहऱ्याने त्यांच्याजवळ जाऊन उभा राहिलो. कार्यक्रमाला हजर असलेले

अनेक प्रतिष्ठित प्रेक्षक माझ्याभोवती जमले. मोठ्या रसिकतेने ते नलिनीवषयी गौरवोद्‌गार काढत होते. “सर्वश्रेष्ठ नृत्यांगना आहेत त्या,” एकाने स्तुतिसुमनं उधळली. “गेल्या पन्नास वर्षांपासून मी नृत्याचे कार्यप्रम पाहत आलोय. एक वेळ जेवलो नाही, तरी बेहत्तर पण कार्यप्रम चुकवणार नाही. कधी कधी वीस मैल चालत जातो कार्यप्रम पाहण्यासाठी...पण नलिनीदेवींसारखी कलाकार बघितली नाही. त्यांची इतरांबरोबर तुलनाच होऊ शकत नाही...” वगैरे वगैरे. “हे प्रसूतिगृह अत्युत्तम दर्जाचं असेल! नलिनीदेवींचं नाव एका विभागाला असायलाच हवं. उद्घाटन समारंभाला आलात तर आम्हाला आनंद होईल. त्यांचा एखादा फोटो मिळेल का?...तो मोठा करून हॉलमध्ये लावायची इच्छा आहे. इतरांना तो पाहून प्रेरणा मिळेल यात शंकाच नाही. कोणी सांगावं, पुढे मागे ह्याच प्रसूतिगृहामध्ये आपल्या पत्नीसारखीच एखादी महान कलाकार जन्माला येईल...”

मी यंत्रवत मान डोलावली. कोणाच्याच बोलण्याकडे माझं लक्ष नव्हतं. केवळ नलिनीला जवळून पाहायला मिळेल ह्या उद्देशाने ही मंडळी माझ्याभोवती जमली आहेत, नलिनी येईपर्यंत काहीतरी संभाषण करून वेळ काढताहेत - मी हे पूर्णपणे ओळखून होतो. थोड्या वेळाने ती आलीच. नेहमीप्रमाणे हातात फुलांचा हार होताच. मी माझा हारही तिला दिला. डी.एस.पी. साहेब कोणाच्या नजरेत येणार नाही अशा पद्धतीने आम्हाला बाहेर घेऊन आले. माश्यांप्रमाणे घोंघावणाऱ्या लोकांमधून वाट काढत आम्ही आमच्या गाडीजवळ पोहोचलो. प्लीमथ गाडीचं दार ड्रायव्हरने अदबीने उघडलं. “चल, बस लवकर गाडीत,” मी नलिनीला उतावीळ होऊन म्हणालो. तिच्यामागोमाग मीही चटकन गाडीत चढलो. जवळच्याच एका झाडावर गॅसबत्ती टांगली होती. तिच्या प्रकाशाचा एक झोत नेमका रोझीच्या चेहऱ्यावर पडून चेहऱ्याचा तेवढाच भाग उजळून निघाला. कार्यप्रम सुटल्यानंतर सर्वांनाच घरी परतायची घाई झाली होती. सर्वच वाहनं - गाड्या, घोडागाड्या, बैलगाड्या एकाच वेळी निघाल्याने एकच गर्दी झाली. प्रचंड धुराळा उडाला. हॉर्न, भोंगे, चाकांच्या कर्णकटू आवाजांनी डोकं उठलं. साहेब पुढच्या सीटवर

बसले होते. आमची गाडी निघाल्यावर बाजूला असलेल्या पोलिसांनी कडक सलाम ठोकला. “डी.एस.पी. साहेब आपल्याबरोबर येताहेत,” मी नलिनीला म्हणालो.

मालगुडीला पोचायला दोन तास लागले. ती कार्यप्रमाविषयी बोलत होती. मीही काही टिपण्या केल्या. तिच्या नागनृत्याविषयी लोक काय बोलत होते तेही सांगितलं. “कितीही वेळा पाहिलं तरी तुझं समाधान होत नाही. तुला खूप आवडतो ना तो नाच?” ती सुखावून म्हणाली. मग श्रांत होऊन शांत बसून राहिली. बहुधा झोप लागली असावी. रस्त्यावरून आमची गाडी वेगाने पळत होती. कडेने बैलगाड्या एका रांगेत जात होत्या. बैलांच्या गळ्यांतील घुंगरांच्या माळांचा मंजूळ नाद ऐकून मी हलक्या आवाजात तिला म्हणालो, “तुझ्या पैंजणांचा आवाज असाच येतो...”

अखेर प्रवास संपला. डी.एस.पीं.कडे पाहून ती हसली. मग ‘गुड नाईट’ म्हणून गेलीसुद्धा. फाटकाजवळ त्यांची पोलीस-जीप उभी होती. “आपण आता जीपमधून जाऊ या,” ते मला म्हणाले.

मी प्लीमथ परत पाठवून दिली. त्यांना विनंती केली, “कृपा करून मला थोडा अवधी द्या. तिला ही गोष्ट सांगायची आहे.”

“ठीक आहे. पण फार वेळ नाही, उगीच प्रॉब्लेम नको,” त्यांनी परवानगी दिली. मी जड अंत:करणाने आणि जड पावलांनी जिने चढायला लागलो. ते माझ्या मागोमाग आत येऊन जिन्याखालीच पहारा देत थांबले.

तिच्यासमोर मी सारा पाढा वाचला. ती एखाद्या पुतळ्याप्रमाणे स्तब्ध बसून ऐकत राहिली. तिचा भावनारहित चेहरा पाहून मी दगडाच्या खांबाशी बोलतोय असं वाटत राहिलं. आजदेखील तिचा कमालीचा गोंधळलेला, धक्का बसलेला, बधिर चेहरा मला स्पष्ट दिसतोय. ती मुळूमुळू रडायला लागेल असं मला वाटलं. कारण एरवी बारीकसारीक कारणांवरून तिच्या गंगाजमुना वाहायला लागायच्या. आजचा धक्का जबरदस्त होता. तिला अजूनही नेमकं काय झालंय हे

समजत नव्हतं. अखेर ती कसंबसं म्हणाली, “तू चुकीचं वागतो आहेस असं मला नेहमीच वाटायचं, ते अखेर खरं ठरलं तर...तेच कर्मामध्ये होतं. आता काय करायचं?” खोलीबाहेर येऊन तिने डी.एस.पी. साहेबांना विचारलं, “ह्या बाबतीत काही करण्यासारखं आहे का? सुटकेचा काही मार्ग आहे?”

“मॅडम, या क्षणाला तरी काही करण्यासाठी मला अधिकार प्राप्त नाहीत. अजामीनपात्र वॉरंट आहे त्यांच्यावर. कदाचित उद्या तुम्ही जामिनासाठी अर्ज करू शकाल. उद्या न्यायाधीशमहाशयांसमोर तुम्ही अर्ज करेस्तोवर मला काहीच करणं शक्य होणार नाही.” माझ्या नेहमीच्या बैठकीमधला माझा दोस्त हे बोलत नव्हता. कायद्याच्या नियमांवर बोट दाखवून माझी रवानगी तुरुंगात करणारा कर्तव्यदक्ष पोलीस अधिकारी आमच्यासमोर उभा होता.

# १०

पोलीस कोठडीमध्ये सामान्य गुन्हेगारांच्या संगतीमध्ये मी दोन दिवस काढले. माझे तथाकथित 'मित्र' डी.एस.पी. साहेब सेंट्रल पोलीस स्टेशनमध्ये पोचल्यावर आमूलाग्र बदलले. सौजन्याने वागणं संपलं. मला स्टेशन अधिकाऱ्यावर सोपवून त्यांनी आपली जबाबदारी झटकली. मला नशिबावर सोडून चक्क निघून गेले.

रोझी मला भेटायला पोलीस स्टेशनवर आली होती. मला तशा अवस्थेत पाहून तिला रडू कोसळलं. आयुष्यात प्रथमच मी तिच्या डोळ्याला डोळा भिडवू शकलो नाही. हे काय होऊन बसलं ह्या विचाराने मीही अतिशय खिन्न झालो. अखेर कसंबसं स्वत:ला सावरून तिला म्हणालो, "बँकेत मॅनेजरला जाऊन भेट." तिने केवळ एकच प्रश्न मला विचारला, "आपल्याकडे चिकार पैसे होते ना? कुठे गेले सगळे?"

तीन दिवसांनी जामीन मिळाल्यावर मी घरी परतलो. पण आता सारंच बदललं होतं. पूर्वीच्या साध्या-सरळ आयुष्याची पार उलथापालथ झाली होती. मणी मान खाली घालून यांत्रिकपणे काम करत बसलेला असे. अर्थात कामही फारसं नव्हतंच. पत्रव्यवहार फारच कमी झालेला होता. घरात स्मशानशांतता पसरलेली असायची. येणं-जाणंही फारच कमी झालं होतं. कोणी यायचंच नाही असं म्हटलं तरी चालेल. रोझीला जामिनासाठी दहा हजार रुपये जमवणंही फार कठीण गेलं. सर्वसामान्य विचारी माणसासारखा वागलो-राहिलो असतो तर ही रक्कम उभी करणं सहज शक्य झालं असतं. त्यात भर म्हणजे जी काही थोडी-फार बचत होती ती सर्व मी बेकार शेअर विकत घेण्यात खर्चली होती. त्या शेअर्सवर कोणतीही बँक कर्ज वा आगाऊ रक्कम द्यायला तयार नव्हती ह्यात नवल ते काय! छानछोकीच्या राहण्यामुळे उरलेसुरले सारे पैसे - आगामी कार्यप्रमासाठी घेतलेली आगाऊ रक्कमसुद्धा - उडले होते.

“पुढचे सर्व कार्यप्रम केलेस तर बाकीचे पैसे तरी मिळतील,” मी आशाळभूतपणे रोझीला सुचवलं होतं. तिची-माझी भेट अलीकडे फक्त जेवणाच्या टेबलवर व्हायची. बाकी सर्व वेळ मी खालीच असायचो. तिच्या खोलीत, एकांतात तिला तोंड द्यायचं धैर्य माझ्यात नव्हतं. झोपायलाही वर खोलीत जायचो नाही. हॉलमध्येच सोफ्यावर अवघडून झोपणं जास्त बरं वाटायचं.

माझ्या सूचनेवर तिने काहीही उत्तर दिलं नाही. मी अगतिक होऊन पुन्हा विचारलं तेव्हाही आचारी स्वयंपाकघरात जाईपर्यंत थांबली. “अशा गोष्टी परक्या माणसासमोर बोलू नयेत एवढंही समजत नाही का?” तिच्या आवाजात तिरस्कार भरला होता. मी तो अपमान मुकाट्याने घासाबरोबर गिळून टाकला.

जामिनावर सोडवून आणल्यापासून मी घरामध्ये एखाद्या आश्रितासारखा जगत होतो - ती मालकीण आणि मी तिच्या दयेवर जगणारं एक बांडगुळ! त्या विचाराने आतल्या आत मी प्रचंड संतापायचो. जिथे एखाद्या राजासारखं राज्य केलं तिथे गुलाम बनून राहणं नशिबी आलं. सुरुवातीला बसलेल्या धक्क्यातून रोझी सावरली होती. नुसती सावरलीच नाही, तर त्यानंतर ती अतिशय कठोर, भावनाहीन झाली होती. माझ्याशी ती फक्त कामापुरती बोलत असे; तेदेखील तुच्छतेने, फार मोठा उपकार करतेय अशा भावनेने. मला जामीन मिळावा म्हणून तिला फारच कष्ट घ्यावे लागले होते, बहुधा त्याचं उट्टं काढत असावी... मदत करतानाही एकूण आविर्भाव अतिशय थंड आणि कोरडा असे. कर्तव्य पार पाडायची इतकंच. आत्तादेखील तिने फटकारल्यानंतर मी मुकाट्याने जेवण संपवलं. जेवणानंतर माझी दया आली म्हणून की काय, पण लगेचच आपल्या खोलीत न जाता थोडा वेळ हॉलमध्ये बसली. बाजूला पानाचा डबा होता. मोठं धारिष्ट्य दाखवून मी डबा बाजूला सारला आणि तिच्याजवळ बसलो. पान खाल्ल्याने तिचे ओठ रंगले होते. तिखट चवीमुळे जीभ चुरचुरली असणार, त्यामुळे चेहऱ्यावरही लाली चढली होती. तिने मोठ्या रुबाबात माझ्याकडे रोखून पाहिलं आणि तुटकपणे म्हणाली, “आता आणखी

काय सांगायचंय?" माझ्या उत्तराची वाट न पाहता तिने मला बजावलं, "नोकरापुढे तोंड उघडायचं नाही हे लक्षात ठेव. आधीच त्यांच्या बाजारगप्पांना ऊत आलाय, त्यात काहीतरी बोलून तू तेल ओतू नकोस. एकाला तर काढूनच टाकणार आहे एक तारखेपासून," ती चिडून म्हणाली. नेहमीच्या सवयीने मी तिला अडवलं, "छे, छे, थोडा वेळ थांब. असं काही करू नकोस."

"का, का नको? कशासाठी थांबायचं?" तिने चिडक्या आवाजात विचारलं. अचानक तिचे डोळे भरून आले. नाकाचा सुरसुर आवाज करत ती रडायला लागली. मुकाटपणे तिच्या अश्रूधारा पाहत राहिलो. मालकीण आहे ती! हवं ते करायचा, हवं तसं वागायचा अधिकार आहे तिला! हवं तेव्हा रडायचादेखील. मी कशाला मध्ये पडू? स्वत:हून थांबेल. तिचा थोडा रागही आला. खरं पाहता सहानुभूतीची गरज मला आहे. संकटांचा पहाड माझ्यावर कोसळलाय. दु:खी मी आहे, ती का रडतेय? स्वत:विषयी मला फारच अनुकंपा वाटायला लागली. तिच्यासाठी काय काय केलं... अजूनही करतोय. तुरुंगात गेलो तेही तिच्यामुळेच, पण तिला काही आहे का त्याचं? तिची मनोकामना पूर्ण करण्यासाठी किती झिजलोय, ती लोकप्रियतेच्या शिखरावर पोचली ते माझ्या अथक कष्टांमुळे... तो दीड दमडीचा मार्को... गुहा, भग्नावशेष, भित्तिचित्रांशिवाय इतर कशाचीही पर्वा नाही असं नाटक करतो. पण पक्का खुनशी आहे. सापासारखा डूख धरून बरोबर फसवलं मला. चांगला सूड उगवला... माझे विचार फारच भरकटत चालले होते. पण 'आपण किती बिचारे आहोत, सर्वांनी आपल्यावर किती अन्याय केला आहे,' असं म्हणून शिव्या दिल्याने किंचित बरं वाटायचं. स्वत:च्याच दु:खामध्ये गुरफटल्यामुळे तिच्या मनाचा मी विचारही करत नसे. खडतर प्रसंगांतून तीही जात होती. अतिशय परिश्रमाने मिळवलेला सर्व पैसा मी मूर्खपणे उडवून टाकल्याने ती किती मोठ्या आर्थिक संकटात सापडलीय ह्या गोष्टी माझ्या खिजगणतीतही नव्हत्या. केवढा मोठा धक्का बसला होता तिला! कशामुळे? माझ्या... काय बरं म्हणावं... अंदाज चुकीचा ठरल्याने? सुज्ञतेच्या अभावामुळे? छे, हा शब्द फारच सौम्य ठरेल... त्यापेक्षा हीन पातळीवरील गोष्ट होती

- सामान्य चारित्र्याच्या अभावामुळे! हो, असंच म्हणावं लागेल. आता मला असं सर्व स्पष्टपणे जाणवत होतं. परंतु अजूनही तिच्याविषयीच्या माझ्या मनातील तप्रारीसुद्धा तितक्याच तीव्र होत्या. त्यामुळे आत्तादेखील रोझी अश्रू गाळत असताना मी तटस्थपणे पाहत होतो. तिचं सांत्वन करण्याच्या भानगडीत पडलो नाही. अखेर तिनेच स्वत:चे डोळे पुसले, शांतपणे म्हणाली, “जेवत असताना तू काहीतरी सांगत होतास ना...”

“हो, पण तू माझं म्हणणं ऐकूनच घेतलं नाहीस,” मी तप्रारीच्या स्वरात म्हणालो, “ठरवलेले कार्यप्रम - निदान ज्यांच्यासाठी आगाऊ रक्कम मिळाली आहे ते तू करावेस असं मला वाटतं.”

हे ऐकून ती विचारात पडली. “ते तरी का करायचे?” तिने विचारलं.

“कारण आपल्याला पैशांची अत्यंत आवश्यकता आहे. कार्यप्रम केलेस तर संपूर्ण बिदागी मिळेल.”

“पण आधीचे सर्व पैसे गेले कुठे?”

“ते तुलाच माहीत. खातं तुझ्याच नावावर आहे. हवं तर पासबुक बघ,” असं म्हणणं दुष्टपणाचं होतं, पण मी म्हटलं. माझ्या डोक्यात सैतान संचारला होता. म्हणजे, आपण आयुष्यात हिच्यासाठी इतकं सर्व करूनही ही आपल्या हेतूंबाबत दयाबुद्धीने जाणून घेऊ शकत नाही, अशी भावना प्रबळ होऊन माझा संताप होत होता.

तिला आणखी वाकड्यात शिरायचं नसावं. माझा नूर पाहून तिने विषय बदलला. “ठीक आहे. कोणाकोणासोबत करार झाले आहेत, ते सांग. सर्वांचे पैसे परत देऊन टाकते,” ती म्हणाली.

कशाच्या जोरावर असं म्हणतेयस? परतफेड करायला पैसे कुठून आणणार आहेस? “त्याऐवजी तू कार्यप्रम कर ना. पैसे परत द्यायची काय गरज?” मी व्यवहारी सल्ला दिला.

“तुला फक्त पैसा दिसतोय का? लोकांसमोर जाणं मला किती लाजिरवाणं वाटतंय ह्याची तुला कल्पना तरी आहे?”

“तुला लाज वाटायचं काय कारण? पोलिसांनी मला पकडलं होतं, मला लाज वाटायला हवी, तुझा त्यात काय संबंध? तू नेहमीप्रमाणे वाग ना.”

“मला जमणार नाही. ह्या विषयावर आणखी बोलायचं नाही मला,” ती निग्रहाने म्हणाली.

तिचा निर्णय पक्का आहे हे पाहून मी थंडपणे विचारलं, “पुढे काय करायचा विचार आहे?”

“कदाचित त्याच्याकडे परत जाईन.”

“तो तुझा स्वीकार करेल असं वाटतंय तुला?”

“हो. मी नृत्य करणं थांबवलं तर तो स्वीकार करेल.” ती म्हणाली.

हे ऐकून मी अतिशय विखारीपणे हसलो.

“हसायला काय झालं?” तिने दुखऱ्या आवाजात विचारलं.

“प्रश्न केवळ नृत्य करण्या न करण्यापुरताच असेल, तर तो तुला स्वीकारू शकतो.”

मी असा दुष्टपणे का बोलत होतो? त्यामुळे ती खूपच दुखावली गेली.

“खरंय, आता तू असंच बोलण्याच्या स्थितीत आहेस. तो मला घरात घेणार नाही कदाचित. पण तसं झालं तर त्याच्या दाराशीच जीव दिलेला बरा,” ती निराशेने म्हणाली. थोडा वेळ ती उदासपणे गप्प बसून राहिली. तिचा सगळा तोरा उतरला हे पाहून मला अपार समाधान लाभलं. जरा वेळाने ती म्हणाली, “ह्या परिस्थितीत सर्वांत उत्तम मार्ग म्हणजे सर्व संबंधितांनी आयुष्य संपवून टाकावं. सारे प्रश्न मिटतील. आपण दोघांनी जीव देऊ या. दुधाच्या ग्लासात डझनभर झोपेच्या गोळ्या टाकून पिऊन टाकायचं. खूपदा ऐकलंय- लोक जोडीने आत्महत्या करतात. फारच छान कल्पना आहे ना... दीर्घ सुट्टीवर जातोय असं वाटेल. साऱ्या समस्या एकाच वेळी

खतम! छान गप्पा मारत, दुधाचे घुटके घेत रात्री बसायचं. हलके हलके गाढ झोपी जायचं. सुंदर, शांत, कोणतीही चिंता नसेल अशा चिंतामुक्त जगामध्ये जाग येईल- कोणी सांगावं. मी आत्ता, ह्या क्षणी मरून जायला तयार आहे; पण तुझा भरवसा नाही. शेवटच्या क्षणी तू विचार बदलशील आणि मी एकटीच जग सोडून जाईन...”

तिला माझ्याविषयी विश्वास वाटत नाही हे बघून मी कडवटपणे म्हणालो, “बाप रे! आणि नंतर तुझ्या मृतदेहाची विल्हेवाट लावायची जबाबदारी माझ्यावर येईल त्याचं काय?” मी वारंवार असं तिरकस बोलून तिला का दुखवत होतो कोणास ठाऊक. ती माझं न ऐकता नृत्य सोडून देणार असं म्हणतेय ह्याचा राग होता, की मी जेलमध्ये सडणार आणि ती स्वच्छंदपणे बागडणार ही गोष्ट मला खुपत होती?

असले भयंकर विचार करण्यापेक्षा कार्यक्रम करणं जास्त चांगलं नाही का? तिची मनमानी फार झाली, पुन्हा एकदा तिला आपल्या तालावर नाचवायची वेळ आली आहे असं ठरवून मी पुढे म्हणालो, “कार्यक्रम करायचे नाहीत असं का म्हणतेस? तुझी काळजी घ्यायला मी नसणार म्हणून चिंता वाटतेय का? तू सगळं व्यवस्थित करशील ह्याविषयी मला जराही शंका नाही. आणि थोड्याच दिवसांचा प्रश्न आहे. माझ्यावरच्या आरोपांमध्ये काही तथ्य नाही. पहिल्याच सुनावणीत सुटतो की नाही बघ. खोटा आळ घेतलाय माझ्यावर. लगेच सुटून येईल.”

“खरंच? खोटा आळ घेतलाय?” तिने विचारलं.

“अर्थात. पुरावा काय आहे त्यांच्याकडे?”

‘पुरावा’ वगैरे कायदेशीर शब्दांकडे दुर्लक्ष करून ती म्हणाली, “ठीक आहे. समजा - तुझी सुटका झालीच तरीही ह्यापुढे मी सार्वजनिक कार्यक्रम करायचे नाहीत असं ठरवलंय. सर्व नुसती सर्पशीसारखी कसरत करत जगणं - अशा अस्तित्वाचा अतिशय कंटाळा आलाय मला. नको वाटतं सगळं.”

"तुझाच निर्णय होता तो," मी आठवण करून दिली.

'खरंय; पण मला सतत धावपळ, दरवेशाप्रमाणे गावोगाव नाचायचं असं काहीही नको होतं. माझं स्वप्न वेगळंच होतं. तुझ्या जुन्या घराबरोबर माझं स्वप्नही निसटलं हातातून!" ती खिन्नपणे म्हणाली.

"अच्छा, असं आहे तर!" मी वैतागून ओरडलो, "अखेर सर्व दोष माझाच आहे. आधी लोकांसमोर नृत्य सादर करायचं म्हणून माझं डोकं खायचीस. मी हजार खटपटी करून तुझ्या मनासारखं केलं; आणि आता असं म्हणतेस? खरंच तुझं समाधान करणं मुष्किल आहे. मला तर काय करावं समजेनासं झालंय."

"तुला खरंच समजत नाही..." एवढंच हताशपणे म्हणून ती खोलीत जाण्यासाठी जिन्याच्या पायऱ्या चढू लागली. मध्येच थबकून म्हणाली, "ह्याचा अर्थ असा नाही की, मी तुला वाऱ्यावर सोडीन. तुला जेलमधून सोडवण्यासाठी असेल-नसेल ते विकून टाकेन. पण एकदा तू बाहेर आलास की, आपला संबंध संपला, कायमचा संपला, एवढंच माझं निक्षून सांगणं आहे. मला विसरून जा. माझ्या आयुष्यातून कायमचा निघून जा. नंतर मी माझ्या जिवाचं काहीही करेन. जगेन किंवा मरेन, माझं मी ठरवेन, काय करायचं ते."

दिलेला शब्द तिने पाळला. अचानक आळस झटकून मोठ्या वेगाने कामाला लागली. मणीला मदतीला घेऊन ती झपाट्याने एकेका कामाचा फडशा पाडत होती. हिऱ्यांचे दागिने, शेअर्स मिळतील त्या भावाने विकून पैसा जमा केला. ती मणीला सर्वत्र पळवत होती. त्याला मद्रासला पाठवून एका बड्या वकिलाकडे माझी केस सोपवली. बरंच काही विकूनदेखील तंगी जाणवत होतीच. अखेर परिस्थितीला शरण जाऊन 'कधीही कार्यप्रम करणार नाही' ही आपली प्रतिज्ञा तिने मागे घेतली. पुढील कार्यप्रमांसंबंधित केले गेलेले सर्व करार तिने पाहून घेतले; त्यानुसार वादक-कलाकारांना गोळा केलं, मणीच्या मदतीने गाडीची तिकिटं, आरक्षणं वगैरेची

व्यवस्था केली. तिची ही सर्व धावपळ पाहून मी तिला टोमणा मारत म्हणालो, “पहा बरं आता... तू हे सर्व स्वत: करावंस, हेच तर मी तुला सांगत होतो.”

कार्यप्रमांसाठी भरपूर आमंत्रणं येत होती... आरंभी फारसे कार्यप्रम मिळाले नाहीत, पण नंतर रोझीची घोडदौड जोरात सुरू झाली. माझ्या जेलप्रकरणामुळे लोकांना आमच्याविषयी जास्तच कुतूहल वाटायला लागलं, त्याचाही परिणाम असू शकेल! अर्थात रसिकांना कार्यप्रमात रस होता, माझ्या आयुष्यात काय चाललंय ह्याच्याशी त्यांना काहीही देणघेणं नसायचं. माझ्याकडे संपूर्ण दुर्लक्ष करून रोझीचा दिनप्रम सुरळीत चालला होता. नृत्याचा सराव, इतर कामं, कार्यप्रम असं सारं व्यवस्थित पार पडत होतं. ह्या गोष्टीचा आनंद न होता मला दु:ख व्हायचं. माझ्याशिवाय, माझ्या मदतीविना तिचं छान चालू शकतं हे तिने सिद्धच करून दाखवलं होतं. मणी खूप मदत करायचा, कार्यप्रमाचे आयोजक तिला सर्वतोपरी साहाय्य करायचे. ह्यामुळे मला तिची असूया वाटायची. मणीला सावध करावं- ‘विषकन्येपासून दूर राहा, नाहीतर एक दिवस माझ्यासारखं ती तुलाही डसून फेकून देईल,’ असंही वाटायचं. खरंतर माझं मन ताळ्यावर नव्हतं. रोझी स्वयंसिद्धा होत आहे याचा मला दिवसेंदिवस हेवा वाटत होता. तिच्याबाबत नकारात्मक विचार करताना त्या क्षणी मला याचा विसर पडत होता की, ही सर्व धावपळ ती माझ्यासाठीच करत होती. खरं तर मला मनातून भीती वाटत होती की, तिच्या मनात कितीही प्रतिकूल विचार आले, तरी नृत्यापासून ती फारकत घेणार नाही. आणि ते खरंच होतं. नृत्य करणं थांबवणं तिच्याच्याने जमणार नव्हतं. उलट ती अधिक सशक्त होऊन आपला मार्ग काढत होती. ती ज्या प्रकारे सर्व व्यवहार संभाळत होती, त्यावरून मला स्पष्टच दिसून येत होतं की, मी तुरुंगात गेलो वा बाहेर राहिलो, तिच्या पतीला नृत्य करणं मान्य असो वा नसो, ती पुढे जाणार होती. सर्व पेलून नेण्यास ती समर्थ झाली होती. मार्को अथवा मला तिच्या आयुष्यात काहीही जागा उरलेली नव्हती. वास्तविक, तिच्या जीवनाला एक शाश्वत चैतन्य लाभलेलं होतं, परंतु आजवरच्या जीवनात तिला त्याचा पुरेसा अंदाज आलेला नव्हता.

माझे वकील अत्यंत यशस्वी, हुशार म्हणून प्रसिद्ध होते. आमच्या विभागात त्यांच्या नावाचा दबदबा होता. केस हाती घेतल्यावर ते जिंकतातच असा त्यांचा लौकिक होता. अनेकांना फाशीच्या फंद्यापासून (काहींना तर एकापेक्षा जास्त वेळा) वाचवलं होतं त्यांनी. फसवणुकीच्या आरोपातून अनेकांची निर्दोष सुटका केली होती. खतरनाक गुंडांच्या टोळीमधील सारेजण सज्जन, निष्पाप नागरिक असून पोलिसांच्या कटाचे बळी आहेत असं ते लीलया शाबित करायचे. सरकारी वकिलांनी मोठ्या कष्टाने उभ्या केलेल्या केसचे तीनतेरा वाजवण्यात त्यांचा हातखंडा होता. आरोपपत्र हास्यास्पद ठरवायचे, अत्यंत काळजीपूर्वक गोळा केलेले पुरावे फुसके आहेत असं सिद्ध करायचे. एकूणच प्रतिस्पर्ध्याला नामोहरम करून केस जिंकण्यासाठी ते प्रसिद्ध होते. अशी महान हस्ती दिसायला साधीसुधी होती. पोशाख जुन्या वळणाचा - लांब कोट, धोतर, डोक्यावर फेटा आणि सगळ्यावर काळा वकिली डगला- असा होता. न्यायाधीश-महाराजांसमोर अशिलाची बाजू मांडायला उभे राहायचे तेव्हा त्यांचे डोळे मिष्किलपणे लुकलुकायचे. एकूण आविर्भाव कमालीचा आत्मविश्वासपूर्ण असायचा. न्यायाधीशमहाराजांनी कागदपत्रं वाचण्यासाठी नजर खाली फिरवली की आमचे वकीलसाहेब मोठ्या नजाकतीने तपकिरीची चिमूट नाकात सोडायचे. त्यांची सगळीच कामं खास असायची. माझी केस त्यांच्या एकूणच नावलौकिकाच्या मानाने फारच सामान्य होती. अशील म्हणून ते माझा स्वीकार करतील की नाही याविषयी मी साशंक होतो. केवळ नलिनीमुळे त्यांनी होकार दिला होता. नलिनीचा नावलौकिक त्यांना साजेसा असल्यामुळेच त्यांनी माझी केस हाती घेतली हे माझं सुदैव. अर्थात त्यांची फीदेखील जबरदस्त होती - एक हजार रुपये. केवळ त्यांच्या होकारामुळेच अर्धी केस जिंकली असं मला वाटू लागलं. खुद्द पोलीसच आरोप मागे घेऊन केस बंद करतील, शिवाय झालेल्या त्रासाबद्दल माफीही मागतील अशी माझी अपेक्षा होती! अर्थात दरवेळी त्यांच्यापुढे घसघशीत दक्षिणा ठेवावी लागे. एकापरीने तेदेखील ‘तारखाबहाद्दर’ वकील होते. प्रत्येक केसला ते मातीच्या गोळ्याप्रमाणे हवा तसा आकार द्यायचे. त्यांनी पूर्ण प्रकरणाची सूक्ष्मातिसूक्ष्म मुद्द्यांमध्ये फोड केली आणि प्रत्येक मुद्दा तपासून घेण्यासाठी पाहिजे तितका वेळ घेऊन ते केस

लांबवत राहिले. अखंडपणे, श्वासही घेण्यासाठी न थांबता बोलण्याची कला त्यांना अवगत होती. जेवणाची सुट्टी घेणं खुद्द न्यायाधीशांनाही कठीण जायचं!

केसच्या दिवशी ते सकाळच्या गाडीने येऊन न्यायालयात हजर झाले आणि दिवसभर तिथे ठाण मांडून बसले. संध्याकाळी परत जाण्याची वेळ होईपर्यंत ना ते स्वत: न्यायालयाचं कक्ष सोडून बाहेर गेले ना त्यांनी न्यायालयाला प्रकरण एक इंचसुद्धा पुढे नेण्याच्या दृष्टीने काही वाव मिळू दिला. म्हणजे कोर्टात त्या दिवशी नेमकं काय घडलं, याबाबत दिवसाअखेरी विचार करताना खुद्द न्यायाधीशमहाराजही बुचकळ्यात पडले असावेत. थोडक्यात, आरोपी जामिनावर राहण्याचं जे स्वातंत्र्य उपभोगत होता, ते अबाधित राहावं याची त्यांनी उपलब्ध वेळात पुरेपूर काळजी घेतली; मग केस पुढे सरकण्याच्या दृष्टीने दिवस कामी लागो वा न लागो! पण अर्थात वकीलसाहेबांची प्रतिदिन फी होती रुपये साडेसातशे - वर रेल्वेभाडं व अन्य खर्चाचे पैसे आणि त्याच्या साहाय्यक वकिलांची फी वगैरे हे सर्व खर्च वेगळे. या सर्व पैशाचा भुर्दंड अर्थात गरीबबापड्या प्रकरणग्रस्त पक्षकारालाच पडणार होता.

वकीलसाहेबांनी माझी केस 'तीन अंकी विनोदी नाटक' ह्या स्वरूपात सादर केली. दुष्ट खलनायक होता मार्को- नागरी सभ्य समाजाचा शत्रूच! सरकार पक्षाचा पहिला साक्षीदार तोच होता. माझ्या थोर वकिलांच्या कमालीच्या आक्रमक हल्ल्यामुळे बिचारा फारच गोंधळून गेला होता. कुठून ह्या फंदात पडलो आणि पोलिसांकडे तक्रार केली असं त्याला झालं असणार! अर्थात मार्कोचा वकीलसुद्धा कोर्टात हजर होता, पण तो स्वत:च घाबरलेला दिसला! दिसायलाही अगदीच किरकोळ होता तो.

विनोदी नाटकाचा पहिला अंक - खलनायक दुर्दैवी नायिकेचा अतोनात मानसिक छळ करून तिच्यावर वेड लागण्याची पाळी आणू पाहत होता.

दुसरा अंक - कमनशिबी नायिकेने त्याचे सर्व अत्याचार सहन केले. सगळ्याच गोष्टींचा कडेलोट होण्याची वेळ आली. भयंकर हालअपेष्टा, उपासमार झाल्याने ती मृत्यूच्या दारी पोचली

होती. तिच्या सुदैवाने राजूसारख्या सज्जन माणसाने खलनायकाच्या कचाट्यातून तिची सुटका केली. नंतरदेखील आपण सर्व वेळ, व्यवसाय पणाला लावून तिचं रक्षण केलं, तिला आसरा दिला. कलेच्या दुनियेत ती यशाच्या शिखरावर पोचली त्यामागे राजूचे अथक प्रयत्न होते. आपला देश, आपल्या सांस्कृतिक परंपरांसाठी नलिनीदेवींनी फार मोठं योगदान केलं. सारी दुनिया 'भरतनाट्यम्'चा उदोउदो करत असताना ह्या मार्कोमहाशयांना मात्र त्याचा तिरस्कार वाटत असे. भरतनाट्यम् नृत्यप्रकारामध्ये तिला भरभरून नावलौकिक मिळाल्याचं पाहून त्यांच्या तळपायाची आग मस्तकी गेली. ह्या अबला नारीने अति परिश्रमाने उभारलेली यशाची कमान कधी एकदा तोडून पायदळी तुडवतो ह्या एकाच कल्पनेने तो झपाटला होता. त्यासाठी त्याने एक कुटिल कारस्थान रचलं, न्यायाधीशमहाराज, त्यासाठी त्याने कैक वर्षांपासून अडगळीत पडलेला एक दस्तावेज मोठ्या कावेबाजपणे वापरला. त्यावर नलिनीदेवींची सही घेण्यामागे त्याचा वेगळाच हेतू होता - पण त्याविषयी नंतर बोलेन. (ही वकीलसाहेबांची खास युक्ती होती. असं सांगून ते प्रकरणाचा गूढपणा वाढवायचे. नंतर बोलायची वेळ कधीच येत नसे!) विस्मरणात गेलेला दस्तावेज अनेक वर्षांनंतर नेमका आत्ताच कसा काय पाठवण्यात आला? (वकीलसाहेब हा प्रश्न अनुत्तरित ठेवायचे. लांडग्याचा वास आलेल्या शिकारी कुत्र्याप्रमाणे ते चहूबाजूला नजर फिरवायचे.) न्यायाधीशमहाशय, नलिनीदेवींनी सही न करताच ते कागद परत पाठवले. ह्या सर्व भानगडीत त्यांना गुंतायचंच नव्हतं. दागिन्यांची लालसाही नव्हती. त्यांचा तो स्वभावच नाही. त्यामुळेच त्यांनी सही केली नाही. राजूने स्वत: पोस्टामध्ये जाऊन ते कागद रजिस्टर करून परत पाठवले. पोस्टमास्तर ह्याची ग्वाही देतील. खेळी वाया गेल्याने कुटिल कारस्थान्याची घोर निराशा झाली. पण तो गप्प बसला नाही. कोणीतरी नलिनीदेवींची खोटी सही केली आणि चोराच्या उलट्या बोंबा ह्या न्यायाने मार्कोसाहेबांनी पोलिसांकडे तक्रार केली. आता ती सही नेमकी कोणी केली वगैरे बाबी माझ्यासाठी महत्त्वाच्या नाहीत. माझ्या अशिलाने ती सही केली नाही एवढंच माझं म्हणणं आहे. हा आरोप तत्काळ मागे

घेऊन त्यांची सुटका करावी अशी माझी न्यायाधीशमहोदयांना कळकळीची विनंती आहे.” माझ्या वकिलांनी मोठ्या नाट्यमयरीत्या आपलं प्रतिपादन संपवलं.

पण फिर्यादी पक्षानेही आपली बाजू मोठ्या ताकदीने मांडली. आमच्या वकिलासारखा जोश त्यांच्या वकिलामध्ये नसला तरी त्यांनी आपले मुद्दे चांगल्या रीतीने मांडले. साक्षीदाराच्या पिंजऱ्यात सर्वप्रथम मणीला पाचारण केलं. उलटसुलट प्रश्न विचारून त्याला त्यांनी असं गोंधळून टाकलं की, अखेर त्याच्या तोंडून सत्य बाहेर पडलं. ते म्हणजे ‘मी एका इन्शुरन्स पेलेल्या पार्सलची अतिशय आतुरतेने वाट पाहत होतो आणि रोज त्याविषयी चौकशी करायचो.’ पोस्टमास्तरांनीसुद्धा उलटतपासणीदरम्यान ‘राजूचं ते वागणं काहीसं चमत्कारिक वाटलं’ अशी कबुली दिली. अखेर हस्ताक्षरतज्ज्ञाने ही माझ्याच हस्ताक्षरातील सही असावी अशी साक्ष देऊन माझ्यावरील आरोपावर शिक्कामोर्तब केलं. चेक, रिसिट आणि पत्रांवरील माझं हस्ताक्षर आणि सह्या ह्यांचा बारीक अभ्यास करून त्याने हा निष्कर्ष काढला होता.

न्यायाधीशमहोदयांनी मला दोन वर्षांची तुरुंगवासाची शिक्षा ठोठावली. ह्या निर्णयाने आमच्या थोर वकिलांना समाधान वाटल्याचं दिसून आलं. कायद्याप्रमाणे मला तब्बल सात वर्षांची कैद व्हायला हवी होती; पण त्यांनी मोठ्या अक्कलहुशारीने माझी बाजू मांडल्यामुळे केवळ दोन वर्षं सजा झाली... अर्थात मी काळजीपूर्वक वागलो असतो तर... बिचारी नलिनी गेले कित्येक महिने त्यांची फी आणि खर्च भागवण्यासाठी दिवसरात्र मेहनत करून पैसे कमावत होती - केवळ माझी सुटका व्हावी म्हणून, पण अखेर पदरी निराशाच पडली.

तुरुंगात मी ‘एक आदर्श कैदी’ म्हणून ओळखला गेलो. आजपर्यंत लोक मला उडाणटप्पू, वाया गेलेला समजायचे. मी तसाच होतो म्हणून नव्हे, पण मी बऱ्याच वेळा चुकाच केल्या म्हणून असेल. मी खरा कसा आहे हे जाणून घ्यायचं तर लोकांनी सेंट्रल जेलमधील माझं आचरण बघायला हवं होतं. अर्थात तिथे माझ्यावर अनेक बंधनं असायची. कितीही नको असलं तरी भल्या पहाटे उठावंच लागत असे - पाच वाजता! निजण्याच्या वेळेबाबतही तसंच -

संध्याकाळी चक्क पाच वाजता गाशा गुंडाळावा लागे. पण ह्या मधल्या बारा तासांमध्ये मी राजासारखा वागायचो. तुरुंगातील सर्व विभागांमध्ये माझा मुक्त संचार चालायचा. सर्वच तुरुंगाधिकाऱ्यांशी मी सलोख्याचे संबंध प्रस्थापित केले होते. अन्य कैद्यांवर लक्ष ठेवणं वगैरे त्यांची कामं मी आनंदाने करायचो. विणकर विभाग, सुतारकाम विभागांवर देखरेख ठेवण्याची जबाबदारी माझी होती. खतरनाक कैदी, खुनी, दरोडेखोर सगळेच माझं मुकाट ऐकायचे. कोणी कितीही उदास, दु:खी असला तरी माझ्याशी बोलल्यानंतर त्यांचे मूड ठीक होत. रिकाम्या वेळात मी त्यांना कथा सांगायचो, कधी तत्त्वज्ञान ऐकवायचो, कधी बौद्धिक घ्यायचो. नंतर ते मला 'वध्यार' म्हणजे 'गुरू' म्हणायला लागले. अंदाजे पाचशे कैदी असावेत त्या तुरुंगामध्ये आणि त्यांपैकी बहुतेक सर्वांबरोबर माझे मित्रत्वाचे संबंध जुळले होते. अधिकाऱ्यांबरोबरसुद्धा माझं छान पटायचं. तुरुंगाचे मुख्य अधीक्षक पाहणी फेरीला निघाले की मीही त्यांच्यामागे असायचो. त्यांची छोटी-मोठी बरीच कामं करायचो. त्यामुळे त्यांची माझ्यावर मर्जी होती. अनेकदा त्यांच्या मनात काय आहे हे मला न सांगताही कळायचं. त्यांनी हलकेच डावीकडे नजर टाकली की त्यांना काय हवंय हे मी समजून जायचो. उदाहरणार्थ, त्यांना अमूक एका वॉर्डरला बोलवायचंय हे ओळखून मी धावतच निरोप सांगून येत असे; चालता चालता ते एक क्षण जरी घुटमळले तरी रस्त्यात पडलेला दगड त्यांना खटकला आहे, हे ओळखून मी लगेचच तो दगड उचलून बाजूला फेकून देत असे. मी न सांगता अशी कामं करायचो त्यामुळे ते माझ्यावर प्रचंड खूष असत. ह्याव्यतिरिक्त 'साहेब राउंड घ्यायला येताहेत' ही खबरही मी धावत जाऊन वॉर्डर आणि अन्य कर्मचाऱ्यांना आगाऊ देत असे. डुलक्या काढणाऱ्या मंडळींना उठायला, आपले फेटे-पगड्या नीट करायला अवधी मिळायचा. त्यामुळे त्यांचीही माझ्यावर मेहेरनजर असायची.

मुख्य अधीक्षकसाहेबांच्या घरामागे छान अंगण होतं. तिथे मी भाजीचे वाफे लावले होते. माती नीट खणून रोपं लावली होती. पाणी वगैरे घालून मी त्यांची फार निगा राखायचो. गाई-गुरांनी तुडवू नये ह्यासाठी वाफ्यांभोवती काटेरी झुडुपांचं पुंपण तयार केलं होतं. मी मोठाली

वांगी, घेवडा, कोबीचे गड्डे अशा भाज्यांचं पीक घेतलं. मेहनतीने लावलेल्या रोपट्यांवर छोटी-छोटी वांगी, घेवड्याच्या शेंगा लटकायला लागल्या तेव्हा मला अपार आनंद मिळाला. हळूहळू ती मोठी झाली. त्यांचा आकार, रंग बदलला. हे सारे टप्पे मी मोठ्या कौतुकाने बघत राहायचो. अखेर भाज्या तयार झाल्यावर मी मोठ्या प्रेमाने खुडल्या, स्वच्छ धुतल्या. प्रत्येक वांगं जॅकेटच्या कोपऱ्याने पुसून मस्त चमकवलं. शेंगाही कोरड्या केल्या. वेतकाम विभागातून मी वेताची टोपली खास ह्या भाज्या ठेवण्यासाठी पैदा केली होती. टोपलीमध्ये भाज्या कलात्मकरीत्या सजवून ठेवल्या आणि मोठ्या समारंभपूर्वक भाज्यांची टोपली मोठ्या साहेबांना पेश केली. सुंदर, ताजी, हिरवीगार भाजी पाहून मोठ्या साहेबांनी मला आनंदानेमिठी मारायचंच बाकी ठेवलं! त्यांना भाज्या अत्यंत प्रिय होत्या. खाण्या-पिण्याचे शौकीन होते ते.

भाज्या पिकवायचं हे काम माझं अतिशय आवडीचं होतं. निळं निळं खुलं आकाश, आल्हाददायक सूर्यप्रकाश मन उल्हसित करायचे. माती खुरपताना तिथल्या घराची सावली अंगावर पडायची. तो उबदार थंडावा, रोपट्यांना पाणी घालताना गार पाण्यामुळे अंगभर उठणारा शहारा - सारंच कमालीचं मोहक, आश्वासक वाटायचं. अशी अनुभूती लाभणं किती भाग्याचं! ओल्या मातीचा सुवास अंगांगात भरून घेण्यासारखं दुसरं सुख नाही.

तुरुंगवास असा असतो? आनंददायी, शांती देणारा? लोकांनी इथे येण्यासाठी धडपडायला हवं... तुरुंग म्हटला की सर्वांचा भयाने थरकाप होतो. तिथे डाग देतात, साखळ्यांनी बांधून ठेवतात आणि सतत चाबकाने फोडलं जातं असं भयंकर चित्र लोकांच्या मनात उभं राहतं. सर्व जुनाट कल्पना. तसं काहीही घडत नाही इथे. खूप चांगलं वागवतात कैद्यांना. फक्त इथले नियम पाळायचे, बाकी कसलाही त्रास नाही. वेळच्या वेळी जेवण मिळायचं. अन्य कैदी आणि कर्मचाऱ्यांबरोबर गप्पागोष्टीत असे मजेत दिवस जात होते माझे. तुरुंगाच्या पन्नास एकरांच्या परिसरात मनमुराद, हवं तिकडे हिंडायची मुभा होती. आणखी काय हवं? नव्याने भरती झालेले कैदी उदास व्हायचे. त्यांचे लांब चेहरे पाहून मी मौलिक सल्ला द्यायचो, ‘तुरुंगाच्या चार

भिंतींच्या आत आहोत हे विसरून जायचं. मजेत राहाल मग!' तुरुंग ह्या शब्दाचीच धास्ती घेणाऱ्या मूढ लोकांचं मला हसू यायचं. अरे, एवढी छान जागा; मस्त खा, प्या, आराम करा. कसला त्रास नाही. घाबरता कशाला? असं मला वाटायचं. अर्थात फाशीची शिक्षा झालेल्यांचं मत वेगळं असू शकेल. अतिशय हिंस्र, मुजोर कैद्यांचा अनुभव नक्कीच चांगला नसणार. पण हे अपवाद सोडले तर बाकी कोणालाही चिंता करायची खरोखरच गरज नाही. मला तर इथे राहणं फारच आवडायचं. दोन वर्षांनी सुटका झाली तेव्हा भावनावेगाने माझं अंत:करण आणि डोळेही भरून आले होते - स्वातंत्र्य मिळालं म्हणून नव्हे, इथून जायला लागतंय म्हणून! थोर वकीलसाहेबांना विनाकारण एवढे पैसे दिले हे आठवून अधिकच दु:ख झालं. त्यांच्यामुळेच फक्त दोन वर्षांची सजा झाली. गुन्हा कबूल करून कायमचं इथेच मस्त सुखात राहिलो असतो.

ताज्या भाज्या खाऊन माझ्यावर बेहद्द खूष झालेल्या बड्या साहेबांनी स्वत:च्या ऑफिसमध्ये माझी स्वीय साहाय्यक म्हणून नेमणूक केली. मी त्यांच्या डेस्कचा ताबा घेतला. शाईच्या दौती भरणं, पेनं स्वच्छ करणं, पेन्सिलींना टोकं काढणं वगैरे कामं मी करायचो. ते कामात असल्यानंतर त्यांना कोणी त्रास देऊ नये म्हणून मी दाराबाहेर खडा पहारा द्यायचो. त्यांच्या मनात काय चाललंय हे मला क्षणार्धात समजायचं. उदाहरणार्थ, बाहेर उभा असताना त्यांचं काही काम आहे हे मला आपोआप कळायचं, लगेच त्यांच्यासमोर जाऊन उभा राहायचो. फाईलची ने-आण करणं हे काम मीच करायचो. वृत्तपत्रं यायची तोपर्यंत ते कामानिमित्त बाहेर गेलेले असत. मी रोज बातम्या वाचायचो, निदान सर्व पानं चाळून मथळे तरी वाचून काढायचोच. साहेबांनीही कधी विरोध केला नाही. त्यांचं वृत्तपत्रंवाचन दुपारच्या जेवणानंतर, वामकुक्षी घेताना चालायचं. जागतिक नेत्यांची भाषणं, पंचवार्षिक योजना, मंत्र्यांचे उद्घाटन समारंभ, बॉम्बस्फोट वगैरे गोष्टींची त्रोटक का होईना माहिती मला असायचीच. रोज नियमित वृत्तपत्रं वाचण्याचा फायदा होता तो.

शुक्रवार आणि शनिवार ह्या दोन दिवशी ‘हिंदू’ हे वृत्तपत्र चाळताना माझे हात थरथरायचे. त्याच्या शेवटच्या पानावर वरच्या बाजूला जाहिरात असायची. ती पाहून माझं काळीज धडधडायचं. नलिनीचा फोटो आणि तिच्या कार्यक्रमाचे तपशील जाहिरातीमध्ये असायचे. संस्थेचं नाव आणि तिकीट दर दिलेले असत. दक्षिण भारतात ठिकठिकाणी कार्यक्रम असायचे. कधी सिलोन (श्रीलंका), पुढच्या आठवड्यात मुंबई किंवा दिल्ली असे तिचे सतत दौरे चालू असायचे. मनात तिच्याबाबत एक कटुता असल्याने तिचं माझ्याविना अडेलच असं वाटायचं, पण तसं काही झालं नव्हतं. उलट, तिचा प्रभाव घटण्याऐवजी वाढतच गेला होता. पहिल्या रांगेत मधोमध असलेल्या सोफ्यावर आता कोण बसत असेल? मी तर्जनीने खूण केल्यानंतर कार्यक्रम सुरू व्हायचा. आता मी नाही तरीही कार्यक्रमाला सुरुवात कशी काय होते? माझ्या इशाऱ्यानंतर कार्यक्रम संपायचा. आता तिला थांबवायला कोणी नाही. तिला नृत्य संपवायचं भानच राहत नसेल. तिच्यासोबतच्या कलाकारांची तिला थांबवण्याची हिंमत होत नसेल! कार्यक्रम लांबल्यामुळे गाडी चुकत असणार. त्या कल्पनेने मला मनापासून आनंद झाला. ती किती कार्यक्रम करतेय आणि त्यापासून तिला किती उत्पन्न मिळत असेल, केवळ हे पाहण्यासाठीच मी वृत्तपत्रांचं ते पान बारकाईने वाचायचो. हिशेब व्यवस्थित ठेवत असेल तर बरंय, नाहीतर एवढे शारीरिक व मानसिक क्लेश सहन करून कष्टाने मिळवलेला सारा पैसा कर भरण्यातच संपून जाईल! असे विचार माझ्या मनात गर्दी करायचे. खरं तर, ‘मणीने आता माझी जागा घेतली असेलच’ असा संशयही माझ्या मनात डोकावला असता आणि असं किल्मिष पचवणं माझ्या मनाला कठीणही गेलं असतं. परंतु सुदैवाने तुरुंगातील सुरुवातीच्याच काळात मणी मला भेटायला आला आणि त्यामुळे त्या क्लेशापासून मी वाचलो.

खरं तर तुरुंगवासात असताना मला भेटायला आलेली एकमेव व्यक्ती होती ती म्हणजे मणीच. बाकी माझे सारे तथाकथित मित्र, नातेवाईक यांना बहुधा माझा विसरच पडला असावा. मणीला फार दु:ख झालं होतं आणि त्याच्या चेहऱ्यावरील गंभीर व उदास भाव ते सर्व सांगून जात होते. परंतु जेव्हा मी त्याला, “तशी ही काही वाईट जागा नाहीये; शक्य असल्यास तूही इथे

येऊन जा," असं म्हटलं तेव्हा त्याचा चेहरा खर्रकन उतरला आणि त्यानंतर तो मला कधीच भेटायला आला नाही. त्या तीस मिनिटांच्या त्याच्यासोबतच्या भेटीदरम्यान त्याने बऱ्याच बातम्या दिल्या - नलिनी मालगुडी सोडून कायमची निघून गेली होती; आता ती मद्रासला राहत असून तिचं आयुष्य सुरळीत चाललं आहे. जाण्यापूर्वी तिने मणीला हजार रुपये बक्षीस म्हणून दिले. तिला निरोप देण्यासाठी तिच्या चाहत्यांनी स्टेशनवर एकच गर्दी केली होती. शंभरच्या वर हारच मिळाले असावेत. मालगुडी सोडण्यापूर्वी तिने अत्यंत पद्धतशीररीत्या सर्व घेणेकऱ्यांची यादी बनवून सर्व पैसे फेडून टाकले. बंगल्यातील सर्व फर्निचर, अन्य सामान लिलावात विकण्यासाठी देऊन टाकलं. केवळ एकच वस्तू तिने आपल्यासोबत नेली - मार्कोचं पुस्तक. मद्याच्या कपाटाचं कुलूप तोडून तिने आतल्या साऱ्या बाटल्या फेकून दिल्या होत्या. तेव्हाच बाटल्यांमागे लपवलेलं पुस्तक तिला सापडलं होतं. अगदी काळजीपूर्वक ती ते पुस्तक घेऊन गेली होती.

हे ऐकून मी अगदी बालिशपणे ओरडलो, "पण ते माझं पुस्तक होतं. तिने का नेलं?" एवढंच बोलून मी थांबलो नाही. "आपण फारच परिणामकारक प्रयोग सादर केला असं वाटलं असेल तिला!... झाला का फायदा? तो खूश झाला असेल ना?" माझ्या स्वरात विखार भरला होता.

"पण तो तिथे नव्हताच. दोघं एकमेकांना भेटलेच नाहीत," मणी म्हणाला. "खटल्याचा निकाल लागल्यानंतर दोघंही आपापल्या गाडीत बसून निघून गेले. मॅडम घरी आल्या. मार्कोसाहेब स्टेशनकडे गेले."

"हे ऐकून बरं वाटलं. थोडा तरी स्वाभिमान दाखवला तिने. त्याचे पाय पकडायला गेली नाही..." माझा राग किंचित कमी झाला.

मी नुकताच तुमच्या आईंना भेटलो. गावीच असतात त्या. ठीक आहे त्यांची प्रकृती." मणीने बातमी दिली. निकालाच्या दिवशी ती न्यायालयात हजर होती. हा माझ्या 'तारखाबहाद्दर' वकिलाचा आगाऊपणा! तो अजूनही अत्यंत यातनादायक आणि प्रदीर्घ काळ चालू असलेलं सैत

प्रकरण हाताळत होता. मद्रासहून नामवंत वकील माझी केस लढवायला आले, तेव्हा तर हे तारखाबहाद्दर वकील कमालीचे चेकाळून गेले होते. त्यांना ही गोष्ट फारच खळबळजनक वाटत होती.

त्याच उत्साहाच्या भरात स्वत: गावाला जाऊन ते आईला घेऊन आले! त्यामागे त्यांचा काय हेतू होता ते देवालाच ठाऊक! मला कोर्टात पाहून आई हादरून गेली होती. रोझी आईला पाहून तिच्याजवळ गेली. ती काही बोलणार तोच आई कडाडली, “झालं तुझं समाधान? त्याला पुरतं बरबाद केलंस... बरं वाटलं आता?” आईच्या डोळ्यांतील अंगार पाहून रोझीला धक्का बसला. तशीच काही न बोलता ती मागे सरकली. दुपारी जेवणाच्या सुट्टीत आईनेच ही गोष्ट मला सांगितली. कोर्टात पाय ठेवायचा प्रसंग पूर्वी कधीच आईवर आला नव्हता. एकूणच वातावरणामुळे ती दबून गेली होती. मी जवळ गेलो तशी ती भावनावेगाने म्हणाली, “काय केलंस हे, राजू? स्वत:बरोबर आम्हा सर्वांचीच अब्रू धुळीला मिळवलीस. लाज वाटते मला. लहानपणी न्यूमोनिया झाला होता तुला. मरणाच्या दारात होतास. तेव्हाच मेला असतास तर बरं झालं असतं. हे बघायला लागलं नसतं...” एवढंच बोलून ती स्फुंदून रडू लागली. तशीच अश्रू ढाळत ती निघून गेली. कोर्टाचा निर्णय ऐकायला थांबलीच नाही ती.

# ११

पहाटे पर्यंत राजू आपली जीवनकहाणी सांगत होता. दूरवरून कोंबड्याच्या आरवण्याचा आवाज ऐकू आला. दगडी पायऱ्यांवर बसलेला वेलन संपूर्ण रात्रभर पुतळ्यासारखा स्तब्धपणे ऐकत राहिला. सतत बोलून राजूचा घसा दुखत होता. गावात अजूनही जाग दिसत नव्हती. वेलनने भलीमोठी जांभई दिली. पण तेवढ्यापुरतंच तोंड उघडून तो पुन्हा मुकाट बसून राहिला. राजूने जन्मापासून ते तुरुंगातून बाहेर पडेपर्यंतच्या आयुष्यातील सर्व बारीकसारीक घटना - काहीही न वगळता - वेलनसमोर उलगडल्या होत्या. आपले अपराध ऐकून वेलनला आपला तिरस्कार वाटेल, तो आपला धिक्कार करेल ह्याविषयी राजूला जराही शंका नव्हती. 'तू सज्जन आहेस, देवमाणूस आहेस असं वाटलं होतं. हे तुझं खरं स्वरूप आहे तर! चांगलंच फसवलंस आम्हाला. तुझ्यासारख्या पापी माणसाने प्रायश्चित्त घेतलं तर पावसाचे दोन-चार थेंब पडायचे तेही पडणार नाहीत. धक्के मारून हाकलून देण्यापूर्वीच चालता हो इथून.'

वेलन असंच काहीतरी म्हणेल आणि एक प्रकारे सामोऱ्या आलेल्या संकटातून आपली मुक्तता करेल, या अपेक्षेने राजू वेलनच्या बोलण्याची वाट पाहत होता. यापूर्वी एका न्यायालयाने त्याला दोषी ठरवलं होतं. आता वेलनच्या रूपाने जणू दुसरा न्यायाधीश समोर होता आणि राजू आरोपी म्हणून त्याच्या निकालाची मोठ्या अस्वस्थतेने वाट पाहत होता.

पण हे न्यायाधीशमहाराज अधिकच कडक आहेत असं दिसलं. निकाल देण्यास फारच वेळ लावत होते. वेलन काहीच हालचाल करत नाही हे पाहून तो झोपी गेलाय असं राजूला वाटायला लागलं.

न्यायाधीशमहाराज वेळकाढूपणा करताहेत हे पाहून वकिलाने प्रश्न करावा तसं राजूने विचारलं, "मी काय म्हणालो हे नीट ऐकलंय ना?"

अखेर वेलनने तोंड उघडलं.

“होय, स्वामी,” तो म्हणाला.

तो अजूनही आपल्याला ‘स्वामी’ म्हणतोय हे ऐकून राजूला धक्का बसला. “मग ह्यावर तुझं काय म्हणणं आहे?”

उत्तर देताना वेलनला फारच वेदना झाल्या, “स्वामी, आपण हे सारं मला का सांगितलंत? माझ्यासारख्या य:कश्चित सेवकाला हा मान दिलात, मी धन्य झालो. आपण फार दयाळू आहात, स्वामी,” तो भावनावेगाने म्हणाला.

त्याचे हे आदराने ओथंबलेले शब्द बाणासारखे राजूच्या काळजात घुसले. ‘ह्याचा अर्थ हा माझा पिच्छा सोडणार नाही. माझी पुरती वाट लावल्याशिवाय स्वस्थ बसेल असं वाटत नाही,’ राजू अत्यंत निराश होऊन विचार करत होता.

सखोल विचारान्ती न्यायाधीशमहाशय आसनावरून उठले. “मी आता घरी जातो. सकाळची कामं आटोपून परत येईन. आपण बोललात त्याविषयी कोणालाही काहीही कळू देणार नाही,” आपले शब्द अधिक परिणामकारक व्हावेत म्हणून वेलनने छाती ठोकली आणि नाटकीपणे म्हणाला, “माझ्या हृदयात उतरलंय तुमचं बोलणं आणि ते कायम तिथेच राहील.” एवढं बोलून त्याने राजूला लवून नमस्कार केला आणि पायऱ्या उतरून तो नदीतीरावरून निघून गेला.

दुष्काळी परिस्थितीची पाहणी करून उपाययोजना सुचवण्यासाठी सरकारने एक समिती नेमली. समितीबरोबर एक बातमीदारही होता. गावात त्याने ‘स्वामीं’ विषयी ऐकलं. त्यांना भेटण्यासाठी तो नदीपल्याडच्या मंदिरात गेला. तिथे सर्व माहिती मिळवल्यानंतर त्याने मद्रासच्या आपल्या वृत्तपत्रात बातमी दिली : ‘स्वामीं’च्या तपश्चर्येमुळे दुष्काळ संपणार...’ हा मथळा आणि थोडक्यात वृत्तांत छापून आला.

इथून सर्व प्रकाराला सुरुवात झाली.

लोकांमध्ये ह्या बातमीमुळे कुतूहल निर्माण झालं. वृत्तपत्राच्या कचेरीमध्ये अधिक तपशिलासाठी चौकशा सुरू झाल्या. अखेर त्या बातमीदाराला परत गावाला पाठवण्यात आलं. 'उपोषणाचा पाचवा दिवस' मथळ्याखाली त्याने सविस्तर बातमी पाठवली. स्वामीजींची दिनचर्या कशी असते ह्याचं वर्णन बातमीत होतं - स्वामीजी रोज सकाळी नदीतीरावर येतात. उगमाकडे चेहरा करून सहा ते आठ ह्या वेळात ते पात्रामध्ये गुडघ्याएवढ्या पाण्यामध्ये उभे असतात. नेत्र बंद करून, हात जोडून देवाची प्रार्थना करतात. अर्थात दुष्काळामुळे गुडघाभर पाणी जमणं अतिशय कठीण गोष्ट झालेली आहे. स्वामीजींना उभं राहण्यासाठी गावकऱ्यांनी पात्रामध्ये खड्डा खणला आहे. दूरदूरच्या विहिरींमधून पाणी आणून हा खड्डा भरला जातो. महात्मा दोन तास उभं राहून तपश्चर्या करतात. त्यानंतर सावकाश पायऱ्या चढून ते मंदिराच्या गाभाऱ्यात येतात. तिथे ते चटईवर पडून राहतात. त्यांचे भक्तगण सतत त्यांना वारा घालत असतात. खूप गर्दी असते. पण स्वामीजी विचारमग्न असतात. त्यांचं कोणाकडेही लक्ष नसतं. स्वामीजींनी पूर्णपणे अन्नत्याग केलेला आहे. आपली तपश्चर्या सफल व्हावी ह्यासाठी ते कायम ध्यानधारणा करत असतात. पडल्या पडल्या डोळे मिटून त्यांचं चिंतन चालू असतं. महान स्वामीजींच्या पवित्र सान्निध्यात राहण्यासाठी गावकऱ्यांनी सारी कामंधामं सोडून मंदिरात आश्रय घेतला आहे. स्वामीजी निद्राधीन असले तरीदेखील गावकरी शांतपणे त्यांची राखण करत बसलेले असतात. एवढी गर्दी असूनही कसलाही कोलाहल, गोंधळ नसतो. शांतता पाळली जाते.

रोज गर्दी वाढतच होती. मंदिराभोवती कायम गजबज असायची. पोरंबाळं हुंदडायची. बायाबापड्या भांडीपुंडी, लाकडं, धान्य, पिठं घेऊन यायच्या. तिथेच नदीकिनारी चुली मांडून नवरा-मुलांसाठी स्वयंपाक रांधायच्या. वरवर चढणाऱ्या धुराच्या वळणदार रेषा नदीच्या दोन्ही किनाऱ्यांवर, उतारावर दिसत असायच्या. जत्रा भरलीय असं चित्र दिसायचं. स्त्रियांच्या रंगीबेरंगी साड्या उठून दिसायच्या, पुरुषदेखील सणासमारंभात घालावेत तसे कपडे घालून

आलेले असत. गाडीला जुंपलेले बैल चरायला मोकळे सोडल्यावर त्यांच्या गळ्यातील घुंगुरमाळांचा खुळखुळाट कानी पडे. नदीच्या पात्रात ठिकठिकाणी खोदलेल्या खड्ड्यांमधून पाणी जमायचं. ते भरण्यासाठी लोकांची झुंबड उडायची.

गाभाऱ्यातून राजूला हे दृश्य दिसायचं. घराघरातून धूर निघतोय याचा अर्थ त्याला लागत होता - स्वयंपाक बनतोय, मग सारे मस्त जेवतील. काय खात असतील बरं? भात, त्यावर गरम तूप. आणि भाजी कसली असेल? दुष्काळात भाज्या कुठून मिळणार? असले विचार करून राजू तळमळायचा.

वास्तविक हा त्याच्या उपोषणाचा चौथा दिवस होता. पहिल्या दिवशी त्याने लपवून ठेवलेलं शिळं अन्न चोरून खाल्लं होतं. आदल्या दिवशीचा ताक-भात आणि थोडी भाजी त्याने ॲल्युमिनियमच्या भांड्यात घालून आतल्या गर्भागारात खांबामागे लपवून ठेवलं होतं. ते खाण्याची संधी त्याला मिळाली हे त्याचं सुदैवच म्हणायचं. पहिल्या दिवशी विशेष गर्दी नव्हती. वेलनला काही काम असल्याने तो घरी गेला. पण स्वामींच्या सेवेसाठी दोघांना ठेवलं होतंच. स्वामी चटईवर पहुडले होते आणि दोघंही मोठ्या प्रेमाने त्यांना वारा घालत बसून होते. दिवसभराच्या उपवासाने स्वामींना अशक्तपणा जाणवू लागला. अखेर भुकेने कळवळून ते दोघांना म्हणाले, "तुम्ही झोपा हवं तर. मी आलोच. काम आहे जरा," असं म्हणून ते खरोखरच महत्त्वाचं काम असावं अशा पद्धतीने आतल्या गाभाऱ्यात गेले.

'कुठे जातो, कशाला जातोय, किती वेळ लागेल हे सर्व कोणालाही सांगायची गरज नाही,' राजूला सगळ्याचाच वैताग आला होता. जराही एकांत मिळत नव्हता. सतत सर्वांची नजर त्याच्यावर असायची. कायम चोरासारखी पाळत ठेवायचे! गर्भागारात एका खोपट्यात लपवलेलं भांडं त्याने घाईघाईने बाहेर काढलं. तिथेच खांबाच्या आडोशाला बसून ताकभात बकाबका खाल्ला. मोठमोठ्या तीन-चार घासांतच संपला भात. दोन दिवसांच्या शिळ्या भाताला पातेल्याचा वास येत होता. सुकून कडकडीत झाला होता; पण भुकेल्या पोटी राजूला तसाही

भात चांगलाच लागला. फडफडीत भात गिळून राजू वरती पाणी प्यायला. मग हळूच मागच्या बाजूला जाऊन त्याने तोंडही स्वच्छ धुतलं. उगीच भाताचा वास यायला नको.

गुपचूप सारं उरकून राजू पुन्हा चटईवर आडवा झाला. मनात उलटसुलट विचार चालू होते. एकूण प्रकाराची त्याला घृणा वाटायला लागली. काय चाललंय हे? हॉलमध्ये लोकांची दाटी झालेली पाहिल्यानंतर चौथऱ्यावर चढून मोठ्याने ओरडावं, लोकांना सांगून टाकावं, 'निघा इथून, चालते व्हा. मला त्रास देऊ नका. मी कोण तुम्हाला वाचवणारा? तुमच्या नशिबात बरबाद होणं असेल तर कोणतीही शक्ती तुम्हाला वाचवू शकणार नाही. मला महात्मा बनवून माझा छळ का करताय? उपास का करायला लावताय?' असं त्याला तीव्रतेने वाटायला लागलं होतं.

पण त्याचा काहीएक फायदा होणार नाही हे त्याला ठाऊक होतं. त्याचं बोलणं हे भोळसट गावकरी मनावर घेणारच नाहीत. तो विनोदाने बोलतोय म्हणून सारं हसण्यावारी नेतील ह्याची त्याला कल्पना होती. आता ह्यातून सुटका नाही हे मान्य केल्यामुळे उपवासाचा दुसरा दिवस काहीसा बरा गेला. पाण्यात उभा राहून काहीतरी पुटपुटताना सभोवताली भरलेली जत्रा तो आसुसलेल्या नजरेने बघत होता. रात्री पुन्हा आतल्या गाभाऱ्यात सटकला. भांड्यामध्ये काही उरलंसुरलं सापडतंय का हे पाहिलं. अर्थात काल आपण सारं चाटूनपुसून साफ केलंय ह्याची जाणीव असल्याने निराशा होणार हेही माहीत होतंच. तरीही राजूला एखाद्या लहान मुलासारखं 'काहीतरी चमत्कार घडेल,' असं वाटत होतं. नाहीतरी त्याचे भक्तगण त्याच्याकडून चमत्कारांची अपेक्षा करत होतेच की... 'मग त्याची सुरुवात ह्या भांड्यापासूनच करावी,' तो कडवटपणे स्वत:शीच म्हणाला. त्याला अशक्तपणा जास्तच जाणवायला लागला. अन्नाचा एकही कण न सापडल्यामुळे प्रचंड संताप आला. अखेरचा प्रयत्न म्हणून वेलनची मनधरणी करावी का? काहीतरी खायला दे म्हणून त्याच्याकडे भीक मागावी का? तोच आता मला वाचवू शकेल. पण सर्व कळलं तरी तो मूर्ख माझी पूजा करणं बंद करणार नाही. चिडून त्याने भांडं

थाडकन खाली फेकलं. बाहेर चटईवर जाऊन बसला. भांडं फुटलं असेल का? नाहीतरी आता त्याचा उपयोग नाहीच. एवढं जपून ठेवायचं काय कारण... वेलनने नम्रपणे विचारलं, “स्वामी, आवाज कसला होता?”

“रिकामं भांडं होतं. तू ती म्हण ऐकली नाहीस का, रिकामं भांडंच जास्त आवाज करतं?”

वेलन विनयाने माफक हसला. मग कौतुकभरल्या स्वरात म्हणाला, “स्वामी, तुमच्या डोक्यामध्ये किती चांगले विचार आणि महान तत्त्वज्ञान भरलेलं आहे.”

हे ऐकून बरं वाटण्याऐवजी राजू वैतागलाच. वेलनकडे त्याने रागीट कटाक्ष फेकला. ‘हा माणूस जबाबदार आहे माझ्या आजच्या ह्या परिस्थितीला...’ नदी पार करताना ह्याला मगरीने गिळलं असतं तर सगळेच प्रश्न मिटले असते. पण ती बिचारी मगरही पाण्याविना तडफडत मरून गेली. मेलेली मगर सापडल्यावर अफवांना ऊत आला होता. तिचं पोट फाडल्यावर आत खजिनाच मिळाला होता. जवळजवळ दहा हजार रुपयांचे दागदागिने सापडले होते. म्हणजे ती मगर फक्त स्त्रियांनाच खायची की काय? पण नाही - थोड्या तपकिरीच्या डब्या आणि पुरुष कानात घालतात तशा भिकबाळ्याही मिळाल्या. हा खजिना कोणाच्या मालकीचा असा प्रश्न उपस्थित झाला. सरकारला तर मुळीच खबर मिळायला नको. कुठेही गुप्तधन मिळालं की मायबाप सरकार त्यावर हक्क सांगतं. अखेर मगरीच्या पोटामध्ये फारसं काही सापडलं नाही असं सर्वानुमते जाहीर करण्यात आलं! ज्याने पोट फाडलं तो मालामाल झाला. जन्मभराची ददात मिटली त्याची. पण त्याला कोणी परवानगी दिली पोट फाडायची! अशा वेळी कोण परवानगीची वाट पाहतं म्हणा! गावकऱ्यांनी सगळं प्रकरण दाबून टाकलं होतं.

त्याला वारा घालता घालता वेलन स्वतःच झोपी गेला. पाय पोटाशी घेऊन. हातात पंखा. राजूला भुकेपोटी झोप लागत नव्हती. वाईटसाईट विचारांनी मन भरकटत होतं. बसल्या जागीच झोपी गेलेल्या वेलनला पाहून राजूचं मन अचानक भरून आलं. राजूची तपश्चर्या यशस्वी व्हावी म्हणून बिचारा किती धडपडत होता. स्वामींची सर्वतोपरी सेवा करत होता. त्यांना हरतऱ्हेने

आराम मिळावा म्हणून सदैव उभा असायचा. एकच कमी होती - त्यांना खायला देत नव्हता! अचानक राजूच्या मनात विचार आला, 'सारखं भूक, खाणं, जेवणं ह्याची आठवण करून दु:खी होण्यापेक्षा वेलनच्या मनासारखं करून बघू या. मी उपास करावा असं वाटतंय ना त्याला, ठीक आहे. आत्तापासून खाण्याचा विचार बंद.' सतत तेच विचार करणाऱ्या स्वत:चाच राग आला. स्वत:वरच सूड उगवावा तशी त्याने प्रतिज्ञाच केली - ह्यापुढे अन्नग्रहण नाही. पुढचे दहा दिवस जीभ आणि पोट ह्या दोन अवयवांना विचारांमधून हद्दपार करायचं. खाण्याविषयीचे सर्व विचार पळवून लावायचे. वेलनसाठी एवढं करायचंच. शिवाय आपलं मनोबलही अजमावून बघायचं.

हे ठरवल्यानंतर राजूला खरोखरच ताकद आल्यासारखं वाटू लागलं. 'माझ्या उपोषणामुळे खरोखरच पाऊस आला तर चांगलंच आहे ना... पानं, फुलं, वृक्ष, वेलींना जीवदान मिळणार असेल, चोहीकडे हिरवाई पसरणार असेल तर मी मनापासून उपोषण करेन. नाही खाणार तोपर्यंत...' राजूच्या मनात एक वेगळीच ऊर्जा निर्माण झाली. आयुष्यात प्रथमच त्याने गंभीर, चांगला निर्णय घेतला होता. आजवर पैसा आणि प्रेम ह्या दोन गोष्टींव्यतिरिक्त त्याने आयुष्यात अन्य कोणत्याही गोष्टीला महत्त्व दिलं नव्हतं. कोणताही स्वार्थ नसताना, केवळ इतरांसाठी काही करण्याची, त्यासाठी दु:ख सहन करण्याची त्याची ही पहिलीच वेळ होती. त्याच्यासाठी ही सर्वस्वी नवीन अनुभूती होती आणि त्यामुळे मनाला अशी शांती मिळते हे ज्ञानही पहिल्यांदाच मिळालं. अचानक त्याची सर्व मरगळ नाहीशी झाली. उत्साह, एक प्रकारच्या शक्तीने अंगांग भरून गेलं. उपोषणाचा बाऊ वाटेनासा झाला. चौथ्या दिवशी त्याला फारच छान हलकंफुलकं, आनंदी वाटत होतं. तो झपाट्याने पायऱ्या उतरून नदीच्या पात्रात उभा राहिला. डोळे मिटून, हात जोडून मोठ्या भक्तिभावाने ईश्वराची प्रार्थना म्हणायला त्याने सुरुवात केली. 'पाऊस पडू दे... मानवजातीला दुष्काळापासून वाचव...' अशा अर्थाची होती ती. संथ, सुंदर लयीत गीताची आवर्तनं करताना त्याला एक प्रकारची गुंगी यायला लागली. हलके हलके सभोवतालच्या दुनियेचं भान नाहीसं झालं. साऱ्या संवेदना विरल्या. थंड पाण्यामुळे पाय बधिर झाले होतेच. चार दिवस अन्नाचा कणही पोटात गेला नसल्याने त्याला हलकेपणा वाटत होताच. हळूहळू

आपण तरंगायला लागलोय असं राजूला वाटायला लागलं. वजनरहित अवस्थेत अलगद विहरताना राजूला आनंदाची परमावधी झाली. 'हा अपार आनंद, सर्वार्थाने जाणवणारी शांती... कोणालाही, वेलनलासुद्धा माझ्यापासून हिरावून घेता येणार नाही. केवळ माझी कमाई आहे ही.'

स्वामींच्या दर्शनासाठी जनसागर उसळला होता. कानाकोपऱ्यातून लोकांच्या झुंडी येत होत्या. राजूचं कशाकडेही लक्ष नसे. त्याच्या अंतर्मनाची कवाडं खुली झाल्यापासून बाह्य जगाचं भान कमी होत गेलं. वृत्तपत्रात बातमी छापून आल्यानंतर हे नगण्य खेडेगाव प्रसिद्धीच्या झोतात आलं होतं. येणाऱ्या लोकांसाठी अखेर रेल्वेला जादा गाड्या सोडाव्या लागल्या. तरीही डब्यांच्या टपावरून, लोंबकळून प्रवास करणाऱ्यांची संख्या कमी झाली नाही. लहानसं मालगुडी स्टेशन प्रवाशांनी खचाखच भरलेलं असायचं. तिथून मंगला गावासाठी खास बससेवा चालू होती. 'चला, चला, मंगलासाठी खास बस सुटतेय. घाई करा...' असा कंडक्टरांचा पुकारा सतत चालू असे. बस पकडण्यासाठी पळापळ, रेटारेटी व्हायची. एवढी गर्दी असे की लोक जवळजवळ एकमेकांच्या मांडीवर बसलेले असत. गफूरच्या मालगुडी ते मंगल अशा दहा-बारा फेऱ्या होत. लोक नदीकिनारी, पायऱ्यांवर, दगडधोंड्यांवर जागा मिळेल तिथे बसून घेत.

बघावं तिथे माणसं! ह्या भागात अशी गर्दी ह्यापूर्वी कधीही जमली नव्हती. अभूतपूर्व दृश्य होतं ते. जादू व्हावी तशी एका रात्रीत छोट्या टपऱ्या उभ्या राहिल्या. रंगीत सोडा बाटल्या, केळ्यांचे घड, नारळ बर्फी विकत घेण्यासाठी भरपूर गिऱ्हाइकं मिळायची त्यांना. द टी प्रोपगँडा बोर्डने तर मोठा स्टॉलच उघडला होता. चहाचा प्रचार करणारी पोस्टर्स मंदिराच्या भिंतींवर चहूबाजूंनी डकवली होती. निलगिरीच्या उतारावरील हिरव्यागार चहामळ्यांची सुंदर चित्रं पोस्टरवर होती. (ह्या भागातील लोक चहापेक्षा कॉफीला जास्त पसंती देत. चहाचा प्रचार करण्यासाठी ही सुसंधी होती.) टी-बोर्डाने टी-बार उघडला. चिनी मातीच्या कपांमधून फुकट चहा देत असल्याने लोकांची झुंबड उडायची. तशीच माश्यांचीही झुंबड चहाच्या कपांवर, साखरेच्या भांड्यांवर पडायला लागली. माश्या म्हणजे रोगांना आमंत्रण. त्यामुळे आरोग्य खातं

जागं झालं. प्रचंड गर्दी, पाण्याचं दुर्भिक्ष आणि भरपूर माश्या ह्या युतीमुळे रोगाच्या साथी सुरू व्हायची शक्यता होती. खाकी गणवेशातील आरोग्य अधिकारी कानाकोपऱ्यात ‘डीडीटी’चे फवारे मारत. कॉलरा, मलेरिया आणि तत्सम रोगप्रतिबंधक इंजेक्शन्स घ्यावीत म्हणून लोकांची मनधरणी करत हिंडायचे. काही शूर तरुण मंडळी लशी टोचून घ्यायची. बाकी जनता ‘आ’ वासून बघायची. देवळाच्या बाजूला मोकळी जागा साफसूफ करून लोकांना बसण्यासाठी व्यवस्था केली होती. तिथे आरोग्यखातं संध्याकाळी अंधार झाल्यानंतर माहितीपट दाखवायचे. लोकांना आकर्षित करण्यासाठी लाऊडस्पीकरवरून लोकप्रिय गाणी दिवसभर वाजवली जायची. सुकलेल्या झाडांच्या शेंड्यांवर हे भोपू लटकवलेले असायचे. डास, मलेरिया, प्लेग, क्षय प्रतिबंधक टिका अशा अत्यंत मनोरंजक विषयांवरचे अनुबोधपट पाहण्यासाठी बायका, पुरुष आणि कच्चीबच्ची मोठ्या उत्साहाने गर्दी करत. मलेरियाला कारणीभूत असलेल्या डासाचा क्लोजअप पाहून एक शेतकरी मोठ्या अचंब्याने म्हणाला, “अरे बापरे! एवढे मोठे डास! म्हणूनच बाहेरच्या देशातील लोकांना मलेरिया होत असणार. आपल्याकडले डास तर किती लहान असतात. त्यांच्यामुळे मलेरिया होणं शक्य नाही.” मलेरियावर माहितीपर भाषण देणाऱ्या अधिकाऱ्याला हे ऐकून निराशेचा असा काही झटका आला की, पुढील दहा मिनिटं त्याच्या तोंडातून शब्दही फुटला नाही! आरोग्यावरील माहितीपट दाखवून झाल्यानंतर धरणं, नद्या, अन्य विकास योजना ह्यावरील फिल्म दाखवल्या जात. मंत्र्यांची भाषणंही ऐकायला मिळत. दूरवर एका चलाख माणसाने डार्ट-बोर्डचा स्टॉल खोलला होता. कामचलाऊ मेरी-गो-राउंडदेखील दिवसभर गरगरत असायचं. तऱ्हतऱ्हेच्या वस्तू विकणारे फेरीवालेही हिंडत असायचे. फुगे, शिट्या, लिमलेटच्या गोळ्या असं काहीबाही मिळायचं त्यांच्याकडे.

स्वामींच्या भोवती नेहमीच प्रचंड गर्दी असे. चेहऱ्यावर कमालीचा आदर, किंचित भीतीही दिसून यायची. स्वामीजींच्या चरणांजवळचं पाणी ते भक्तिभावाने आपल्या मस्तकावर शिंपडत. स्वामीजी नदीच्या पात्रात उभे असायचे तोपर्यंत त्यांचे भक्तदेखील तिथून हलायचे नाहीत. अखेर मुख्य संयोजक वेलन त्यांना विनंती करायचा, “कृपा करून जा आता. स्वामींना मोकळी जागा

द्या. तुमचं दर्शन घेऊन झालं ना? आता दुसऱ्यांनादेखील जागा द्या. त्यांनाही दर्शन घ्यायचंय. स्वार्थीपणा बरा नाही." भाविक नाइलाजाने बाजूला व्हायचे. त्यांची जागा घेण्यासाठी दुसरा गट तयार असायचाच. दर्शन घेऊन झालं की लोक जत्रेचा आनंद लुटायला मोकळे होत!

स्वामी चटईवर पहुडल्यानंतर पुन्हा हीच तऱ्हा असायची. तिथेही लोक कोंडाळं करून त्यांच्याकडे कौतुकभरल्या नजरेने पाहत राहायचे. वेलनने 'जा' म्हणेपर्यंत ते हलायचे नाहीत. काही मोजक्या भाग्यवंतांना महात्मा स्वामीजींच्या जवळ बसायचं सौभाग्य प्राप्त होत असे. त्यांच्यापैकी एक होते शाळामास्तर. स्वामींना यश मिळावं ह्यासाठी देशाच्या कानाकोपऱ्यातून सदिच्छा संदेश, तारा, पत्रं येत होती. मंगलामधील पोस्ट ऑफिस गावाला शोभेसं होतं - लहानसं, आठवड्यातून फक्त एकदा पोस्टमन फेरी मारायचा. कधी तार आलीच तर सात मैलांवरच्या अरुणा गावातल्या पोस्टामध्ये घेतली जायची. हे गाव मंगलापेक्षा थोडं मोठं होतं. मंगला गावात जाणारं कोणी भेटलं तर तार रवाना केली जायची! ह्याच मंगला गावातील पोस्ट ऑफिसला आता क्षणाचीदेखील उसंत मिळायची नाही. रात्रंदिवस पत्रं, तारांचा वर्षाव चालू होता. पत्रांवर नाव असायचं 'स्वामीजी!' बस एवढंच. तासागणिक पत्रांचा ढीग वाढतच असायचा. बटवड्यासाठी खास माणसं नेमली होती. तिथून पाठवल्या जाणाऱ्या तारा, पत्रांची संख्याही खूप वाढली होती. संपूर्ण जगातले वार्ताहर मंगलामध्ये ठाण मांडून होते. तासागणिक ते आपापल्या वृत्तसंस्थेला वृत्तांत पाठवत असायचे. प्रत्येकजण अत्यंत आक्रमक आणि आग्रही होता. गरीब बिचारे पोस्टमास्तर त्यांना टरकून असायचे. पोस्टाच्या खिडकीवर दणादण थापा मारून वार्ताहर ओरडायचे, "अर्जंट! आत्ताच्या आत्ता गेलं पाहिजे. पाकिटं, फोटो फिल्म, फोटो असं काहीतरी, जराही विलंब न करता गेलं पाहिजे. ऑफिसला आज पोचलं नाही तर..." त्यांच्या धमक्या ऐकून पोस्टमास्तरांना घाम फुटायचा.

'बातमीदार,' एकदम अर्जंट... लगेच गेलं पाहिजे' त्यांच्या धमकावणीच्या सुरांमुळे आधीच घाबरलेले पोस्टमास्तर गर्भगळीत व्हायचे. "स्वामीजींच्या दर्शनाला घेऊन जाईन," असं त्यांनी

आपल्या मुलांना कबूल केलं होतं. मुलंही खूश झाली होती. “अलिबाबाचा सिनेमापण दाखवताहेत. मित्राने सांगितलंय,” ती उत्साहाने ओरडली. पण श्वास घ्यायलाही फुरसत नसलेल्या पोस्टमास्तरांना मुलांकडे लक्ष द्यायला वेळच नव्हता. वार्ताहरांचं काम संपेतो येणाऱ्या तारांचं कडकट्ट सुरू हाई! आजपर्यंत फारच शांत, सुस्त आयुष्य गेलं होतं. विशेष कामच नसायचं. आता अचानक कामाचा ताण प्रचंड वाढला, तो त्यांना झेपेना. कामातून जराशी उसंत मिळाली की ते जिवावर उदार होऊन वरिष्ठ अधिकाऱ्यांना ‘अर्जंट’ संदेश पाठवायचे - “रोज दोनशेच्या वर पत्रं, तारांचा फडशा पाडायला लागतोय. कृपया मदत पाठवा.”

बैलगाड्या, बस, सायकली, जीप, गाड्या अशा वेगवेगळ्या तऱ्हेच्या, आकाराच्या वाहनांनी रस्ते खचाखच भरलेले असायचे. टोपल्या, पेट्या घेऊन पायी निघालेल्या वाटसरूंच्या रांगा दिसायच्या. सर्वांचं एकच लक्ष्य होतं - स्वामीजी! साखरेच्या दाण्यासाठी शिस्तीत तुरुतुरु चालणाऱ्या मुंग्यांप्रमाणे दिसायच्या ह्या लोकांच्या रांगा! काहीजण स्वामीजींजवळ भजनं म्हणत बसायचे. साथीला पेटी आणि तबलाही असायचा.

ह्या सर्व भाऊगर्दीमध्ये एका अमेरिकन व्यक्तीची भर पडली. उपोषणाचा दहावा दिवस चालू होता. हे महाशय जीपमधून आले. धुळीने माखलेल्या जीपच्या मागे ट्रेलरही जोडलेला होता. पातळ कापडाचा बुशशर्ट, कॉर्डरॉयची पँट, विस्कटलेले दाट केस असा त्याचा अवतार. दुपारी साधारण एक वाजता मंगला गावी पोचला असेल. येताक्षणी त्याने कामाला सुरुवात केली. मद्रासमधून त्याने आपल्याबरोबर एक दुभाष्याही आणला होता. ३७५ मैल जीप चालवून आल्यानंतरही जराही विश्रांती न घेता त्याने परिस्थिती ताब्यात घेतली. देवळामागे एका मोठ्या झुडुपाजवळ जीप थांबवली. टुणकन उडी मारून खाली उतरला आणि लांब ढांगा टाकत मंदिराकडे निघालादेखील. चटईवर पहुडलेल्या स्वामीजींजवळ जाऊन दोन्ही हात जोडले आणि म्हणाला, “नमस्ते.” भारतात आल्यावर सर्वप्रथम तो हाच शब्द शिकला होता. येथील

चालीरीती, संस्कृतीची माहितीही मिळवली होती. राजूने त्याच्याकडे निरखून पाहिलं. नेहमीच्या चेहऱ्यांमध्ये हा गुलाबी कांतीचा रांगडा परदेशी पाहुणा उठून दिसत होता.

स्वामींच्या बाजूलाच शिक्षक बसले होते. गुलाबी पाहुण्याने खाली झुकून त्यांना विचारलं, "त्यांच्याशी इंग्रजीमध्ये संभाषण करता येईल का?"

"होय, त्यांना इंग्रजी येतं."

मोठ्या कष्टाने तो खाली जमिनीवर मांडी घालून बसला. स्वामीजींच्या कानाशी लागून त्याने हलक्या आवाजात आपली ओळख करून दिली - "माझं नाव जेम्स जे. मॅलन. कॅलिफोर्नियाहून आलोय. फिल्म आणि टीव्ही शोचा निर्माता आहे मी. तुमच्यावर फिल्म बनवायची आहे. आमच्या देशातील लोकांनी ती बघावी असं वाटतंय. न्यू दिल्लीहून परवानगी मिळाली आहे. तसं पत्र आहे माझ्याजवळ. आपली परवानगी मिळेल का?" त्याने नम्रपणे विचारलं.

राजूने ह्यावर विचार केला, मग प्रसन्नपणे मान डोलावून संमती दिली.

"ठीक आहे. आपला आभारी आहे. आपले फोटो काढायचे आहेत, आपल्याला काही त्रास होणार नाही; पण काही सामान हलवलं तर चालेल का? लाईट, केबलसुद्धा लावायला लागतील. आपली हरकत नाही ना?"

"नाही, तुम्ही तुमचं काम करा. मला चालेल," ऋषिवर्य शांतपणे म्हणाले.

हे ऐकून तो ताडकन उठून भराभरा कामाला लागला. ट्रेलर आणून जनरेटर चालू केला. त्याच्या धडधडणाऱ्या आवाजाने बाकी सारे आवाज दबले गेले. बायका-पोरं आणि बाप्येदेखील धावत आले. जत्रेतील अन्य आकर्षणापेक्षा हे काम फारच भारी आणि वेगळं दिसत होतं. मॅलन केबल खेचत असताना बघ्यांचा घोळकाही मागोमाग हिंडत होता. मॅलनने त्यांच्याकडे पाहून भलंमोठं हास्य फेकलं आणि कामांकडे वळला. वेलन आणि एक-दोघे गर्दी पांगवायचा प्रयत्न

करत होते. "काय मासळीबाजार भरवलाय? तुमचं काय काम इथे? चला, निघा." त्यांच्या ओरडण्याकडे सर्वांनी दुर्लक्ष केलं. कोणी खांबावर चढलं, कोणी वरच्या पायऱ्यांवर, कोणी कुठे - सर्वांनी मोक्याच्या जागा पकडल्या. लोकांच्या माकडचेष्टांकडे मॅलनचं लक्ष नव्हतं. तो एकाग्रतेने आपलं काम करत होता. अखेर मनासारखे लाईट लावून झाले. कॅमेरा आत आणून बघ्यांचे, मंदिराचे आणि अर्थातच स्वामींचे वेगवेगळ्या अंतरावरून, निरनिराळ्या कोनांतून फटाफट फोटो घेत सुटला.

फोटोचं काम झालं. "स्वामी, लाईट फार तीव्र होता का? त्याबद्दल माफ करा," मुलाखत घेण्यासाठी त्याने माईक स्वामींच्या चेहऱ्याजवळ धरला, "आता थोड्या गप्पा मारू या. चालेल ना? कसं वाटतंय आपल्याला? आवडतंय का?'

"मी माझं कर्तव्य करतो आहे. माझी आवड-निवड महत्त्वाची नाही."

"अन्नग्रहण थांबवलंत त्या गोष्टीला किती दिवस झाले?"

"दहा दिवस."

"अशक्तपणा जाणवतोय का?"

"होय."

"उपोषण कधी थांबवणार?"

"बाराव्या दिवशी."

"तोपर्यंत पाऊस पडायला सुरुवात होईल असं वाटतंय का आपल्याला?"

"का नाही पडणार?"

"उपोषणामुळे सर्व युद्धं, लढाया संपतील आणि सर्व जगात शांतता प्रस्थापित होईल असं आपल्याला वाटतं?"

"नक्कीच."

"प्रत्येकाने उपोषण करावं असा संदेश आपण द्याल का?"

"होय."

"जातिव्यवस्थेविषयी सांगाल? अजूनही अस्तित्वात आहे का ती?"

"होय."

"आपल्या पूर्वायुष्याविषयी काही सांगाल का?"

"नेमकं कशाविषयी?"

"अं... उदाहरणार्थ, आपणामध्ये योगी पुरुषाचे गुण पूर्वीपासून होते का?'

"तसं म्हणायला हरकत नाही."

एवढ्या संभाषणानंतर स्वामींना थकवा वाटायला लागला. क्लांतपणे ते मागे रेलून बसले. वेलन आणि बाकीची मंडळी चिंताग्रस्त दिसू लागली. मास्तर गुलाबी अमेरिकनला म्हणाले, "स्वामी दमले आहेत."

"ठीक आहे. थोडा वेळ विश्रांती घेऊ दे त्यांना. त्रास झाला त्याबद्दल क्षमस्व."

स्वामी डोळे मिटून पडून राहिले. सरकारने स्वामींच्या तब्येतीवर लक्ष ठेवून वेळोवेळी माहिती देण्यासाठी दोन डॉक्टरांची नेमणूक केली होती. त्यांनी स्वामींची नाडी तपासली, हृदयाचे ठोके मोजले. नंतर त्यांना चटईवर व्यवस्थित झोपवलं. चोहीकडे गंभीर शांतता पसरली. वेलनने पंख्याने वारा घालायचा वेग वाढवला. अतिशय उदास, घाबरलेला दिसत होता वेलन. स्वामींना पाठिंबा दर्शवण्यासाठी वेलनही उपास करत होता. एक दिवसाआड जेवायचा तो. फक्त उकडलेल्या भाज्या - मीठविरहित- खायचा. तोही थकलेला दिसत होता. "अजूनही एक दिवस

जायचाय. कसा काढणार आहेत देव जाणे! आजच त्यांची अवस्था इतकी वाईट झालीय. आणखी एक दिवस निघणं फार मुश्किल दिसतंय," वेलन दु:खाने मास्तरांना म्हणाला.

मॅलन शांतपणे स्वामींना आराम वाटण्याची वाट पाहत होता. त्याने डॉक्टरांना विचारलं, "कशी आहे त्यांची तब्येत?"

"फार चांगली नाही. रक्तदाब कमी झालाय. एक किडनीही खराब झाली असावी. युरेमियाची सुरुवातही झालेली दिसते आहे. सलाईन आणि ग्लुकोज द्यायचा प्रयत्न करतोय. देशाला त्यांची गरज आहे.'

मॅलनने डॉक्टरपुढे माईक धरला. "स्वामींच्या प्रकृतिविषयी थोडं सांगाल का?"

गाभाऱ्याकडे जाणाऱ्या पायऱ्यांच्या कडेला दगडामध्ये हत्तीचं मस्तक कोरलं होतं. मॅलन महाशय त्याच्यावर स्थानापन्न झाले होते!

दोन्ही डॉक्टरांनी घाबरून एकमेकांकडे पाहिलं, "माफ करा. आम्ही सरकारी नोकर आहोत. सरकारच्या परवानगीशिवाय काहीही माहिती देता येणार नाही. आमचे अहवाल मुख्य कार्यालयातून प्रसिद्ध केले जातात. तुम्हाला सांगता येणार नाही. सॉरी."

"ठीक आहे. तुमचे नियम तोडणार नाही मी," मॅलन म्हणाला. मग घड्याळाकडे नजर टाकून म्हणाला, "मला वाटतं, आजच्यासाठी एवढंच पुरे." मास्तरांजवळ जाऊन त्याने विचारलं, "स्वामी उद्या सकाळी प्रार्थना करण्यासाठी किती वाजता नदीकिनारी जातील?"

"सहा वाजता."

"मला नेमकी ती जागा दाखवाल का?"

मास्तर त्यांच्याबरोबर निघाले. अमेरिकन म्हणाला, "छे, छे, असं नको. तुम्ही त्यांच्या बदली उभे राहाल का थोड्या वेळासाठी? स्वामी नेमके कुठून सुरुवात करतात, कसे उठतात, पायऱ्या उतरतात आणि कुठे उभे राहतात हे सगळं करून दाखवता का?"

हे ऐकून मास्तर गोंधळले. स्वामींची नक्कल करायची? त्या कल्पनेनेच त्यांना लाज वाटली. मॅलन त्यांना चुचकारत म्हणाला, "असं काय करता? थोडं सहकार्य करा ना. कोणी आक्षेप घेतला तर मी उत्तर देईन. तुम्ही काळजी करू नका."

हे ऐकून मास्तरांना थोडा दिलासा मिळाला. चौथऱ्यापासून त्यांनी चालायला सुरुवात केली. "स्वामी इथूनच निघतात. माझ्यामागे या," असं म्हणून त्यांनी नदीपर्यंत पोचण्याचा मार्ग दाखवला. स्वामी नदीत कुठे उभे राहतात, दोन तास कशी प्रार्थना करतात हे सर्व व्यवस्थित दाखवलं. बघ्यांचा घोळका पाठोपाठ होताच. मास्तरांचं बोलणं सारेजण लक्षपूर्वक ऐकत होते. गर्दीतल्या एकाने विनोद केला, "अच्छा! आमचे मास्तरही आता प्रायश्चित्त घेणार तर! उपोषणही करणार का?" सर्वांना विनोद आवडला. काहीही न कळूनही मॅलन सर्वांबरोबर हसला. तो मधून मधून सर्वांकडे हसून बघत होताच. प्रार्थनास्थळ त्याने वेगवेगळ्या कोनांमधून बारकाईने पाहिलं, जनरेटरपासून किती अंतरावर आहे हे मोजलं. मास्तरांचा हात हाती घेऊन त्यांचे आभार मानून तो जीपमध्ये बसला. 'उद्या सकाळी भेटू' असं म्हणून जीप चालू केली. इंजिनचा मोठा आवाज झाला. धडधडाट करत जीप खाचखळग्यांतून बाहेर पडली. मुख्य रस्त्याला लागेपर्यंत जीपचा खडखड आवाज ऐकू येत होता.

अकरावा दिवस. सकाळ झाली. उपोषणाचा अखेरचा दिवस असल्याने लोकांच्या झुंडी रात्रभर येत होत्या. स्वामींच्या दर्शनासाठी जनसागर लोटला. वाहनं, लोकांचे आवाज रात्रभर चालू होते. वेलन आणि त्याची फौज कोणालाही हॉलमध्ये प्रवेश करू देत नव्हती. "स्वामींना मोकळी हवा मिळू द्या. ते अन्न-पाणी घेत नाहीत. हवा एवढी एकच गोष्ट, ती तरी शुद्ध हवी ना? खेळती राहू दे हवा. नदीकिनारी त्यांचं दर्शन घ्या. तिथे सर्वांना व्यवस्थित दर्शन मिळेल ह्याची मी हमी देतो. आता स्वामींना विश्रांती घेऊ द्या." रात्रभर सारेजण डोळ्यांत तेल घालून स्वामींवर लक्ष ठेवून होते. असंख्य कंदील, गॅसबत्त्यांमुळे बाहेर झाडाझुडपांवर, भिंतींवर गूढ सावल्यांचा खेळ चालू होता.

पहाटे साडेपाच वाजता डॉक्टरांनी स्वामींना तपासलं. अहवालावर पुढीलप्रमाणे शेरा लिहिला : 'स्वामींची परिस्थिती गंभीर आहे. त्यांनी ग्लुकोज आणि सलाईनला नकार दिला. उपोषण तत्काळ थांबवायला हवं. सूचनांची वाट पाहत आहोत.' मुख्य कार्यालयाला अशी तार तातडीने पाठवण्यात आली.

अत्यंत महत्त्वाची सरकारी तार असल्याने अग्रप्रमाने तार गेली आणि लगेच तासाभरात तिचं उत्तरही आलं. तारेतील मजकूर पुढीलप्रमाणे होता - 'स्वामींचे प्राण वाचवणं अत्यंत महत्त्वाचं आहे. सहकार्य करावं ह्यासाठी त्यांचं मन वळवा. सलाईन आणि ग्लुकोज देण्यासाठी प्रयत्न करा. प्रकृतीमध्ये सुधारणा झाल्यानंतर पुन्हा उपोषण करण्यासाठी स्वामींना राजी करा.' दोघांनी स्वामींना तार वाचून दाखवली. स्वामींनी केवळ हलकंसं स्मित केलं. खूण करून वेलनला जवळ बोलावलं. डॉक्टरांनी अखेर वेलनला साकडं घातलं, "स्वामींना कमालीचा अशक्तपणा आलाय. कसंही करून त्यांनी अन्न प्राशन करायला हवं. जीव धोक्यात टाकून चालणार नाही. प्लीज, त्यांचं मन वळवा."

वेलन सैरभैर झाला होता. स्वामींच्या कानाशी तो हलकेच म्हणाला, "डॉक्टर म्हणताहेत..."

स्वामींनी वेलनला अधिक जवळ येण्याची खूण केली. क्षीण आवाजात त्याला म्हणाले, "मला उठायला मदत कर." वेलनने हात पुढे केला. त्याच्या दंडाला पकडून स्वामी सावकाश उठले, उठून उभे राहिले. पायांमध्ये त्राण नव्हतंच. वेलन आणि दुसऱ्या एकाने त्यांना दोन्ही बाजूंनी आधार दिला. मोठ्या कष्टाने एक एक पाऊल टाकत राजू नदीच्या दिशेने निघाला. जमाव अत्यंत शांतपणे त्यांच्या मागोमाग जात होता. कोणी एक शब्दही बोलत नव्हतं.

सूर्येदयाचा समय. पूर्व दिशेवर लालिमा पसरला होता. कुठेही पथारी टाकून झोपलेले अनेक लोक अजूनही निद्रादेवीच्या आधीन होते. राजू आणि त्याच्यामागे लोकांचा जमाव अशी यात्रा निघाली - संथ गतीने, शांतपणे... तेवढ्याही हालचालीमुळे राजू धापा टाकायला लागला. प्रत्येक पायरीवर थांबून श्वास घ्यायचा, धाप कमी झाली की पुढची पायरी... पण तो मोठ्या

निग्रहाने अखेर नदीपर्यंत पोचला. गेले दहा दिवस ज्या ठिकाणी पाण्यात उभं राहून तप केलं तिथे अखेर पाय रोवून उभा राहिला. डोळे बंद केले. दूरवरच्या पर्वतराजीकडे, नदीच्या उगमाच्या दिशेला चेहरा करून तो प्रार्थना म्हणायला लागला. ओठ हलत होते, पण शब्द बाहेर पडत नव्हते. केवळ त्या ईश्वरालाच ऐकू जात असणार...एकीकडे वेलन आणि दुसऱ्या बाजूला दुसरा, दोघांनीही मूकपणे राजूला आधार दिला होता.

हळूहळू सूर्य पर्वतशिखरांमधून डोकावून बघायला लागला. सारा आसमंत प्रकाशकिरणांनी उजळून निघाला. राजूला आधार देणं मुश्किल झालं होतं. आतापर्यंत मनोबलानेच उभा असलेला राजू खाली पडू नये म्हणून दोघांनीही त्याला लहान बाळासारखं घट्ट पकडलं होतं.

राजूने हलकेच डोळे उघडून सभोवताली नजर फिरवली. मग असीम आनंदभरल्या आवाजात म्हणाला, “वेलन, त्या तिथे डोंगरावर पाऊस पडतोय बघ. पावसाचं पाणी माझ्या पावलांना स्पर्श करतंय, हे बघ, वर चढतंय, पायावर...” एवढं बोलून तो खाली कोसळला.